म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ८०९

# [illegible]



# चरित्र आणि परंपरा

[illegible]

रा. चिं. ढेरे

REFBK-0010334

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
नं



शके १८७८ चें ‘ शंकराजी नारायण पारितोषिक ’
मिळालेला ग्रंथ

# श्रीगुरु गोरक्षनाथ

## चरित्र आणि परंपरा

### ★ नाथ संप्रदायाचा इतिहास ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४९०६ वि: चरित्र
क्रमांक ९०९ नों: दि: २०/६/५८

REFBK-0010334

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
90338

मूल्य साडेपांच रुपये

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

◆

प्रथमावृत्ति : शके १८८१

◆

सर्व हक्क लेखकाकडे : १९५९

◆

मुद्रक :

ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २.

श्री : १६

* * *

सौजन्यमूर्ति

श्रीमंत आबासाहेब मुजुमदार

यांस सादर समर्पण

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५१७६ वि: चरित्र
क्रमांक २०१ नों: दि: २०|८|५८

# अ नु क्र म णि का

प्रकाशकांचें निवेदन ७–८

लेखकाचें मनोगत ९–१०

निवडक संदर्भ-साहित्य ११–१६

१. नाथ संप्रदाय : उदय आणि विकास : १७–६६

मध्ययुगीन साधनेची गंगोत्री १७, उगमाची पार्श्वभूमि १८, उदयभूमीचा शोध २२, संप्रदायाचें नांव २८, सिद्धान्त ३५, साधना ३९, सांप्रदायिक वेश ४४, नाथ संप्रदाय आणि भक्तिसाधना ५१, नाथ संप्रदाय आणि वामाचार ५४, कांहीं सांप्रदायिक प्रमाण-ग्रंथ ५५, उपास्यदेवता ५७, पवित्र स्थानें ५८, संप्रदायाचे शाखाभेद ५९.

२. गुरु गोरक्षनाथ : जीवन आणि कार्य : ६७–११४

गोरक्ष-गुरु मत्स्येंद्रनाथ ६७, गोरक्षकालीन साधना-विश्व ८६, गोरक्षनाथाचा कालनिर्णय ९५, स्थल-निर्णय १०१, चरित्र आणि चारित्र्य १०२, शिष्य-परिवार १०४, ग्रंथ-संभार १०५, औपनिषदिक ऋषींचा वारसा ११२, युगप्रवर्तक महापुरुष ११४.

३. कांहीं प्राचीन नाथसिद्धांचा परिचय : ११५–१३३

नवनाथ ११५, चौऱ्यायशीं सिद्ध ११८, जालंधरनाथ १२५, कृष्णपाद १२६, चौरंगीनाथ १२७, चर्पटीनाथ १२९, भर्तृहरि १३१.

४. महाराष्ट्रांतील नाथ संप्रदाय : १३४–१८८

साधनेचें साम्राज्य १३४, अमरनाथ १३६, गहिनीनाथ १३८, हरिनाथ १४२, रघुनाथ १४४, मुकुंदराज १४५, मुकुंदराजोत्तर परंपरा १४८, पूर्णप्रकाशानंदनाथ १५०, गहिनीनाथांची एक

स्वतंत्र परंपरा १५२, आदिनाथ भैरव १५२, ज्ञानेश्वर-मंडळ १५३, ज्ञानेश्वरांची शिष्यसंख्या १५५, सोपानोत्तर परंपरा १५५, लिंगनाथ योगी १५५, कविदास मुकुंदराज १५६, गंगाधरनाथ १५८, मुक्ताबाई-प्रणीत परंपरा १५९, चांगा वटेश्वर १५९, शिवकल्याण १६६, रत्नाकर १६६, विठ्ठल किंकर १६७, सदाशिवनाथ परंपरा १६८, देवनाथ परंपरा १६८, सत्यामलनाथ परंपरा १६९, सत्यामलनाथांचे ग्रंथ १६९, केसरीनाथ १७२, बालमुकुंद १७४, शिवदीन केसरी १७५, महीपतिनाथ उज्जयिनीकर १७६, चिंतामणीचें 'ज्ञानकैवल्य' १७७, एकनाथोत्तर परंपरा १७७, गोपाळनाथ १७७, शेख सुलतान १८०, गोविंदनाथ १८०, देवनाथ १८१, दयाळनाथ १८१, गंगानाथ १८२, कांहीं त्रुटित परंपरा १८४, सोहिरोबानाथ आंबिये १८४, चिंदड शंकर १८६, 'घटचक्र' व 'गोरखगोधडी' १८७.

५. **नाथ संप्रदायाचा प्रभाव :** **१८९–२४४**

महानुभाव संप्रदाय १९०, लिंगायत संप्रदाय १९९, वारकरी संप्रदाय २०१, दत्त संप्रदाय २०२, आनंद व चैतन्य संप्रदाय २०४, समर्थ संप्रदाय २०५, कबीर आणि निर्गुण संत-परंपरा २१९, नानक आणि शीख पंथ २३०, धर्म संप्रदाय २३२, मालिक मुहंमद जायसी २३३, मीराबाई २३६, लोकसाहित्य २३९, नाथ संप्रदायाचें कार्य २४२.

**परिशिष्ट :**

महाराष्ट्रांतील नाथ संप्रदाय : गुरु-शिष्य-परंपरांचे तीन तक्ते : पृ. १८८ समोर (१) मुकुंदराज परंपरा, (२) ज्ञानेश्वर परंपरा, (३) एकनाथ परंपरा.

* * *

# प्रकाशकांचें निवेदन

भारतीय साधनेच्या पार्श्वभूमीवर मराठी भक्तिपरंपरेचा परिचय घडविणाऱ्या या ग्रंथमालेचा प्रारंभ 'श्रीनरसिंहसरस्वती : चरित्र आणि परंपरा – दत्त संप्रदायाचा इतिहास' या ग्रंथापासून झाला. त्या ग्रंथमालेंतील 'श्रीगुरु गोरक्षनाथ : चरित्र आणि परंपरा – नाथ संप्रदायाचा इतिहास' हा दुसरा ग्रंथ प्रकाशित होत आहे.

प्रस्तुत ग्रंथमाला ही चिकित्सक आहे; तशीच भाविकांच्या सांप्रदायिक श्रद्धास्थानांची उचित महती विवरण करणारीहि आहे. इतिहासावरील शोध-ज्योतींच्या प्रकाशांत लेखकाला त्या त्या संप्रदायाचीं जीं गुणवैशिष्ट्यें दिसलीं तीं त्यानें आदरपूर्वक आपल्या ग्रंथांतून वाचकांपुढें मांडलीं आहेतच; परंतु ज्या ठिकाणीं प्रस्थापित श्रद्धा-कल्पना-भावनांपेक्षां वेगळें असें कांहीं आढळलें, तेंहि त्यानें निःसंकोचपणें उघड करून सांगितलें आहे. यांत केवळ सत्य तेंच सांगण्याचा त्याचा प्रांजल हेतु दिसतो; केवळ श्रद्धाभावनांना जोराचा धक्का देऊन आपलें कांहीं तरी विशेष पांडित्य प्रकट करण्याचा नव्हे. कारण लेखकानें हे संप्रदायांचे इतिहास लिहितांना विनम्र अभ्यासकाची भूमिका घेतलेली आहे; 'हाच माझा ठाम सिद्धान्त – आणि तोच बरोबर' अशी अंतिम शब्द सांगणाऱ्या स्वयंमन्य पंडिताची नव्हे; स्वमतासाठीं वा सांप्रदायिक निष्ठेसाठीं सत्यासत्याला समान मानणाऱ्या आग्रही सांप्रदायिकाची तर नव्हेच नव्हे.

आमच्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील महत्त्वाच्या अशा या सहा संप्रदायांचे इतिहास महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रवाहांचें आंतरिक दर्शन घडवितील; किंबहुना महाराष्ट्र-संस्कृतीचे बाहेरील प्रांतांत उमटलेले पडसादहि यावरून अजमावतां येतील.

श्री. रा. चिं. ढेरे हे कोणी पदवी-विभूषित पंडित नव्हेत. तथापि त्यांचें या ग्रंथमालेंतून आणि इतरत्र प्रकट होत असलेलें चिकित्सक विवरणात्मक साहित्यसृजन त्यांना पांडित्यानें विभूषित करण्यास पुरेसें समर्थ असल्याची ग्वाही महाराष्ट्रांतील निःपक्ष जाणकारांनीं कधींच दिलेली आहे.

त्यांनीं आणि आम्हीं संकल्पिलेली ही ग्रंथमाला पूर्णत्वाला जावो ही प्रार्थना.

– प्रकाशक

भारतीय साधनेच्या पार्श्वभूमीवर
मराठी भक्तिपरंपरेचा परिचय घडविणारी

# चिकित्सक ग्रंथमाला

लेखक : रामचंद्र चिंतामण ढेरे

★

१. श्रीनरसिंहसरस्वती : चरित्र आणि परंपरा
● दत्त संप्रदायाचा इतिहास ( प्रकाशित )

२. श्रीगुरु गोरक्षनाथ : चरित्र आणि परंपरा
● नाथ संप्रदायाचा इतिहास ( प्रकाशित )

३. श्रीगणेश : देवता आणि संप्रदाय
● गाणपत्य संप्रदायाचा इतिहास ( आगामी )

४. श्रीसमर्थ रामदास : चरित्र आणि परंपरा
● समर्थ संप्रदायाचा इतिहास ( आगामी )

५. श्रीचक्रधर : चरित्र आणि परंपरा
● महानुभाव संप्रदायाचा इतिहास ( आगामी )

६. श्रीज्ञानेश्वर : चरित्र आणि परंपरा
● वारकरी संप्रदायाचा इतिहास ( आगामी )

★ ★ ★

## लेखकाचें मनोगत

'दत्त संप्रदायाच्या इतिहासा'नंतर आठच महिन्यांनीं हा 'नाथ संप्रदायाचा इतिहास' वाचकांच्या हातीं देतांना मला अत्यंत आनंद होत आहे. वास्तविक हेंच माझें या स्वरूपाचें पहिलें पुस्तक. शके १८७६ च्या आषाढ महिन्यांत 'शंकराजी नारायण पारितोषिका'साठीं मीं हें काम हातीं घेतलें. दिवसभरची नित्य जबाबदारीचीं कामें, प्रकृतीची अस्वस्थता, साधनांचा अभाव आणि या सर्वांमुळें येणारी मानसिक संत्रस्तता यांच्या चक्रांत मीं हें अभ्यासाचें वेड राखलें आणि शके १८७८ च्या नवरात्रांत आठ दिवसांची रजा घेऊन, रात्रंदिवसांची बैठक मारून, विजयादशमीच्या दिवशीं हस्तलिखित परीक्षण-समितीकडे सादर केलें.

परीक्षण-समितीनें माझा प्रबंध सर्वोत्कृष्ट ठरविला आणि समितींतील कांहीं घटकांनीं प्रबंधाच्या प्रकाशनाचें वातावरण तयार केलें. परंतु अनेक प्रासंगिक अडचणींनी प्रकाशन लांबत गेलें. भारतीय साधनेचें अध्ययन निर्हेतुकपणें, स्वानंदप्राप्त्यर्थ करीत राहणें हें माझें वेड आहे. त्या अध्ययनाच्या क्षेत्रांत 'कांहीं करून दाखवावें,' अशी ईर्षा त्यामागें मूलतः नाहीं. त्यामुळें माझ्या अध्ययनक्षेत्रांतील नवनवीन अंगांचा अभ्यास मी करीतच राहिलों. अशा स्थितींत शके १८८० च्या अखेरीस मे. वोरा आणि कंपनीच्या मराठी विभाग-प्रमुखांशीं माझा संबंध आला आणि माझ्या अध्ययनाच्या टिपणांना प्रकाश दिसण्याची शक्यता निर्माण झाली.

गतवर्षीं श्रीनरसिंहसरस्वतींच्या पंचशताब्दी-महोत्सवानिमित्त 'दत्त संप्रदायाचा इतिहास' मराठी जिज्ञासूंच्या हातीं दिला आणि सर्वसाधारण जिज्ञासू वाचक व जाणते अभ्यासक यांनीं त्या पुस्तकाचें अपेक्षातीत स्वागत केलें. अर्थातच त्यामुळें आत्मविश्वासाबरोबर उत्तरदायित्वहि वाढलें. तीन वर्षांपूर्वीं, मुदत साधण्यासाठीं, घाईघाईनें खरडलेल्या हस्तलिखितांत संदर्भ-नोंदींची शास्त्रीयता आणि विषयाच्या मांडणीचा बांधेसूदपणा नव्हता. 'दत्त संप्रदाया'वरील पुस्तकाचीं तीं वैशिष्ट्यें वाचकांना पुढील सर्व कामांत वाढत्या प्रमाणांत अपेक्षित असणें स्वाभाविक आहे. परंतु मूळ हस्तलिखिताचें सर्वांगीण

संस्करण करूनहि त्या बाबतींत माझें थोडेंसें असमाधान राहिलेंच आहे. वाचक ' न्यून तें पुरतें, अधिक तें सरतें ' करून घेतील, अशी आशा आहे.

हीं पुस्तकें विवक्षित दृष्टि राखून केलेल्या अध्ययनाचीं केवळ 'टिपणें' आहेत. यांतून व्यापक अध्ययनाची दिशा निश्चित व्हावी आणि साधनेच्या इतिहासाचे आंतरिक अनुबंध ध्यानीं यावे, एवढाच अल्प हेतु आहे. जर ईश-कृपेनें अंतर्बाह्य क्षमता टिकून राहिली, तर या टिपणांच्या आधारें मराठी भक्तिपरंपरेचा उदय आणि विकास स्पष्ट करणारा विवेचक ग्रंथ लिहिण्याची माझी मनीषा आहे.

या पुस्तकाच्या निर्मितींत श्रीमंत आबासाहेब मुजुमदार आणि माझे अनेक सुहृद यांनीं कल्पनातीत साहाय्य केलें आहे. तो सर्व ऋणभार वाहतांना माझें मन आनंदानें भारावून गेलें आहे.

किंबहुना तुमचें केलें,
हें धर्मकीर्तन सिद्धि गेलें,
येथ माझें जी उरलें
पाईकपण !

आषाढ शुद्ध ११, शके १८८१.
१५९ शनिवार पेठ,
पुणें २.

विनीत,
रामचंद्र चिंतामण ढेरे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम २८१७६ विः चरित्र
क्रमांक ८०१ नोंः दिः २०/८

## निवडक संदर्भ-साहित्य

१. कौलज्ञाननिर्णय : सं. डॉ. प्रबोधचंद्र बागची. एम्. पी. पी. हाउस लि., कलकत्ता, १९३४.
२. महार्थमंजरी : सं. म. म. मुकुंदशास्त्री. काश्मीर संस्कृत ग्रंथावलि, ग्रंथांक ११. १९१८.
३. अमरौघशासनम् : सं. म. म. मुकुंदशास्त्री. काश्मीर संस्कृत ग्रंथावलि, ग्रंथांक १९. १९१८.
४. सिद्धसिद्धान्तपद्धति : सं. डॉ. कल्याणी मलिक. पूना ओरिएंटल बुक हाउस, १९५४.
५. सिद्धसिद्धान्तसंग्रह : सं. पंडित गोपीनाथ कविराज. सरस्वती भवन ग्रंथमाला, ग्रंथांक १३. १९२५.
६. गोरक्षसिद्धान्तसंग्रह : सं. पंडित गोपीनाथ कविराज. सरस्वती भवन ग्रंथमाला, ग्रंथांक १८. १९३९.
७. हठयोगप्रदीपिका : सं. योगी श्रीनिवास अयंगार. थिऑसॉफिकल पब्लिशिंग हाउस, अड्यार (मद्रास). १९३३.
८. पातंजलयोगसूत्रें : सं. प्रा. श्री. शं. खानवेलकर. महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर. १९५८.
९. प्रज्ञोपायविनिश्चयसिद्धि आणि ज्ञानसिद्धि (Two Vajrayana Works) : सं. डॉ. बिनयतोष भट्टाचार्य. गायकवाड ओरिएण्टल सेरीज, ग्रंथांक ४४. १९२९.
१०. प्रभुलिंगलीला : सं. मल्लिकार्जुनशास्त्री, वीरशैवलिंगिब्राह्मण धर्मग्रंथमाला, ग्रंथांक ७. १९०३.
११. ईशाद्यष्टोत्तरशतोपनिषदें : निर्णयसागर प्रेस, मुंबई.
१२. कदलीमञ्जुनाथमाहात्म्यम् : योगप्रचारिणी महासभा, गोरक्षटिल्ला, काशी. शके १८७८.
१३. गोरखबानी : सं. डॉ. पीताम्बरदत्त बड्थ्वाल. हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग. १९४२.
१४. हिन्दी काव्यधारा : सं. पं. राहुल सांकृत्यायन. किताब महल. १९४५.

१५. प्रसिद्ध सरहपादका दोहाकोश : सं. पं. राहुल सांकृत्यायन, बिहार राष्ट्रभाषा परिषद्, पटना. १९५८.
१६. संतसुधासार : सं. वियोगी हरि. सस्ता साहित्य मंडल, नई दिल्ली. १९५३,
१७. कबीर ग्रंथावलि : सं. श्यामसुंदरदास, नागरी प्रचारिणी सभा, काशी.
१८. जायसी ग्रंथावलि : सं. रामचंद्र शुक्ल. नागरी प्रचारिणी सभा, काशी.
१९. मीरा-पदावलि : सं. परशुराम चतुर्वेदी. हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग.
२०. संत दादू और उनकी वाणी : सं. अज्ञात संत. राजेंद्रकुमार अँड ब्रदर्स, बलिया. १९५०.
२१. संत रविदास और उनका काव्य : सं. स्वामी रामानंद शास्त्री आणि वीरेंद्र पांडेय. भारतीय रविदास सेवा संघ, ज्वालापूर, हरिद्वार. १९५५.
२२. मीरा-बृहत्पद-संग्रह : सं. पद्मावती 'शबनम्'. लोकसेवक प्रकाशन, बनारस. संवत् २००९.
२३. सिद्धपुराण : सं. पंडित रूपनारायण पांडे. प्रकाशक : धीरजनाथ अलबेले, लखनौ. संवत् १९८३.
२४. गोर्खविजय (बंगाली) : पंचानन मकुल. विश्वभारती ग्रंथालय, कलकत्ता.
२५. विवेकसिंधु : सं. प्रा. कृ. पां. कुलकर्णी. लेखन-वाचन भाण्डार, पुणें. १९५७.
२६. लीळाचरित्र : सं. ह. ना. नेने. प्र. बाबू गोविंद सहाय, सिंगापूर.
२७. श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ : सं. ह. ना. नेने.
२८. आचारस्थळ : सं. ह. ना. नेने. शके १८५९.
२९. श्रीगोविंदप्रभुचरित्र : सं. डॉ. वि. भि. कोलते. अरुण प्रकाशन, मलकापूर (वऱ्हाड). १९५१.
३०. स्मृतिस्थळ : सं. वा. ना. देशपांडे. सरस्वती प्रकाशन. १९३९.
३१. स्थानपोथी : सं. डॉ. वि. भि. कोलते, अरुण प्रकाशन, मलकापूर.
३२. मतिरत्नाकर व दर्शनप्रकाश : चित्रशाळा प्रेस, पुणें.
३३. सार्थ ज्ञानेश्वरी : सं. प्राचार्य शं. वा. दांडेकर. प्रसाद प्रकाशन, पुणें.
३४. श्रीज्ञानेश्वरमहाराज यांची सार्थ गाथा : सं. श्री नानामहाराज साखरे. शके १८५६.

३५. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गाथा : सं. व प्र. तात्या नेमिनाथ पांगळ. पुणें. १९२७.

३६. सार्थ अमृतानुभव व चांगदेवपासष्टी : सं. श्री नानामहाराज साखरे. शके १८७२.

३७. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें योगवासिष्ठ : सं. गो. का. चांदोरकर. सत्कार्योत्तेजक सभा, धुळें. शके १८३६.

३८. चांगदेव वटेश्वरकृत तत्त्वसार : सं. डॉ. ह. रा. दिवेकर. प्राच्य ग्रंथ-संग्रहालय, उज्जयिनी. १९३६.

३९. नामदेवाचा गाथा : सं. वि. न. जोग. चित्रशाळा, पुणें. शके १८४७.

४०. बालबोध : सं. गो. का. चांदोरकर. सत्कार्योत्तेजक सभा, धुळें. शके १८३५.

४१. ज्ञानप्रदीप : सं. म. म. दत्तो वामन पोतदार. भारत इतिहास संशोधक मंडळ. शके १८५६.

४२. दीपरत्नाकर : प्रकाशक, पं. वि. पाठक, मुंबई. १९२९.

४३. श्रीकेशवगोविंदमाहात्म्य : पां. श्री. आपटे व दा. गो. पाटील. प्र. रा. नं. सोनी, येवला. शके १८६९.

४४. आंईनाथ-चरित्र : ग. अं. जोशी. प्रकाशक : वा. रा. उत्तरवार, उमरखेड. १९५५.

४५. श्रीदासबोध : सं. शं. श्री. देव. प्रकाशक : के. भि. ढवळे, मुंबई.

४६. श्रीस्वानुभवदिनकर : सं. शं. श्री. देव. सत्कार्योत्तेजक सभा, धुळें. शके १८३३.

४७. श्रीनवनाथभक्तिसार :

४८. देवनाथमहाराजकृत कवितासंग्रह : सं. वा. दा. ओक. काव्यसंग्रह, ग्रंथांक २१. १८९६.

४९. योगिराज सोहिरोबानाथकृत पारमार्थिक पद्यसंग्रह : सं. भ. बा. रायकर व अ. ना. सांबारे. १९०७.

५०. अनेककविकृत पदसंग्रह, भा. १—३ : निर्णयसागर प्रेस, मुंबई.

५१. वैदर्भकवि दयाळनाथ यांची कविता : सं. साठे.

५२. हिंदी साहित्यका आलोचनात्मक इतिहास : रामचंद्र शुक्ल.

५३. अपभ्रंश साहित्य : प्रा. हरिवंश कोछड. भारती साहित्य मंदिर, दिल्ली. संवत् २०१३.
५४. सिद्धसाहित्य : डॉ. धर्मवीर भारती. किताब महल, अलाहाबाद. १९५५
५५. उत्तरी भारतकी संतपरंपरा : परशुराम चतुर्वेदी. भारती भंडार, प्रयाग. संवत् २००८.
५६. हिंदी काव्यमें निर्गुण संप्रदाय : डॉ. पीतांबरदत्त बड़थ्वाल. अवध पब्लिशिंग हाउस, लखनौ. सं. २००७.
५७. नाथ संप्रदाय : डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी. हिंदुस्थानी अॅकेडमी, उत्तर प्रदेश, अलाहाबाद. १९५०.
५८. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी. हिंदी ग्रंथ-रत्नाकर कार्यालय, मुंबई ४. १९५३
५९. कबीरकी विचारधारा : डॉ. गोविंद त्रिगुणायत. साहित्य-निकेतन, कानपूर. संवत् २००६.
६०. कबीर साहित्यकी परख : परशुराम चतुर्वेदी, भारती भण्डार, प्रयाग. सं. २०११.
६१. मकरंद : डॉ. पीताम्बरदत्त बड़थ्वाल. अवध पब्लिशिंग हाउस, लखनौ.
६२. मीरा : एक अध्ययन : पद्मावती 'शबनम्'. लोकसेवक प्रकाशन, बनारस. सं. २००७.
६३. मध्यकालीन धर्मसाधना : डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी. साहित्य भवन लिमिटेड, अलाहाबाद. १९५२.
६४. तेलुगु और उसका साहित्य : श्री. हनुमच्छास्त्री अयाचित. राजकमल प्रकाशन, दिल्ली.
६५. तमिल और उसका साहित्य : श्री. पूर्णसोमसुन्दरम्. राजकमल प्रकाशन, दिल्ली.
६६. मालवी और उसका साहित्य : श्री. श्याम परमार. राजकमल प्रकाशन, दिल्ली.
६७. बंगला और उसका प्रकाशन : श्री. हंसकुमार तिवारी. राजकमल प्रकाशन, दिल्ली.
६८. आदान-प्रदान : श्री. वा. रा. रेणु. साहित्यकार संसद्, प्रयाग. संवत् २०१०.

६९. महाराष्ट्र-सारस्वत : वि. ल. भावे. प्रकाशक : विश्वकर्मा मुद्रणालय, पुणें. चतुर्थावृत्ति. शके १८७६.
७०. रामदासी संशोधन, खं. १ व २ : सत्कार्योत्तेजक सभा, धुळें.
७१. ज्ञानेश्वर-दर्शन, खं. १ : सं. व प्र. : न. वा. देशमुख. वाङ्मयोपासक मंडळ, अहमदनगर.
७२. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खं. १–२ : ह. भ. प. ल. रा. पांगारकर.
७३. महाराष्ट्र कविचरित्र, भाग १–६ : ज. र. आजगांवकर. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, मुंबई.
७४. श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व चरित्र : श्रीपतिबुवा भिंगारकर.
७५. ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान : डॉ. शं. दा. पेंडसे. प्रकाशक : के. भि. ढवळे, मुंबई. शके १८६३.
७६. श्रीज्ञानेश्वरीचा अभ्यास : डॉ. शं. दा. पेंडसे. कौशिक व्याख्यानमाला, ग्रंथांक ५. १९५४.
७७. उपनिषद्रहस्य : डॉ. रा. द. रानडे. अ. वि. गृह प्रकाशन, पुणें.
७८. साहित्य आणि संशोधन : प्रा. र. म. भुसारी. प्रकाशक : जोशी ब्रदर्स, हैद्राबाद ( दक्षिण ). १९५१.
७९. पातंजल योगशास्त्राचा अभिप्राय : नानाभाई सदानंद रेळे, शके १८६२.
८०. स्फुट प्रकरणें, भाग १ : भा. इ. सं. मंडळ, पुणें. शके १८३६.
८१. श्रीहरिनाथ महाराज व त्यांचा संप्रदाय : वि. रा. ढोक. श्रीक्षेत्र आंभोरें देवस्थान. १९५०.
८२. महाराष्ट्रांतील पांच संप्रदाय : पं. रा. मोकाशी. प्र. : य. गो. जोशी. १९५४.
८३. मऱ्हाटी संस्कृति : शं. बा. जोशी, आंतर भारती प्रकाशन. १९५२.
८४. श्रीचक्रधर-चरित्र : डॉ. वि. भि. कोलते. अरुण प्रकाशन, मलकापूर. १९५२.
८५. संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुति : प्रा. गं. बा. सरदार. म. सा. परिषद, पुणें. १९५०.
८६. सूफी संप्रदाय : सेतु माधव पगडी. ग. पां. परचुरे, मुंबई. १९५३.
८७. शाहीर हैबती : वि. कृ. जोशी व द. दि. परचुरे, पुणें. १९५६.

८८. लिंगधारणचंद्रिका : सं. एम. आर. साखरे.
८९. ज्ञानेश्वरांची प्रभावळ : ह. भ. प. ल. रा. पांगारकर.
९०. नाथ सम्प्रदायेर इतिहास, दर्शन ओ साधनाप्रणाली ( बंगाली ) : डॉ. कल्याणी मल्लिक. कलकत्ता विश्वविद्यालय. १९५०.
९१. Gorakhnath and the Kanphata Yogis : G. W. Briggs Y. M. C. A Publishing House, Calcutta. 1938.
९२. Gorakhnath and the Medieval Hindu Mysticism : Dr. Mohan Singh, Lahore University.
९३. History of Bengali Language and Literature : Prof. D. C. Sen. University of Calcutta. 1954.
९४. Decline of Buddhism in India : R. C. Mitra. Vishva-bharati. 1954.
९५. Studies in the Tantras : Dr. P. C. Bagchi. University of Calcutta. 1939.
९६. Mystic Tales of Lama Taranath : Bhupendranath Datta. Ramkrishna Vedanta Math, Calcutta. 1944.
९७. Kashmir Shaivism : J. C. Chatterji.
९८. Sarasvati Bhavan Studies, Vol. VI : Gopinath Kaviraj. Govt. Sanskrit Library, Benares. 1924.
९९. गंगा : पुरातत्त्वांक : सं. पंडित राहुल सांकृत्यायन.
१००. भा. इ. सं. मंडळ : त्रैमासिकें, वार्षिक इतिवृत्तें, संमेलन-वृत्तें, ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, इ.; महाराष्ट्र साहित्य पत्रिका; रामदास-रामदासी; नवभारत; माउली; कल्याण : योगांक व शिवांक; हस्तलिखितें : म. म. पोतदार संग्रह, गंगानाथमठसंग्रह व सरदार आबासाहेब मुजुमदार संग्रह; आणि इतर अनेक ग्रंथांतील व नियतकालिकांतील स्फुट संदर्भ.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
२८१७८ वि: चरित्र
अनुक्रम ०१ नों दि: २०/८/८२
10334

# (१) नाथ संप्रदाय : उदय आणि विकास

## मध्ययुगीन साधनेची गंगोत्री :

भारताच्या सांस्कृतिक परंपरेंत मध्ययुगीन भारतीय साधना हा सुवर्ण-काळ आहे. या काळांत भारतांत हिमालयापासून रामेश्वरापर्यंत आत्मानु-भूतीचा ध्वनि हुंकारत होता. भारताची आध्यात्मिक विचार-परंपरा प्रत्यक्ष आत्मिक साक्षात्कारानें या काळांत कृतार्थ बनली होती. समग्र चराचराला गवसणी घालणारी करुणा, सकल-भेदातीत समदृष्टि, आत्मानुभूतीचें विवेक-निष्ठ प्रामाण्य आणि दीनदलितांच्या उत्थानाची तळमळ हे या संतयुगाचे विशेष आहेत. या युगाचें प्रवर्तन अखिल भारतीय पातळीवरून प्रथम गुरु गोरक्षनाथानें केलें आणि आपल्या अप्रतिहत संचारानें त्यानें सहस्रावधि आत्म्यांना आध्यात्मिक जीवनाची प्रेरणा दिली. गुरु गोरक्षनाथानें आपल्या असामान्य व्यक्तिमत्त्वाची, प्रखर विचारांची व उदात्त जीवनकार्याची अमिट छाप समग्र मध्ययुगीन साधनेवर उमटविली. त्याचमुळें हा अनन्यसाधारण आत्मिक शक्तीचा महापुरुष आणि त्याचा नाथ संप्रदाय यांचें अध्ययन मध्ययुगीन भारतीय साधनेच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे.

श्रद्धेची आणि जिज्ञासेची दिवटी पाजळून भूतकाळांत भ्रमण करतांना आपल्याला नाथ संप्रदायाच्या उदयाचें आणि विकासाचें जें अस्पष्ट असें दर्शन होतें, त्या धूसर दर्शनानेंहि आपण आश्चर्यविमूढ होऊन जाऊं. नाथ संप्रदायाच्या मूलप्रकृतीची जडण-घडण करण्यांत जसा सर्व पूर्ववर्ती साधनांचा वांटा आहे, तसेंच सर्व परवर्ती साधनांवर नाथ संप्रदायाचा फार मोठा प्रभाव आहे, असें आपणांस अभ्यासान्तीं आढळून येतें. डोंगरमाथ्यावरील एखाद्या प्रस्तरानें जसें जळधारांना नि लहानमोठ्या ओहोळांना आपल्या गाभ्यांत सामावून घ्यावें आणि निर्मळ निर्झराच्या रूपानें त्या सर्व जल-संचयाचा उद्रेक घडवावा, त्या-प्रमाणेंच नाथ संप्रदायानें समकालीन सर्व साधनाप्रणालींचा सुयोग्य समन्वय करून, मध्ययुगांत विशुद्ध साधनेचा एक प्रसन्न आणि भारतव्यापी प्रवाह निर्माण केला. नाथ संप्रदायाच्या उदय-विकासाचें ओझरतें दर्शन घेतलें तरी असें आढळून येईल कीं, नाथ संप्रदाय ही मध्ययुगीन भारतीय साधनेची गंगोत्री

आहे. या प्रवाहाच्या उगमाचें नि वहनाचें सूक्ष्म निरीक्षण करूं लागल्यावर भारतीय साधनेच्या इतिहासांतील अनेक दुवे जुळून येतात आणि विविध साधना-प्रणालींच्या परस्पर-अनुबंधांवर बराचसा प्रकाश पडतो.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांत तर नाथ संप्रदायाचें स्थान अनन्य-साधारण आहे. 'महाराष्ट्राची माउली' असलेले श्रीज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायाचे दीक्षित. त्यांच्या प्रेमानें, प्रज्ञेनें आणि प्रतिभेनें महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचें महन्मंगल मंदिर सुस्थिर पायावर उभें केलें आणि विश्वाच्या अन्तापर्यंत पुरेल एवढें अध्यात्मवैभव आमच्या स्वाधीन केलें. त्यांच्या समग्र आन्तरजीवनाचा भावमय आविष्कार ज्या ग्रंथांत झाला आहे, ते ग्रंथ म्हणजे नाथ संप्रदायानें त्यांना दिलेल्या अद्वयानन्दवैभवाचा वारसा आहे, असें त्यांनींच लिहून ठेवलें आहे.[1] महाराष्ट्रांतील महानुभाव, दत्त, वारकरी, आनंद व समर्थ या साधना-संप्रदायांपूर्वी नाथ संप्रदायाचा उदय-विकास घडून आला आणि या सर्व संप्रदायांवर त्याचा ठसा कमी-अधिक प्रमाणांत उमटला. आद्यत्व आणि महनीयत्व या उभयविध दृष्टींनीं नाथ संप्रदायाचा अभ्यास मराठी भक्तिपरंपरेच्या इतिहासांत महत्त्वाचा आहे. शिवाय नाथ संप्रदायाच्या उदात्त प्रेरणांचा वारसा महाराष्ट्रानें अत्यंत आदरानें आणि निष्ठेनें सांभाळला व वाढविला. अर्थातच नाथ संप्रदायाच्या इतिहासाचा वेध घेणें हें आपलें परम कर्तव्य आहे.

## उगमाची पार्श्वभूमि :

ज्ञानेश्वरांनीं 'योगाब्जिनीसरोवर' आणि 'विषयविध्वंसैकवीर' या दोन विशेषणांनीं गोरक्षनाथाला गौरविलें आहे.[2] या दोन विशेषणांत त्यांनीं केवळ गोरक्षनाथाचेंच नव्हे, तर नाथ संप्रदायाचेंहि यथार्थ माहिमान गायिलें आहे, असें वाटतें. कारण, समकालीन साधना-प्रणालींत 'योग' हें साधारण तत्त्व आढळल्यामुळें आणि इंद्रियसंयमन व चित्तशुद्धि यांसाठीं योगाची नितान्त आवश्यकता वाटल्यामुळें गोरक्षनाथानें 'विषयध्वंसना'साठीं योगप्रधान नाथ संप्रदायाचें वामाचार-विद्रोही आन्दोलन उभें केलें. या 'योगाब्जिनीसरोवरा'चें व 'विषय-विध्वंसना'चें रहस्य काय आहे, तें अभ्यासून पहावयास हवें.

१. ज्ञानेश्वरी, १८. १७५८–६२.
२. ज्ञानेश्वरी, १८. १७५५.

दहाव्या-अकराव्या शतकाच्या सुमारास भारतीय साधनेनें एक निराळेंच स्वरूप धारण केलें होतें. या स्वरूपाची घडण जरी इ. सनाच्या पहिल्या शतकापासून होत होती, तरी त्याची चरम परिणति दहाव्या शतकाच्या अखेरीसच घडून आली होती. हा काळ म्हणजे बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची अखेरची अवस्था. या काळांत बौद्ध धर्मानें तंत्रसाधना अंगीकारली आणि अनेक आचार्यांनीं व साधकांनीं तंत्राचें सुव्यवस्थित शास्त्रहि बनविलें. याच सुमारास या तंत्रसाधनेचा प्रकर्ष हिंदु साधनाप्रणालींतहि झाला आणि लौकरच भारतांत बौद्ध, शाक्त, कापालिक इत्यादि तंत्रसाधनांचें प्राबल्य माजलें. या तंत्रसाधनांत सर्वत्र अनेक यौगिक प्रक्रिया रूढ होत्या. तांत्रिकांच्या प्रभावापासून दूर असलेल्या साधनाप्रणालींतहि योगावर भर होता. 'योग' हें तत्कालीन भारतीय साधनेचें साधारण वैशिष्ट्य बनलें होतें. जैनांनीहि त्या काळीं योगप्रक्रियेचा प्रकर्ष गांठला होता. अनेक प्रयोगांनीं योगप्रक्रियांमध्यें उत्तरोत्तर एकसारखी भर पडूं लागली होती. आणि कित्येक वेळां योगाचें परमध्येय[3] विस्मृत होऊन, त्यांतून भयंकर परिणाम घडूं लागले होते. आश्चर्य म्हणजे या काळांत शैव संप्रदायांचा झपाट्यानें प्रसार होत होता; तरीहि साधना-मार्गांत 'शिवा'ऐवजीं 'अशिवा'लाच प्राधान्य मिळालें होतें. तंत्रमार्गांतली सर्व घृणास्पद भयंकरता शिवाराधनेच्याच नांवाखालीं चालू राहिली होती. या वेळीं बौद्ध, जैन व हिंदु या तीनहि परंपरा शिवाला सारख्याच उत्कटतेनें मानूं लागल्या होत्या. 'शिव' हें या काळाचें साधारण उपास्य बनलें होतें. आणखी एक विशेष म्हणजे या काळांत वेदविरोधी प्रवृत्तींचा प्रकर्ष होत गेला. इ. सनाच्या सहाव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत बहरत राहिलेल्या तंत्रसाधनांनीं वेदांविरुद्ध जोरदार आवाज घुमविला. वैदिक परंपरेंतील सामान्यातिसामान्य गोष्टींचाहि त्यांनीं प्रखर विरोध सुरू केला आणि प्रतिक्रियावश आध्यात्मिक साधनेला प्रतिकूल अशाहि गोष्टींचें महिमान वाढविलें. बाह्याचाराचा विरोध, चित्तशुद्धीवर जोर, शरीरालाच सकल साधनांचा आधार मानणें आणि समरसीभावानें स्वसंवेदनानंद उपभोगिणें हीं साधनेचीं साधारण वैशिष्ट्यें या काळांत सर्वत्र दृग्गोचर होतात.

या सकल वैशिष्ट्यांनीं युक्त आणि आपापल्या प्रणालीचें व्यवच्छेदकत्व असलेला सिद्धांचा मेळावा या काळांत तयार झाला होता. वज्रयानी सिद्ध,

---

३. 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः ।' – पातंजलयोगसूत्रें, १. २.

सहजयानी सिद्ध, जैन सिद्ध, शाक्त सिद्ध, कापालिक सिद्ध, इत्यादि विविध सिद्धांचे समूह तयार होत होते. त्यांत कौल सिद्धांसारख्या आणखीहि अन्यान्य साधनांतील सिद्धांची भर पडत होती. या काळांतील संस्कृतीला आध्यात्मिक दृष्ट्या 'सिद्धसंस्कृति' म्हणावयास हरकत नाहीं. पं. राहुल सांकृत्यायन या युगाला राजकीय दृष्ट्या 'सामंतमयुग' आणि धार्मिक दृष्ट्या 'सिद्धयुग' असेंच म्हणतात.

या सर्व साधनांचें केंद्रवर्ती प्राबल्य एका विवक्षित भूभागांतच होतें. बौद्धांच्या वज्रयानी शाखेचा उदय आणि विकास दक्षिणेंतच झाला होता. नागार्जुन कोंडा हें बौद्ध नागार्जुनाचें ठिकाण प्रसिद्धच आहे. द्रविड प्रदेशांत अलवार आणि नयनार या तामिळी वैष्णव आणि शैव संतांची परंपरा या सुमारास उत्कर्षास पोंचली होती. नम्मलवारसारखा शैव संत या वेळीं समर्थपणें शैव मताचा पुरस्कार करीत होता. अलवारांच्या भक्तिगीतांचें संकलन होऊन 'नालायिर प्रबंधम्' सारखा तामिळ वेद तयार झाला होता. या वैष्णव भक्ति परंपरेंतून नव्या संजीवक प्रेरणांचा उदय होऊन आचार्य परंपरेची पार्श्वभूमि तयार झाली होती. जैन साधनाहि या वेळीं कर्नाटकादि दक्षिणेंतील भूभागांत प्रसारकार्य करीत होती. तेथेंच जैन आणि तामिळ शैव यांचा संघर्ष चालू होता. या प्रदेशापासून जवळच मालव-राजस्थानांत व गुर्जर प्रदेशांत प्रसिद्ध जैन सिद्ध मुनि रामसिंह, मुनि देवसेन, जोइंदु इत्यादि आपल्या विद्रोहिणी आत्म-शक्तीचा परिचय घडवीत होते. शाक्त-कापालिकांचें प्रस्थहि याच दक्षिणेंतील भूभागांत विशेषत्वानें होतें.

दक्षिणेंतील 'श्रीशैल' हेंच बहुतेक तंत्र-साधनांचें केंद्रस्थान होतें. या काळीं श्रीशैलावर वज्रयानाचा प्रकर्ष झाला होता. अनेक बौद्ध तांत्रिक ग्रंथांतून श्रीशैलाचें 'केंद्रस्थान' म्हणून वर्णन आहे. याच काळीं शाक्त-कापालिकादि हिंदु तांत्रिक साधनाहि श्रीशैलावरच बहरल्या होत्या. "श्रीशैल आणि तांत्रिक साधना" असें जणुं समीकरण बनून गेलें होतें. 'मालतीमाधव', 'कादंबरी', 'हर्षचरित', 'रत्नावली', 'प्रबोधचंद्रोदय', 'कर्पूरमंजरी', 'जसहरचरिउ' इत्यादि अनेक तत्कालीन वाङ्मय-कृतींतून श्रीशैलाचें तंत्रपीठ म्हणून वर्णन आलें आहे आणि तेथील तंत्रसाधनांचें स्वरूपदिग्दर्शनहि झालें आहे. या साधना – अर्थात् तंत्रसाधना – प्राधान्यानें वामाचारी बनल्या होत्या. त्यांच्या यौगिक प्रक्रियांसाठी

४. हिंदी काव्यधारा, प्रस्तावना.

स्त्री हें आवश्यक साधन बनलें होतें. त्याचप्रमाणें मद्य-मांसादि पंचमकारांचाहि मनसोक्त वापर त्यांत चालू होता. आपण आध्यात्मिक साधनेला ज्या गोष्टी परम त्याज्य समजतों, त्याच त्यांनीं अत्यावश्यक मानल्या होत्या. त्यामुळें श्रीशैलावर योगिनींचे मेळावेच बनले होते. इतके कीं, या भागाला 'स्त्री-राज्य' अशी संज्ञा रूढ झाली. यावरून हें स्पष्ट होईल कीं, दहाव्या शतकाच्या सुमारास श्रीशैलावर आणि त्याच्या परिसरांत मद्य-मांस-स्त्रीप्रधान तंत्रसाधनांचा प्रकर्ष झाला होता. या आणि इतर तत्कालीन रूढ साधनाप्रणालींत योग, उपास्य 'शिव', वेदविरोधी स्वर, बाह्याचाराला विरोध, देह-देवालय इत्यादि साधारण वैशिष्टयें होतीं. गोरक्षनाथानें याच पार्श्वभूमीवर योग आदि वैशिष्टयांचा समन्वय-दृष्टीनें स्वीकार करून आणि 'विषय'-प्राधान्याचा धुव्वा उडवून योग-प्रधान, 'शिव'युक्त, अनुभूतीनें प्रमाण मानणारा, बाह्याचार-विरोधक असा 'नाथ संप्रदाय' प्रवर्तित केला. गोरक्ष हा 'महेशान्वयसम्भूत' ( शिवाच्या आध्यात्मिक वंशांत प्रादुर्भाव झालेला ) आहे; 'योगाब्जिनीसरोवर' आहे आणि 'विषयविध्वंसैकवीर' आहे, याचें रहस्य हें असें आहे. या तांत्रिकांच्या माया-जालांत फसलेल्या आपल्या गुरूचाहि गोरक्षनाथानें उद्धार घडविला, म्हणूनच तो या 'विषयविध्वंसना'च्या बाबतींत 'एक-वीर' ठरला. नाथ संप्रदायाचें प्रवर्तकत्व यामुळें मत्स्येंद्रनाथाकडे न जातां, गोरक्षनाथालाच तो बहुमान द्यावा लागेल. तसा तो दिला गेलाहि आहे. कारण, 'नाथ पंथ' म्हणजेच 'गोरक्ष पंथ' अशी नाथ पंथाशीं त्याच्या नांवाची संलग्नता आहे. 'नाथ' म्हणजे 'गोरक्षनाथ', अशीहि नाथपंथीयांची भावना आहे.

नाथ संप्रदायाच्या उदयाची पार्श्वभूमि ही अशी आहे. ज्याविरुद्ध गोरक्षनाथानें विद्रोही आंदोलन उभें केलें, त्या गोरक्ष-पूर्व वामाचारी साधनांचा विस्तृत परिचय आपण पुढील प्रकरणांत करून घेऊं.

समर्थ-शिष्य दिनकरस्वामींनीं आपल्या 'स्वानुभवदिनकर' या प्रसिद्ध ग्रंथांत या विकृत साधनांचें जें चित्र रेखाटलें आहे, तें या वामाचारी तंत्र-साधनांच्या किळसवाण्या स्वरूपावर प्रखर प्रकाशझोत टाकणारें आहे. नाथ संप्रदायाच्या उदयानंतर हा ग्रंथ पांचशें वर्षांनीं लिहिलेला असला, तरी या साधनांचें स्वरूप 'स्वानुभवदिनकरां'तील वर्णनानुरूपच त्या काळींहि होतें, असें पुढील प्रकरणांतील त्यांच्या वर्णनावरून स्पष्ट होईल.

आणि मंत्र यंत्र कीळनोत्कीळनें । आगम तंत्रोक्त नाना साधनें ।
शाक्त कौळिक चौळिक संपादणें । भ्रष्टाकार कृत्यें ॥[५]

* * *

कवळार्णव क्रिया अघोर मंत्र । शाक्तागम प्रेतसाधन विचित्र ।
भगमालिनी पूजा स्वतंत्र । मध्यरात्रीं समई ॥
कुंभपूजा कंचुकीविधान । अघोरक्रिया मद्यपान ।
आणि त्रिपुरसुंदरी पूजन । कामाक्षाविधी ॥
बाह्यात्कारें शाक्तनाम मिरविती । आणि कर्म करूं नये तें करिती ।
अभक्ष भक्षूनि अंगिकारिती । मद्य आणि उन्मत्तद्रव्यें ॥
भगपूजामिसें परदारा भोगिती । कवळमिसें भ्रष्टाकार करिती ।
परस्त्रीहातीं स्वलिंगपूजा करविती । नाना विषयभोगार्थ ॥
मध्यरात्रीं समई कालिकामिसें । नैवेद्यार्थ आणविती नाना मांसें ।
मग आपण भक्षिती प्रसादमिसें । शिस्नोदरपरायण ॥[६]

* * *

येक म्हणती मद्यमांसस्वादनोन्माद । हाचि मोक्ष होय पैं स्वतःसिद्ध ।
येक म्हणती सुरतक्रीडा विभ्रमानंद । जालिया मोक्ष सहजेंचि ॥[७]

## उदयभूमीचा शोध :

नाथ संप्रदायाचे आदिसिद्ध मत्स्येंद्रनाथ-गोरक्षनाथ हे उत्तरेंतले, त्यामुळें नाथ संप्रदायाची उदयभूमिहि उत्तरेंतली, असा ग्रह आजपर्यंत रूढ आहे. दारावर येणारे नाथजोगी आणि निरनिराळ्या मठांतून आढळणारे जोगी हिंदी भाषेचा वापर करतांना आढळतात, त्यामुळें हा समज खरा आहे, असेंहि वाटूं लागतें. ज्या पंडितांनीं आजवर नाथ संप्रदायावर लेखन केलें, ते पंडित दक्षिण भारतांतील अभ्यास-साधनांपासून सर्वथा वंचित होते. रूढ समजुतींना गृहीत धरून त्यांनीं संशोधन सुरू केलें आणि मग अनुमानांची कसरत करीतच आपल्या संशोधनपूर्ण प्रबंधांचा पसारा त्यांनीं मांडला. नेपाळ, पंजाब, उत्तर प्रदेश, आसाम या प्रदेशांना आजवर निरनिराळ्या पंडितांनीं नाथ संप्रदायाच्या उदय-

---

५. स्वानुभवदिनकर, ५. ३. ५८.
६. स्वानुभवदिनकर, ७. २. ४२–४६.
७. स्वानुभवदिनकर, १५. ३. २०.

भूमीचा मान बहाल केला आहे. डॉ. मोहनसिंग, प्रो. ब्रिग्ज, डॉ. द्विवेदी, डॉ. मल्लिक या जाड्या जाड्या पंडितांच्या ग्रंथांचें अनुसरण करणारे महाराष्ट्रीय पंडितहि आजवर हाच समज खरा असल्याचें मानीत आले. प्रा. सोनोपंत दांडेकरांनीं आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत सिंग-द्विवेदी यांच्या ग्रंथाधारें याच मताचा पुनरुच्चार केला आहे.[८] डॉ. शं. दा. पेंडसे यांनीं 'ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' या आपल्या महनीय ग्रंथांत "ते (मत्स्येंद्र-गोरक्ष) मूळचे उत्तरेचे असून यात्रेच्या निमित्तानें दक्षिणेंत आले असावे, याविषयीं मतैक्य आहे"[९] असें विधान केलें आहे. महाराष्ट्रांतील बहुतेक अभ्यासकांनीं याच मताचा अनुवाद केला आहे. अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्रांतील पांच संप्रदाय' या श्री. मोकाशी यांच्या ग्रंथांतहि उत्तरेंतील पंडितांच्या मतांचाच अनुवाद आहे.[१०]

याला अपवाद आहे तो केवळ सरदार मिरीकरांचा. मिरीकरांनीं आपल्या एका प्रकाशित निबंधांत[११] ('ज्ञानेश्वरांचा नाथपंथ') आणि अप्रकाशित संशोधनांत[१२] "नाथसंप्रदाय दक्षिणेंतील – महाराष्ट्रांतीलच –" असा क्रान्तिकारी सिद्धान्त मांडला आहे. परंतु ज्या काळांत स. मिरीकरांनीं हें मत मांडलें, त्या वेळीं त्यांच्या हातीं पुरेशीं साधनसामग्री उपलब्ध नसल्यामुळें त्यांचा सिद्धान्त केवळ भावनात्मक स्वरूपांतच राहिला. आपला सिद्धान्त ते सहज पटणाऱ्या ऐतिहासिक पुराव्यांनीं सिद्ध करूं शकले नाहींत.

सरदार मिरीकरांच्या मतें, नगर जिल्ह्यांतील वृद्धेश्वराचा (म्हातारदेवाचा) डोंगर हेंच आदिनाथाचें स्थान असून तेथेंच नाथ संप्रदायाचा उदय झाला. समर्थ-शिष्य दिनकरस्वामींनी केलेलें वृद्धेश्वर येथील तपोभूमीचें वर्णन[१३] आणि ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांतील तपोभूमीचें वर्णन[१४] ताडून पाहतां वृद्धेश्वर

---

८. श्रीसार्थ ज्ञानेश्वरी, प्रस्तावना पृ. ३९-४०.

९. ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, पृ. ४०८.

१०. महाराष्ट्रांतील पांच संप्रदाय, पृ. ६, ९.

११. ज्ञानेश्वर-दर्शन, खंड १ : 'ज्ञानेश्वरांचा नाथ पंथ' हा लेख, पृ. ८०-९२.

१२. नाथ संप्रदायाचा इतिहास (हस्तलिखित) : सरदार मिरीकर. (सरदार आबासाहेब मुजुमदार यांचा संग्रह)

१३. स्वानुभवदिनकर, प्रस्तावना पृ. ६-७.

१४. ज्ञानेश्वरी, ६. १६३-१८५.

हेंच ज्ञानेश्वरांचें तपःस्थान आहे, हें सिद्ध होत असलें, तरी त्यामुळें वृद्धेश्वराला नाथ संप्रदायाची उदयभूमि ठरविण्यास कांहींच आधार नाहीं. 'नवनाथ-भक्तिसार' या ग्रंथांत वर्णिलेलीं नाथसिद्धांचीं समाधिस्थानें या वृद्धेश्वराच्या परिसरांतच आहेत, ही गोष्ट सरदार मिरीकर स्वमतपुष्ट्यर्थ वापरतात. परंतु 'नवनाथभक्तिसार' हा ग्रंथ कोणत्याहि दृष्टीनें प्रमाण मानणें धोक्याचें आहे. तसेंच मढीचा मोथंबा व कान्होबा म्हणजे मत्स्येंद्र व गोरक्ष, असें सरदार मिरीकरांचें मत आहे. वृद्धेश्वर येथील आदिनाथाचा आद्यभक्त जो होता, तोच व्यक्तिरूप आदिनाथ होय, असेंहि मत त्यांनीं मांडलें आहे. या मताच्या पुष्टीसाठीं त्यांनीं ज्ञानेश्वरांचा एक अभंग दिला आहे –

पैल मेरूच्या शिखरीं । एक योगी निराकारी ।
मुद्रा लावूनि खेचरी । प्राणायामीं बैसला ॥
तेणें सांडियेली माया । त्यजियेली कंथा काया ।
मन गेलें विलया । ब्रह्मानंदामाझारीं ॥
अनुहत ध्वनिनाद । तो पावला परमपद ।
उन्मनी तुर्या विनोदें । छंदें छंदें डोलतुसे ॥
ज्ञान गोदावरीच्या तीरीं । स्नान केलें पांचाळेश्वरीं ।
ज्ञानदेवाच्या अंतरीं । दत्तात्रेय योगिया ॥ [15]

" हा ज्ञानेश्वरांचा अभंग दत्तपर नसून, त्या दत्तात्रेय जोगियावरील आहे, ज्यानें वृद्धेश्वराची – आदिनाथाची – भक्ति करून स्वतःच आदिनाथत्व प्राप्त केलें. " अर्थात् मिरीकरांचा हा सर्व भावनेचा खेळ आहे, हें उघड आहे. परंतु हें मात्र नम्रपणें मान्य करावयास हवें कीं, सरदार मिरीकरांच्या मतांतील या तीव्र भावनात्मक आग्रहामुळेंच या सिद्धान्ताची पारख करण्याची इच्छा माझ्या मनांत उत्कटतेनें जागी झाली.

नाथ संप्रदायाच्या उदयभूमीसंबंधीं उत्तरभारतीय पंडितांचीं मतें पाहिलीं, तर त्यांच्या मतप्रदर्शनांत 'कदलीबन' नामक ठिकाणावर अधिक जोर देण्यांत आला आहे असें दिसतें.[16] या कदलीबनांत योगिनींच्या मेळाव्यांत ( स्त्री-राज्यांत )

---

१५. ज्ञानेश्वरमहाराजांचा गाथा, अ. ९८०.

१६. नाथ संप्रदाय : डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. ४६–५६.

फसलेल्या मत्स्येंद्रनाथाचा गोरक्षनाथानें उद्धार केला, अशा सांप्रदायिक कथा सर्वत्र आढळतात. त्या कदलीबनाचा शोध करण्यासाठीं त्यांनीं हिमालयाच्या पादप्रदेशापासून गंगेच्या मुखापर्यंत भ्रमंती केली आहे! या 'कदलीबना'शिवाय पंथप्रसाराचीं आणि गोरक्षनामांकित स्थळांचीं गमकें वापरून कुणी पंजाब, कुणी आसाम, कुणी बंगाल, कुणी उत्तर प्रदेश, तर कुणी नेपाळ ही नाथसंप्रदायाची उदयभूमि ठरवितात. आपण प्रारंभी नाथ संप्रदायाच्या उदयाची पार्श्वभूमि स्थूलपणें पाहिली आहे. त्यावरून हें निश्चित झालें आहे कीं, नाथ संप्रदायाचा उदय वामाचारी विकृत साधनांच्या निर्मूलनासाठीं आणि भारतीय धार्मिक जीवनाच्या शुद्धीकरणासाठीं झालेला आहे. अर्थात् हें विद्रोही आंदोलन वामाचारी विकृत साधकांच्या बालेकिल्ल्यांतच होणें अधिक स्वाभाविक आहे.

नाथ संप्रदायाच्या उदयकालापूर्वी श्रीशैल हें तांत्रिक साधनांचें प्रभावी केंद्र होतें. त्या काळी श्रीशैल हा शैव, बौद्ध आणि शाक्त तंत्रांचा अड्डाच होता. तेथें योगिनींचे मेळावे होते. स्त्रीप्रधान साधनापद्धतींच्या प्रक्रियांना तेथें ऊत आलेला होता. या श्रीशैलावर नाथ संप्रदायाच्या विद्रोही आंदोलनाचा प्रादुर्भाव होणें अधिक शक्य आहे. ज्या कदलीबनांत योगिनींच्या मेळाव्यांत मत्स्येंद्रनाथ अडकला होता, तें कदलीबनहि श्रीशैलाच्याच परिसराचें नांव आहे, हें आजवर उत्तरेंतील पंडितांच्या लक्षांत न आल्यामुळें नाथ संप्रदायाची उदयभूमि ठर-विण्याच्या बाबतीत ते दिग्भ्रान्त झाले आहेत. एकीकडे, श्रीशैल हें तंत्रसाधना-केंद्र आहे, हें ते मानतात; तंत्रसाधनेच्या प्रसाराला नाथ संप्रदायानें खीळ घातली, हेंहि त्यांना मान्य आहे; पण कदलीबनाचा शोध न लागल्यामुळें त्यांचा अंधारांतील प्रवास थांबत नाहीं. नाथ संप्रदाय हा उत्तर भारतांतील आहे, या आजवरच्या रूढ समजुतीमुळें ते नाथ संप्रदायाच्या या उदयभूमीचा – 'कदलीबना'चा – उत्तरेंतच शोध घेतात. एक तर भारतीय साधनेच्या इतिहास-सामग्रींत दक्षिणेंतील साधनांचा विचार उत्तरभारतीय पंडित करीत नाहींत; त्यांना त्याविषयीं अज्ञान आहे. आणि आपल्याकडील पंडितांचा सारा भर इतिहासावर नसून तत्त्वज्ञानावर आहे. त्यामुळें इतिहास-क्षेत्रांत वर्षांच्या वर्षे अनेक अपसिद्धान्त ठाण मांडून बसले आहेत.

आतां आपण श्रीशैल आणि कदलीबन यांच्या अभिन्नतेची व त्या स्थळाशीं असलेल्या नाथ संप्रदायाच्या संबंधाची साधारण चर्चा करूं :

( १ ) नाथ संप्रदायाशीं दृढ संबधित अशा चक्रधरांची ( महानुभाव पंथाचे संस्थापक ) त्यांच्या एकांक-काळांतील भ्रमणांत भर्तृहरि-शिष्या मुक्ताबाई या नाथयोगिनीशीं भेट झाली. ही नाथयोगिनी मुक्ताबाई कदलीबनांतीलच.

कर्दळीचा वनीं । मुक्ताई योगिनी ।
देओ धायधणी । पूजिएले ॥

असा हिच्याविषयींचा उल्लेख महानुभावीय वाङ्मयांत आहे.

( २ ) "कन्नडदेसां तेलंगदेसां न वचावें"[१७] या चक्रधरांच्या निषेधात्मक आज्ञेचें कारण "तेथ अवधूत मान्य"[१८] असें आहे. आपल्या एकांकभ्रमणांत चक्रधरांना या प्रदेशांतील अवधूतांच्या प्राबल्याची चांगलीच कल्पना आली असणार.

( ३ ) नाथपंथाच्या आदिसिद्धांतील एक प्रसिद्ध सिद्ध आणि एक वीर-शैवमतप्रवर्तक अल्लमप्रभु, रेवणसिद्ध आणि महादेवी अक्का या तिघांनींहि श्री-शैलाजवळील कदलीवनांत समाधि घेतल्याचें वर्णन अनेक लिंगायतपंथीय ग्रंथांत आहे. श्रीशैल-कदलीबन हें लिंगायतांचें परमपवित्र स्थान आहे.

( ४ ) दत्त संप्रदायाचे संजीवक श्रीनरसिंह सरस्वती यांनींहि अखेर श्रीशैलाजवळील कदलीबनांत प्रवेश करून तेथेंच चिरविश्रांति घेतली, असें वर्णन 'गुरुचरित्रां'त आहे. गुरुचरित्रांत श्रीशैलाविषयींचा एक समग्र अध्याय ( ४३ वा ) आहे. "ऐसें बोधूनि शिष्यांसी । गुरु गेले कर्दळीवनासी ।" असा कदलीबनाचा स्पष्ट उल्लेख 'गुरुचरित्रां'त आहे.[१९]

( ५ ) विख्यात नाथसिद्ध चांगा वटेश्वर याच्या 'तत्त्वसार' या ग्रंथांतहि 'कदलीबना'चा सूचक उल्लेख आहे. हा ग्रंथ गुरु-शिष्यसंवादात्मक आहे. यांत एके ठिकाणी गुरु शिष्याला त्याज्य विषय व स्थळें कोणतीं, याची माहिती देत आहे. स्वतः चांगदेव महान् योगी असूनहि त्या मार्गांत दिसलेल्या विकृत दृश्यांमुळें व चमत्कारिक अनुभवांमुळें त्यानें येथें यौगिक व रासायनिक साधनांचा व तत्संबद्ध स्थळांचा त्याग सुचविला आहे :

---

१७. सूत्रपाठ, सू. २२.
१८. सूत्रपाठ, सू. २२.
१९. गुरुचरित्र, ५२. ७४.

त्यजीं तिर्थदेशभ्रमण । गिरिगह्वर कर्दळीवन ।
निरोपद्रव स्थानीं रहण । प्रारंभीं तुं ॥ [२०]

यांत कर्दळीवनाचा ' साधनेला उपद्रवकारक स्थान ' म्हणून उल्लेख केला आहे.

( ६ ) चौदाव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेलेल्या गौरन्न मंत्री या तेलगू कवीनें 'नवनाथचरित्रमु' नामक ग्रंथ लिहिला आहे. यांतील नऊ नाथांत कांहीं स्थानिक सिद्धांचा समावेश आहे. सांप्रदायिक इतिहासावरील ह्याच जुन्यांत जुना ग्रंथ आहे. आणि विशेष म्हणजे कवीनें हा ग्रंथ श्रीशैलमल्लिकार्जुनाला अर्पण केला आहे.[२१]

( ७ ) राजा गोपीचंदालाहि दक्षिण दिशेकडील एका योगिनीनें आपल्या मोहजालात अडकवून ठेवल्याची कथा आहे.[२२]

( ८ ) लीळाचरित्राच्या उत्तरार्धांत चक्रधरांनीं आपल्या शिष्यांना जालंधरशिष्य कान्हाच्या चमत्कारिक अंताची कथा सांगितली आहे.[२३] त्या कथेनुसार कान्हाचा ( कान्हपादाचा ) अंत दक्षिणेंतील बहुडी नामक एका योगिनीशीं समागम करून आपली ऊर्ध्वरेतावस्था सिद्ध करतांना झाला.

( ९ ) याच बहुडीची स्वामिनी कामाख्या नामक योगिनी चांगदेव राउळांची योगख्याति ऐकून त्यांचा समागम मागण्यासांठीं द्वारकेस गेल्याचें आणि तिच्या हट्टामुळें चांगदेव राउळांना देहत्याग करावा लागल्याचें वर्णन 'लीळाचरित्रां'त आलें आहे.[२४]

श्रीशैलावरील तंत्रसाधकांत योगिनींचा मोठा भरणा असे, हें आपण पाहिलें आहे. वरील ७, ८, ९, या उदाहरणांवरून दक्षिणंतील या योगिनींच्या साधना-पद्धतींवर स्पष्ट प्रकाशझोत पडतो. यावरून कदलीबन आणि त्यांतील स्त्रीराज्य म्हणजे काय, याची कल्पना येण्यास अडचण पडूं नये. योग्यांशीं संबद्ध असें स्त्रीराज्य शोधण्यासाठीं कामरूपांत वा सिंहलद्वीपांत जाण्याचें मुळींच कारण नाहीं.

---

२०. तत्त्वसार, ६९५.
२१. तेलुगु और उसका साहित्य, पृ. २७–२८.
२२. नाथ संप्रदाय : डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. १६९–१७१.
२३. लीळाचरित्र, एकांक लीळा ४, पृ. ३.
२४. लीळाचरित्र, उत्तरार्ध लीळा ४१८, पृ. २३७.

(१०) नाथ संप्रदायाचा प्रवर्तक गोरक्षनाथ हाहि दक्षिणेंतील, हें आपण पुढील प्रकरणांत पाहणार आहोंतच.

(११) एकनाथांनीं भावार्थ रामायणांत सीताशुद्धीच्या निमित्तानें दक्षिणेंतील ज्या अनेक स्थळांची नोंद केली आहे, त्यांत 'कर्दळीवनां'चा समावेश आहे. नाथांच्या भावार्थ रामायणाची पूर्ति करणारें मुक्तेश्वराचें उत्तरकांड अगदीं अलीकडे उपलब्ध झालें आहे; त्यांतहि 'श्रीपर्वतिं कर्दळीवनिं' असा संयुक्त उल्लेख आलेला आहे.[२५]

(१२) संवत् २०१३ मध्यें नाशिक येथील सिंहस्थ यात्रेच्या निमित्तानें काशीच्या योगप्रचारिणी महासभेनें 'कदलीमञ्जुनाथमाहात्म्यम्' नांवाचा एक संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. ताडपत्रांवर तुळुलिपींत लिहिलेला हा ग्रंथ कदलीमंजुनाथाच्या पुजाऱ्यांच्याच घरीं उपलब्ध झाला आहे. साठ अध्यायांच्या या ग्रंथांत सर्वत्र श्रीशैल व कदलीवन यांचें भौगोलिक ऐक्य मानलेलें आहे.[२६] श्रीशैलस्थ मंजुनाथाला (आदिनाथाला) सर्वत्र 'कदलीश्वर' म्हणून संबोधिलें आहे. 'कदलीमञ्जुनाथपीठ' हें नाथ संप्रदायाचें पुरातन पीठ समजलें जातें. प्रत्येक बारा वर्षांनीं सिंहस्थ यात्रेच्या वेळीं बाराहि शाखांतील दूरदूरचे नाथयोगी गोदावरीच्या उगमाजवळ त्र्यंबकेश्वरीं एकत्र जमतात आणि 'योगिराजा'ची निवड करतात. ही निवड झाल्यावर गोदावरीच्या जळानें 'कदलीमञ्जुनाथपीठा'वर योगिराजास पट्टाभिषेक करतात. या उत्सवास 'पात्रदेवकदलीयात्रा' अशी संज्ञा आहे.[२७]

यावरून – नाथ संप्रदायाची उदयभूमि दक्षिणेंतील श्रीशैल-कदलीवन ही असून, आंध्र – कर्नाटक – महाराष्ट्र ही नाथसंप्रदायाची प्रथम लीलास्थली आहे, हें आपणांस दिसून येईल.

### संप्रदायाचें नांव :

'नाथ संप्रदाय' या नांवानें आपण ज्या संप्रदायाच्या उदय-विकासाची चर्चा करीत आहोंत, त्या संप्रदायाचें हेंच नांव प्रथमपासून चालत आलें आहे

२५. रामायण (उत्तरकांड), १. २६ : मुंगी येथील सनातन मठांतील हस्तलिखित.

२६. कदलीमञ्जुनाथमाहात्म्यम्, ४७. ८२, ४८. ५, ४९. १९.

२७. कदलीमञ्जुनाथमाहात्म्यम्, प्रस्तावना पृ. ७–८.

काय ? निरनिराळ्या कालविभागांत कोणकोणत्या नांवांनीं हा विवक्षित संप्रदाय ओळखला जात असे ? अशा विविध नांवांच्या उपयोजनाचें कारण काय ? त्या त्या नांवांतून या विवक्षित संप्रदायाचीं कांहीं लक्षणें, कांहीं स्वरूपविशेष व्यक्त होत आहेत काय ? – इत्यादि प्रश्नांचा विचारहि आपल्या अभ्यासाच्या दृष्टीनें उपयुक्त ठरणार आहे. हा संप्रदाय नाथ संप्रदाय, नाथ पंथ, सिद्ध पंथ, सिद्ध मत, सिद्ध मार्ग, योग मार्ग, योग संप्रदाय, अवधूत मत, गोरख पंथ, कानफाटा संप्रदाय, गुरुमार्ग इत्यादि नांवांनीं उल्लेखिला जात असे. या विविध नांवांच्या उपयोजनाचे उल्लेख आपण आतां यथाक्रम पाहूं.

**नाथ पंथ :** डॉ. कल्याणी मल्लिक यांनीं आपल्या नाथ संप्रदायावरील बंगाली प्रबंधाच्या प्रारंभींच असें म्हटलें आहे की, "नाथ संप्रदाय ही संज्ञा नवीन असून, तिचा प्रथम वापर म. म. हरप्रसाद शास्त्री यांनीं केला."[२८] डॉ. मल्लिक यांनीं असें विधान कसें केलें, याचें आश्चर्य वाटतें. कारण मराठी साधनें बाजूला ठेवलीं, तरी अखिल भारतीय विद्वानांना परिचित असलेल्या साधनांवरून 'नाथ पंथ' वा 'नाथ संप्रदाय' ही संज्ञा जुनी असल्याचें उघड होतें. ब्रह्मानंदानें 'हठयोगप्रदीपिका-टीके'त 'नाथ संप्रदाय' हीच संज्ञा वापरली आहे : "आदिनाथः सर्वेषां नाथानां प्रथमः, ततो नाथसंप्रदायः प्रवृत्त इति नाथसंप्रदायिनो वदन्ति।"[२९] गोरक्षसिद्धान्तसंग्रहां'त 'नाथमार्ग' अशी संज्ञा वापरली आहे.[३०] गोरक्षनाथ नाथ संप्रदायांत अनेकदां केवळ 'नाथ' या नांवानें ओळखला जातो. 'राजगुह्यां'त 'नाथ' शब्दाचें विवरण असें दिलें आहे –

**नाकारोऽनादिरूपं थकारः स्थाप्यते सदा।**
**भुवनत्रयमेवैकः श्रीगोरक्ष नमोऽस्तु ते ॥**

'शक्तिसंगमतंत्रां'तहि 'नाथ'-पदाचें असेंच आध्यात्मिक व्युत्पादन केलें आहे –

**श्रीमोक्षदानदक्षत्वात् नाथ ब्रह्मानुबोधनात्।**
**स्थगिताज्ञानविभवात् श्रीनाथ इति गीयते ॥**

महाराष्ट्रांत तरी तेराव्या शतकापासून आजपर्यंत 'नाथ पंथ' हीच संज्ञा बाहुल्यानें

२८. नाथ संप्रदायेर इतिहास, दर्शन ओ साधनाप्रणालि (बंगाली) : डॉ. कल्याणी मल्लिक, पृ. १.
२९. हठयोगप्रदीपिका, १.५, पृ. ९.
३०. गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. १८.

वापरली गेली आहे. ' नाथ पंथका बाणा न्यारा ' असें सोहिरोबानाथांनीं म्हटलें आहे. 'नवनाथभक्तिसार' या ग्रंथांत याच संज्ञेचा उपयोग आहे. गिरिधर-स्वामींच्या 'समर्थप्रतापां'त ' नाथपंथी बाळक ' असे शब्द आले आहेत.[31] स्वतः रामदासांनीं 'दासबोधां'तील सभा-स्तवनांत 'नाथपंथी'चा समावेश केला आहे.[32] राजराम प्रसादींच्या 'भक्तमंजरीमालें'त ' नाथसंप्रदाई तयासी नमन ' असें म्हटलें आहे.[33] त्र्यंबकरायाच्या 'बाळबोधां'त " येथूनि दृष्टि प्रकारु । नाथ पंथ विचारु । " आणि " नाथपंथी सीद्धान्ती । तेथहि दाविली वित्पत्ति । " असा दोनदां याच नांवाचा उल्लेख आहे.[34] संत निळोबांनीं ' नाथ संप्रदायाची थोरी । प्रकट केली ज्ञानेश्वरी । '[35] या पंक्तींत याच नांवाचें स्पष्ट उपयोजन केलें आहे.

हे उत्तरकालीन उल्लेख सोडले तरी स्वतः ज्ञानेश्वरांचा " आम्ही एकें दीन जाणा नाथपंथी । " हा अभंग प्रसिद्धच आहे. याहि पूर्वी शोध घ्याव-याचा झाला, तर 'लीळाचरित्र' आणि अन्य महानुभावीय आद्य ग्रंथ यांत याच शब्दाचा अनेकदां उपयोग झाला आहे.[36] ' नाथ पंथ ' आणि 'नाथपंथी' हे शब्द लीळाचरित्रांत कित्येक ठिकाणीं आले आहेत, हें जाणत्यांना चांगलें परि-चित आहे. हरिबास-सोंगोबास-रचित 'अन्वयस्थळां'तहि ' नाथ पंथ ' ही संज्ञा वापरलेली आहे.[37] 'ज्ञानेश्वरीं'त सहाव्या अध्यायांत योगरहस्याला ' नाथ-संकेतींचा दंशु '[38] म्हटल्याचें सर्वपरिचित आहे. यावरून ' नाथ पंथ ' वा ' नाथ संप्रदाय ' या संज्ञेची प्राचीनता व सार्वत्रिकता सिद्ध होईल.

मीं ' नाथ पंथ ' अशी संज्ञा न वापरतां ' नाथ संप्रदाय ' ही संज्ञा सहेतुक-पणें वापरली आहे. प्राचीन मराठींतील आध्यात्मिक स्वरूपाच्या साहित्यांत 'संप्रदाय' हा शब्द विशेष अर्थ-सघन आहे, हें संतसाहित्याच्या अभ्यासकांना

---

३१. समर्थ-प्रताप, २–७७, पृ. २५.

३२. दासबोध, १. ८. १०.

३३. भक्तमंजरीमाला, २४. ९१.

३४. बाळबोध, पृ. १३४, १८६.

३५. निळोबाराय यांचा गाथा, १५५८.

३६. लीळाचरित्र, भा. ४, पृ. २०, ४९.

३७. अन्वयस्थळ, म. सा. पत्रिका, अं. १०६, पृ. २६, ३१.

३८. ज्ञानेश्वरी, ६. २९१.

परिचित आहे. साधकाच्या साधना-क्रमांत या ‘संप्रदाया’चें महिमान फार मोठें मानलें जातें :

तरि ययाचि शास्त्राचेनि । संप्रदायें पांघुरौनि ।
शास्त्रार्थु हा निकेनी । अनुष्ठीं हो ॥
येऱ्हवीं अमृतमथना । सारिखें होईल अर्जुना ।
जरि रिघसी अनुष्ठाना- । संप्रदायेंवीण ॥
गाय धड जोडे गोमटी । ते तैंचि पिवों ये किरीटी ।
जैं जाणिजे हातवटी । सांजवणीची ॥
तैसा गुरु प्रसन्नु होये । शिष्य विद्या ही कीर लाहे ।
परि ते फळे संप्रदायें । उपासिलिया ॥
म्हणौनि शास्त्रीं जो इथे । उचितु संप्रदायो आहे ।
तो ऐक आतां बहुवें । आदरेंसीं ॥ [३९]

या ओव्यांत ज्ञानेश्वरांनीं ‘संप्रदाय’ या संज्ञेंत जी सघनता ओतली आहे, ती विशेष आहे. याच सघन अर्थानें ‘संप्रदाय’ संज्ञेचा अनेक साधकांनीं उपयोग केला आहे. ज्ञानेश्वर-परंपरेंतील शिवदीननाथांनीं –

आतां वंदुं सांप्रदाय । परात्पर श्रीसद्‌गुरुपाय ।
संसारसागर तरणोपाय । पर्याय अपाय नाशकर्ते ॥ [४०]

याच सघन अर्थानें हा शब्द वापरला आहे. ‘संप्रदाय’ या शब्दाची ही प्रतिष्ठा जाणूनच मीं ‘ नाथ संप्रदाय ’ हें नांव स्वीकारलें आहे.

**सिद्धमत :** ‘सिद्धमत’ ही संज्ञा ‘ सिद्ध असें मत ’ वा ‘ सिद्धांचें मत ’ अशीं दोन प्रकारें विवरितां येईल. परंतु माझ्या मतें दुसरें विवरणच अधिक सयुक्तिक आहे. कारण ज्याप्रमाणें या संप्रदायांतील दीक्षितांना ‘नाथ’ अशी संज्ञा नामान्तीं जोडली जाते आणि आदिकालीन दीक्षितांचा ‘नाथ’ असा सामान्यनामात्मक निर्देश केला जातो, त्याचप्रमाणें या संप्रदायांतील आदिकालीन दीक्षितांना ‘सिद्ध’ असेंहि म्हणत. अर्थात् ‘सिद्ध’ ही पदवी मात्र नाथ संप्रदायांतील दीक्षितांपुरतीच मर्यादित नसून, तिचा वापर नाथ संप्रदायाच्या

---

३९. ज्ञानेश्वरी, १८. १४८१–८५.
४०. ज्ञानप्रदीप, ८९६.

उदयापूर्वींहि केला जात होता. प्रारंभीं 'सिद्ध संस्कृती 'चा विचार करतांना आपण 'सिद्ध' संज्ञेच्या व्याप्तीचा इतिहास पाहिला आहे. नाथ संप्रदायाशीं निकटचा संबंध असलेले वज्रयानी सिद्ध, जैन सिद्ध, कौल सिद्ध, निरंजन सिद्ध अशा अनेक साधना-प्रणालींच्या सिद्धांचा वावर त्या काळांत होता. पण असा या संज्ञेचा अतिव्याप्त वापर असूनहि, नाथ संप्रदाय 'सिद्धमत' या नांवानें ओळखला जात असे. 'सिद्धसिद्धान्तपद्धति' या गोरक्षकृत संस्कृत ग्रंथांत हीच संज्ञा अनेकवार वापरली आहे[४१] –

वर्जयेत् तान् गुरून् दूरे धीरः सिद्धमताश्रयः ।
तस्मात् सिद्धमतं स्वभावसमयं धीरः सदा संश्रयेत् ।

'मुमुक्षू'त आलेल्या ज्ञानेश्वर मंडळाच्या अप्रसिद्ध अभंगांत 'सिद्धपंथ' असा या पंथाचा निर्देश निवृत्तिनाथ व ज्ञानेश्वर यांनीं केला आहे –

" गहिनीनाथ सांगे निवृत्तीचे कानीं । पावले ते ज्ञानी सिद्धपंथें ॥ "
" निवृत्तीनें गूज स्वतंत्र बोतिलें । अपार पावले सिद्धपंथें ॥ "
" निवृत्ति निष्टंक ज्ञान तें सम्यक । गयनी विवेक सिद्धपंथु ॥ "

चांगा वटेश्वराच्या 'तत्त्वसार' या ग्रंथांत –

गुरूनि मुखींचा उगाळु दिधला । महाप्रसादु म्हणौनि येरें घेतला ।
मग शिष्यें पुसिला । सिद्धपंथु ॥ [४२]

असा 'सिद्धपंथा'चा उल्लेख असून पुढें 'सिद्धपंथ' या शीर्षकाखालीं नाथ-सिद्धांची नामावळी दिली आहे. संत तुकारामांनींहि आपल्या दोन अभंगांत सिद्धपंथाचा गौरव केला आहे –

" जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्धपंथ ॥ "
" जाईन सिद्धपंथें अवघ्या चुकतील खेपा ॥ "

यांत भक्तीलाच 'सिद्धपंथ' म्हटलें असलें, तरी हा निवृत्ति-ज्ञानदेवांचा पंथ, असें तुकारामबोवांना अभिप्रेत असावें. दामा कोंडदेवकृत 'सिद्धान्तसार' या नाथपंथीय ग्रंथांत –

---

४१. सिद्धसिद्धान्तपद्धति, ६. ७५-७९.
४२. तत्त्वसार, ८६४.

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........



हा सिद्धान्तु ईश्वरें उमेप्रती निरोपिला।
तेथूनिया सिद्धपंथ कैसा चालिला।[४३]

असा उपसंहारांत नाथ पंथाचा नामनिर्देश आहे. महानुभावांच्या 'मतिरत्नाकर' या उत्तरकालीन ग्रंथांत 'सिद्धिप्रकाश' ग्रंथांतील संस्कृत श्लोकावर व्याख्यान करतांना —

दुराश्रवणी म्हणिजे दुरुनि ऐकिजे।
प्रकाशरूपता प्रकाशें आगळी बोलिजे।
या अष्टमहासिद्धि जाणिजे।
सिद्धपंथ ॥ [४४]

'सिद्धपंथ' हेंच नांव वापरलें आहे.

**अवधूत मार्ग :** नाथपंथीय योग्याला 'नाथ', 'सिद्ध', 'जोगी' याप्रमाणेंच 'अवधूत' ही एक संज्ञा आहे. या अवधूतांचें जें मत, तें अवधूत मत, अवधूत मार्ग वा अवधूत पंथ. 'लीळाचरित्रां'त अवधूतांचा उल्लेख अनेक वेळां आला आहे. कबीरानें या नाथपंथीय 'अवधू'ला उद्देशून अनेक तत्त्वोद्गार काढले आहेत. मीरेनेंहि आपल्या कांहीं पदांत या 'अवधू'ला संबोधलें आहे. गोरक्षसिद्धान्त-संग्रहांत "अस्माकं मतं त्ववधूतमेव।"[४५] असें म्हटलें आहे. 'सिद्धसिद्धान्त-पद्धती'चा संपूर्ण षष्ठोपदेश अवधूतलक्षणाचा असून त्यांत 'सोऽवधूतोऽभिधीयते' असा शेवट असलेले अवधूतलक्षणाचे एकामागून एक अनेक श्लोक आहेत. "सर्वान् प्रकृतिविकारानवधुनोतीत्यवधूतः।"[४६] अशी गोरक्ष-कृत अवधूत-पदाची व्याख्या आहे. 'गोरखबानीं'ताहि अनेकदां 'अवधूत'-पदाचें विवेचन केलें आहे. दत्तसांप्रदायिकांत दत्तात्रेयाला 'अवधूत' म्हणून संबोधिलें जातें. नाथ संप्रदायाच्या देवतासमूहांत दत्ताला मोठें स्थान आहे. 'अवधूत-गीता' हा दत्तसांप्रदायिक ग्रंथ दत्तात्रेयानें गोरक्षनाथाला बोधिल्याची कथा आहे. 'दत्त-गोरक्षगोष्टी' असा एक नाथसांप्रदायिक ग्रंथ आहे. तेव्हां दत्तात्रेय या देवतेचा उगम आणि दत्त व नाथ या दोन संप्रदायांचा संबंध यांचा अधिक

---

४३. ऐतिहासिक संकीर्ण वाङ्मय-साहित्य, खंड १ ला, पृ. ५१.
४४. मतिरत्नाकर, पृ. २९.
४५. गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. १८, ५६.
४६. सिद्धसिद्धान्तपद्धति, ६. १.

गांभीर्यानें आणि संशोधनपूर्वक विचार व्हावयास पाहिजे, असें वाटतें. " वटेश्वराचा सुतु । चांगा म्हणे अवधुतु । "[४७] " तरी सांघीजेती ते अवधूत । जे निजानंदें भरित ॥ "[४८] " म्हणूनि शिवादि गुरुपर्यंत । जाणावे ते अवधूत। "[४९] " दत्तदुर्वासादि वसिष्ठ हनुमंत । कपिल मत्स्येंद्रादि गोरक्ष अवधूत । "[५०] असे कितीतरी 'अवधूत'-पदाचे उल्लेख प्राचीन मराठींत आढळून येतील. विस्तार-भयास्तव अधिक उतारे दिले नाहींत.

**योगमार्ग :** योगप्रधान मार्ग म्हणून योगमार्ग. अर्थात् 'सिद्धपंथा'प्रमाणेंच याहि नांवाची व्याप्ति नाथ पंथापुरती मर्यादित असणार नाहीं. आपण पाहिलेंच आहे की, नाथ पंथाच्या उदयाच्या वेळीं भारतांत अनेक योगप्रधान साधना प्रचलित होत्या. 'गोरक्षसिद्धान्तसंग्रहां'त " योगसंप्रदायं विना सर्वमते विपरीता वार्ता वर्तते । "[५१] असा या नांवाचा उल्लेख आहे.

**गोरख पंथ :** गोरख-प्रवर्तित पंथ म्हणून गोरखपंथ. ही संज्ञा अव्याप्त आहे. कारण नाथसंप्रदायांतर्गत 'गोरखपंथी' या शाखेंतील बैराग्यांचाच निर्देश बहुशः या संज्ञेनें होतो.

**कानफाटा :** कान फाडून कर्णमुद्रा घालण्याच्या पद्धतीवरून हें नांव मिळालें आहे. मराठींत तरी हें नांव निंदाव्यंजक म्हणून वापरलें जातें. एक-नाथ-तुकाराम-रामदास आणि इतरहि कांहीं महाराष्ट्रीय संतांनीं कानफाट्यांवर कठोर टीका केली आहे. लिओनार्ड, ब्रिग्ज आदि पाश्चात्य लेखकांनीं आपल्या नाथ पंथावरील ग्रंथांच्या नांवांत ( Notes on the Origin of Kanphata Yogis, Gorakhnath & the Kanphata Yoigs ) 'कानफाटा' हाच शब्द वापरला आहे.

**गुरुमार्ग :** ही संज्ञा श्री. शं. बा. जोशी यांनीं आपल्या 'मऱ्हाटी संस्कृति' या ग्रंथांत वापरली आहे.[५२] नाथ संप्रदायांत असलेल्या गुरुमाहिम्यावर

---

४७. तत्त्वसार, १०२५.
४८. विवेकसिंधु, १८. २३.
४९. विवेकसिंधु, १८. २२.
५०. स्वानुभवदिनकर, ९. २. २२.
५१. गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. ५८
५२. मऱ्हाटी संस्कृति, पृ. १५८.

या संज्ञेचें अधिष्ठान आहे. गोरक्षकृत ग्रंथांत, अन्य सांप्रदायिक ग्रंथांत आणि ज्ञानेश्वरींत प्रकटलेला गुरुमहिमा पाहून हें सार्थ वाटतें. या संज्ञेंत श्री. जोशी यांनीं अन्य गुरुप्रधान साधनाप्रणालींचाहि समावेश केला आहे.

## सिद्धान्त :

मत्स्येंद्रनाथाचा अभिनवगुप्तानें 'तंत्रालोकां'त केलेला सादर उल्लेख आणि गोरक्षाच्या नांवावर काश्मिरी शैव परंपरेंत आढळणारे 'महार्थमंजिरी' इत्यादि ग्रंथ यांमुळें नाथ संप्रदायाच्या विचारविश्वावर काश्मिरी शैव संप्रदायाचा परिणाम असणें सुसंगत आहे. शिवशक्तींच्या प्राणभूत कल्पनेचा समावेश नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानांत काश्मिरी परंपरेंतूनच झाला आणि ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवांत त्या कल्पनेचें परिणत आणि परिष्कृत स्वरूप प्रकट झालें. ज्ञानेश्वरांच्या विचार-विश्वावर, विशेषतः अमृतानुभवांत, काश्मिरी शैव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव असल्याचें जाणत्यांनीं मान्य केलें आहे. हा प्रभाव अर्थातच बाहेरचा नाहीं; तो परंपरेच्या प्रवाहांतूनच ज्ञानेश्वरापर्यंत पोंचला आहे, हें वरील संबंधावरून कळून येईल. किंबहुना आपणांस असेंहि म्हणतां येईल कीं, गोरक्ष-नाथाच्या दार्शनिक समन्वयाच्या बीजांतूनच ज्ञानेश्वरांनीं आपल्या दिव्य प्रतिभेनें आणि प्रगाढ अनुभूतीनं अमृतानुभवासारखें अमृतमधुर फळ निर्माण केलें.

नाथ संप्रदायांतील अनेकांनीं ग्रंथरचना केली असली, तरी संप्रदायाच्या मूलसिद्धान्तांच्या दृष्टीनें आपणांस त्या ग्रंथांचा तितकासा उपयोग करून घेतां येणार नाहीं. उत्तरकालीन ग्रंथकारांनीं आपापल्या काळांतील अनेक भल्या-बुऱ्या गोष्टी उचलल्या असल्यानें मूलविचार त्यांच्या मांडणींत झांकोळले आहेत. प्रत्यक्ष मत्स्येंद्रनाथाचे ग्रंथहि कौलमताचे असल्यानें नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञाना-साठीं त्यांचा उपयोग करून घेतां येणार नाहीं. जालंधरनाथ आणि कृष्णपाद या आदिसिद्धांच्या रचनेचाहि, ते कापालिक मताचे असल्यामुळें, उपयोग होणार नाहीं. अर्थात् संप्रदायाचा प्रवर्तक गोरक्षनाथ याच्याच ग्रंथांचा विचार करून संप्रदायाचे मूलसिद्धान्त ठरवावे लागतील. गोरक्षनाथाच्या नांवावर असलेल्या प्रचंड ग्रंथसंभारांत साधनापरक ( केवळ योगप्रक्रिया सांगणारे ) असे ग्रंथच अधिक आहेत गोरक्षनाथाची स्फुट हिंदी रचना वादातीत गोरक्षकृतच आहे, असें निश्चयाने सांगतां येत नाहीं. अशा अवस्थेंत गोरक्षनाथाचा

सर्वमान्य संस्कृत ग्रंथ 'सिद्धसिद्धान्तपद्धति' याच्या आधारेंच नाथ संप्रदायाचे मूलसिद्धान्त ठरवावे लागतील.

**शक्तियुक्त शिव :** 'सिद्धसिद्धान्तपद्धती'च्या प्रारंभीं गोरक्षनाथानें पुढील श्लोकांत ग्रंथप्रस्ताव केला आहे :

**आदिनाथं नमस्कृत्य शक्तियुक्तं जगद्गुरुम् ।**
**वक्ष्ये गोरक्षनाथोऽहं सिद्धसिद्धान्तपद्धतिम् ॥**

गोरक्षनाथाच्या मतें हा आदिनाथ वा 'शक्तियुक्त शिव' हेंच अंतिम सत्य आहे. तें स्वयंप्रकाश, स्वसंवेद्य, अनन्त, अविनाशी, व्यक्ताव्यक्तविवर्जित आणि द्वैताद्वैतविलक्षण आहे. हें शिवतत्त्व शक्तियुक्त आहे. परंतु शक्ति ही शिवाहून भिन्न नसून ती तदन्तर्गतच आहे. तीच विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-लयाला कारणीभूत आहे. या शक्तीचें स्वरूप अखंड क्रियमाण आहे. हें क्रियमाण स्वरूप कधीं स्थूल, तर कधीं सूक्ष्म, कधीं व्यक्त, तर कधीं अव्यक्त असतें. या शक्तीच्या विकासांतून व संकोचांतूनच हें विश्व-चक्र चालू असतें. या शक्तीनें युक्त असा शिवच पिण्ड-ब्रह्माण्डाचा आधार आहे. 'शिवां'तील इकार हा शक्तिवाचक असून शक्तिविना शिव हा केवळ 'शव' आहे –

**शिवोऽपि शक्तिरहितः कर्तुं शक्तो न किञ्चन ।**
**स्वशक्त्या सहितः सोऽपि सर्वस्याभासको भवेत् ॥** [५३]

शिव आणि शक्ति यांच्यांत अभेद आहे. चन्द्र-चन्द्रिकेप्रमाणें त्यांचा अन्योन्य संबंध आहे :

**शिवस्याभ्यन्तरे शक्तिः शक्तेरभ्यन्तरे शिवः ।**
**अन्तरं नैव जानीयात् चन्द्रचन्द्रिकयोरिव ॥** [५४]

ही शक्ति कधीं व्यक्त असते, तर कधीं अव्यक्त. जेव्हां ही शक्ति विश्वरूपानें स्फुरते, तेव्हां शिवच विश्वाचा सर्जक, नियंत्रक आणि संहारक बनतो आणि जेव्हां ती अव्यक्त असते, तेव्हां शिवाचें स्वरूप अद्वय असतें. या बाबतींत गोरक्षनाथानें स्पष्ट केलें आहे :

---

सिद्धसिद्धान्तपद्धति, ४. १३.
५४. सिद्धसिद्धान्तपद्धति, ४. २६.

अलुप्तशक्तिमान्नित्यं सर्वाकारतया स्फुरन् ।
पुनः स्वेनैव रूपेण एक एवावशिष्यते ॥ [५५]

ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवाच्या प्रथम प्रकरणांत हें शिव-शक्ति-समावेशन अत्यन्त बहारीनें वर्णिलें आहे :

जेणें देवें संपूर्ण देवी । जियेविण कांहीं ना तो गोसावी ।
किंबहुना येकोपजीवी । येकयेकांची ॥
कैसा मेळु आला गोडिये । दोघें न माती जगीं इयें ।
कीं परिमाणुहीमाजी उवायें । मांडलीं आहातीं ॥
जिहीं येकयेकाविण । न कीजे तृणाचेंही निर्माण ।
जियें दोघें जीऊप्राण । जियां दोघां ॥ [५६]

ज्याप्रमाणें दोन टिपऱ्यांचा नाद एकच, दोन फुलांचा गंध एकच, दोन ज्योतींचा प्रकाश एकच, दोन ओठांतील शब्दोच्चार एकच, दोन डोळ्यांतील दृष्टि एकच, त्याप्रमाणें या विश्वाच्या पसाऱ्यांत 'शिव-शक्ति' या नामद्वयानें नटलेलें तत्त्व एकच आहे. [५७] ज्ञानेश्वरांनीं चन्द्र-चन्द्रिकेऐवजीं दीप-दीप्तीची आणि सूर्य-प्रभेची कल्पना वापरली आहे आणि ही अभिन्नता आणखी स्पष्ट केली आहे :

गोडी आणि गुळु । कापुरु आणि परिमळु ।
निवडूं जातां पांगळु । निवाडु होय ॥
समग्र दीप्ति घेतां । जेविं दीपुचि ये हातां ।
तेविं जियेचिया तत्त्वतां । शिवुचि लाभे ॥
जैसी सूर्यीं मिरवे प्रभा । प्रभे सूर्यत्वचि गाभा ।
तैसी भेद गिळीत शोभा । येकचि जे ॥ [५८]

ज्ञानेश्वरांच्या परंपरेंतील एक श्रेष्ठ ग्रंथकार आणि अमृतानुभवाचे एक समर्थ भाष्यकार शिवकल्याण यांनीं आपल्या दशम-टीकेच्या प्रारंभीं शिव-स्वरूप

---

५५. सिद्धसिद्धान्तपद्धति, ४. १२.
५६. अमृतानुभव, १. १०–१२.
५७. अमृतानुभव, १. १८–१९.
५८. अमृतानुभव, १. २३–२५.

गुरूला वंदन करतांना चन्द्रचन्द्रिकेची कल्पना रसाळ शब्दांत मांडली आहे :

ते जे काहिं प्रतिति । ते निर्विशेषें चिच्छक्ति ।
असो हे तुझि दिप्ति । तुजवरि मांडलि ॥
जेव चंद्राची चंद्रिका भलि । चंद्रावरि वेलिं गेलि ।
तेवि जगमिशें विलासलि । तुझि शोभा ॥ [५९]

आदिनाथ भैरवानें शके १७५६ मध्यें लिहिलेल्या 'श्रीनाथलीलामृत' या ग्रंथांत प्राचीन सांप्रदायिक ग्रंथांच्या आधारें अनेक ठिकाणीं सांप्रदायिक तत्त्वज्ञानाचें विवेचन केलें आहे. शिवशक्ति-अभेदाचें वर्णन करतांना आदिनाथ भैरव म्हणतो :

सामरस्याचे वोहल्यावरी । शिवशक्ती साजिरी ।
अभेद जेवीं सिंध-लहरी । लवण-जळ न्यायेसी ॥
जेवीं दीप आणि ज्योती । किरणें अंगीं गभस्ती ।
कीं चंद्र आणि दीप्ती । अभेदें असती ज्यापरी ॥
पुष्प तेथें सुगंध । वाद्य तेथेंचि नाद ।
कीं सुख तेथें आनंद । अभेदपणें वर्तत ॥ [६०]

पिण्ड-ब्रह्माण्ड : तें एकमेवाद्वितीय शिवतत्त्वच विश्वरूपानें स्फुरलें आहे; त्याचप्रमाणें 'ब्रह्माण्डवर्ति यत्किञ्चित् तत्पिण्डेऽप्यस्ति सर्वथा ।" असा पिण्ड-ब्रह्माण्डाविषयीचा गोरक्षनाथाचा सिद्धान्त आहे. जें जें ब्रह्माण्डांत आहे, तें तें सारें पिण्डांत आहे. त्यामुळें 'पिण्डसंवित्ती'चें गोरक्ष-विचारांत विशेष महिमान आहे. 'पिण्डमध्ये चराचरौ यो जानाति स योगी पिण्डसंवित्तिर्भवति ' [६१] असें त्यानें स्वच्छ म्हटलें आहे. या सर्व विचार-प्रक्रियेचें सारभूत रहस्य गोरक्षनाथानें अत्यंत सुंदर शब्दांत सांगितलें आहे : "अतएवैकाकार एवानन्तशक्तिमान् निजानन्दतयावस्थितोऽपि नानाकारत्वेन विलसन् स्वप्रतिष्ठां भजतीति व्यवहारः ।" [६२] हें विश्व-चक्र, हा चराचराचा व्यापार म्हणजे शिवाची

५९. श्रीकृष्णजन्मपंचाध्यायी, १. १०–११.
६०. नाथलीलामृत, २. ९७–९९.
६१. सिद्धसिद्धान्तपद्धति. ३. १.
६२. सिद्धसिद्धान्तपद्धति, ४. १२.

'आत्मरति' आहे. आपणच आपणांला भोगण्यासाठीं तो 'बहुत्व' पावला आहे. ज्ञानेश्वरांनीं ही 'आत्मरती'ची ( ...'स्वप्रतिष्ठां भजतीति व्यवहारः ।' ) कल्पना आपल्या काव्यात्म भाषेनें खुलविली आहे. अमृतानुभवाच्या नवव्या प्रकरणाच्या प्रारंभीं जीवन्मुक्तावस्थेचें वर्णन करतांना त्यांनीं एकामागून एक समर्पक सुंदर कल्पनांचा वर्षाव करून ही 'आत्मरति' वर्णिली आहे. ते म्हणतात :

**आतां आमोद सुनास जालें । श्रुतीसि श्रवण रिघालें ।**
**आरिसे उठिले । लोचनेंसी ॥**
**आपलेंनि समीरपणें । वेल्हावती विंजणें ।**
**कीं माथेंचि चांफेपणें । बहकताती ॥**
**जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकासे ।**
**चकोरचि जैसें । चंद्रमा जालें ॥**
**फुलेंचि जालीं भ्रमर । तरुणीचि जाली नर ।**
**जालें आपुलें शेजार । निद्राळुचि ॥**
**चूतांकुर जाले कोकीळ । आंगचि जालें मलयानिळ ।**
**रस जाले सकळ । रसनावंत ॥**
**तैसें भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता ।**
**हें सरलें अद्वैता- । अफुटामाजीं ॥** [६३]

हा अमृतानुभव चाखणें, पिण्ड-ब्रह्माण्डाच्या अन्तर्यामीं वसणाऱ्या शिवाशीं 'समरसीकरण' साधणें हेंच नाथयोग्याचें परमध्येय आहे.

**साधना :**

मानवी शरीरांत कुंडलिनीरूपानें शक्ति सुप्त स्थितींत असते आणि मस्तकांतील सहस्रार चक्रांत शिवाचा निवास असतो. जन्मजन्मान्तरींच्या संचित मलभारानें-कुंडलिनी दबली जाते. जर साधकानें ध्यानधारणेच्या साह्यानें प्राणवायूचें संयमन केलें आणि षट्कर्मांच्या द्वारां नाडी-शोधन साधलें, तर कुंडलिनीचा सुषुम्नामार्ग खुला होतो आणि ब्रह्मरंध्रांतून ती शिव-संमीलनासाठीं धांवत जाते. अग्निचक्रांत सुप्त असलेली ही शक्ति जेव्हां सहस्रार वा शून्य चक्रांतील शिवाशीं समरस होतो, तेव्हां योग्यांना कैवल्यावस्थात्मक, परमानंदमय

---

६३. अमृतानुभव, ९. १-४, ६-७.

सहजसमाधि प्राप्त होते. यालाच 'पिंड-ब्रह्माण्डैक्य' वा 'समरसीकरण' अशी संज्ञा आहे.

ज्याप्रमाणें चावीनें हठात् कुलूप उघडलें जातें, त्याप्रमाणें कुंडलिनीच्या उद्बोधनानें हठात् मोक्षद्वार खुलें होतें. हठात् मोक्षद्वार खुलें करण्याची प्रक्रिया ज्यांत आहे, तो हठयोग. हठयोगाला शरीराच्या आंतरघटनेचें ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. हें ज्ञान नसणारा योगी केवळ नामधारी होय, असें गोरक्षनाथानें म्हटलें आहे :

**नवचक्रं कलाधारं त्रिलक्ष्यं व्योमपञ्चकम् ।**
**सम्यगेतन्न जानाति स योगी नामधारकः ॥**[६४]

कुण्डलिनीचें उद्बोधन वायु-निरोधानें साधावयाचें असतें. त्यामुळें प्राणवायूचा निरोध म्हणजे हठयोग. अर्थात् वायुवहन करणाऱ्या नाड्या आणि त्यांनीं बनलेलीं शरीरस्थ चक्रें योग्याला ज्ञात असावयास हवीं. कुण्डलिनीचा प्रवास या चक्रांना ओलांडून अंतिम, मस्तकस्थ सहस्रार चक्रापर्यंत व्हावयाचा असतो. मेरुदंडाजवळील मूलाधार चक्र, त्यानंतर नाभीजवळ स्वाधिष्ठान चक्र, त्यावर मणिपूर चक्र, हृदयाजवळ अनाहत चक्र, कंठाजवळ विशुद्धाख्य चक्र आणि भ्रूमध्यांतील आज्ञाचक्र अशा सहा चक्रांना ओलांडून कुण्डलिनी सहस्रारांत जाते. या कुण्डलिनीच्या प्रवासालाच 'षट्चक्रभेदन' असें म्हणतात. हीं चक्रें 'सिद्धसिद्धान्तपद्धतीं'त नऊ मानलीं आहेत. हठयोगी कुण्डलिनीचा प्रवास निर्वेध होण्यासाठीं षट्कर्मांनीं नाडीशुद्धि साधतो. धौति, बस्ति, नेति, त्राटक, नौलि, कपालभाति या नाडीशुद्धीच्या सहा यौगिक प्रक्रिया ( षट्कर्में ) आहेत. सांप्रदायिक साधनग्रंथांत या प्रक्रियांची विस्तृत माहिती दिलेली आहे.

नाडीशुद्धि झाल्यावर प्राणादि वायूंचें सहज शमन होतें. नाना प्रकारच्या आसनांनीं आणि प्राणायामानें कुंडलिनीचा सुषुम्नामार्ग-खुला होतो. ही कुंडलिनी उद्‌बुद्ध होऊन अनाहत चक्रापर्यंत आल्यावर प्राणाचें स्थिरीकरण होतें आणि साधकाला अनाहत नाद ऐकूं येऊं लागतो. हा प्रथम सागरगर्जित वा मेघगर्जितासारखा असतो; नंतर क्रमशः शंख-घंटा-काहल यांच्या ध्वनी-सारखा आणि अखेर बांसरीच्या सुरासारखा किंवा वीणा-झंकारासारखा असतो.

---

६४. सिद्धसिद्धान्तपद्धति, २. ३१.

नंतर साधकाच्या चित्तस्थिरतेच्या योगानें हा नादहि विरत जातो आणि षट्-चक्रांचा प्रवास पुरा करून कुंडलिनी सहस्रारस्थित शिवाला आलिंगन देते. हें सहस्रार चक्र म्हणजेच योग्याच्या महायात्रेंतील कैलास. इथेंच शिवाचा निवास असल्यानें याला महातीर्थाचें महिमान प्राप्त झालेलें असतें. या महातीर्थापर्यंत योग्याला नेणारी सुषुम्ना नाडी याचमुळें 'शाम्भवी शक्ति' हें नाभाभिधान पावली आहे.

कुंडलिनी ही माकडहाडाजवळील मूलाधार चक्रांत सुप्तावस्थेंत असते. ती केवळ अमूर्त चैतन्यरूप ( Energy ) आहे. कुंकुमानें न्हालेल्या व आपल्या अंगाचे साडेतीन वेढे घातलेल्या नागिणीसारखी ती असते, असें ज्ञानेश्वरांनीं तिचें वर्णन केलें आहे :

नागाचें पिलें । कुंकुमें नाहलें ।
वळण घेऊनि आलें । सेजे जैसें ॥
तैशी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी ।
अधोमुख सर्पिणी । निजैली असे ॥ [६५]

गोरक्षनाथानें तिच्या तेजाचें वर्णन 'बालार्ककोटिसदृशी' [६६] असें केलें आहे. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत या कुंडलिनीच्या उद्बोधनाचें आणि तिच्या सहस्रारापर्यंतच्या प्रवासाचें इतकें हृदयंगम चित्र रेखाटलें आहे कीं, तें वाचतांना ती अन्तःस्थित शक्ति आपल्या डोळ्यांपुढें साकार झाल्याचा भास होतो. ज्ञानेश्वरांनीं या अध्यायांत आपलें परंपराप्राप्त योग-प्रक्रियांचें सारें ज्ञान स्वानुभवाच्या उत्कटतेनें मांडलें आहे. हा 'नाथसंकेतींचा दंशु' आहे, असें त्यांनीं स्पष्टच सांगितलें आहे. 'चैतन्य-चक्रवर्तीची शोभा' असलेली ती परमेश्वरी कुंडलिनी षट्चक्रभेदानंतर सहस्रारांतील चंद्रामृताचें प्राशन करते, तेव्हां योग्याच्या रूपांत होणारा बदल ज्ञानेश्वरांनीं अतीव सुंदर शब्दांत आणि स्वानुभूतीच्या रंगांत चितारला आहे :

मग काश्मीराचे स्वयंभ । कां रत्नबीजा निघाले कोंभ ।
अवयवकांतीची भांब । तैसी दिसे ॥

---

६५. ज्ञानेश्वरी, ६. २२२–२२३.

६६. सिद्धसिद्धान्तपद्धति, २. २.

नातरी संध्यारागींचे रंग । काढूनि वाळिलें तें आंग ।
कीं अंतर्ज्योतीचें लिंग । निर्वाळिलें ॥
तो कनकचंपकाचा कळा । कीं अमृताचा पुतळा ।
नाना सासिनला मळा । कोंवळिकेचा ॥
हो कां शारदीचिये वोलें । चंद्रबिंब पाल्हेलें ।
कां तेजचि मूर्त बैसलें । आसनावरी ॥ [६७]

'सिद्धसिद्धान्तपद्धती'त गोरक्षनाथानें संक्षेपानें अष्टांगयोग वर्णिलें आहे : [६८] ( १ ) यम, ( २ ) नियम, ( ३ ) आसन, ( ४ ) प्राणायाम, ( ५ ) प्रत्याहार, ( ६ ) धारणा, ( ७ ) ध्यान, आणि ( ८ ) समाधि हीं काययोगाचीं आठ अंगें होत.

( १ ) यम : सर्वेन्द्रियजय; आहार-निद्रा-शीत-वातातपजय.

( २ ) नियम : मनोवृत्तींचें नियमन; एकान्तवास; निःसंगता; औदासीन्य; यथाप्राप्तिसंतुष्टि; गुरुचरणारूढत्व.

( ३ ) आसन : स्वस्वरूपांत समासन्नता. ( स्वस्तिकासन, पद्मासन, सिद्धासन, इत्यादि. )

( ४ ) प्राणायाम : प्राणाची ( वायूची ) स्थिरता. ( रेचक-पूरक-कुंभक-संघट्टकरण हीं चार प्राणायामाचीं लक्षणें होत. )

( ५ ) प्रत्याहार : 'चैतन्यतरङ्गाणां प्रत्याहारः ।'

( ६ ) धारणा : सबाह्याभ्यन्तर एकमेव निजतत्त्व आहे, अशी अन्तःकरणाची धारणा. ( 'स्वात्मानं निर्वातदीपमिव धारयेदिति धारणालक्षणम् ।' )

( ७ ) ध्यान : सर्वभूतांच्या ठायीं समदृष्टि. ( 'यद्यत्स्फुरति तत्तत्स्वरूपमेवेति भावयेत् ।' )

( ८ ) समाधि : समावस्था; निरुद्यमत्व; अनायासस्थितिमत्त्व.

याशिवाय नाना आसनें, मूलबंध, जालंधर बंध, उड्डियान बंध, खेचरी, सहजोली, अमरी इत्यादि मुद्रा – अशा नानाविध यौगिक क्रियांचें सूक्ष्म वर्णन 'हठयोगप्रदीपिके'सारख्या साधनाग्रंथांतून आलेलें आहे. वर केवळ स्थूल

६७. ज्ञानेश्वरी, ६. २५४, २५७–२५८.
६८. सिद्धसिद्धान्तपद्धति, २. ३२–३९.

रूपरेखा दिली आहे. मी योगविज्ञानाविषयीं अनभिज्ञ असल्यानें प्रमाणग्रंथ आणि जाणते योगज्ञ यांचा हवाला देणेंच इष्ट. कारण –

क्रियायुक्तस्य सिद्धिः स्यादक्रियस्य कथं भवेत् ।
न शास्त्रपाठमात्रेण योगसिद्धिः प्रजायते ॥ [६९]

**साधकाचा आचार :** वरील शारीरिक क्रियांच्या उल्लेखावरून असा भास होईल की, हें योगसाधन केवळ शरीरनिष्ठ आहे; परंतु मानसिक अभ्यासाशिवाय हें सारें अशक्य आहे. शुद्ध मनाचें अधिष्ठान लाभल्याशिवाय, 'चित्तवृत्तींचा निरोध' साधल्याशिवाय योगसाधनेचा प्रारंभच होऊं शकणार नाहीं. वर अष्टांगयोगाची, गोरक्षनाथाच्या शब्दांत, जी रूपरेखा दिली आहे, तींत साधनेचा प्रारंभ मानसिक अभ्यासांतून असल्याचें स्पष्ट होईल. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, क्षमा, धृति, दया, आर्जव, मिताहार, शौच हे दहा यम आणि तप, संतोष, आस्तिक्य, दान, ईश्वरपूजन, सिद्धान्तवाक्यश्रवण, लज्जा, तप, होम हे दहा नियम आचरूनच आसनांकडे वळावयाचें आहे. ध्यान आणि धारणा या मानसिक क्रियाच आहेत. आणि मन व शरीर यांच्या सहयोगी अभ्यासांतून साधलेली समाधि हीहि एक मनाचीच अवस्था आहे. त्या अवस्थेंत मन आनंदसागरांत विलय पावलेलें असतें.

गोरक्षनाथानें आपल्या हिंदी रचनांतून योग्याच्या 'रहनी'चा ( आचारधर्माचा ) विस्तृत विचार केला आहे. कठोर ब्रह्मचर्य, वाक्संयम, शारीरिक शौच, मानसिक शुद्धि, ज्ञाननिष्ठा, बाह्यावडंबराविषयीं अनादर, मद्यमांसादि मादक द्रव्यांच्या सेवनाविषयीं आत्यंतिक तिरस्कार, इत्यादि गोष्टींवर गोरक्षनाथानें आपल्या उपदेशांत जोर दिला आहे.

मुण्डनं चोपवासं च तीर्थयात्रां तथैव च ।
अग्निहोत्रं च संन्यासं नाथपन्थे विवर्जयेत् ॥

असा निषिद्ध आचारासंबंधींचा एक श्लोक वारंवार उल्लेखिला जातो.

**गुरूची आवश्यकता :** नाथ संप्रदाय हा गुरुमार्ग आहे. नाथ संप्रदायापूर्वींच्या सिद्ध संस्कृतींत गुरुमहिमा प्रकर्षाला पोंचला होता. अर्थातच हा गुरुमहिमा नाथ संप्रदायांतहि तसाच चढता-वाढता राहिला. पुढें नाथ संप्रदाया-

---

६९. हठयोगप्रदीपिका, १. ६५.

च्या प्रभावानें संपूर्ण मध्ययुगीन साधनेंत हें गुरुमहिमान नांदत राहिलें. 'गुरुरत्र सन्मार्गदर्शनशीलः' असा गोरक्षनाथाचा सिद्धान्त आहे. गोरक्षनाथाचें संपूर्ण जीवन गुरुभक्तीनें रंगलेलें होतें. या महापुरुषाच्या जीवनांतील अनेक अद्‌भुत कथा गुरुभक्तीच्या संदर्भांत सांगितल्या जातात :

> **कथनाच्छक्तिपाताद्वा पादावलोकनात् ।**
> **प्रसादात् स्वगुरोः सम्यक् प्राप्यते परमं पदम् ॥**
> **किमत्र बहुनोक्तेन शास्त्रकोटिशतेन च ।**
> **दुर्लभा चित्तविश्रान्तिर्विना गुरुकृपां पराम् ॥**[७०]

'निगुरा न रहिबा' ('गुरुहीन राहूं नये') असा लोकभाषेंतहि गोरक्षनाथानें इशारा दिला आहे. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या आपल्या दोन्ही ग्रंथांत कंठरवानें उद्घोषिलेली आणि जीवनभर आचरिलेली गुरुभक्ति किती उत्कट होती, हें महाराष्ट्रांत सर्वपरिचित आहे.

**सिद्ध पुरुष :** समाधि साधलेला योगी सिद्धावस्थेला पोंचतो. ही अवस्था गीतेंत वर्णिलेल्या सिद्ध पुरुषासारखीच नाथपंथीय ग्रंथांतून वर्णिली आहे. 'हठयोग-प्रदीपिके'च्या शेवटीं सिद्ध पुरुषाचें वर्णन पुढीलप्रमाणें दिलें आहे :

> **सर्वावस्थाविनिर्मुक्तः सर्वचिन्ताविवर्जितः ।**
> **मृतवत्तिष्ठते योगी स मुक्तो नात्र संशयः ॥**
> **खाद्यते न च कालेन बाध्यते न च कर्मणा ।**
> **साध्यते न स केनापि योगी युक्तः समाधिना ॥**
> **न विजानाति शीतोष्णं न दुःखं न सुखं तथा ।**
> **न मानं नापमानं च योगी युक्तः समाधिना ॥**[७१]

## सांप्रदायिक वेश :

सरदार नानासाहेब मिरीकरांनीं नगरच्या वाङ्मयोपासक मंडळांत नाथ पंथावर जी व्याख्यान-माला गुंफली, तींत दि. ८–९–३४ (शनिवार) रोजीं 'कानफाटे' या विषयावर त्यांनीं दिलेल्या विवेचक व्याख्यानांत म्हटलें आहे :

---

७०. सिद्धसिद्धान्तपद्धति, ५. ६२, ७८.
७१. हठयोगप्रदीपिका, ४. १७–८, १११.

" कानफाट्यांत वेशभूषणाला फार महत्त्व आहे. शैली, शृंगी, कंथा, झोळी हीं संप्रदायविशिष्ट वेशभूषणें धारण करण्याचा त्यांच्यांत प्रघात आहे. पुंगीलाहि फार महत्त्व असतें. ती वाजविल्याशिवाय त्यांना अन्नग्रहण करतां येत नाहीं. तसेंच 'कुका' नांवाचें एकतारी वाद्य वाजवून, गाणें म्हणून ते भिक्षा मागतात. 'आलख' व 'आदेश' हा त्यांच्या नमनाचा प्रघात असून भिक्षेच्या वेळींहि ते त्याचीच गर्जना करतात. मेखला, कौपीन, व्याघ्रांबर, खडावा यांचा ते उपयोग करतात व विभूति लावण्याचा त्यांचा नित्य प्रघात आहे ... "[७२]

हें वेशवर्णन केल्यावर त्यांनीं असें मत मांडलें आहे कीं, " कानफाट्यांचा वेश आणि नाथ पंथाचा वेश यांची गल्लत करूं नये. " स. मिरीकरांच्या मतें, " या वेशाशीं नाथ पंथाचा कांहीं संबंध नाहीं आणि नाथ पंथाचा विवक्षित बाह्य वेशहि नसावा. ज्या कानफाटा पंथाचा हा वेश आहे, त्या पंथाचें प्रवर्तन चौदाव्या शतकाच्या अखेरीस धर्मनाथ नांवाच्या नाथपंथीयानें केलें. ज्ञानेश्वर-काळीं नाथ-पंथाला हें कर्णमुद्राद्योतक 'कानफाटा' नांवहि नव्हतें आणि संप्रदायाचा असा विवक्षित वेशहि नव्हता. उलट उत्तरकालीं देखील नाथ संप्रदायाला मानणारे ज्ञानेश्वरांच्या परंपरेंतील लोक 'कानफाट्या' जोग्यांना शिव्याच देतांना दिसतात."

मला वाटतें, स. मिरीकरांचा हा समज अपुऱ्या माहितीवर आधारलेला आहे. 'नवनाथभक्तिसार' हा ग्रंथ स. मिरीकरांच्या मतें 'कानफाटा-प्रभावित' आहे म्हणून सोडून दिला, तरी राजाराम प्रसादीच्या 'भक्तमंजरीमालें'त गैबी-नाथाचें वर्णन करतांना हाच वेश वर्णिलेला आहे –

**सईली शींगी गळा गोदडि । शोभे हस्तकिं सुंदर फावडि ।**
**अद्वयनिशाण झळके गुडि । मुखीं आवडी गुरुस्मरण ॥**[७३]

हा ग्रंथ 'नवनाथभक्तिसारा'च्याच शैलीचा आहे, असें कोणी आक्षेपील; परंतु ज्ञानेश्वरांच्या परंपरेंतील आणि महीपति-दत्तनाथादि इतर उत्तरकालीन नाथसिद्ध यांच्या कृतींतहि या वेशाला दुजोरा मिळतो. चैतन्य-परंपरेंतील भैरव अवधूत

---

७२. नाथ संप्रदायाचा इतिहास ( हस्तलिखित ) : सरदार मिरीकर. ( सरदार आबासाहेब मुजुमदार यांचा संग्रह ).

७३. भक्तमंजरीमाला, २१. ८९.

ज्ञानसागर यानें आपले पैठणचे मित्र लक्ष्मीनाथ यांच्याविषयींच्या गौरवगीतांत म्हटलें आहे –

> शैली पुंगी कंथा घालुनिया टोपी ।
> कीर्तनरंगी बोधी गुरुकिल्ली सोपी ॥ [७४]

यावरहि कदाचित् कोणी अशी शंका घेईल कीं, 'ज्ञानेश्वरोत्तर कालीं कानफाट्यांच्या सहवासामुळें उत्तरकालीन नाथपंथीय आचारावर हा परिणाम झालेला असेल; या उदाहरणांवरून या वेशाची प्राचीनता सिद्ध होऊं शकत नाहीं.' या शंकेच्या निरसनासाठीं आपण एक ज्ञानेश्वर-पूर्वकालीन पुरावा पाहूं.

'लीळाचरित्रा'मध्यें असें वर्णन आहे कीं, चक्रधर एकदां हिवरळी येथें असतांना त्याला महालक्ष्मीच्या देवळापलीकडे कुणी तरी जोग्याचा वेश ठेवलेला आढळला. त्यासरशीं त्यानें विनोदवशतेनें आपलीं वस्त्रें काढून ठेवलीं, अंगाला विभूति फांसली, गळ्यांत कंथा घातली, एका हातांत खापरी आणि दुसऱ्या हातांत काठी घेऊन तो जोगीवेशांत उभा राहिला आणि जोग्याचें भिक्षागीत म्हणूं लागला –

> ... "तेथ जोगीयाची गळकंथा खापरी काठी आधारी होती : ते देखीली : गोसावी चौकीं वस्त्रें ठेवीलीं : विभुती श्रीमूख माखीलें : भस्म आंगीं लाविलें : गळ कंथा घातली : एके श्रीकरीं खापरी : एके काठी घेतली : आणि गोसावी उभे ठेले : मग ह्मणीतलें : 'कर धरि खपर : भिक्षापात्र : भस्म विधुळीत : विगळित गात्र : नित्य चळ : चित : मंद मंद मनसो विगळित गात्र : परमानंद : परमानंद : मन भुलिरे मन भुलिरे :' सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : मागील सीध एणें वचनें भिक्षा करिति :" [७५]

या उताऱ्यांतील शेवटचें वाक्य विशेष चिंतनीय आहे. चक्रधरासारखा नाथ-परंपरेशीं संबंधित आणि निरीक्षक वृत्तीचा बहुश्रुत पुरुष ही माहिती पुरवीत आहे, हें अत्यंत महत्त्वाचें आहे. हा प्रसंग पूर्वार्धं लीळांतील (शके ११८० पूर्वीचा) आहे. आणि या प्रसंगीं चक्रधर जोगीवेशधृत अवस्थेंत म्हणतो कीं,

---

७४. महाराष्ट्रकविचारित्र, भाग २, पृ. १९२.
७५. लीळाचरित्र, भा. २, पृ. १०४.

" मागीलें सिद्ध या वचनानें भिक्षा मागत. " यावरून या वेशचिन्हांची प्राचीनता लक्षांत येईल. 'लीळाचरित्रा'मध्यें आणखीहि या वेशविशेषाचे उल्लेख आहेत. या विवक्षित वेश-भूषणांतील ज्या कर्णमुद्रांमुळें 'कानफाटा' या नांवाचा उद्भव होऊं शकला, त्या कर्णमुद्राहि नाथपंथीयांत ज्ञानेश्वरांपूर्वीच होत्या, हेंहि 'लीळा-चरित्रा'वरून सिद्ध होतें. आउसा या नाथपंथी योगिनीला महानुभाव पंथाची दीक्षा देतांना " गोसावी आपुलेनि श्रीकरें तेयांचिया कानिचिया मूद्रा फेडी-लिया : "[७६] असा स्पष्ट उल्लेख आहे. त्र्यंबकानें 'बालबोधां'त ' श्रवणछेदक योगीजन '[७७] ( श्रवण + छेदक = कान + फाटे ) असाच नाथयोग्यांचा उल्लेख केला आहे. हा वेशविशेष ज्ञानेश्वर-मंडळांत नव्हता, हें मान्य. याचें कारण कदाचित् असें असेल कीं, ज्ञानेश्वर-मंडळाचा नाथ पंथाशीं ( गहिनीनाथांशीं ) जो संबंध आला, तो केवळ आध्यात्मिक प्रबोधनापुरता. सांप्रदायिक मठस्थ वातारणांत ज्ञानेश्वर-मंडळाचा निवास नसावा. आणि दुसरें असें कीं, नाथ पंथांतील आदिसिद्धांत बाह्यावडंबरविरोधी असलेले चर्पटीसारखे पुरुष होतेच. किंबहुना मूळ आध्यात्मिक प्रेरणांचा विसर पडून जेव्हां केवळ बाह्यावडंबरच उरलें, तेव्हां नाथ-प्रभावित अशाच अनेक महापुरुषांनीं नवसंप्रदायांचें प्रवर्तन केलें आणि नाथपंथीय बाह्यावडंबराची अतिकठोर निर्भर्त्सना केली. आतां आपण भारतीय साहित्यांतील योगीवेशवर्णनाची कांहीं प्रमुख स्थळें पाहूं.

**जायसी-कृत योगी-वर्णन :** जायसीनें 'पद्मावतां'त योगी-वर्णन सुस्पष्ट रीतीनें केलें आहे : " राजानें हातांत किंकरी, शिरावर जटा, शरीरावर भस्म, मेखला, शृंगी, योगाला शुद्ध करणारें धंधारी चक्र, रुद्राक्ष आणि आधार ( आसनपीठ ) धारण केलें होतें. कंथा धारण करून हातांत सोटा घेतला होता. त्यानें कानांत मुद्रा, कंठांत रुद्राक्षमाला, हातांत कमंडलु, खांद्यावर व्याघ्रांबर, पायांत पावरी, डोक्यावर छत्री आणि काखेंत 'खप्पर' धारण केलें होतें. या सर्वाला त्यानें भगव्या रंगानें रंगविलें होतें. "[७८]

**कबीर-कृत योगी-वर्णन :** कबीराच्या अनेक पदांत योगीवेशाचें वर्णन आहे : " योगी लोक मुद्रा, नाद, कंथा, आसन, खप्पर, झोळी, विभूति, बटवा

७६. लीळाचरित्र, भा. ४, पृ. ५१.
७७. बालबोध, पृ. १८०.
७८. पद्मावत, जोगीखंड.

आदि धारण करीत असत. सारंगीयंत्र ( गोपीचंद-प्रचलित म्हणून 'गोपीयंत्र' ) वाजवीत. मेखला वापरीत आणि 'अजपाजप' करीत. "[७९]

**मीरा-कृत योगी-वर्णन :** मीरेनें आपल्या अनेक गीतांत स्वतःच्या उपास्याला जोगीवेशांत चित्रित केलें आहे. तिचा जोगी 'सेली', 'नाद', 'भभूति' इत्यादि चिन्हें धारण करणारा आहे. त्याचा शोध करण्यासाठीं तिनेंहि 'जोगणवेश' धारण करण्याचें ठरविलें आहे –

**... आऊँगी मैं नाहिं रहूँ रे, कर जटाधारी भेस।**
**चीर को फाडूँ कंथा पहिरूँ, लेऊँगी उपदेश।**
**... मुद्रा माला भेष लूँ रे, खप्पड लेऊँ हाथ।**
**... माला मुदरा मेखला रे बाला, खप्पर लूँगी हाथ।**[८०]

आतां आपण या वेश-चिन्हांचें स्वरूप काय आहे, तें पाहूं –

**कर्णकुंडल :** कुंडलधारणाची प्रथा केव्हां सुरू झाली, याविषयीं अनेक दंतकथा प्रचलित आहेत. कांहींच्या मतें या प्रथेचें प्रवर्तन मत्स्येंद्रनाथानें केलें : मत्स्येंद्रनाथानें शिवाच्या कानांत कुंडल पाहिलें होतें आणि तें प्राप्त करण्यासाठीं कठीण तपस्या केली होती. दुसरा एक असा समज आहे कीं, गोपीचंदाच्या प्रार्थनेवरून जालंधरनाथानें या पंथाच्या योग्यांना अन्य सांप्रदायिकांपासून विशिष्ट दर्शविण्यासाठीं या प्रथेचें प्रचलन केलें. भर्तृहरीच्या कानांत गुरूनें मातीचें कुंडल घातलें होतें. आजहि अनेक योगी मातीचें कुंडल घालतात. कांहींच्या मतें, गोरक्षनाथानेंच भर्तृहरीचा कान फाडून प्रथम या प्रथेचें प्रचलन केलें. मातीचें कुंडल फुटण्याची भीति असल्यामुळें धातूचें वा हरणाच्या शिंगाचें कुंडल धारण करतात. यालाच 'मुद्राधारण' म्हणतात. ज्या विधवा स्त्रिया संप्रदायाची दीक्षा घेतात, त्याहि कुंडल धारण करतात आणि गृहस्थ-योग्यांच्या पत्नीहि कुंडल धारण करतात. शुभदिनीं ( विशेषतः वसंतपंचमीस ) मंत्र-संस्कारपूर्वक मुद्रा धारण करतात. स्त्रीदर्शनानें जखम चिघळते, असा समज असल्यामुळें जखम बरी होईपर्यंत बंदिस्त जागीं बसून राहतात आणि फलाहार करतात. कान फाटणें अयोग्य समजतात. ज्या योग्याचा कान खराब

---

७९. कबीर ग्रंथावली, पदें २०५–२०९.
८०. मीरा पदावली, पदें ४९, ५८, ७०, ११८.

होतो, त्याला संप्रदायांतून दूर केलें जातें. कुंडल हें योग्यांचें पुरातन चिन्ह आहे, हें निश्चित; परंतु कांही असेहि योगी आहेत की, जे कुंडल धारण करीत नाहींत. त्यांना 'औघड' म्हणतात. जेव्हां औघडांचा कर्णमुद्रासंस्कार होतो, तेव्हां त्यांना 'कानफाटा' योगी म्हटलें जातें. कांहीं असेहि योगी आहेत की, जे आजीवन कर्णमुद्रा धारण करीत नाहींत. सुधारक मनोवृत्तीचे योगी असें मानतात कीं, कान चिरण्याच्या पीडेच्या भीतीनें अनधिकारी लोकांनीं पंथप्रवेश करूं नये, यासाठीं श्रीनाथानें ही प्रथा रूढ केली असावी.

**धंधारी :** हें एक प्रकारचें चक्र आहे. हें लोखंडी वा लांकडी पट्टयांचें बनवून, त्याच्या छेदांतून मालाकार दोरा ओवतात. पुनः मंत्र म्हणून तो दोरा काढतात. त्याच्या क्रियेच्या ज्ञानाशिवाय छेदांतून दोरा काढणें शक्य नसतें. हा दोरा चक्राच्या पट्टयांमध्यें अशा तऱ्हेनें गुंतविलेला असतो की, तो सोडवणें अतिशय कठीण असतें. ज्याला तो सोडविण्याची माहिती आहे, तो सहजतेनें सोडवितो. याला 'गोरखधंधा' असेंहि म्हणतात. गोरखपंथीयांची अशी श्रद्धा असते कीं, मंत्र जपून 'गोरखधंद्यां'तून धागा सोडविल्यानें गोरक्षकृपेनें ईश्वर प्रसन्न होतो आणि संसार-चक्रांत अडकलेल्या प्राण्यांना या धाग्याप्रमाणें भवजाळांतून मुक्त करतो.

**रुद्राक्षमाला :** रुद्राक्षमाला साधकांच्या विश्वांत प्रसिद्ध आहे. योगी लोक जी माला धारण करतात, तिच्यांत ३२, ६४, ८४, १०८ असे मणि असतात. ज्यांना 'स्मरणी' ( 'सुमिरनी' ) म्हणतात, अशा छोट्या माला १८ वा २८ मण्यांच्या असतात. 'स्मरणी' मनगटांत बांधतात. 'रुद्राक्ष' म्हणजे ( रुद्र+अक्ष ) शिवाचा डोळा. तंत्रशास्त्रानुसार ही माला जपकार्यांत विशेष फलदायिनी असते. रुद्राक्षमण्यांत खरबुजाच्या फांकेप्रमाणें जे रेषात्मक भाग असतात, त्यांना 'मुख' म्हणतात. जपांत बहुशः पंचमुखी रुद्राक्षाचें विशेष महत्त्व आहे. एकमुखी रुद्राक्षाला अत्यंत शुभ मानतात. घरांत एकमुखी रुद्राक्ष बाळगल्यानें लक्ष्मीचा स्थिर निवास राहतो, अशी श्रद्धा आहे. ज्याच्या गळ्यांत एकमुखी रुद्राक्ष आहे, त्याच्यावर शस्त्र चालूं शकत नाहीं, असा योग्यांचा विश्वास आहे. एकमुखी रुद्राक्षाच्या एकमुखित्वाची परीक्षा घेण्याकरितां तो मेंढीच्या गळ्यांत बांधतात. जर शस्त्राघातानें मेंढीची मान कापली गेली तर तो

खरा मानतां कामा नये ! एकादशमुखी रुद्राक्षहि विशेष पवित्र मानतात. गृहस्थयोगी साधारणतः द्विमुखी रुद्राक्षच जपासाठीं फलदायक मानतात.

**किंगरी :** ही एक प्रकारची सारंगी असते. या वाद्याच्या साथीवर योगी भर्तृहरीचीं गीतें गात हिंडतात.

**मेखला :** ही मोळाच्या दोरीची एक कटिबंधिनी असते. मेखला सर्वच योगी धारण करतात असें नाहीं. कांहीं योगी काळ्या मेंढीच्या लोकरीची मेखला वापरतात. प्रायः लंगोटी नेसण्यास हिचा उपयोग होतो. आणखी एक प्रकारची मेखला असते, तिला 'हाल मटंगा' म्हणतात. ती धारण केल्यानंतर लगेच भिक्षेसाठीं बाहेर पडावें लागतें.

**जानवें :** योगी आणि औघड दोन्ही काळ्या मेंढीच्या लोकरीचें जानवें वापरतात. या विद्येंतील विशिष्ट जाणकारच हें जानवें बनवितात. क्वचित् रुईच्या सुताचेंहि जानवें वापरतात.

**शृंगी** ( शिंगी वा शिंगीनाद ) **:** ही हरणाच्या शिंगाची बनवलेली एक शिटी असते. ही जानव्यालाच बांधून ठेवतात. त्यामुळें या जानव्याला 'शिंगीनाद जानवें' म्हणतात. कांहीं योगी जानवें वा शिंगीनाद वापरीत नाहींत. त्यांचा असा बंडखोर दावा असतो कीं, हीं चिन्हें आम्ही अन्तःस्थपणें धारण करतों.

**कंथा :** हें भगव्या रंगाचें एक वस्त्र असतें. हें गळ्यांत अडकवल्यानें पाठीकडून अंग झांकलें जावें, अशी योजना असते. याला 'गूदरी' ( गोधडी ) असेंहि म्हणतात. कारण जुन्यापुराण्या चिंध्यांचें हें शिवावें, असा संकेत आहे. भगवा रंग ब्रह्मचर्यसाधक समजला जातो. भगव्या रंगाच्या वापरामुळें वीर्यस्तंभनशक्ति वाढते, अशी कल्पना आहे. एक दंतकथा अशी आहे कीं, प्रथम पार्वतीनें आपल्या रक्तांत रंगवून एक कंथा गोरक्षनाथाला दिली होती, तेव्हांपासून लाल वा भगवा रंग योग्यांचा पवित्र रंग बनला. कंथाधारण परमावश्यक मानलें जात नाहीं. कांहीं योगी अंगावर केवळ लंगोटी परिधान करतात आणि कांहीं तर लंगोटीहि वापरीत नाहींत !

**दंडा :** ही एक हात-दीड हात लांबीची काठी असते. याला कुणी 'गोरक्षनाथाचा दंडा' म्हणतात, तर कुणी 'भैरवनाथाचा दंडा' म्हणतात.

१०३३४

**खापरी :** फुटक्या मडक्याच्यीं भागाचा भिक्षेसाठीं वापर करीत, त्याला खापरी म्हणत. सध्यां खापरी नारळाच्या कवटीची बनवितात. अनेक योगी कांशाची खापरी वापरतात; तिला 'कौंसा' हि म्हणतात.

**अधारी :** लांकडाच्या दांडक्याला खालींवर पाटासारख्या फळ्या बसवून बसण्यासाठीं तयार केलेलें एक स्टुलासारखें आसन-पीठ. योगी हें हातांत घेऊनच भटकतात आणि बसण्याच्या वेळीं कुठेंहि याचा उपयोग करतात.

इब्न बतूतानें आपल्या भारत-प्रवासाच्या वर्णनांत स्वतः पाहिलेल्या योग्यांचें वर्णन केलें आहे, तें प्रचलित वेशभूषणांशीं जुळतें आहे. सूरदासाच्या भ्रमरगीतांत गोपींनीं ज्या योग्यांची चर्चा केली आहे, त्यांचा वेशहि प्रचलित परंपरेनुसारच आहे. गोरक्षनाथाच्या 'सिद्धसिद्धान्तपद्धति' या प्रमाण-ग्रंथांत ज्या वेशाचें अध्यात्मीकरण वर्णिलें आहे,[८१] तो वेशहि विभृति, कौपीन, खर्पर, शंख, पादुका, मृगत्वच्, मेखला, कुंडलें, जपमाला, दंड, योगपट्ट यांनीं युक्त आहे. या वेश-चिन्हांच्या अध्यात्मीकरणांतून एक प्रमुख गोष्ट सिद्ध होते कीं —

> **न वेषधारणं सिद्धेः कारणं न च तत्कथा ।**
> **क्रियैव कारणं सिद्धेः सत्यमेतन्न न संशयः ॥**[८२]

## नाथ संप्रदाय आणि भक्तिसाधना :

"गोरक्षनाथांनी समस्त प्रचलित साधनामार्गांतून उचित भाव ग्रहण केला. केवळ एक वस्तुच त्यांनीं कुठूनहि स्वीकारली नाहीं — ती म्हणजे भक्ति. ते ज्ञानाचे उपासक होते आणि लेशमात्र भावालुतेलाहि त्यांच्या मनांत स्थान नव्हतें." असें स्पष्ट मत डॉ. हजारीप्रसाद द्विवेदींनी आपल्या प्रबंधाचा उपसंहार करतांना मांडलें आहे. नाथसंप्रदाय हा 'योगसंप्रदाय' आहे, हें खरें. मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ हीं नांवें उच्चारलीं कीं, योगसिद्धींचें किमयागार आपल्या दृष्टीपुढें उभें राहतें. गोरक्षनाथादि सिद्ध पुरुषांचे ग्रंथ पाहिले, तरी काया-योगाच्या चर्चेनेंच ते भरलेले आढळतात. आणि मग डॉ. द्विवेदींचें वरील मत सर्वथा सत्य आहे, असें वाटूं लागतें.

---

८१. सिद्धसिद्धान्तपद्धति, ६. २–१०.
८२. हठयोगप्रदीपिका, १. ६६.

योग आणि आत्यंतिक संयमन यांवर गोरक्षनाथानें कां भर दिला, याचा कालसापेक्ष विचार आपण केलाच आहे. पण हें केवळ भक्तिराहित्याचें कारण झालें; त्यामुळें तर नाथ संप्रदायांत भक्तीला स्थान नाहीं, हेंच सिद्ध होतें.

मग नाथपंथीय ज्ञानेश्वर गीतेवर भाष्य लिहितांना भक्तियोगाचें विश्व कसें उभें करतात? निवृत्तिनाथ कृष्णनामाचा अखंड घोष कसा करतात? ज्ञानेश्वरीच्या शब्दाशब्दांतून भक्तितत्त्वाचें उत्कट महिमान गायिलें आहे. कुणी म्हणेल कीं, निवृत्ति-ज्ञानेश्वरांनीं 'भक्ति'-तत्त्वाची नवीन देणगी नाथ संप्रदायाला दिली आहे. परंतु वस्तुस्थिति वेगळीच आहे. स्वतः ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीचा उपसंहार करतांना, गुरु-परंपरेंतून मिळालेला 'बोधाचा संसरा'च आपण आपल्या या ग्रंथांतून व्यक्त केला आहे, असें म्हणतात.[८३] वारकरी संप्रदायाच्या भक्ति-परंपरेंतील अखेरचे प्रसिद्ध संत निळोबारायहि –

**नाथ संप्रदायाची थोरी।**
**प्रगट केली ज्ञानेश्वरी ॥**[८४]

असेंच ज्ञानेश्वरीचें वर्णन करतात. आणि निवृत्तिनाथ आपल्या अनेक अभंगांतून हें स्पष्ट करतात कीं, कृष्णनामाचा महामंत्र आपणांस गहिनीनाथानें दिला आहे. एवढेंच नव्हे तर या कृष्णनाममंत्राच्या प्रदात्यांचा उल्लेख करतांना त्यांनीं गोरक्ष-गहिनी-अमर अशीं तीनहि नांवें अनेकदां उच्चारलीं आहेत. गहिनीनाथासंबंधी लिहितांना 'महाराष्ट्रांतील नाथ संप्रदाय' या प्रकरणांत याचा साधार विस्तार केला आहे. गुरु-परंपरेवरील अभंगांत 'कुळ हें पावन कृष्णनामें' असा आपल्या गुरुकुळाचा आणि कृष्णनामाचा संबंध निवृत्तिनाथांनीं सांगितला आहे.[८५] यावरून इतकें तरी निःसंशय सिद्ध होतें कीं, निवृत्ति-ज्ञानदेवांपूर्वी गहिनीनाथानेंहि कृष्ण-भक्तीचा पुरस्कार केला होता. गहिनीनाथ हा गोरक्षनाथाचा – पंथप्रवर्तकाचा – शिष्य होता, हें महत्त्वाचें आहे.

या प्रमाणांशिवाय ज्ञानेश्वर-पूर्वकालीन आणखी कांहीं प्रमाणें मिळतात काय, तें पाहूं. महानुभाव पंथ हा कृष्णभक्तिप्रधान पंथ आहे, हें सर्वांस माहीत

---

८३. ज्ञानेश्वरी, १८. १७५९–६०.
८४. निळोबाराय यांचा गाथा, १५५८.
८५. ज्ञानेश्वरमहाराजांची गाथा, अ. ३३२; पृ. २९६–९७.

आहेचें. बाह्यतः जैनांप्रमाणें वाटणाऱ्या महानुभाव पंथांत कृष्णभक्तीला प्राधान्य मिळावें, याचें मूळ काय ? चक्रधराचे गुरु आणि आजेगुरु हे नाथ सिद्ध होते, हें मीं याच पुस्तकांत ‘ नाथ संप्रदायाचा प्रभाव ’ या प्रकरणांत महानुभाव पंथा-संबंधीं लिहितांना सप्रमाण सिद्ध केलें आहे. चक्रधराचे आजेगुरु चांगदेव राऊळ हे द्वारकेस ६३ वर्षें राहिले होते. गुंडम राउळांचा कृष्णभक्तीशीं संबंध आहे. त्यांनीं कृष्णविवाहविधि साजरा केल्याचें प्रसिद्ध आहे. अवधूताच्या कृपाप्रसादानें जन्म पावलेल्या चक्रधरानें लहानपणींच ‘गोपाळ’ मंत्राची दीक्षा घेतली होती. चक्रधराचें ‘चक्रधर’ हें कृष्णवाचक नांव गुंडम राउळांनीच ठेवलें आहे. आउसा नांवाची नाथयोगिनी चक्रधरांची शिष्या बनल्याचें वर्णन ‘लीळाचरित्रां’त आहे. या वर्णनांत, दीक्षाविधीच्या अगोदर आउसेची तपासणी झाली, त्यांत –

“ दैवतें निगालीं : जोगला देवि : रिरिय ( ? ) पितळेची निगाली : तितरिया महुवाचा कृष्णेयां निगाला : तें गोसावीं सांडवुं आदरीली : ... तवं आउसीं म्हणीतलें : जी जी जी जगन्नाथा : जोगल देवी सांडीजो जी : कृष्णेया नको सांडुं : हा मज वाट दाखवी : ” [८६]

‘ नाथपंथी उपदेशु ’ घेतलेली, चौवर्णिकांच्या घरीं भिक्षा मागणारी, ‘ दीक्षिताची सून ’ आणि ‘ उपासानियाची कन्या ’ असलेली ही आउसा किती कृष्णवेडी आहे, हें वरील उताऱ्यांत स्वच्छ प्रतिबिंबित झालें आहे. “ कृष्णेया नको सांडुं : ” असें चक्रधरांना विनवतांना तिचें हृदय कळवळून उठलें आहे. कारण कृष्ण हाच साधनेच्या प्रवासांत तिचा पथप्रदर्शक होता. ( “ हा मज वाट दाखवी : ” )

वरील प्रमाणांवरून वाटतें कीं, ‘भक्ति’ ही नाथ संप्रदायाला केवळ ज्ञानेश्वरांनीं दिलेली नवी देणगी नव्हती; तर त्यापूर्वींहि नाथ संप्रदायांत भक्तीला – कृष्णभक्तीला – स्थान होतें.

नाथ संप्रदायांत ‘गुरुभक्ती’ची परमोत्कटता प्रथमपासूनच आहे, हें कोणीहि नाकारणार नाहीं. ही परमोत्कट गुरुभक्ति आणि दत्त-शंकरादींचें पूज्यत्व भक्तीच्या प्रवेशाला सर्वथा अनुकूल होतें. महाराष्ट्रांत तरी गोरक्षनाथा-नंतर लगेच, गोरक्षनाथाच्या प्रभावानें परिपूर्ण अशा महानुभाव-वारकरी-लिंगायत अशा भक्तिप्रधान साधनांचा परमोदय घडून आलेला आहे.

---

८६. लीळाचरित्र, भा. ४, पृ. ४९.

**नाथ संप्रदाय आणि वामाचार :**

वज्रयान, सहजयान, शाक्त, कापालिक आदि वामाचारी तंत्रसाधनां विरुद्ध गोरक्षनाथानें आंदोलन उभें करून भारतीय साधनेचें शुद्धीकरण केलें, हें जरी खरें असलें, तरी नाथ संप्रदायांत अंतर्भूत झालेले अनंत वामाचारी साधक आपले पूर्वसंस्कार विसरले नसणार. हे संस्कार अर्थातच हळूहळू नाथ संप्रदायाच्या नसांतून विषासारखे प्रसृत होत राहिले. आज नाथ संप्रदायाच्या कक्षेंतील अनेक योगीशाखांत वामाचाराचें प्रचलन आहे. मद्य, मत्स्य, मांस, मुद्रा आणि मैथुन या तांत्रिक साधनेंतील पंचमकारांचा आचार नाथयोग्यांतहि कांहीं अंशीं रूढ होत राहिला. नाथपंथीय योगक्रियांत वज्रोली आणि सहजोली या दोन मुद्रा समाविष्ट झाल्या आहेत. या मुद्रांसाठीं केवळ दोन गोष्टी अत्यावश्यक आहेत : वशवर्तिनी स्त्री आणि प्रचुर दूध. गोमांस आणि अमरवारुणी यांचें सेवनहि प्रचलित आहे. लीळाचरित्रांत 'ब्रह्मप्रकाशिके'चें ( भांग ) सेवन करणाऱ्या एका नाथ-जोग्याचा आढळ होतो.[८७] कानफाटे जोगी योनिपूजा आणि लिंगपूजा करतात आणि ' वासनेचें दमन साधनेला बाधक ठरतें, असें समर्थनहि करतात. शक्तिपूजेच्या निमित्तानें अनेक ठिकाणीं पंचमकारांचें सेवन प्रचलित आहे. हें सर्व पाहिलें कीं वाटतें, सांप्रदायिकांनीं त्या महामानवाच्या – गुरु गोरक्षनाथाच्या – मूलप्रेरणांना डावलून आणि त्याला तिरस्करणीय वाटणाऱ्या आचारांचा अवलंब करून, त्याचा पराभव केला आहे.

अशा उपेक्षणीय नाथजोग्यांची तुकारामानें पुढील शब्दांत संभावना केली आहे –

**कान फाडुनिया मुद्रा ते घालिती । नाथ म्हणविती जगामाजीं ॥**
**घालोनिया फेरा मागती द्रव्यासी । परी शंकरासी नोळखती ॥**
**पोट भरावया शिकती उपाय । तुका म्हणे जाय नरकलोकां ॥**[८८]

गोरक्षनाथाचा खरा वारसा इतिहासांत नाथपंथीय जोग्यांनीं सांभाळला नाहीं. तो वारसा चक्रधर, ज्ञानेश्वर, अल्लमप्रभु, कबीर, नानक, दादू यांसारख्या

---

८७. लीळाचरित्र, भा. ४, पृ. २५.

८८. तुकाराममहाराजांचा गाथा, २५५५.

अनुक्रम ........ बि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........



महापुरुषांनीं पत्करला आणि आपल्या स्फूर्तिदात्याच्या उदात्त साधनामूल्यांच्या पायावर त्यांनीं मध्ययुगीन भारतीय साधनेचें महन्मंगल मंदिर उभारलें.

### कांहीं सांप्रदायिक प्रमाण-ग्रंथ :

सिद्धान्त आणि साधना सांगणारे सांप्रदायिक ग्रंथ अनेक आहेत. अर्थात् या ग्रंथांतून सिद्धान्तांचें विवेचन करणाऱ्या ग्रंथांपेक्षां साधना – योगसाधना – विवरणारे ग्रंथच अधिक आहेत. या समग्र सांप्रदायिक ग्रंथांच्या पसाऱ्यांत गोरक्षनाथाचा 'सिद्धसिद्धान्तपद्धति' हा ग्रंथ प्रधान समजला जातो. या ग्रंथांत संप्रदायाचे मूल सिद्धान्त व साधना यांचें स्थूल विवेचन शास्त्रीय रीतीनें केलें आहे. गोरक्षनाथाचा 'गोरक्षपद्धति' हा ग्रंथहि सांप्रदायिकांत प्रामाण्य पावलेला आहे. गोरक्षनाथाच्या ग्रंथांचा परिचय आपण पुढील प्रकरणांत स्वतंत्रपणें करून घेणार आहोंत. गोरक्षनाथाच्या ग्रंथांशिवाय उत्तरकालीन तीन ग्रंथ संप्रदायांत बरीच मान्यता पावलेले आहेत. ते तीन ग्रंथ म्हणजे 'हठयोगप्रदीपिका', 'सिद्धसिद्धान्तसंग्रह' आणि 'गोरक्षसिद्धांतसंग्रह'.

**हठयोगप्रदीपिका :** हा ग्रंथ योगी स्वात्मारामाचा आहे. ग्रंथकार आणि ग्रंथरचनाकाल यासंबंधीं कांहींहि माहिती उपलब्ध नाहीं. 'श्रीसहजानंदसंतानचिंतामणिस्वात्मारामयोगींद्र' असा आपला उल्लेख त्यानें ग्रंथाच्या समाप्तिमुद्रेंत केला आहे. डॉ. गोडे यांच्या मतें या ग्रंथाची निर्मिति चौदाव्या शतकांत झाली असावी.[८९] महाराष्ट्रांत समर्थ-काळांत या ग्रंथाचे उल्लेख आढळतात. त्या अर्थीं सतराव्या शतकांत योगक्षेत्रांत मान्यता पावलेला हा ग्रंथ चौदाव्या-पंधराव्या शतकांत तयार झाला असावा. या ग्रंथाची नाथजोग्यांत फारच प्रसिद्धि आहे. विशेषतः कानफाटे जोगी या ग्रंथास प्रमाण मानतात. या ग्रंथाचे चार 'उपदेश' (अध्याय) असून सर्व 'उपदेश' मिळून श्लोकसंख्या (६७+७८+१३०+११४) ३७९ आहे. या ग्रंथावर अनेक टीका-टिप्पणी झाल्या आहेत. त्यांत ब्रह्मानंदाची 'जोत्स्ना' टीका प्रसिद्ध आहे. या ग्रंथांत मठलक्षण, यमनियम, आसनें, योग्याचा आहार-विहार, प्राणायाम, षट्कर्में, योगमुद्रा, बंध, नादानुसंधान, समाधिस्वरूप आदि विषयांची चर्चा आहे. योगपर अर्वाचीन उपनिषदें आणि हा ग्रंथ यांत अनेक साम्यस्थळें आहेत. त्या दृष्टीनें असा तुलनात्मक अभ्यास

---

८९. Indian Historical Quarterly, Vol. XVI, 1940.

धिकारी अभ्यासकांनीं करणें आवश्यक आहे. मला वाटतें, बरींच योगपर उपनिषदें नाथ संप्रदायाच्या वातावरणांत तयार झालीं असावीं. या ग्रंथांत " वर्जयेत् दुर्जनप्रांतं वह्निस्त्रीपथसेवनम् । प्रातःस्नानोपवासादिकायक्लेशविधिं तथा ॥ " हा श्लोक ( १. ६१ च्या पुढें ) 'गोरक्षवचन' म्हणून नोंदविला आहे. हाच श्लोक योगतत्त्वोपनिषदांतहि आहे.[१०]

**सिद्धसिद्धान्तसंग्रह :** हा ग्रंथ पं. गोपीनाथ कविराजांनीं 'सरस्वती-भवन टेक्स्ट्स्' मालेंतून प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथाचा कर्ता कुणी बलभद्र नामक असून त्यानें काशी येथें कृष्णराजाज्ञेनें या ग्रंथाची रचना केली, इतकाच ग्रंथान्तर्गत पुरावा आहे. हा ग्रंथ म्हणजे 'सिद्धसिद्धान्तपद्धती'चा सारग्रंथ आहे. यांत 'ललितस्वच्छंद', 'तत्त्वसार', 'जठरसंहिता' या ग्रंथांतून संदर्भ घेतले आहेत. श्लोकसंख्या अवघी ३०६ आहे.

**गोरक्षसिद्धान्तसंग्रह :** हाहि ग्रंथ वरील मालेंतूनच प्रसिद्ध झाला आहे. हा ग्रंथ संस्कृत गद्यांत असून व्याकरणदृष्ट्या अशुद्ध आहे. परंतु सांप्रदायिक विचार-संग्रह म्हणून ग्रंथाचें महत्त्व विशेष समजलें जातें. यांत ग्रंथकारानें स्वमतपुष्ट्यर्थ अनेक ग्रंथांतून आधार घेतले आहेत. हे संदर्भग्रंथ सिद्धसिद्धान्त-पद्धति, अवधूतगीता, सूतसंहिता, ब्रह्मबिंदूपनिषद्, कैवल्योपनिषद्, तेजबिंदूपनिषद्, अमनस्क, विवेकमार्तंड, ध्यानबिंदूपनिषद्, मुंडकोपनिषद्, आत्मोपनिषद्, अमृतबिंदूपनिषद्, मनुस्मृति, उत्तरगीता, वायुपुराण, मार्कंडेय पुराण, गीता, तंत्रमहार्णव, क्षुरिकोपनिषद्, गोरक्षोपनिषद्, बृहदारण्यकोपनिषद्, छांदोग्योपनिषद्, कालाग्निरुद्रोपनिषद्, ब्रह्मोपनिषद्, सर्वोपनिषद्, राजगुह्य, शक्तिसंगमतंत्र, हठप्रदीपिका, सिद्धान्तबिंदु, शाबरतंत्र, षोडषनित्यतंत्र, षट्शांभव-रहस्य, पद्मपुराण, महाभारत, कवेषयगीता, सनत्सुजातीय, बह्वृच्ब्राह्मण, शिवोपनिषद्, मांडूक्योपनिषद्, भागवत, योगबीज, कपिलगीता, गोरक्षस्तोत्र, गोरक्षसहस्रनाम, सारसंग्रह, स्कंदपुराण, रुद्रयामल, तारासूक्ति, कुलार्णवतंत्र, वायुपुराण, सूतसंहिता, आदिनाथसंहिता, ब्रह्मवैवर्तपुराण, शिवपुराण, परमहंसोपनिषद्, योगशास्त्र, श्रीनाथसूत्र, अखंडखंड — असे जवळ जवळ साठ आहेत. आणि हें सर्व संदर्भयुक्त तत्त्वविवेचन अवघ्या ८० ( डेमी आकार ) छापील पृष्ठांत सामावलें आहे !

---

१०. ईशाद्यष्टोत्तरशतोपनिषदः, पृ. २५६.

**उपास्यदेवता :**

नाथ संप्रदाय हा शैव संप्रदाय आहे. त्यामुळें शिव हीच त्याची प्रधान उपास्यदेवता आहे. परंतु शाक्त, कापालिक आदि अन्य सांप्रदायिकांचा नाथ संप्रदायांत समावेश झाल्यामुळें शक्तीची काली, अंबा, जगदंबा, दुर्गा आदि रूपें आणि शिवाचीं भैरव, कालभैरव, नंदभैरव, एकलिंग आदि रूपें पुढें उपास्य ठरलीं. शक्तीविना शिव केवळ 'शव' आहे, या सिद्धान्तामुळें शक्त्युपासना खूपच मान्यता पावली. नाथांचें एक महापीठ 'कामाख्या' हें शक्तिस्थानच आहे. भैरवमूर्ति आठ हातांची, मुंडमाला ल्यायलेली, सर्पभूषणें व कुंडलें परिधान केलेली, कृष्णकुकुरवाहना अशी असते. 'सिद्धसिद्धान्तसंग्रहा'मध्यें भैरवाच्या 'मूर्त्यष्टका'चीं नांवें –

शिवाद्भैरव एतस्मात् श्रीकण्ठोऽतः सदाशिवः।
ईश्वरोऽस्माद्रुद्र आसीत्ततो विष्णुस्तथा विधिः॥ [९१]

अशी दिलीं आहेत.

गोरक्षोत्तर काळीं गोरक्षनाथाचीं मंदिरें सर्व भारतभर उभारलीं गेलीं. या मंदिरांतून गोरक्षनाथाबरोबर गोरक्ष-गुरु मत्स्येंद्रनाथ व दत्तात्रय यांच्याहि मूर्ति आढळतात. बंगालमध्यें गोरक्ष-मत्स्येंद्राबरोबर हाडिपा ( जालंधर ? ) ची मूर्ति पूजार्ह मानली जाते. अनेक ठिकाणीं गोरक्षप्रमुख नवनाथ व चौऱ्यांशीं सिद्ध यांच्याहि मूर्ति पूजिल्या जातात. नेपाळमध्यें बौद्ध वातावरणांत मत्स्येंद्र-नाथाची अवलोकितेश्वराच्या रूपानें पूजा केली जाते. क्वचित् हनुमान, रामचंद्र या देवतांच्याहि मूर्ति आढळतात. कानफाटे योगी-शाखेचा प्रवर्तक धर्मनाथ याच्या धीनोधर ( कच्छ ) येथील मठांत विष्णुमूर्तिहि आहे. डमडमजवळील गोरक्षमंदिरांत कपिलमुनींची मूर्ति आहे. महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरोत्तर काळी नाथ-परंपरा ही जवळ जवळ वारकरीच बनल्यामुळें ग्रंथांतून व स्फुट रचनेंतून सर्वत्र विठ्ठलाचा, रामाचा, कृष्णाचा जयजयकार आढळतो. ही देवतांची बहुलता संप्रदायाच्या समावेशक स्वरूपांतून निर्माण झाली आहे. शिव आणि त्या-खालोखाल दत्त याच संप्रदायाच्या प्रधान उपास्यदेवता होत. शिव आणि दत्त या दोन्ही देवता वेश आणि विहार या बाबतींत जोगी आहेत, हें सर्व-परिचित

---

९१. सिद्धसिद्धान्तसंग्रह, १. ३६.

आहे. अर्थात् शिव आणि दत्त या दोन्ही देवतांचा समादर 'आदिगुरु'च्या स्वरूपांत आहे.

**पवित्र स्थानें :**

नाथ सांप्रदायिक जोगी प्रयाग, अयोध्या, त्र्यंबकेश्वर, द्वारका, हरद्वार, बद्रीनाथ, केदारनाथ, वृंदावन, पुष्कर, रामेश्वर, नेपाळमधील पशुपतिनाथ, काश्मीरांतील अमरनाथ आणि हिंगलाज या स्थळांची यात्रा करतात. शिवाय ते शिव, भैरव आणि शक्ति यांच्या सर्व मंदिरांना 'तीर्थरूप' मानतात. यांशिवाय नेपाळ-काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत त्यांचीं सांप्रदायिक मठ-मंदिरें विखुरलेलीं आहेत. अंगना ( उदयपूर ), आदिनाथ ( बंगाल ), काद्रीमठ ( मद्रास ), गंभीरमठ ( पुणें ), गरीबनाथ टिला ( सारमौर स्टेट ), गोरक्षक्षेत्र ( गिरनार ), गोरखबंसी ( डमडम – बंगाल ), चंद्रनाथ ( बंगाल ), चंचलगिरी मठ ( मद्रास प्रांत ), त्र्यंबक मठ ( नाशिक ), नीलकंठ महादेव ( आग्रा ), नोहर मठ ( बिकानेर ), पंचमुखी महादेव ( आग्रा ), पांडुधुनि ( मुंबई ), पीर सोहर ( जम्मू ), बत्तीस शिराळें ( सातारा ), भर्तृगुंफा ( ग्वाल्हेर ), भर्तृगुंफा ( गिरनार ), मंगलेश्वर ( आग्रा ), महानादमंदिर ( बरद्वान – बंगाल ), महामंदिर मठ ( जोधपूर ), योगीगुहा ( दिनाजपूर ), योगीभवन ( बगुडा – बंगाल ), योगी मठ ( मेदिनीपूर ) लादुवास ( उदयपूर ), हाँडीभरंगनाथ ( म्हैसूर ), हिंगुआ मठ ( जयपूर ) आदि नाथसांप्रदायिक मठ साऱ्या भारतभर आहेत. गोरखपूर हें संप्रदायाच्या संचालनाचें अलिखित केंद्र समजलें जातें. महाराष्ट्रांत नगर जिल्ह्यांतील वृद्धेश्वराच्या डोंगराची रांग आणि त्र्यंबकेश्वराचा डोंगर नाथ संप्रदायाच्या पाऊल-खुणांनीं व्याप्त आहे. जनार्दनस्वामींचें देवगिरीवरील साधनास्थान व समर्थांचें चंद्रगिरीवरील साधनास्थान गोरक्ष-संस्पृष्ट समजलें जातें. पैठणला शिवदीनकेसरींचा मठ प्रसिद्ध आहे. सातारा जिल्ह्यांतील मत्स्येंद्रगड मत्स्येंद्रनाथाची नांवनिशाणी बाळगून आहे. आळंदीचा परिसर ज्ञानेश्वरोत्तर नाथ संप्रदायाशीं संबंधित आहे. आळंदीजवळच अडबंगनाथ नामक नाथसिद्धाचें स्थान ( डुडुळगांव ) दाखवितात. गोव्यांतील चंद्रनाथ, मंगेशनाथ आदि नाथपदान्त शिवमंदिरें नाथ पंथाच्या प्रसाराचीं चिन्हें असावीं, असें श्री. प्रियोळकरांचें मत आहे.[१२]

---

१२. मराठी संशोधन पत्रिका, व. ५, अं. १, पृ. २७.

हरिनाथ ( मुकुंदराजांचे आजेगुरु ) या महासिद्धाचा शिष्य विश्वंभरनाथ याच्या परंपरेंतील अनेक पुरुष गोव्यांत नांदले असावेत, असें श्री. प्रियोळकरांनीं संशोधिलेल्या प्रकाशानंदनाथाच्या ग्रंथांवरून वाटते. शिरूर तालुक्यांतील ( पुणें जिल्हा ) केंदूर या गांवीं (प्रसिद्ध ज्ञानेश्वर-समकालीन संत कान्होबा पाठक यांचें गांव ) नवनाथांचीं स्थानें दाखवितात. सासवड मार्गावर ( पुणें जिल्हा ) दिवे घाटांत एक कानिफनाथाचें मंदिर आहे. मराठवाड्यांतील मढीचा मायंबा व कान्होबा हीं मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ यांचीं स्थानें असावीं, असें सरदार मिरीकरांचें मत आहे. विदर्भांतील अंभोरें, छिंदवाडा, खेडलें हीं स्थानें मुकुंदराज-परंपरेंत महत्त्व पावलेलीं आहेत. मराठवाड्यांत आंबेजोगाई व परळी-वैजनाथ यांचें महत्त्व आहे.

## संप्रदायाचे शाखा-भेद :

गोरक्षनाथानें प्रवर्तिलेल्या नाथ संप्रदायाचे अनेक शाखा-भेद झाले आहेत. अशा शाखा-भेदांचें कारण काय, हा प्रश्न विशेष चिंतनीय आहे. उपलब्ध साधनांवरून मात्र या पंथभेदांवर विशेष प्रकाश टाकणें आज तरी अशक्य आहे. तात्त्विक आणि आचारविषयक मतभेद तीव्र होऊन गोरक्षोत्तरकालीं विविध साधना-प्रणाली निर्माण झाल्या आणि मध्ययुगांत साधनाविश्वाचा पसारा वाढला. अर्थात् या साधनाप्रणालींवर गोरक्षनाथाचा अमिट प्रभाव होता, तरी त्या नाथ पंथाच्या शाखा म्हणून कधींहि गणल्या गेल्या नाहींत. चक्रधरांचा महानुभव पंथ, अल्लमप्रभूंचा लिंगायत पंथ, ज्ञानेश्वरांचा वारकरी पंथ, कबीराची निर्गुण भक्तिपरंपरा, नानकाचा शीख संप्रदाय, इत्यादि साधना बहुंशानें गोरक्ष-प्रभावित असल्या तरी त्या नाथ संप्रदायाच्या शाखा नव्हेत, हें उघड आहे. परंतु नाथ संप्रदायान्तर्गतच शाखा-भेद कां निर्माण व्हावे ? आज नाथ संप्रदायांत जे शाखा-भेद आहेत, ते गोरक्षोत्तरकालीं निर्माण झाले असावे, असें वाटतें. (प्रमुख बारा शाखा ज्यांच्या नांवानें रूढ आहेत, त्यांतील कांहीं गोरक्षनाथाचे पूर्ववर्ती, कांहीं समकालीन आणि कांहीं ईषदुत्तरकालीन आहेत. जालंधरनाथ गोरक्षाच्या गुरूचे सहकारी होते; भर्तृहरि गोरक्षनाथाचा शिष्य होता; जालंधरशिष्य कानिपा त्याचा समकालीन होता; पूरनभगत वा चौरंगीनाथ त्याचा गुरुबंधु होता; आणि अन्य ईषदुत्तरकालीन होते.)

हे सर्व शाखाभेद गोरक्षाच्या जीवितावस्थेंत निर्माण होणें शक्य नाहीं. कारण ज्या महापुरुषानें आपल्या असामान्य प्रभावानें आणि अपूर्व समन्वय-शक्तीनें अनेक पूर्ववर्ती साधना-प्रणालींना आपल्या नेतृत्वाखालीं एकत्र आणलें, त्याच्या हयातींत मतभेद टिकणें शक्य नव्हतें. या शाखाभेदांचें रहस्य असें असावें कीं, ज्या पूर्ववर्ती साधनांना गोरक्षनाथानें कांहीं देवाणघेवाणीनें नाथ पंथाच्या ध्वजाखालीं आणलें, त्याच साधना आपल्या पूर्ववर्ती वैशिष्ट्यांच्या जाणिवेमुळें गोरक्षोत्तरकाली विविध शाखांत विभक्त झाल्या असाव्या.

आज प्रमुख १२ शाखा आहेत. पारंपरिक जनश्रुतीनुसार गोरक्षनाथानेंच परस्परविच्छिन्न नाथ पंथाचें संघटन करून त्याला १२ पंथांत व्यवस्थित केलें. ते बारा पंथ असे : ( १ ) सत्यनाथी, ( २ ) धर्मनाथी, ( ३ ) राम पंथ, ( ४ ) नाटेश्वरी, ( ५ ) कन्हड, ( ६ ) कपिलानी, ( ७ ) माननाथी, ( ८ ) आई पंथ, ( ९ ) पागल पंथ, ( १० ) धज पंथ, ( ११ ) गंगानाथी ( १२ ) बैराग. या बारा पंथांच्या समूहांतील योग्यांना, शंकराचार्यांच्या 'दशनामी' संन्याशां-प्रमाणें 'बारहपंथी योगी ' म्हणतात. प्रत्येक पंथाचें विवाक्षित पवित्र स्थान, मूल-प्रवर्तक, प्रवर्तनभूमि आहे. गोरखपूरचे प्रसिद्ध सिद्ध महंत गंभीरनाथ यांच्या एका बंगाली शिष्यानें या बारा पंथांची जी माहिती गोरखपूर परंपरेनुसार डॉ. द्विवेदींना सांगितली, ती पुढील पृष्ठावरील कोष्टकांत दिली आहे.[९३]

एक दंतकथा अशी आहे कीं, शिव-संचालित बारा पंथ होते आणि गोरक्ष-संचालित बारा पंथ होते. या दोन्ही गटांत संघर्ष चालत असे, म्हणून गोरक्षनाथानें शिवाचे सहा आणि स्वतःचे सहा असे बारा पंथ नष्ट करून उरलेल्या बारा पंथांचें पुनःसंघटन केलें. प्रो. ब्रिग्ज यांनीं शिवाचे १८ आणि गोरक्षाचे १२ अशी संख्या दिली आहे. डॉ. द्विवेदींच्या मतें, " पहिल्या १२ व १२ या संख्याच ग्राह्य धराव्या. कारण, शिव म्हणजे आदिनाथ याच्या दोन शिष्यां-पैकीं जालंधराच्या कापालिकप्रणालीचे बारा आचार्य ( व भेद ) होते आणि दुसरा शिष्य मत्स्येंद्रनाथ याचा शिष्य गोरक्ष याचे १२ पंथ असावे. " जालंधराच्या नेतृत्वाखालील साधनांचा समावेश आपल्या साधनेंत करतांना जी तडजोड गोरक्षाला करावी लागली असेल, तिचाच गर्भितार्थ वरील दंतकथेंत असावा, असें वाटतें.

---

९३. नाथ संप्रदाय, पृ. ११.

| नांव | मूलप्रवर्तक | स्थान | प्रदेश | विशेष |
|---|---|---|---|---|
| १. सत्यनाथी | सत्यनाथ | पाताल-भुवनेश्वर | ओरिसा | सत्यनाथ हें ब्रह्म्याचेंच नांव आहे; म्हणून हे योगी स्वतःस 'ब्रह्याचे योगी' म्हणवितात. |
| २. धर्मनाथी | धर्मराज (युधिष्ठिर) | दुल्लुदेलक | नेपाळ | — — |
| ३. रामपंथ | श्रीरामचंद्र | चौकतप्पे पंचौरा | गोरखपूर (सं. प्रांत) | — — |
| ४. नाटेश्वरी | लक्ष्मण | गोरखटिला | झेलम (पंजाब) | दोन शाखा : नाटेश्वरी व दरियापंथी. |
| ५. कन्हड | गणेश | मानफरा | कच्छ | — — |
| ६. कपिलानी | कपिलमुनि | गंगासागर | बंगाल | सध्यां डमडमजवळचें 'गोरखबंसी' हें यांचें केंद्र आहे. |
| ७. बैरागपंथ | भर्तृहरि | रतडोंडा | पुष्करजवळ (अजमेर) | — — |
| ८. माननाथी | गोपीचंद | अज्ञात | — | सध्यां जोधपूरचा महामंदिर मठ हें यांचें स्थान आहे. |
| ९. आई पंथ | भगवती विमला | जोगीगुफा वा गोरखकुँई | बंगालच्या दिनाजपूर जिल्ह्यांत | — — |
| १०. पागलपंथ | चौरंगीनाथ (पूरनभगत) | अबोहर | पंजाब | — — |
| ११. धजपंथ | हनुमान | — | — | — — |
| १२. गंगानाथी | भीष्मपितामह | जखबार | गुरुदासपूर (पंजाब) | — — |

**शिव-प्रवर्तित पंथ :** ( १ ) भूज ( कच्छ ) चे कंठरनाथ, ( २ ) पेशावर आणि रोहतकचे पागलनाथ, ( ३ ) अफगाणिस्थानचे रावल, ( ४ ) पंख वा पंक, ( ५ ) मारवाडचे बन, ( ६ ) गोपाल वा 'रामके'.

गोरक्ष-प्रवर्तित पंथ : ( १ ) हेठनाथ, ( २ ) आई पंथाचे चोलीनाथ, ( ३ ) चांदनाथ कापिलानी, ( ४ ) रतढोंडा, मारवाडचा बैराग पंथ व रतननाथ, ( ५ ) जयपूरचे पावनाथ, ( ६ ) धजनाथ महावीर.

महाराष्ट्रांत प्राचीन मराठींत नाथ पंथाच्या या शाखाभेदांची विशेष चर्चा कुठें आढळत नाहीं. ज्ञानेश्वर-परंपरेंतील नाथपंथीयांशिवाय अन्य नाथजोग्यांची 'कानफाटा' या निंदाव्यंजक शब्दानें संभावना झाली आहे. महानुभावीय आद्य ग्रंथांत 'चोळीक' पंथ या नाथपंथीय शाखेचा उल्लेख येतो.[९४] 'स्मृतिस्थळां'त 'कामळे' मार्गाचा एकदां उल्लेख आला आहे.[९५] पण अन्यत्र, नाथपंथीय मराठी वाङ्मयांत सुद्धां, या शाखाभेदांचे उल्लेख नाहींत. महानुभावांच्या 'षट्दर्शन-विवर्णन' या उत्तरकालीन प्रकरणांत मात्र नाथपंथाच्या तीस शाखांचा नामनिर्देश आहे. वाचकांच्या जिज्ञासा-तृप्तीसाठीं तो समग्र उतारा येथें देतों :

नाटेश्वरी लक्षणपंथी । आणि पार्वतीनाथी ।
अभंगनाथी । कापिल विभूतिये ॥
भरथरी वैराग्य केवळ । पंख आई पंथी राउळ ॥
पावपंथी पांगुळ । दासमार्गी ॥
हे नाटेश्वरादिक । बारापंथी योगी देख ।
आणिक संतनाथादि ऐक । अठरापंथी ॥
संतनाथपंथी । सांतीनाथी गुललय ( ? ) धर्मनाथी ।
हायसेखीन का उखाळपंथी । नाथ लक्षण ॥
रामनाथी वंकनाथी । योगी वैरागी गमपंथी ।
चोळीक गंगनाथी गोपाळपंथी । हे मार्गी धनंजय ॥
गजकथडी नागार्जुनपंथी । हे अठरा पंथ बोलीजती ।
ऐसे तीसपंथी भेद असती । योगीयांचे ॥ [९६]

या उताऱ्यांत अनेक नांवें लेखनदोषामुळें विकृत झालेलीं असल्यामुळें त्यांची निश्चिति कठीण झाली आहे. 'दर्शनप्रकाश' या महानुभावीय ग्रंथांतहि बारा पंथांचा नामनिर्देश आलेला आहे —

---

९४. स्मृतिस्थळ, ९९. पृ. ३१.
९५. 'प्रतिष्ठान', ऑक्टोबर १९५५, पृ. ५१.
९६. मतिरत्नाकर, पृ. ९६.

**नाटेश्वर भैरव संतनाथ। जालंधरी वाघळी अवघटी अघड कळंक पंथ।**
**अघोर मच्छ अळपाळी महिंद्रनाथ। घोडाचुडी ॥**
**सुवर्ण पंथ बाळनाथ। हा योग जाणिजे बारापंथ ॥**[९७]

या उताऱ्यांतहि कित्येक नांवांचा अर्थबोध होत नाहीं. हे दोन्ही उतारे पाहिले असतां एक गोष्ट स्पष्ट होते कीं, पंथभेदांच्या प्रचलित बारा नांवांहून या उताऱ्यांतील कांहीं नांवें भिन्न आहेत. आतां आपण क्रमशः सतनाथी, रामनाथी, धर्मनाथी, लक्ष्मणनाथी, दरियानाथी, गंगानाथी, बैरागपंथी, रावल ( नागनाथी ), जालंधरिपा, आई पंथी, कपलानी, धजनाथी व कानिपा या तेरा शाखांचा स्थूल परिचय करून घेऊं.

**( १ ) सतनाथी :** सर्व पारंपरिक सूचींत हिचा समावेश होतो. शिवप्रवर्तित पंक या शाखेशीं हिचा सबंध जोडला जातो. या शाखेचा प्रमुख मठ पुरीला आहे. स्थानेश्वर, कर्णाल आणि भेवा इथेंहि यांचे मठ आहेत. विभिन्न रंगांच्या चिंध्यांची टोपी धारण करणें हें यांचें वैशिष्ट्य. धर्मनाथ आणि त्याचा कच्छमधील सहयात्री गरीबनाथ हे याच शाखेतून उदय पावले.

**( २ ) रामनाथी :** शिवप्रवर्तित शाखांपैकीं गोपाल शाखेशीं संबंध. चुकीनें प्रभु रामचंद्राशीं संबंध जोडला जातो.

**( ३ ) धर्मनाथी :** सतनाथी परंपरेंतील धर्मनाथानें ही शाखा प्रवर्तित केली. गोदावरी-तीरावर यांचें केंद्रस्थान असून कच्छमधील यांचा धीनोधर मठ विख्यात आहे. या धर्मनाथाचा नवनाथांतहि समावेश होतो.

**( ४ ) लक्ष्मणनाथी :** लक्ष्मणनाथ हा गोरक्षनाथानंतर पंजाबच्या टिला मठाचा महंत बनला. याच शाखेतून नाटेश्वरी व दरिया या दोन शाखा उगम पावल्या.

**( ५ ) दरियानाथी :** सिंध वगैरे पश्चिम भागांत यांचीं पीठस्थानें आहेत. दरियानाथी हे मूलतः गोरक्ष-प्रवर्तित हेठनाथी या प्रथम शाखेंतील. सिंधमध्यें प्रतिवर्षी यांचा महोत्सव होतो. त्या वेळीं हिंदु-मुसलमान या उभय जमाती त्यांत सामील होतात.

---

९७. दर्शनप्रकाश, पृ. १९.

( ६ ) **गंगनाथी :** कपिल-मुनिशिष्य गंगानाथ-प्रवर्तित. यांच्याशीं काया-नाथी व रतननाथी यांचा संबंध आहे.

( ७ ) **वैरागी** ( भर्तृहरि ) **:** उज्जनीचा राज्याधिकारी भर्तृहरि यानें राजत्याग करून गोरक्षशिष्यत्व पत्करलें. त्याचीच ही शाखा. रतननाथ त्याचा मुस्लिम शिष्य. यांत मुसलमानांचाहि भरणा आहे. काबुलांत पीठस्थान.

( ८ ) **रावल** ( नागनाथी ) **:** यांत मुसलमान योग्यांचें आधिक्य आहे. रावळपिंडीत प्रमुख स्थान. शिव-प्रवर्तित शाखेंतील तिसऱ्या शाखेशीं संबद्ध. पंजाब आणि पश्चिम भारतांत यांचा विशेष वावर आहे. मादिया आणि गल वा पागलपंथी अशा यांच्या दोन शाखा आहेत. या शाखेचा प्रवर्तक नागनाथ मानला जातो.

( ९ ) **जालंधरिपा :** गोरक्ष-प्रवर्तित पांचव्या पावनाथ या शाखेशी संबद्ध. नाथ पंथांतून फुटून जालंधरानें हा पंथ स्थापला, असें म्हणतात. 'पा' हा शब्द तिबेटी असून, त्याचा अर्थ 'अधिकारी', 'प्रभु' असा आहे. कानिपा, गोपीचंद याच शाखेंतील होते.

( १० ) **आई पंथी :** गोरक्षशिष्या विमलादेवी ही या शाखेची प्रवर्तक. विमलामाईचा पंथ म्हणून 'माई पंथ' वा 'आई पंथ'. रोहतक व हरिद्वार येथें मठ आहेत. तेथें कोणतीहि मूर्ति नाहीं. 'दाबिस्तानां'त आई पंथाचा उल्लेख आहे.

( ११ ) **कपलानी :** ही शाखा कपिलमुनिद्वारां प्रवर्तित मानली जाते. गंगासागरांत यांचा मठ आहे. डमडमजवळ यांचें एक पवित्र ठिकाण आहे.

( १२ ) **ध्वजनाथी :** हे जोगी ध्वजधारी असतात. महावीर हनुमानाशी संबंध सांगतात. सिंहल, पेशावर, अंबाला येथें या जोग्यांचा आढळ होतो.

( १३ ) **कानिपा :** जालंधर-शिष्य कानिपानें या पंथाचें प्रवर्तन केलें. हा वामाचारी पंथ होता, असें म्हणतात. 'बामारग' अशी आजहि त्याला पर्यायी संज्ञा वापरतात. यांत शक्तिपूजेला स्थान आहे. गोपीचंद वा सिद्ध शृंगारी याच शाखेचा. बंगालमधील 'सेपला' वा 'सापूडे' ही जात यांतूनच निर्माण झाली.

याशिवाय या प्रमुख शाखांत न मोडणाऱ्या किती तरी लहानसहान परंपरा प्रचलित आहेत : हाडीभरंग, काथिकनाथी, पायलनाथी, उदयनाथी, आरय पंथ, फीलनाथी, चर्पटनाथी, गहिनीनाथी, निरंजननाथी, वरंजोगी, पा-पंक,

कामभज, काषाय, अर्धनारी, नायरी, अमरनाथ, कुंभीदास, तारकनाथ, अमापंथी, भृंगनाथ इत्यादि अनेक शाखा भारतभर व सुदूर अफगाणिस्थानपर्यंत आजहि वावरत आहेत.

नाथजोग्यांत जोगी, अवधूत, कानफाटे असे अनेक प्रकार आहेत. त्यांच्या आचारांत भेदानुसार थोडी भिन्नता आढळते. कानफाटे हा जोगीवर्ग १४ व्या शतकांत धर्मनाथ नांवाच्या नाथ सिद्धानें प्रवर्तित केला. त्याचा मठ कच्छमध्यें 'धीनोधर मठ' या नांवानें प्रसिद्ध आहे. धर्मनाथाच्या अनुयायांत 'पीर' नांवाचा मुस्लिम जोग्यांचाहि वर्ग आढळतो. सुताचा व्यवसाय करणाऱ्या अनेक विणकर जाती नाथ संप्रदायाच्या गृहस्थ-जोग्यांच्या क्षेत्रांत पडतात. समाजांत या गृहस्थ-जोग्यांचा स्तर नीचतम मानला जातो. या जोगी जातींपैकीं अनेक जाती मुसलमान झालेल्या आहेत. अशाच जोगी जातींत महात्मा कबीराचा जन्म झाला, असें डॉ. हजारीप्रसाद द्विवेदींचें मत आहे.[९८] इ. स. १९२१ च्या शिरगणतीच्या अहवालांतील जोगी-संख्या पाहिली म्हणजे अजूनहि जोग्यांचा संचार किती प्रचंड आहे, हें समजून येईल — हिंदु जोगी : ६२९९७८; मुसलमान जोगी : ३११५८; हिंदु फकीर : १४११३२. यांत स्त्रियांची संख्याहि लहान नाहीं.

दक्षिणेंत श्रीशैलावर उदय पावलेला नाथ संप्रदाय लौकरच अखिल भारतांत पसरला. श्रीशैल ज्या वज्रयानीचा बालेकिल्ला होता, त्या वज्रयानी व अन्य तांत्रिक साधकांचा बंगालमध्येंहि बाहुल्यानें संचार होता. त्यामुळें श्रीशैलावरील पराभूत साधनाप्रणाली गोरक्षनाथाच्या प्रभावाखालीं येतांच नाथ संप्रदायाचा प्रसार त्यांच्या द्वारां बंगालकडे झुकला. बंगालच्या गोपीचंद्राप्रमाणेंच इकडे उज्जैनीचा राजा भर्तृहरि हा राजत्याग करून गोरक्षशिष्य बनल्यामुळें भारताच्या पश्चिम दिशेनें नाथ संप्रदाय पसरत चालला. भर्तृहरि-शिष्य रतननाथ व त्याचे अन्य सहकारी यांच्या द्वारां पंजाब, सरहद्द प्रांत व त्याच्या पलीकडे अफगाणिस्थानपर्यंत नाथ संप्रदायाची ध्वजा फडकली.

इकडे गहिनीनाथ, अमरनाथ यांसारख्या महाराष्ट्रीय शिष्यांच्या द्वारां महाराष्ट्र व्यापला गेला. विदर्भांत हरिनाथादींचें कार्य सुरू होतेंच. आंध्र-

---

९८. 'कबीर', पृ. ११.

कर्नाटकांत तर अनेक नाथपंथी संचार करीत होते. कर्नाटकांत अल्लमप्रभु व रेवणसिद्ध हे नाथसंबद्ध पुरुष कानडी लोकजीवनांत इष्ट परिवर्तन घडवीत होते. बंगालधूनच नाथ संप्रदाय पुढें नेपाळांत घुसला आणि तेथील लोकजीवनांत समरसून गेला.

गोरक्षनाथानें नाथ संप्रदायाचें बीजारोपण केलें आणि त्यानें स्वतःच आपल्या ह्यातींत प्रयत्नांची परिसीमा करून, त्या बीजाचा भारतव्यापी वृक्ष-विस्तार घडविला. 'याचि देहीं याचि डोळां' त्यानें भारतीय धार्मिक जीवनाचें धवल स्वरूप निर्माण केलें आणि 'विषयविध्वंसैकवीर' ही सार्थ उपाधि प्राप्त केली. गोरक्षनाथाच्या या कार्याला भारतीय साधनेच्या इतिहासांत तुलना नाहीं.

• • •

## : २ : गुरु गोरक्षनाथ : जीवन आणि कार्य

### गोरक्ष-गुरु मत्स्येंद्रनाथ :

नाथ संप्रदायाच्या इतिहासांतील पहिला ऐतिहासिक पुरुष मत्स्येंद्रनाथ हा होय. भारतीय लोकमानसांत मत्स्येंद्रनाथ आणि गोरक्षनाथ या गुरुशिष्यांविषयीं कमालीचा गूढादर वास करीत आहे. ज्ञानेश्वरांचें जीवन जसें निवृत्ति-भक्तीनें भारावलेलें होतें, त्याचप्रमाणें गोरक्षनाथाची मत्स्येंद्रनाथाविषयींची गुरुभक्ति प्रसिद्ध आहे. गुरुभक्तीचा आणि गुरु-शिष्यसंबंधाचा आदर्श वर्णितांना मत्स्येंद्र-गोरक्षांचें उदाहरण नेहमीं दिलें जातें. त्यामुळें गोरक्षनाथाचें जीवन-कार्य समजून घेण्याअगोदर मत्स्येंद्रनाथाचा विचार करणें आवश्यक आहे.

मत्स्येंद्रनाथाची जीवन-गाथा अनेक अद्भुत दंतकथांच्या आवरणांत लुप्त झाली आहे. एक महान् योगी अशी त्याची ख्याति असल्यामुळें योगसिद्धींविषयींच्या कल्पनाजालांतून मत्स्येंनाथाविषयीच्या शेंकडों कल्पित कथा भारतीय लोकसाहित्यांत आणि उत्तरकालीन सांप्रदायिक पुराणग्रंथांत निर्माण झाल्या आहेत.

ब्रह्मानंदानें आपल्या हठयोगप्रदीपिकेवरील टीकेंत मत्स्येंद्रनाथाच्या प्रादुर्भावासंबंधीं जी कथा दिली आहे, तीच थोड्याफार फरकानें सर्वत्र आढळते. "अत्रैवं किंवदन्ती – कदाचिदादिनाथः कस्मिंश्चिद्द्वीपे स्थितः तत्र विजनमिति मत्वा गिरिजायै योगमुपदिष्टवान्। तीरसमीपनीरस्थः कश्चन मत्स्यः तं योगोपदेशं श्रुत्वा एकाग्रचित्तो निश्चलकायोऽवतस्थे। तं तादृशं ऽत्रानेन योगः श्रुत इति तं मत्वा कृपालुरादिनाथो जलेन प्रोक्षितवान्। स च प्रोक्षणमात्राद्दिव्यकायो मत्स्येन्द्रः सिद्धोऽभूत्। तमेव मत्स्येन्द्रनाथ इति वदन्ति।"[1] (एकदां केव्हां तरी कोणत्या तरी एका द्वीपावर बसून, एकान्तांत आदिनाथ गिरिजेला योगाचा उपदेश करीत होता. तीराजवळच्या पाण्यांत असलेल्या एका माशानें तो उपदेश ऐकला आणि त्यायोगें त्याच्या मनाची एकाग्रता होऊन तो निश्चल-काय बनून राहिला. त्याला तशा निश्चल अवस्थेंत पाहून, त्यानें आपला

---

१. हठयोगप्रदीपिका, १.५, पृ. ९.

योगोपदेश ऐकला आहे, हें आदिनाथाला समजून आलें. कृपाघन आदिनाथानें त्याच्यावर जलप्रोक्षण केलें; त्याबरोबर त्या मत्स्याचा सिद्ध मत्स्येंद्रनाथ बनला. )

ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या अखेरीस आपली गुरुपरंपरा सांगतांना याच कथेचा निर्देश केला आहे :

क्षीरसिंधुपरिसरीं। शक्तीच्या कर्णकुहरीं।
नेणों कैं श्रीत्रिपुरारीं। सांगितलें जें॥
तें क्षीरकल्लोळाआंत। मकरोदरीं गुप्त।
होता तयाचा हात। पैठें जालें॥ [२]

या कथेचीं विविध रूपांतरें 'गोरक्षविजय' व 'मीनचेतन' हे बंगाली ग्रंथ, 'बुद्धपुराण' हा नेपाळमधील ग्रंथ, योगी चंद्रनाथकृत 'योगिसंप्रदायाविष्कृति', जोधपूरच्या सरदार म्युझिअममधील 'नाथचरित्र', 'नाथपुराण', 'मेघमाला', मराठींतील 'नवनाथभक्तिसार' इत्यादि ग्रंथांत आढळतात. स्कंद पुराणाच्या नागर खंडांतहि मत्स्येंद्रकथा आली आहे. या सर्व कथांच्या एकत्र निरीक्षणांतून कांही समान समजुती आढळतात :

१. मत्स्येंद्रनाथाला प्रत्यक्ष शिवापासून योगज्ञान प्राप्त झालें. त्याला कुणी मानवी गुरु नव्हता.

२. जालंधरनाथ त्याचा समकालीन होता.

३. त्याचा प्रमुख शिष्य गोरक्षनाथ हा होता.

४. तो एकदां कदलीबनांतील स्त्रियांच्या ( तंत्र-मार्गीय योगिनींच्या ) जाळ्यांत सांपडला होता आणि आपलें पूर्वजीवन व जीवनध्येय विसरून भोगविलासांत मग्न झाला होता.

५. त्याला कर्दळीबनांतील स्त्रियांच्या जाळ्यांतून सोडविण्याची कामगिरी त्याचा पट्टशिष्य गोरक्षनाथ यानें अत्यंत कौशल्यानें आणि धीरानें पार पाडली आणि आपल्या गुरूला स्वकर्तव्याची जाणीव करून दिली.

**स्थल-शोध :** या अनेक दंतकथांच्या पसाऱ्यांतून एवढेंच हातीं येतें. त्याच्या मूलस्थानाविषयींची कांहींच निश्चित अशी कल्पना करतां येत नाहीं.

---

२. ज्ञानेश्वरी, १८. १७५२–५३.

नेपाळमध्यें अवलोकितेश्वराशीं त्याचें ऐकात्म्य मानलें आहे. बंगाली दंतकथांच्या निरीक्षणावरून डॉ. बागची यांनीं असें मत मांडलें आहे कीं, " It is therefore natural to suppose that Matsyendranatha and his school originated and flourished in Bengal and most probably in Eastern Bengal ( in Chandradvipa which in the present state of our knowledge may be located in the deltaic region of Bengal and may be identified with the island of Sundvip ). The teachings of the school later on spread to different parts of India and the original legend was elaborated and expanded in different fashions in those places. "[३]

परंतु कोणत्याहि एका प्रदेशांतील स्थानिक लोककथांना सत्य मानून व इतर प्रदेशांतील दंतकथांना तुलनेनें असत्य मानून कांहीं निर्णायक सिद्धान्त मांडणें सर्वथा अशक्य आहे. 'कदलीमञ्जुनाथमाहात्म्यम्' या संस्कृत ग्रंथानुसार मत्स्येंद्रनाथ हा दक्षिणेंतील तौलवी ( तुळुभाषिक ) देशाचा राजा होता आणि मंगला ही त्याची राजधानी होती. 'नाथलीलामृत' या मराठी ग्रंथांत मत्स्येंद्रनाथ हा मल्लाळ देशांतील असल्याची हकीकत दिली आहे. ज्या कदलीवनांत मत्स्येंद्रनाथ फसला होता, तें कदलीबन कामरूपांत वा बंगालमध्यें गंगामुखाजवळ नसून श्रीशैलाच्या परिसरांत असल्याचे पुरावे आपण गेल्या प्रकरणांत विस्तारानें पाहिले आहेत. त्यावरून आपणांस एवढें मात्र निश्चित म्हणतां येईल कीं, वामाचाराच्या पापकर्दमांत रुतलेल्या मत्स्येंद्रनाथाचा उद्धार गोरक्षनाथानें श्रीशैलावर केला आणि आपल्या वामाचारविरोधी आंदोलनाचा शुभारंभ अशा रीतीनें दक्षिणेंतच आपल्या गुरूच्या जीवनपरिवर्तनानें साजरा केला.

**नामवैचित्र्य :** मत्स्येंद्रनाथाच्या स्थल-कालाप्रमाणेंच त्याच्या नांवाच्या बाबतीतहि निश्चित एकमत नाहीं. डॉ. बागची यांनीं संपादिलेल्या मत्स्येंद्रकृत ग्रंथांच्या समाप्तिमुद्रांत ( Colophons ) 'मच्छघ्नपाद' ( कौलज्ञाननिर्णय, पटलें १–११, १४ ), 'मच्छेंद्रपाद' ( कौ. ज्ञा. नि., प. १३, १५, १७ ), 'मत्स्येंद्रपाद' ( कौ. ज्ञा..नि., प. १६, २२–२४ ), 'मीनपाद' ( कौ. ज्ञा. नि.,

---

३. कौलज्ञाननिर्णय, प्रस्तावना, पृ. १८, ३०.

प. १९–२१ ), 'मीननाथ' ( अकुलवीरतंत्र – A ), 'मच्छेंद्रपाद' ( अकुलवीरतंत्र – B ), 'मत्स्येंद्र' ( कौलानंद ), व 'मच्छिंद्रनाथपाद' ( ज्ञानकारिका ) अशीं मत्स्येंद्रनाथाचीं नाम-रूपें आढळतात. नाथपंथीय हिंदी गीतांतून व नाथविषयक लोकगीतांतून त्याला 'मछिंदर' वा 'मछिंदरनाथ' या नांवानें संबोधिलें आहे.

या नांवांपैकीं मत्स्येंद्र आणि त्याचीं अपभ्रष्ट रूपें यांचा संबंध मत्स्येंद्रनाथाच्या आविर्भावकथेशीं जुळतो. परंतु 'मच्छघ्नपाद' हें नांव मात्र कांहींसें निराळें भासतें. या नांवावरून म. म. हरप्रसादशास्त्री यांनीं असें अनुमान केलें आहे कीं, "मत्स्येंद्रनाथ हा मूलतः मासे मारणाऱ्या कैवर्तक जातींतील असावा." 'कौलज्ञाननिर्णया'त याविषयीं असा उल्लेख आहे :

मत्स्याभिघातिनैर्विप्रा मत्स्यघ्नमेति विश्रुताः ।
कैवर्तकत्वं कृतं यस्मात् कैवर्तो विप्रनायकः ॥[४]

कौलागम गिळंकृत करणाऱ्या मत्स्याला मारून, त्याच्या उदरांतील ज्ञान मुक्त करण्याचें मत्स्येंद्राचें कृत्य कैवर्तकासारखें असल्यामुळें तो ब्राह्मण असूनहि कैवर्तक समजला जाऊं लागला, असा कौलज्ञाननिर्णयांतील उल्लेखांचा सूर आहे. डॉ. बागची यांनीं संपादिलेले कौलज्ञाननिर्णयादि ग्रंथ – विशेषतः 'कौलज्ञाननिर्णय' – हे पौराणिक ढंगाचे असून त्यांचें मत्स्येंद्रकर्तृत्व मला संशयातीत वाटत नाहीं; त्याविषयीं आपण पुढें विचार करूं. येथें मला इतकेंच सुचवायचें आहे कीं, त्यांतील मत्स्येंद्रचरित्रविषयक उल्लेखांना अन्य दंतकथात्मक सामग्रीहून अधिक मूल्य नाहीं. मत्स्येंद्राच्यां नांवाचें स्पष्टीकरण काश्मिरी शैव परंपरेंत पुढीलप्रमाणें केलें आहे :

रागारुणं ग्रन्थिविलावकीर्णं यो जालमातानवितानवृत्तिम् ।
कलोम्भितं बाह्यपथे चकार स्यान्मे स मच्छन्दविभुः प्रसन्नः ॥[५]

हा श्लोक अभिनवगुप्ताच्या 'तंत्रालोकां'तील आहे. यांत "आतान-वितान-वृत्यात्मक जाल छिन्न करण्यामुळें मच्छन्द हें नांव निर्माण झाल्याचें" सूचित

४. कौलज्ञाननिर्णय, १६. २७.

५. तंत्रालोक, १. १७. ( भाग १, पृ. २५ )

केलें आहे. 'तंत्रालोका'चा टीकाकार जयद्रथ या श्लोकावर टीका करतांना लिहितो :

मच्छाः पाशाः समाख्याताश्चपलाश्चित्तवृत्तयः ।
छेदितास्तु यदा तेन मच्छन्दस्तेन कीर्तितः ॥

कबीर परंपरेंत चपल चित्तवृत्तींना 'मच्छ' अशी प्रतीकात्मक संज्ञा आहे.[६] जयद्रथानें केलेलें स्पष्टीकरण कबीर परंपरेंतील कल्पनेनें पुष्ट होतें. आदिकालीन बौद्ध सिद्धांच्या साहित्यांत 'मत्स्य' हें प्रज्ञेचें प्रतीक आहे.[७] त्यानुसार मत्स्येंद्र म्हणजे प्रज्ञावंत.

सारांश, मत्स्येंद्रनाथाच्या बाबतींत नांवापासूनच मतमतांतरांचें जंजाळ निर्माण झालें आहे. माझ्या कल्पनेप्रमाणें तांत्रिक सिद्धांच्या गूढ परिभाषेच्या परंपरेनुसार मत्स्येंद्रनाथाचें नांव त्याचा पारमार्थिक व बौद्धिक अधिकार सूचित करणारें असावें आणि नंतर त्या नांवांतील 'मत्स्य' या शब्दाचा लाक्षणिक अर्थ विसरला जाऊन, अभिधामूलक अर्थाच्या स्पष्टीकरणासाठी अद्भुत दंतकथांचें कल्पनाजाल निर्माण होत राहिलें असावें. कौलज्ञाननिर्णयांत मत्स्येंद्रनाथाचें एक पर्यायनाम 'भृंगपाद' असें आहे आणि नवल असें कीं, मत्स्येंद्रविषयक नेपाळी दंतकथांत भुंग्यांचा संबंध असलेली एक कथा प्रचलित आहे! गोरक्षनाथाचा एक कर्नाटकीय सहकारी श्रीअल्लमप्रभु वा प्रभुदेव हा आपल्या गुरूचें ( मत्स्येंद्रनाथाचें ) नांव 'अनिमिषदेव' ( अनिमिष = मत्स्य ) असें देतो.[९]

या नामवैचित्र्यांतूनच आणखी कांही घोटाळे निर्माण झाले आहेत. मत्स्येंद्रनाथ आणि मीननाथ हीं एकाच व्यक्तीचीं दोन नांवें आहेत, कीं त्या

---

६. बीजक : विचारदास-कृत टीका, पृ. ४०

७. कौलज्ञाननिर्णय, प्रस्तावना, पृ. ७ वर डॉ. बागचींनीं 'चतुष्पीठतंत्रा'वरील दुर्जयचंद्राच्या टीकेंतील उतारा दिला आहे : " प्रज्ञामकरमीनकैरिति सर्वभावानां निःस्वभावता प्रज्ञा तया च सर्वेन्द्रियाणि प्राणिनैव मकरमीनकैर्व्यापाद्यन्ते इति साधर्म्यात् प्रज्ञैव मकरमीनायते । " ( पटल २ ).

८. कौलज्ञाननिर्णय, १६. १७.

९. म. सा. पत्रिका, जानेवारी १९२५ : प्रा. द. रा. बेंद्रे यांचा ' ज्ञानेश्वरपूर्व कानडी वाङ्मय ' हा लेख.

दोन वेगळ्या व्यक्ति होत्या ? तिबेटी सिद्ध परंपरेंतील लुइपा आणि मत्स्येंद्रनाथ एकच कीं वेगळे ? – असे अनेक प्रश्न उद्भूत झाले आहेत.

हठयोगप्रदीपिका आणि तीवरील ब्रह्मानंदाची 'ज्योत्स्ना' टीका यांत मत्स्येंद्रनाथ आणि मीननाथ विभिन्न नोंदविले आहेत.[१०] तिबेटी दंतकथांनुसार मीननाथ हा मत्स्येंद्रनाथाचा पिता होय, तर नेपाळी दंतकथांनुसार तो त्याचा धाकटा भाऊ होय. नवनाथभक्तिसारांत व योगीसंप्रदायाविष्कृतींत मत्स्येंद्र-नाथाचा मीननाथ हा पुत्र असल्याचें लिहिलें आहे. कौलज्ञाननिर्णयादि ग्रंथांत मात्र मत्स्येंद्र-मीनांचें ऐकात्म्यच गृहीत आहे. ज्ञानेश्वरांनीं मत्स्येंद्रनाथाचा 'मीन' असाहि उल्लेख केला आहे.[११] 'कद्लीमञ्जुनाथमाहात्म्यां'तहि मत्स्येंद्र-मीन एकच आहेत. नाथ परंपरेंत उत्तरकालीं मीननाथ या नांवाचा आणखी एखादा सिद्ध होऊन गेला असावा, असें मानण्यास जागा आहे.[१२] परंतु 'मीननाथ' हें मत्स्येंद्रनाथाचेंहि एक पर्याय नाम आहे, एवढें मात्र निश्चित.

मत्स्येंद्रनाथाच्या नांवावरील 'योगविषय' नामक ग्रंथांत –

**उमाशङ्करपुत्रोऽहं मीननाथो मुनीश्वरः ।**
**कथयामि परं तत्त्वं कुलाकुलविबोधकम् ॥**[१३]

या श्लोकांत 'मीननाथ' हें नांव असून याच ग्रंथाच्या समाप्तिमुद्रेंत 'मत्स्येंद्र-नाथविरचितं' असें म्हटलें आहे. याशिवाय गोरक्षनाथानें आपल्या 'गोरक्ष-शतक' आणि 'अमरौघप्रबोध' या ग्रंथांच्या प्रारंभीं गुरुनमन करतांना 'मत्स्येंद्र-नाथ' या नांवाऐवजीं 'मीननाथ' असेंच गुरुनाम उल्लेखिलें आहे.[१४]

तिबेटांत प्रचलित असलेल्या सिद्धांच्या मालिकेंतील आदिसिद्ध जो लुइपा तो मत्स्येंद्रनाथच होय, असें डॉ. बागची, डॉ. मल्लिक इत्यादि पंडितांचें

---

१०. हठयोगप्रदीपिका, १. ५, पृ. ९.

११. ज्ञानेश्वरी, १८. १७५५.

१२. नाथ संप्रदाय : पृ. ३६ वर दिलेल्या सिद्धांच्या यादींत (क्र. १०८) एक मीननाथ आहे.

१३. योगविषय, ५, ७ (सिद्धसिद्धान्तपद्धति and Other Works of Nath Yogis, पृ. ४५).

१४. सिद्धसिद्धान्तपद्धति and Other Works of Nath Yogis, पृ. ४८; Gorakhnath and Kanphata Yogis, पृ. २८४.

मत आहे.[१५] या मताला अनुसरून लुइपाविषयक माहितीच्या आधारावर मत्स्येंद्रनाथाचा काळ ठरविण्याचा प्रयत्नहि झाला आहे. ज्या लुइपाशीं मत्स्येंद्र-नाथाची एकता कल्पिली जाते, त्या लुइपाच्या नांवाचे पर्याय लुइपाद, लुयिपा, लुहिपाद, लोहिपा, लोहितपाद असेहि आढळतात. लोहित-रोहित = मत्स्य अशा प्रकारें लोहितपाद वा लुइपा हें नांव बनलें असल्याची कल्पना आहे. लुइपाच्या तिबेटी नांवांपैकीं एका नांवाचें संस्कृत रूपांतर 'मत्स्यांत्राद' असें होतें. लुइपाच्या चित्रांतहि त्याचें स्वरूप, तो मत्स्याचीं आंतडीं खात आहे व भोंवतीं मासे आहेत, असेंच आहे. या मत्स्यसंपर्कामुळें लुइपा व मत्स्येंद्र एकच, असा भास होतो. परंतु या साम्यापलीकडे या ऐक्याला अन्य कांहीं पुरावा नाहीं. लुइपाचीं दोन बंगाली गीतें उपलब्ध आहेत[१६] आणि बंगालमध्यें प्रच-लित असलेल्या कथांवरून मत्स्येंद्रनाथ हा बंगालचा निवासी होय – यावरूनहि वरील लुइपा-मत्स्येंद्र-एकतेला पुष्टि मिळते, असा वरील अभ्यासकांचा दावा आहे. परंतु सिद्धांच्या उपलब्ध कवितेच्या भाषेचा वारसा आजच्या कोणत्या भाषेनें सांगावा, याचा अंतिम निर्णय अजून झालेला नाहीं. त्या बाबतींत भाषा-शास्त्रज्ञांत भरपूर मतभेद आहे. आणि बंगाली कथांच्या आधारावर मत्स्येंद्र-नाथाची मूलभूमि ठरविणेंहि आग्रहीपणाचें ठरेल. वज्रयान-सहजयानाचे अनुयायी नाथ संप्रदायाच्या प्रभावाखालीं आल्यावर या पूर्ववर्ती साधनांच्या अनुयायांनीं उभय-साधनांच्या परंपरांची व विचारांची भरपूर गल्लत केल्याचीं प्रत्यंतरें या विषयाच्या उपलब्ध सामग्रींतून वारंवार आढळून येतात. अशा अवस्थेंत तिबेटी परंपरेवर विश्वसून कोणतेंहि अनुमान बांधणें धोक्याचें ठरेल.

आज उपलब्ध झालेल्या मत्स्येंद्रनाथाच्या नांवावरील ग्रंथांवरूनहि ( ते ग्रंथ नाथ संप्रदायाच्या साधना-विचारांशीं संबंधित नसतांनाहि ) मत्स्येंद्रनाथ हा पूर्वी कधी बौद्ध तांत्रिक ( वज्रयानी साधक ) असल्याचें प्रत्यंतर आढळत नाहीं. कौलज्ञाननिर्णयादि ग्रंथांवरून, मत्स्येंद्रनाथानें आपलें मूलमत सोडून जी साधना-प्रणालि पत्करली ती बौद्ध तंत्राशीं संबंधित नसून हिंदु शाक्त तंत्राशीं संबंधित होती. आणि ही नवी साधना-प्रणालि ( योगिनीकौलमत ) स्वीकारण्या-

---

१५. कौलज्ञाननिर्णय, प्रस्तावना पृ. २२–२४; सिद्धसिद्धान्तपद्धति, प्रस्तावना पृ. १४–१६.

१६. चर्याचर्यविनिश्चय, चर्या क्र. १ व २९.

पूर्वी सुद्धां तो बौद्धानुयायी नसून, 'सिद्धामृत' नांवाच्या कौल ( शाक्त ) मताशीं संबंधित असावा, असें कौलज्ञाननिर्णयावरून दिसून येतें.

'लीळाचरित्रां'त गोरक्षनाथाचा आणि इतरहि अनेक नाथ सिद्धांचा व साधकांचा उल्लेख वारंवार येतो. 'लीळाचरित्र' हा ग्रंथ चक्रधरांच्या आठवणींचा ( लीळांचा ) संग्रह आहे. या ग्रंथांत मत्स्येंद्रनाथाचा कोठेंहि उल्लेख नाहीं. परंतु एका प्रसंगीं लुइपाची कथा मात्र आलेली आहे.[१७] लीळाचरित्रांतील कित्येक उल्लेखांवरून असें दिसून येतें कीं, गोरक्षनाथाचा काळ चक्रधरांच्या जीवनकालापूर्वी फारसा दूरचा नसावा – किंबहुना चक्रधर-जीवनकालींहि गोरक्षनाथ विद्यमान असल्याची जाणीव लोकमानसांत आहे. गोरक्षनाथाला पाहिलेलीं माणसें चक्रधरांच्या वेळीं हयात होतीं. स्वतः चक्रधरांना नाथ संप्रदायाच्या इतिहासाचें, विचारांचें व आचारांचें चांगलें ज्ञान असल्याचें याच ग्रंथावरून दिसून येतें. अशा अवस्थेंत, लुइपाची कथा सांगणाऱ्या चक्रधरांना लुइपा व मत्स्येंद्रनाथ एकच याची जाणीव असूं नये, याचें आश्चर्य वाटतें. जर लुइपा व मत्स्येंद्रनाथ एकच असते, तर चक्रधरांच्या मुखांतून प्रकटलेली ही लुइपाची कथा मत्स्येंद्रनाथाची म्हणून प्रकटणें जास्त शक्य होतें. चांगा वटेश्वरानें 'तत्त्वसारां'त जी सिद्ध-नामावळी दिली आहे, तींत –

> आदिनाथा प्रसादें । उमास्वामिसंवादें ॥
> मछिंद प्रबोधें । प्रकट जाले ॥[१८]

असा मत्स्येंनाथाचा स्वतंत्र उल्लेख केला आहे आणि आदिनाथापासून मुक्तादेवीयोगिनीपर्यंत आपली गुरुपरंपरा दिल्यावर, पुढें –

> सर्व सुसावेरी ( ? ) । नागार्जुन कणेरी ।
> लुइलाला कुकरि । रत्नघोषु ॥[१९]

असा लुइपाचा स्वतंत्र उल्लेख केला आहे. ज्ञानेश्वरांच्या नांवावरील 'योगवासिष्ठां'तहि मत्स्येंद्रनाथ व लुइपा यांचा वेगवेगळा उल्लेख आलेला आहे :

---

१७. लीळाचरित्र, उत्तरार्ध लीळा, ४१९, पृ. २३९.

१८. तत्त्वसार, ८६६.

१९. तत्त्वसार, ८७१.

अनिळ बुध निरंजन । आदि अनादि मीन ।
मछेंद्र चौरंगि गहन । भूचर जती ॥
गोरक्ष संती तंती अचळी । वीरुवा लोईलीळा पांगळी ।
सियाळी कनखळी । शबरिनाथु ॥ [२०]

**काल-शोध :** मत्स्येंद्रनाथाचा काल ठरविणेंहि कठीण आहे. त्याच्या काळाचा अलीकडील बिंदु ठरवितां येतो, पण पहिला बिंदु ठरविणें तितकें सोपें नाहीं. त्याचमुळें अनेक पंडितांनी त्याला आठव्या-नवव्या शतकांत नेऊन बसविलें आहे. अभिनवगुप्ताच्या 'तंत्रालोकां'त त्याला नमन केलें आहे, हें आपण मागें पाहिलेंच आहे. 'तंत्रालोका'ची रचना इ. स. १०१५ मध्यें झाली. तेव्हां मत्स्येंद्रनाथाचा काल १०१५ पूर्वीचा असला पाहिजे, हें उघड आहे. तो किती पूर्वीचा आहे, हें पहावयास पाहिजे. मत्स्येंद्रनाथाचा काळ ठरविण्यासाठी जीं प्रमाणें पुढें केलीं जातात, तीं आपण क्रमशः तपासून पाहूं.

( १ ) मत्स्येंद्रनाथाच्या नांवावरील कौलज्ञाननिर्णयादि ग्रंथांचा लिपिकाल ११ व्या शतकाहून अलीकडे आणतां येणार नाहीं, असें डॉ. बागची यांनी आग्रहानें सांगितलें आहे. [२१] आणि ज्या अर्थी या ग्रंथांत मत्स्येंद्रविषयक अद्भुत कथांचा उल्लेख आहे, त्या अर्थी त्यापूर्वी एक शतक तरी मत्स्येंद्रनाथाचा काल मानावयास हवा, असें त्यांचें म्हणणें. अभिनवगुप्ताच्या ग्रंथांतील उल्लेखाचा काळ लक्षांत घेऊन, मत्स्येंद्रनाथ दहाव्या शतकाच्या प्रारंभीं उदयास आला, असें निर्णायक मत त्यांनीं नोंदविलें आहे. [२२] डॉ. कल्याणी मल्लिक यांनींहि मत्स्येंद्राचा काळ दहावें शतकच मानला आहे.

डॉ. द्विवेदी आणि डॉ. मोहनसिंग यांनीं मात्र तिबेटी सिद्ध परंपरेंतील माहितीच्या आधारें मत्स्येंद्रनाथाला नवव्या शतकांत नेऊन बसविलें आहे. [२३] तिबेटी परंपरेंतील मीनपा राजा देवपालाच्या राज्यकालांत ( इ.स. ८०९–४९ ),

---

२०. श्रीज्ञानेश्वरकृत योगवासिष्ठ, १. २८०–२८१.

२१. कौलज्ञाननिर्णय, प्रस्तावना पृ. ५.

२२. कौलज्ञाननिर्णय प्रस्तावना पृ. ३२.

२३. नाथ संप्रदाय, पृ. ५२–५४; Gorakhnath and the Mediæval Hindu Mysticism, पृ. १८–२२.

होऊन गेला. मीनपा म्हणजेच मत्स्येंद्रनाथ, म्हणून मत्स्येंद्राचा काल नववें शतक. तसेंच मीनपाप्रमाणेंच जालंधरशिष्य कण्हपा हाहि राजा देवपालाच्या राज्य-कालांत होऊन गेला. जालंधर आणि मत्स्येंद्रनाथ हे समकालीन. म्हणून मत्स्येंद्र-नाथाचा काल नववें शतक.

( ३ ) 'प्रबंधचिंतामणी'नुसार चालुक्य राजा मूलराज ( दहावें शतक ) याच्याशीं संबंधित असा कंथडी नामक एक शिवयोगी होता. हा कंथडी म्हणजे गोरक्षशिष्य समजला जाणारा कंथडीनाथच होय, असें डॉ. द्विवेदींचें मत. गोरक्ष-शिष्याचें अस्तित्व दहाव्या शतकांत असल्यामुळें मत्स्येंद्रनाथाचा काल नववें शतक ठरतो.

( ४ ) श्री. शि. म. परांजपे यांनीं माधवाचार्यकृत 'शंकरदिग्विजया'च्या आधारें मत्स्येंद्र-गोरक्ष शंकराचार्यांच्या पूर्वीं होऊन गेले, असें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे.[२४] " मंडनमिश्राची स्त्री शारदा हिनें विचारलेल्या शृंगार-विषयक प्रश्नांचीं उत्तरें देण्याकरितां अमरु राजाच्या मृत शरीरामध्यें प्रवेश करण्याचा आपला विचार शंकराचार्यांनीं जेव्हां आपला शिष्य पद्मपादाचार्य यास सांगितला, तेव्हां त्या शिष्याला हें आपल्या गुरूचें करणें योग्य न वाटून त्यानें त्याविषयीं जें भाषण केलें, त्यांत मत्स्येंद्रनाथाच्या परकाया-प्रवेशाची हकीकत दिली आहे. आपल्या शरीराचें संरक्षण करण्याविषयीं आपला शिष्य गोरक्षनाथ यास आज्ञा करून मत्स्येंद्रनाथ हे अशाच कोणा एका मृत राजाच्या शरीरामध्यें प्रवेश करते झाले. आणि पुढें तेथील सुखोपभोगांमध्यें ते इतके निमग्न झाले कीं, गोरक्षनाथानें मोठ्या कष्टानें राजमंदिरांत प्रवेश करवून घेऊन आणि पूर्वीची आठवण देऊन त्यांना पूर्वदेहावर आणलें. " या माहितीच्या आधारें श्री. परांजपे म्हणतात कीं, " जर मत्स्येंद्रनाथ शंकराचार्यांपूर्वीं होऊन गेला नसता, तर माधवाचार्यांसारख्या काटेतोल लेखकानें ' मत्स्येंद्रनामा हि पुरा महात्मा ' असा चरण पद्मपादाचार्यांच्या तोंडीं घालून कालविपर्यासाची चूक केली नसती. या कारणानें मत्स्येंद्रनाथ आणि गोरक्षनाथ हे शंकराचार्यांपूर्वीं होऊन गेलेले असावेत, हीच गोष्ट सिद्ध होते. "

वरील प्रमाणांपैकीं अभिनवगुप्ताच्या तंत्रालोकांतील उल्लेखाशिवाय कोणतेंहि प्रमाण विश्वसनीय मानण्याजोगें नाहीं. तिबेटी परंपरेंतील माहितीचा

---

२४. भा. इ. सं. मं. तृतीय संमेलन वृत्त, श. १८३७, पृ. १६४–१६६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २८१७८ वि: चरित्र
८०१ २०
आ.मि..क्रा मों: दि: ...७७...


आधार तर नेहमींच दिशाभूल करणारा ठरतो. त्या परंपरेंत नोंदविलेले गुरुशिष्य-संबंधहि असेच गोंधळाचे आहेत. वर जो मीनपा उल्लेखिला आहे, तो मीनपा तिबेटी परंपरेंत मत्स्येंद्रनाथाचा पिता म्हणून उल्लेखिला आहे. जर मीनपाचें देवराजसमकालीनत्व तिबेटी परंपरेप्रमाणें मानावयाचें तर हा मीन-मत्स्येंद्रांचा पितापुत्र संबंध कां प्रमाण मानूं नये ? तेव्हां कालनिर्णयासारख्या बाबतींत तरी तिबेटी परंपरेचा विचार वर्ज्य मानावा, हें बरें. कंथडीचा उल्लेखहि या बाबतींत उपयोगीं पडण्यासारखा नाहीं. कारण मूलराजाशीं संबंध असलेला शिवयोगी कंथडी हा नाथपंथी सिद्ध होता, याला कांहीं प्रमाण नाहीं आणि सदर कंथडी हा गोरक्षाचा शिष्य होय, याला कल्पनेशिवाय अन्य आधार नाहीं. 'शंकर-दिग्विजया'तील उल्लेख तर सरळ कालविपर्यास करणारा आहे. कालविपर्यासाचा दोष अनेक ख्यातनाम ग्रंथकारांच्या कृतींतहि नेहमीं आढळतो. भागवतांत अक्रूर-कृत श्रीकृष्णस्तुतींत श्रीकृष्णोत्तर बुद्धावतारालाहि नमन केलेलें आहे !

मत्स्येंद्रनाथाचा काळ ठरविण्यासाठीं अभिनवगुप्तानें केलेल्या उल्लेखा-शिवाय अन्य प्रमाण नाहीं, हें जर खरें, तर या उल्लेखामागें ( इ. स. १०१५ ) मत्स्येंद्रनाथाला किती मागें न्यावयाचें, हा प्रश्न आहे. मत्स्येंद्र-शिष्य गोरक्षनाथ याचा काळ जर आपणांस निश्चित करतां आला, तर आपण मत्स्येंद्रनाथाच्या काळाविषयीं कांहीं खात्रीचें अनुमान करूं शकूं. येथें इतकेंच सुचवितों कीं, गोरक्षनाथाचें अस्तित्व आपण ११ व्या शतकांत निश्चित करूं शकतों. तेव्हां मत्स्येंद्रनाथ दहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला असें म्हणावयास हरकत नाहीं. ( गोरक्षनाथाच्या काळाविषयींची चर्चा आपण पुढें करणार आहोंतच. )

**मत्स्येंद्रनाथाचे ग्रंथ :** मत्स्येंद्रनाथाच्या ग्रंथांचे आपणांस दोन विभाग करावे लागतील : एक कौलमताच्या ग्रंथांचा व दुसरा नाथ मताच्या ग्रंथांचा. पहिल्या विभागांत 'कौलज्ञाननिर्णय', 'अकुलवीरतंत्रम्', 'कुलानंदतंत्रम' व 'ज्ञानकारिका' आणि दुसऱ्या विभागांत 'योगविषय' व कांहीं स्फुटांचा समावेश होतो.

पहिल्या विभागांतील सर्वच ग्रंथ नेपाळच्या दरबार लायब्ररीच्या संग्रहांतून उपलब्ध झाले आहेत. या ग्रंथांचें एकत्र संपादन डॉ. प्रबोधचंद्र बागची यांनीं केलें असून, त्याला जवळ जवळ शंभर पानांची संशोधनपूर्ण प्रस्तावना जोडली आहे.

हे ग्रंथ मत्स्येंद्रनाथ-कृत नसून मत्स्येंद्रनाथाच्या कौल साधनेचें विवरण करणारे आहेत. या ग्रंथसमूहांतील प्रमुख ग्रंथांत प्रत्यक्ष मत्स्येंद्रनाथाच्याच अद्भुत कथा वर्णिल्या आहेत.

'**कौलज्ञाननिर्णय**' हा ग्रंथ योगिनीकौलमताचा प्रधान ग्रंथ आहे. हा ग्रंथ भैरव-देवी संवादात्मक आहे. या संस्कृत ग्रंथाचे २४ पटल असून त्यांत एकूण ५६७ श्लोक आहेत. ग्रंथांतील संस्कृत भाषा सदोष आहे. या ग्रंथांत सृष्टि, संहार, कुललक्षण, जीवलक्षण, अजरामरता, चक्र-विवरण, शक्तिपूजा, ध्यानयोगमुद्रा, परमवज्रीकरण, भैरवावतार, ज्ञानसिद्धि व क्रियासिद्धि, योगिनी-कौलमत, विविध कौल परंपरा इत्यादि विषयांचें विवरण आहे.

'**अकुलवीरतंत्रम्**' या ग्रंथाच्या थोड्या फरकानें दोन आवृत्ति आहेत. त्यांची श्लोक-संख्या अनुक्रमें ९१ व १४२ आहे. पहिल्या प्रतीच्या आरंभीं 'श्रीमच्छन्दपादकेभ्यो नमः' असें नमन असून प्रारंभींच्या दोन श्लोकांत मीननाथाला नमन आहे. सुरवातीच्या भागांतच 'अनुग्रहाय लोकानां सिद्ध-नाथेन भाषितम्' असा उल्लेख आहे. दुसऱ्या आवृत्तींत मात्र या ओळीच्या ऐवजीं 'अनुग्रहार्थं लोकानां मीननाथेन भाषितम्' अशी ओळ असून ग्रंथ-समाप्तीच्या श्लोकांत 'सिद्धनाथप्रसादतः' असा उल्लेख आहे. यावरून ग्रंथ-कर्त्याच्या निश्चितीविषयीं मन शंकित होतें.

'**कुलानंदतंत्रम्**' हा ६० श्लोकांचा संस्कृत ग्रंथहि भैरव-देवीसंवादा-त्मकच आहे. यांत भैरवानें देवीच्या जिज्ञासेवरून पाशस्तोभ, भेद, धूनन, कम्पन, खेचर, समरस, वलीपलित-नाशन आदि यौगिक प्रक्रियांचें स्थूल वर्णन केलें आहे.

कौलमतविभागांतील शेवटचा ग्रंथ '**ज्ञानकारिका**' हा ३ पटलांचा व ८७ श्लोकांचा आहे. प्रथम पटल 'मोक्षाधिकारा'चा आहे. यांत योग्यानें सर्वेन्द्रियविनिर्मुक्त, सर्वद्वन्द्वविनिर्मुक्त व समचित्त असावें, असें सांगितलें आहे. दुसरा पटल 'धर्माधर्मविचारा'चा आहे. यांत स्वर्ग-नरक-दायी धर्म-अधर्म दोन्ही मनाला बंधक असून 'धर्माधर्मातीत' होणें हाच मुक्तीचा मार्ग आहे, असें सांगितलें आहे. तिसरा पटल 'चर्याधिकारा'चा आहे. यांत —

एकलिङ्गे श्मशाने वा नदीनां सङ्गमेषु च ॥
शून्यागारे गुहावासे वृक्षमूले तु चत्वरे ।
महोदधितटे चैव त्रिपथे वापि साधकः ॥
नग्नास्ते मुक्तकेशास्तु मदिरानन्दचेतसः ।
मालानिर्म्मोलिता योगी एकाकी भ्रमते सदा ॥ [२५]

असें योग्याच्या एकाकी भ्रमणाचें वर्णन आहे.

'योगविषय' हा केवळ ३३ श्लोकांचा संस्कृत ग्रंथ आहे. डॉ. कल्याणी मल्लिक यांच्या ' सिद्धसिद्धान्तपद्धति and Other Works of Nath Yogis ' या संकलनांत याचा समावेश झालेला आहे. या ग्रंथाचाहि वरील कौलमतविभागांतच समावेश करावयास हवा. कारण –

उमाशङ्करपुत्रोऽहं मीननाथो मुनीश्वरः ।
कथयामि परं तत्त्वं कुलाकुलविबोधकम् ॥ [२६]

असें ग्रंथकर्त्यानेंच सांगितलें आहे. ग्रंथाच्या समाप्ति-मुद्रेंत 'योगविषय' असें नांव नसून ' भक्तिसं ( ? ) ' असें अस्पष्ट नांव आहे. या ग्रंथाशीं 'भक्ती'चा काय संबंध, तें कळत नाहीं.

वर उल्लेखिलेल्या डॉ. मल्लिकच्या संकलनांतच ' मत्स्येन्द्रनाथ जी का पद ' या शीर्षकाखाली दोन रागबद्ध पदें दिलीं आहेत. या पदांचा समावेश डॉ. सिंगांनींहि आपल्या ग्रंथांत केला आहे. यांतील एका पदांत भक्तितत्त्वाचा रंग आहे, हें विशेष –

जलकूं चाहै माछली, घणकूं चाहै मोर ।
सेवक चाहै रामकूं, ज्यौं चितवत चन्द चकोर ॥ [२७]

या ओळींत सेवक आणि राम यांच्या संबंधासाठीं वापरलेले जल-मीन, घन-मोर आणि चन्द्र-चकोर हे दृष्टान्त भक्ति-साहित्यांत सर्वत्र आढळणारे आहेत.

---

२५. ज्ञानकारिका, ३. ४–६ ( कौलज्ञाननिर्णय, पृ. ११९ ).

२६. योगविषय, ७ ( सिद्धसिद्धान्तपद्धति and Other Works of Nath Yogis, पृ. ४५ ).

२७. सिद्धसिद्धान्तपद्धति and Other Works of Nath Yogis, पृ. ७६.

जब गोविन्द किरपा करी, म्हारौ मनवौ समझ्यौ आय । " हें ' गोविंद-किरपे 'चें महिमान 'मछंदरनाथ' गात आहे, ही गोष्ट भक्ति आणि नाथ साधना यांच्या संबंधांत विशेष चिंतनीय आहे.

'भक्तराजग्रंथ' या ज्ञानेश्वर-विरचित (?) छापील ग्रंथाच्यां शेवटीं मत्स्येंद्रनाथाचें एक हिंदी पद छापलेलें आहे. आश्चर्य असें कीं, या पदांत काया-योगाच्या शुष्क कसरतीचा स्पष्ट निषेध केला आहे आणि कबीराइतक्या तीव्र भाषेंत बाह्यावडंबराचा धुव्वा उडविला आहे. ' कहे मछंदर सुन रे गोरख ' अशी या पदाची मुद्रा आहे. कदाचित् मत्स्येंद्र-गोरक्षांच्या नांवावर खपविलेलें हें एक गोरखपंथीयांत प्रचलित असलेलें पदहि असेल :

सोही कच्चा बे कच्चा बे। नहीं गुरु का बच्चा ॥ ध्रु० ॥

दुनिया त्यजकर खाक लगाई, जाकर बैठा बनमों।
खेचरि मुद्रा बज्रासनपर ध्यान धरत है मनमों ॥ १ ॥

गुपत होकर परगट होवे, जावे मथुरा कासी।
प्रान निकाले सिद्ध भया है, सत्यलोक का वासी ॥ २ ॥

तीरथ कर कर ऊमर खोई जोग जुगतमों सारी।
धन कामिनिको नजर न लावे, जोग कमाया भारी ॥ ३ ॥

कुंडलिनी को खूप चढावे, ब्रह्मरंध्रमों जावे।
चलता हैं पानी के ऊपर, मुख बोले सो होवे ॥ ४ ॥

शास्तरमों कछु रही न बाकी, पूरा ग्यान कमाया।
बेदबिधिका मारग चलकर, तनका लकरा किया ॥ ५ ॥

कहे मछिंदर सुन रे गोरख, तीनों ऊपर जाना।
कृपा भई जब सद्गुरुजीकी आप आपकू चिन्हा ॥ ६ ॥ [२८]

मत्स्येंद्रनाथाचा 'मत्स्येंद्रसंहिता' नामक संस्कृत ग्रंथ असल्याचे उल्लेख आढळतात. श्री. श्रीपतिबुवा भिंगारकरांनीं आपल्या ज्ञानेश्वर-चरित्रावरील ग्रंथांत मत्स्येंद्रसंहितेंतून दोन श्लोक उद्धृत केले आहेत :

---

२८. भक्तराजग्रंथ, पृ. २२.

सृष्टेः पुरा सदेवासीदेकमेवाद्वितीयकम् ।
सत्यं ज्ञानमनन्तं यत् वेदेत्थं ब्रह्मलक्षणम् ॥

तस्मिन् ब्रह्मणि अतिगूढा चिच्छक्तिः स्यादतर्किता ।
वह्निशक्तिवच्च कार्यानुमेया श्रुतिराहताम् ॥ [२९]

या श्लोकांत औपानिषदिक परिभाषेनेंच अद्वैत-प्रतिपादन केलें आहे आणि ब्रह्माच्या ठायीं असलेल्या अतर्क्य आणि अतिगूढ अशा चिच्छक्तीमुळेंच सृष्टि निर्माण झाली आहे, असें सांगितलें आहे. हा ग्रंथ सध्यां उपलब्ध नाही. परंतु आदिनाथ भैरवाचा 'नाथलीलामृत' हा ग्रंथ आणि बाळाबोवांचें 'भक्ति-तत्त्वामृतरहस्य' यांत 'मत्स्येंद्रसंहिता' आधारास घेतल्याचे उल्लेख आढळतात, त्या अर्थी या ग्रंथाचा प्रसार दोन शतकांपूर्वींपर्यंत असावा, असें वाटतें.

आनंद परंपरेंतील कान्तानन्द नामक ग्रंथकारानें लिहिलेला 'मत्स्येंद्र-पुराण' नामक ग्रंथ यवतमाळच्या शारदाश्रमांत असल्याचें समजतें. या ग्रंथाचें स्वरूप नेमकें काय आहे तें माहीत नाही. त्याची एक त्रुटित प्रत मला पहावयास मिळाली आहे. या त्रुटित भागांत तत्त्वचर्चा असल्यामुळें या ग्रंथांत अन्यत्र मत्स्येंद्रविषयक ऐतिहासिक वा दंतकथात्मक माहिती समाविष्ट आहे कीं काय, तें नक्की सांगतां येत नाहीं. ( मीं पाहिलेल्या त्रुटित प्रतीचा परिचय चौथ्या प्रकरणांत पाहा. )

**कौलमत :** मत्स्येन्द्रनाथ कौलमतानुयायी बनले होते, याचा उल्लेख मागें आलाच आहे. कौलमताचें विवरण करणारें कौलज्ञाननिर्णय इत्यादि ग्रंथ मत्स्येंद्र-नाथावतारित समजले जातात. कौलमताच्या परंपरेंत मत्स्येंद्रनाथांच्या नांवा-वरील ग्रंथांशिवाय आणखीहि अनेक ग्रंथ झाले आहेत. सर्वसाधारण तंत्र-ग्रंथांतहि कौलमताची चर्चा आढळते. कौलमत ही शाक्ततंत्राचीच एक शाखा आहे. कुल म्हणजे शक्ति आणि अकुल म्हणजे शिव. कुल आणि अकुल ( अर्थात् शिव आणि शक्ति ) यांच्या समरसीकरणाचा जो मार्ग तो कौलमार्ग होय. 'सौभाग्यभास्कर' नामक ग्रंथांत कौलमताची व्याख्या करतांना भास्कररायानें म्हटलें आहे :

---

२९: श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान : डॉ. पेंडसे, पृ. ४०८.

कुलं शक्तिरिति प्रोक्तं अकुलं शिव उच्यते ।
कुलेऽकुलेस्य सम्बन्धः कौलमित्यभिधीयते ॥[३०]

शिवाला कोणतेंहि कुलगोत्र नसल्यामुळें त्यास अकुल ही संज्ञा यथार्थ आहे. शिवाची सिसृक्षा शक्ति म्हणजेच शक्ति. समस्त जगताच्या पसाऱ्याची ती प्रवर्तिका असल्यामुळें तिला कुल ( वंश ) ही संज्ञा मिळाली आहे. कौल-मतांतहि नाथ संप्रदायाप्रमाणें शिवशक्तींचें अभेदत्व मानलेलें आहे :

न शिवेन विना शक्तिर्न शक्तिरहितः शिवः ।
अन्योन्यं च प्रवर्तन्ते अग्निधूमौ यथा प्रिये ॥
न वृक्षरहिता छाया न छायारहितो द्रुमः ।[३१]

तत्त्वतः नाथयोगी आणि कौलसाधक यांच्या परमध्येयांत कांहींच अंतर नाहीं. शिवशक्ति-समरसीकरण हेंच दोघांचेंहि लक्ष्य असतें. नाथयोगी प्रथम-पासूनच अंतरंग उपासनेचा अवलंब करतो; तर कौलसाधक प्रथम बहिरंग उपासनेचा अवलंब करून नंतर क्रमशः कुंडलिनी-जागृतीकडे वळतो. नाथ-योगी सकल इंद्रिय-विषयांचा निग्रहपूर्वक त्याग करून यमनियमांच्या आचरणानें अष्टांगयोग साधून अखेर समाधिसुखाचा लाभ घेतो; परंतु कौलसाधक मद्यमांसादि कुलद्रव्यांचें सेवन करून तांत्रिक प्रक्रियांच्या द्वारां तें सुख मिळ-विण्याचा प्रयत्न करतो. कौलसाधकाचें म्हणणें असें कीं, योग्याच्या मार्गा-पक्षां आमचा मार्ग सुलभ आहे. खरें म्हणजे भोग आणि त्याग हे उत्तर-दक्षिण ध्रुवांसारखे परस्पर-विरुद्ध आहेत. परंतु कौलसाधकाच्या जीवनांत भोग ही त्यागाची पायवाट मानली जाते! कौलज्ञाननिर्णयांत तांत्रिकांच्या पंचमकारां-प्रमाणें ( मद्य, मत्स्य, मांस, मुद्रा आणि मैथुन ) पंचपवित्रांची चर्चा आहे. विष्ठा, धारामृत, शुक्र, रक्त आणि मज्जा हीं तीं पंचपवित्रें होत. गो-मांस, गो-घृत, गो-रक्त, गो-क्षीर, गो-दधि हे उत्तम भोज्य पदार्थ मानले आहेत. श्वान, मार्जार, उष्ट्र, हय, कूर्म, कच्छप, वराह, बक, कर्कट, शलाकी, शेरक, मृग, महीष, गंडक आणि सर्व प्रकारचे मत्स्य यांचा उत्तम भक्ष्यांत समावेश केला आहे. पैष्टी, माध्वी आणि गौडी या मादिरांना गौरविलें आहे. कौलसाधक हा भक्ष्याभक्ष्य, कार्याकार्य यांचा विधिनिषेध मानीत नाहीं.

---

३०. नाथ संप्रदाय, पृ. ६१.
३१. कौलज्ञाननिर्णय, ७. ८–९.

नाहं कश्चिन्न मे कश्चित् न बद्धो न च बन्धनम् ।
नाहं किञ्चित् करोमीति मुक्त इत्यभिधीयते ॥
गच्छंस्तिष्ठन्स्वपन्जाग्रद् भुज्यमाने च मैथुने ।
भवदारिद्र्यशोकैश्च विष्टामूत्रादिभक्षणे ॥
विचिकित्सां नैव कुर्वीत इन्द्रियार्थैः कदाचन ।
आचरेत् सर्ववर्णानि न च भक्ष्यं विचारयेत् ॥ [32]

कुलार्णवतंत्रांत मद्यपानापासून उत्पन्न होणाऱ्या सात उल्लासांची ( आनंद-श्रेणींची ) आणि मद्यपानाच्या ' आध्यात्मिक प्रभावा 'ची चर्चा केली आहे !

सुरादर्शनमात्रेण सर्वपापैः प्रमुच्यते ।
तद्गन्धघ्राणमात्रेण शतक्रतुफलं लभेत् ॥
तस्य सन्दर्शमात्रेण तीर्थकोटिफलं लभेत् ।
देवि तत् पानतः साक्षाल्लभेन्मुक्तिं चतुर्विधाम् ॥
यथा क्रतुषु विप्राणां सोमपानं विधीयते ।
मद्यपानं तथा कार्यं समग्राभोगमोक्षदम् ॥ [33]

जोंवर इंद्रियवैकल्य प्राप्त होत नाहीं आणि जोंवर विक्रियोन्मुखता येत नाहीं, तोंवर मद्यपान करायला हरकत नाहीं, असें कौलसाधकांचें मत असतें.

पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा यावत् पतति भूतले ।
उत्थाय च पुनः पीत्वा पुनर्जन्म न विद्यते ॥
आनन्दात् तृप्यते देवी, मूर्छनाद् भैरवः स्वयम् ।
वमनात् सर्वदेवाश्च तस्मात् त्रिविधमाचरेत् ॥ [34]

हें मदिरामाहात्म्य एवढ्यावरच थांबलेलें नाहीं. जिथें मद्यासवाचा गंध आहे, तिथें पशु पशुपति बनतो आणि जिथें या गंधाचा अभाव आहे, तिथें पशुपतीला पशुत्व प्राप्त होतें, असें कौलमतानें स्पष्ट उद्घोषिलें आहे. आणि म्हणूनच —

---

३२. अकुलवीरतंत्र ( A ), ६६–६८.

३३. कुलार्णवतंत्र, अ. ५.

३४. कुलार्णवतंत्र, अ. ७.

अनाचारः सदाचारस्त्वकार्यं कार्यमेव च ।
असत्यमपि सत्यं स्यात् कौलिकानां कुलेश्वरि ॥ [३५]

असा स्पष्ट संदेश कौलसाधकांना मिळालेला आहे ! या मद्यमांसाच्या मनसोक्त सेवनानेंहि कौलसाधकाची साधना पूर्ण होत नाहीं. पंच मकारांपैकीं मैथुन या अंतिम आणि सर्वश्रेष्ठ प्रकाराचें महिमान प्रत्यक्ष शिवमुखानें कुलार्णवतंत्रांत असें वर्णिलें आहे —

मद्कुम्भसहस्रैस्तु मांसभारशतैरपि ।
न तुष्यामि वरारोहे ! भगलिंगामृतं विना ॥
न चक्रांकं न पद्मांकं न वज्रांकं इदं जगत् ।
लिंगांकं च भगांकं च तस्माच्छक्तिशिवात्मकम् ॥ [३६]

कौलज्ञाननिर्णयाच्या चौदाव्या पटलांत रोमकूपादि कौल, वृषणोत्थकौल, वह्निकौल, कौलसद्भाव आणि पदोत्तिष्ठकौल असा कौलमतांतील उपशाखांचा उल्लेख आला आहे. याशिवाय महत्कौल, सिद्धामृतकौल आणि मत्स्योदरकौल अशा आणखी तीन शाखांचा उल्लेख सोळाव्या पटलांत आलेला आहे. मत्स्येंद्रनाथानें स्वीकारलेली साधना ही योगिनीकौलमताची होती. या मार्गांत योगिनींचें प्राबल्य फारच मोठ्या प्रमाणांत होतें. याच योगिनींच्या भ्रमजालांतून गोरक्षनाथानें आपल्या गुरूची मुक्तता केली. या घटनेनंतर मत्स्येंद्रनाथाच्या कौलमतानुयायी परिवाराचा समावेश गोरक्षप्रणीत मार्गांत झाला असणार. अर्थातच या गोरक्षप्रभावित कौलमार्गीयांच्या पूर्वमतांचे संस्कार गोरक्षनाथाच्या प्रभावळींतील साधकांच्या विचारांवरहि उमटले असणार. या संस्कारांच्या खुणा नाथ संप्रदायाच्या ग्रंथांत आढळून येतात. प्रत्यक्ष 'सिद्धसिद्धान्तपद्धतीं'त कुलाकुलाची तत्त्वचर्चा आलेली आहे. 'सिद्धसिद्धान्तपद्धती'च्या षष्ठोपदेशांत कौलमताचें उच्च तात्त्विक स्वरूप विशद करतांना म्हटलें आहे कीं —

कुलं सर्वात्मकं पिण्डमकुलं सर्वतोमुखम् ।
तयोरैक्यपदं शक्तिर्यस्तां वेद स शक्तिभाक् ॥
कौलं सर्वकलाग्रासः स कृतः सततं यया ।
तां शक्तिं यो विजानाति शक्तिज्ञानी स कथ्यते ॥

---

३५. कुलार्णवतंत्र, अ. ९.
३६. कुलार्णवतंत्र, अ. ८.

ज्ञात्वा कुलाकुलं तत्त्वं स क्रमेण क्रमेण तु ।
स्वप्रकाशमहाशक्त्या ततः शक्तिपदं लभेत् ॥ [३७]

सिद्धसिद्धान्तसंग्रह, गोरक्षसिद्धान्तसंग्रह आणि हठयोगप्रदीपिका या ग्रंथांतहि कौलमताचे आत्मीय उल्लेख आढळतात. [३८] हठयोगप्रदीपिकेंत –

गोमांसं भक्षयेन्नित्यं पिबेदमरवारुणीम् ।
कुलीनं तमहं मन्ये इतरे कुलघातकाः ॥
गोशब्देनोदिता जिह्वा तत्प्रवेशो हि तालुनि ।
गोमांसभक्षणं तत्तु महापातकनाशनम् ॥
जिह्वाप्रवेशसम्भूतवह्निनोत्पादितः खलु ।
चन्द्रात्स्रवति यः सारः सा स्यादमरवारुणी ॥ [३९]

अशा रीतीनें गोमांस आणि अमरवारुणी यांच्या सेवनाचें अध्यात्मीकरण केलें आहे.

डॉ. बागची यांनीं मत्स्येंद्रनाथाच्या कौलमताचें वज्रयानाशीं साम्य दाखवून मत्स्येंद्रनाथाला बौद्ध-तांत्रिक ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. [४०] मत्स्येंद्रनाथाचें कौलमत आणि वज्रयान यांत सहजसाधनेवर भर, बाह्याचार-विरोध, पीठचर्चा, वज्रीकरण-प्रयोग आणि पंचमकारांचें सेवन या बाबतीत साम्य असलें, तरी तत्कालीन तंत्रसाधनांत त्या प्रायः सर्वत्र आढळणाऱ्या बाबी आहेत. मत्स्येंद्रनाथाच्या कौलमत परंपरेंतील सर्वच ग्रंथांवरून मत्स्येंद्रनाथाचा कौलमार्ग हा बौद्धतंत्रान्तर्गत नसून, हिंदु शाक्त धर्माच्या कक्षेंतील होता, हें सहज दिसून येतें.

मत्स्येंद्रनाथाच्या नांवावरील कौलज्ञाननिर्णयादि ग्रंथांशिवाय श्रीकामाख्यागुह्यसिद्धि, अकुलागमतंत्र, कुलार्णवतंत्र, कौलोपनिषद्, कौलावलिनिर्णय इत्यादि आणखीहि अनेक कौलमताचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत.

---

३७. सिद्धसिद्धान्तपद्धति, ६. ४८–५०

३८. सिद्धसिद्धान्तसंग्रह, ४. ६–१४; गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. २०; हठयोगप्रदीपिका, ३. ४७–४९.

३९. हठयोगप्रदीपिका, ३. ४७–४९.

४०. कौलज्ञाननिर्णय, प्रस्तावना पृ. २४, ५५–५९.

वर कौलमताचें जें स्थूलवर्णन दिलें आहे, त्यावरून कौलमताविषयीं समाजाची प्रतिक्रिया कशी झाली असेल, याची कल्पना करतां येणें शक्य आहे. पुष्पदंताच्या 'जसहरचरिउ' या ग्रंथांत भैरवानंद नामक कुलमार्गीयाचें वर्णन आढळतें.[४१] त्या वर्णनावरून कौल साधकांची साधनापद्धति किती विकृत आणि बीभत्स होती, याची कल्पना येते. लीळाचरित्रांतहि एका पंचकौळाचार्याचें चित्रण आलें आहे.[४२] आपला एक शिष्य दुसऱ्या अवधूताला अनुसरला म्हणून त्या पंचकौळाचार्यानें त्या अवधूतावर विषप्रयोग केला. समर्थांनींहि आपल्या स्फुटरचनेंत कौलमताविषयीं प्रतिकूल मत नोंदविलें आहे. गिरिधरस्वामींच्या 'समर्थप्रतापां'त अशा एका प्रसंगाचें वर्णन आलें आहे कीं, प्रत्यक्ष समर्थांना एका कौळिकानें मंत्रप्रयोग करून गुहेंत नेलें आणि अकरा दिवसपर्यंत आपल्यामागें फिरविलें. पुढें समर्थ त्याच्या तावडींतून मुक्त झालें आणि त्या कौळिकाला शिवरायानें तोफेच्या तोंडीं दिलें.[४३] त्र्यंबकस्वामींच्या बालबोधांत आणि दिनकर-स्वामींच्या स्वानुभवदिनकरांत कौलमताच्या किळसवाण्या क्रियांचे उल्लेख अनेक वेळां आढळतात.[४४]

## गोरक्ष-कालीन साधना-विश्व :

वरील कौलमताच्या स्थूल वर्णनावरून गोरक्षकालीन साधना-विश्वाची कांहींशी कल्पना येईल. गोरक्ष-गुरु मत्स्येंद्रनाथ याची कौलसाधना आणि जालंधर-कृष्णपाद यांची कापालिक साधना यांहूनहि वज्रयानादि बौद्ध तांत्रिक साधनांतील वामाचाराचें स्वरूप अधिक तीव्र होतें. या गोरक्ष-कालीन साधनांतील आचाराची कल्पना आल्याशिवाय गोरक्षकार्याची महत्ता आपणांस पुरतेपणीं समजून घेतां येणार नाहीं.

**कापालिक साधना :** जालंधर आणि त्याचा शिष्य कृष्णपाद हे दोन नाथसिद्ध स्वतःला कापालिक म्हणवितात. त्यांचा आणि त्यांच्या नांवांवर असणाऱ्या संप्रदायशाखांचा गोरक्षप्रणीत नाथ संप्रदायांत समावेश होत असल्या-

---

४१. जसहरचरिउ, पृ. ६–१२ (हिंदी काव्यधारा, पृ. २१५–२२०).
४२. लीळाचरित्र, एकांक ली. १९.
४३. समर्थप्रताप, ३. ७८–८० (पृ. २५).
४४. बालबोध, पृ. ८७; स्वानुभवदिनकर, ५. २. ५८; ७. २. ४२; १५. ३. २५.

मुळें आपणांस कापालिक मताचा स्थूल इतिहास पाहणें आवश्यक आहे. जालंधर-कृष्णपाद हे शैव-कापालिक नसून बौद्ध-कापालिक होते. उत्तरकालीन संस्कृत साहित्यांत शैव कापालिकांचें वर्णन आढळतें; परंतु बौद्ध-कापालिकांचे विशेष उल्लेख नाहीत. भवभूतीच्या ‘ मालती-माधवां ’त सौदामिनी नामक बौद्ध भिक्षुणी श्रीपर्वतावर कापालिक साधना शिकण्यास गेल्याचा उल्लेख आहे. ‘ मालती-माधवां ’तील कपालकुंडला आणि अघोरघंट यांच्या चित्रणांतून कापालिकांचें दर्शन घडतें.[४५] राजशेखराच्या ‘कर्पूरमंजरी’मध्यें भैरवानंद नामक एका कापालिकाची चर्चा आहे. ‘प्रबोधचंद्रोदयां’त सोमसिद्धान्त नामक कापालिकाचें चित्रण आहे. त्यानें मानवी अस्थींची माला धारण केली होती; त्याचा स्मशानांत निवास होता; व तो नरकपालांत भोजन करीत असे. ‘प्रबोधचंद्रोदया’वरून असें दिसतें कीं, कापालिक मानवी मांसाहुति देत, नरकपालांतून सुरापान करीत; ताज्या मानव-रक्तानें भैरवाची पूजा करीत आणि कपालिनींबरोबर स्वच्छन्दाचार करीत. सुरेला तर ते ‘पशुपाशसमुच्छेदकारण’ समजत असत. ‘कर्पूरमंजरीं’तील भैरवानंदाच्या मतें मद्यपान आणि स्त्री-भोग यांतून सहज मोक्षप्राप्ति होते !

‘शांकरदिग्विजयां’त, उज्जयिनी येथें शंकराचार्य व कापालिक यांचा संबंध आल्याचें वर्णन आलें आहे. ते स्मशानांत राहत, सर्वांगाला भस्म फासीत, हातांत नरकपाल धारण करीत; ते कपालिन् वा भैरवाची उपासना करीत; नरकपालांतून सुरापान करीत. नरहत्या त्यांना मुळीच निषेध्य नसे. ‘मालती-माधवा’नुसार श्रीशैल हें कापालिकांचें केंद्रपीठ होतें. स्मशानवासी देवता कराला-चामुंडा हिच्यापुढें नरबलि देण्यासाठीं कपालकुंडला व अघोरघंट यांनीं मालतीला पळवून आणल्याचें भवभूतीच्या ‘मालती-माधवां’तील वर्णन सर्व-परिचित आहे.

यावरून स्त्रीसंग, मद्यपान, नरहत्या आणि रक्त-मांस-अस्थि-स्मशान यांच्या साहचर्यानें येणारी सर्व भीषणता हे कापालिकांचे विशेष होत, असें दिसतें. भैरव-चामुण्डा हीं त्यांचीं रुद्रभीषण उपास्यें होत.

जालंधर-कृष्णपाद हे वज्रयानी सिद्ध म्हणून प्रसिद्ध आहेत. या गुरु-शिष्यांची जी ग्रंथ-रचना आज उपलब्ध आहे, तीहि वज्रयानी माध्यमांतूनच.

---

४५. मालतीमाधव , अंक ५ वा.

" अरे डोम्बी तोरे साथ करब न संग। निघृण काण्ह कपाल-जोगि नंग ॥ "
" काण्ह कपाली जोगी पइठो आचारे। देह-नगरी विहरै एकाकारे ॥ "
" मातु मारि काण्ह भइल कपाली। "

असे कान्हपाच्या 'कपालि'त्वाचे उल्लेख 'चर्यापदांत' स्पष्ट आहेत. या कान्हपाचा अंत दक्षिणेंतील 'बहुडी' नामक योगिनीशीं रतिस्पर्धा करीत असतां झाल्याचें वर्णन 'लीळाचरित्रा'च्या उत्तरार्धांत विस्तारपूर्वक आलें आहे.[४६] जालंधर-कान्हपा आणि त्यांचे अनुयायी गोरक्ष-मार्गांत प्रवेशल्यामुळें उत्तरकालीन नाथपंथीय साहित्यांत " कापालिकमपि मतं नाथेनैव प्रकटीकृतम्। " अशी भावना आढळते.[४७]

वज्रयान (बौद्ध तांत्रिक परंपरा) : आज तांत्रिक बौद्ध परंपरेचें स्वरूप समजून घेण्यास अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. साधनमाला, प्रज्ञोपाय-विनिश्चयसिद्धि, ज्ञानसिद्धि आदि अनेक शास्त्रीय ग्रंथ आणि वज्रयानी सिद्धांच्या चर्यागीति व दोहासंग्रह यांच्या निरीक्षणांतून वज्रयानाचें स्वरूप चांगलें प्रतीत होतें. आजवर म. म. हरप्रसादशास्त्री, डॉ. प्रबोधचंद्र बागची, डॉ. बिनयतोष भट्टाचार्य यांनीं अनेक बौद्ध तांत्रिक ग्रंथ संपादित केले आहेत आणि त्यांच्या प्रस्तावनांतून व स्वतंत्र ग्रंथांतून वज्रयानाच्या दार्शनिक बाजूचा व साधना-पद्धतीचा ऊहापोह केला आहे.

भगवान् बुद्धानें प्रवर्तिलेला धर्म अनेकं परिवर्तनांतून वज्रयानाच्या चमत्कारिक तत्त्वज्ञानांत आणि चमत्कारिक साधना-पद्धतींत परिणत झाला. बौद्ध धर्माच्या ऱ्हासाचीं प्रामुख्यानें तीन कारणें आहेत : 'निर्वाण' कल्पनेंत 'महा-सुखा'च्या कल्पनेचा उद्भव, अत्यंत कडक आणि अनैसर्गिक नियमांनीं बौद्ध संघांतील घटकांना जखडण्याचा प्रकार आणि सर्वस्वत्यागाची आवश्यकता प्रतिपादणारें 'करुणा'तत्त्व. यांतूनच प्रतिक्रियात्मक विकृति निर्माण झाली. वज्रयानाचा उदय निश्चित केव्हां झाला, हें सांगतां येणार नाहीं. परंतु वज्रयानाच्या उदयाचीं बीजें मूल बौद्ध धर्मांतच मुद्रा, मंत्र, मंडल, धारणी,

४६. लीळाचरित्र, उत्तरार्ध ली. ४२२.
४७. गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. १८. (कापालिकमपि मतं नाथैनैव प्रकटीकृतम्।)

योग आणि समाधि या स्वरूपांत अस्तित्वांत होतीं, असें वाटतें. बुद्धाच्या समन्वयवादी धर्मांत तत्कालीन विकृतीहि बौद्ध धर्माच्या बुरख्याखालीं गुप्तपणें वावरत असाव्यात. वज्रयानाच्या विकास-क्रमांतील यानंतरची पायरी आपणांस 'आर्य-मंजुश्री-मूलकल्प' या ग्रंथांत पहावयास मिळते. हा ग्रंथ इ. स.च्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकांत लिहिला गेला असून त्यांत मुद्रा, मंत्र, मंडल आणि विविध देवता यांचा भरणा आहे. वज्रयानाच्या विकासाला साहाय्य करणारा यानंतरचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'गुह्य-समाज' हा होय ! यांतच 'वज्रयान' असें नामकरण प्रथमच स्पष्टपणें आलें आहे. वज्रयानाच्या परिणत देवता-वादाची उभारणी ज्या पांच ध्यानी बुद्धांच्या कल्पनेवर झाली आहे, ती कल्पना या ग्रंथांत आहे. बौद्ध धर्मांत या तंत्रवाद्यांचा मतप्रचार आणि तांत्रिक प्रयोग प्रथम गुप्त रीतीनेंच चालले असणार. पुढें वैयक्तिक दीक्षेंतून अखंड गुरुपरंपरेच्या रूपानें ही तांत्रिक साधना वाढीस लागली. सातव्या शतकापासून दहाव्या-अकराव्या शतकापर्यंत झालेले चौऱ्यायशी वज्रयानी सिद्ध हे याच गुरुपरंपरेंतले.

'ज्ञानसिद्धि' या इंद्रभूतीच्या ग्रंथांतील खालील उताऱ्यावरून वज्रयानाच्या साधनापद्धतीची स्पष्ट कल्पना येईल –

> शुष्कलोहितमांसं च बोधिचित्तविमिश्रितम ।
> महोदकसमायुक्तं भक्षयेत् तत्त्ववित् सदा ॥
> नरश्च हयगोदीपं करिणां गर्दभस्य च ।
> भक्षयेत् तत्त्वसिद्ध्यर्थं सर्वसंकल्पवर्जितम् ॥
> घातयेत् विभवोत्पत्तिं परवित्तानि हारयेत् ।
> कामयेत् परदारान्वै मृषावादमुदीरयेत् ॥
> कर्मणा येन वै सत्त्वाः कल्पकोटिशतान्यपि ।
> पच्यन्ते नरके घोरे तेन योगी विमुच्यते ॥[४८]

थोडक्यांत सांगावयाचें झालें तर तंत्र-साधकाला कोणतेंहि खाद्य वा पेय वर्ज्य नाहीं आणि उपभोगासाठीं कोणतीहि स्त्री त्याज्य नाहीं. तो सर्व प्रकारच्या दुष्कर्मांत आणि पापाचरणांत निमग्न झाला, त्यानें प्राणिहत्या केली, परद्रव्यापहरण केलें, असत्य भाषण केलें आणि परस्त्री-समागम केला, तरीहि

---

४८. ज्ञानसिद्धि, १. १२–१५.

त्यांच्या साधनेला कसलीहि बाधा येणार नाहीं! ज्या कर्मांनीं सामान्य प्राण्यांना कोट्यवधि वर्षे नरकवास लाभेल, त्याच कर्मांनीं योग्याला मुक्ति लाभते. विश्वोद्धारासाठीं सर्वस्वार्पण केलेल्या योग्यानें कोणतेंहि कर्म केलें तरी त्याला पाप लागणार नाहीं!

वज्रयान व मंत्रयान यांच्या प्रचारांतून श्रद्धावंतांची संख्या वाढत गेली आणि या श्रद्धावंतांच्या औदार्याचा फायदा घेऊन साधकांनी सर्व प्रकारच्या विलासाला आरंभ केला. वज्रयानांत योगाला स्थान असलें तरी त्यांच्या स्त्री-प्रधान महामुद्रादि साधनांचें स्वरूप अनेक विकृतींना जन्म देत राहिलें. वज्रयानी साधकानें एखाद्या हीन जातींतील सुंदर स्त्रीची निवड करून तिच्याबरोबर राहावयाचें आणि गुरूपदिष्ट मार्गानें तिच्याशीं समागम करून परमसिद्धि प्राप्त करावयाची. या साधनेंतहि कांहीं रहस्यमय सामर्थ्यें आहेत, असें तज्ज्ञांचें मत आहे. परंतु या साधनापद्धतीच्या बाह्य स्वरूपाकडे पाहून आकृष्ट झालेले सर्वसामान्य कामासक्त साधक परमार्थाच्या नांवाखालीं व्यभिचाराचा कळस कसा गांठीत असतील, याची सहज कल्पना येते. गुह्य-समाजतंत्रांत असें म्हटलें आहे कीं –

दुष्करैर्नियमैस्तीव्रैः सेव्यमानो न सिध्यति ।
सर्वकामोपभोगैस्तु सेवयश्चाशु सिध्यति ॥

वज्रयान-मतें स्त्रीन्द्रिय पद्मस्वरूप असून पुंसेन्द्रिय वज्र-प्रतीक आहे. साधनेसाठीं आवश्यक स्त्री चंडाला वा डोम्बिका असावी. ती जितकी हीन-कुलीन असेल, तितकी सफलता अधिक –

चाण्डालकुलसम्भूतां डोम्बिकां वा विशेषतः ।
जुगुप्सितकुलोत्पन्नां सेवयन् सिद्धिमाप्नुयात् ॥

त्यांच्या मतें ध्यानाच्या एकाग्रतेसाठीं मद्यपान, शरीरपुष्टतेसाठीं मांस-भक्षण आणि बिंदुरक्षणासाठीं स्त्री-सेवन अत्यंत आवश्यक आहे!

प्रारंभिक वज्रयानी सिद्धांनीं हठयोगांतील नाड्यांना डोमिनी, रजकी, चंडाली आदि नांवें कल्पिलेलीं दिसतात. पुढें या पारिभाषिक नांवांतूनच अनर्थाचें बीज फोफावलें असणार. अमरवारुणी, गोमांस, डोमिनी, रजकी, चंडाली इत्यादि पारिभाषिक शब्दांचे अभिधामूलक अर्थ रूढ झाले आणि घोर

अनाचाराची बेफाम वाढ होऊन साधनेला तामस रूप प्राप्त झालें. वज्रयानी-साधकांनीं उल्हासानें वाढविलेला हा विषवृक्ष लवकरच हिंदु साधनांतहि प्रविष्ट झाला आणि वज्रयानी, शाक्त, कापालिक आदि तांत्रिक साधनांत अनाचाराची जणुं चढाओढ लागून राहिली. नाथ संप्रदायाला आपलें विषयविध्वंसनाचें आंदोलन उभें करावें लागलें, तें प्रामुख्यानें या पार्श्वभूमीवर.

या कामोपभोगाचें समर्थन करतांना अनंगवज्रानें असें कारण दिलें आहे कीं, कामोपभोग वर्ज्य केल्यानें चित्तक्षोभ होतो आणि सर्व साधना विफल ठरते. वासनांचें दमन केल्यानें त्या अंतस्तलांत सुप्त राहतात आणि संधि सांपडतांच भडकतात. तेव्हां उचित मार्ग हा कीं, सर्व कामनांचा उपभोग घ्यावा आणि चित्तक्षोभ होऊं न देतां सिद्धि प्राप्त करावी.

बौद्ध धर्माला तांत्रिक स्वरूप प्राप्त होण्याचें आणखी एक कारण दिलें जातें : भारताच्या उत्तर भागांत पुरातनकाळापासून यक्षपूजा प्रचलित होती. बुद्धपूर्वयुगांत यक्षांचें महत्त्वपूर्ण स्थान होतें. हळूहळू कांहीं यक्षदेवता बौद्ध संप्रदायांत प्रविष्ट होऊन मान्यता पावल्या. 'उपासकदशासूत्रां'त मणिभद्र चैत्याची चर्चा आहे. 'संयुक्तनिकायां'त मणिभद्र यक्षाचा उल्लेख आहे. मणिभद्र-हा बुद्धाचा शिष्य, असें मानलें जातें. एक आणखी यक्ष बुद्धाचा शिष्य म्हणून सांगितला जातो, तो वज्रपाणि होय. हा वज्रपाणि बोधिसत्त्वाचें महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करतो. तोच 'बोधिचर्यावतारटीकें'तील वज्री अर्थात् वज्रपाणि बोधिसत्त्व होय. हाच उत्तरकालीन बौद्ध धर्मांत महान् उपास्य बनला. 'अष्टसाहस्रिकाप्रज्ञा-पारमिता'च्या सतराव्या अध्यायांत यालाच 'महायक्ष' असें म्हटलें आहे. पुरातन यक्ष-संप्रदायाचें रूप आपणांस निश्चित माहीत नसलें तरी, यक्षलोक विलासी होते आणि अप्सरा व कामदेव त्यांच्या देवता होत्या, हें निश्चित. सुरापानहि त्यांच्यांत सर्रास रूढ होतें. बौद्ध धर्मांतील या यक्ष-समावेशामुळेंच स्त्री-संग आणि मदिरापान यांनीं युक्त अशा तांत्रिक रहस्यमय साधनेचें प्रचलन झालें असावें, असें कांहींचें मत आहे.[४९] 'ललितविस्तरां'त यक्षकुल हें वज्रपाणीचें उत्पत्तिस्थान म्हणून उल्लेखिलें आहे.

**योग-परंपरा :** योग-परंपरेचा उद्भव वेदकालाशी जाऊन भिडतो. सांख्यमत व योगमत यांचा अभेद प्रथमपासूनच मानण्यांत येतो. सांख्य हें

४९. नाथ संप्रदाय, पृ. ८१–८२.

तत्त्वज्ञानाचें नांव व योग हें त्याच्या प्रक्रियेचें नांव. उपनिषदांत योगविवरण प्रचुर प्रमाणांत आहे. डॉ. सिंग यांच्यासारखे विद्वान् गोरक्षनाथाच्या विचारांचा औपनिषदिक योगाशीं संबंध जोडतात. उत्तरकालीन उपनिषदें तर गोरक्षप्रणीत योगमार्गाशीं जवळून संबद्ध आहेत. किंबहुना कांहीं योगउपनिषदें तर मध्यकालीन योग-परंपरांच्या प्रकर्षकालांतच लिहिलीं गेलीं असावींत.

उपनिषदांनंतर योगदर्शनांत गीतेनें फारच मोठें पाऊल टाकलें. पुढें योगदर्शनाचें वैभव वाढीस लागलें आणि कालिदासासारख्या विदग्ध कवींच्या ललितकृतींतूनहि योगाचें महिमान उमटूं लागलें. इसवी सनाच्या आरंभाच्या सुमारास महर्षि पतंजलीनें योगसूत्रांची रचना केली. पूर्वप्रचलित योगाविषयक ज्ञानाचें आणि अनुभवांचें व्यवस्थापन पतंजलीच्या योगसूत्रांत आढळतें. पातंजलयोगदर्शन अत्यंत सूक्ष्म आणि जटिल बौद्धिक स्वरूपाचें शास्त्र आहे. समाजांतील उच्च श्रेणींतील लोकांतच त्याचें प्रचलन होतें. साधारण समाजांत प्रचलित असलेलें प्रक्रियाप्रधान योगमत मध्यकालांत देशी भाषांच्या माध्यमांतून व्यक्त होऊं लागलें. अर्थात् या काळांत संस्कृतांतहि योगग्रंथांचें लेखन झालें; परंतु हे संस्कृत ग्रंथहि बहुंशीं प्रक्रियाप्रधानच आहेत.

उत्तरकालीन उपनिषदें तर मध्यकालीन प्रक्रियाप्रधान योगसाधनेशीं संपूर्ण संबद्ध आहेत. त्यांत आसन-बंध-मुद्रांचा खूप खल केला आहे. 'गोरक्ष-सिद्धान्तसंग्रहां'त या योग-उपनिषदांतील अनेक वचनें उद्धृत आहेत. उत्तर-कालीन उपनिषदांत निरनिराळीं आसनें वर्णिलीं आहेत. त्रिशिखी ब्राह्मणोप-निषदांत सर्वांत जास्त म्हणजे सोळा आसनांचें वर्णन आलें आहे. स्वस्तिक, गोमुख, वीरासन, सिंहासन, योगासन, पद्मासन, बद्धपद्मासन, कुक्कुटासन, उत्तानकूर्मक, धनुरासन, भद्रासन, मुक्तासन, मयूरासन, मत्स्यासन, पश्चिमो-त्तानासन व वज्रासन या आसनांनीं शरीरांतील सर्व दोष नाहींसे होऊन तें निरोगी व ईश्वरध्यानास योग्य होतें. मूलाधारचक्रांत प्रसुप्त असलेली कुंडलिनी शक्ति जागृत करण्याच्या कामीं बंध व मुद्रांचा फार उपयोग होतो. मूल, उड्डियान व जालंधर अशा तीन बंधांचें वर्णन या उत्तरकालीन उपनिषदांतून आहे. मुद्रा तीन प्रकारच्या वर्णिल्या आहेत. खेचरी मुद्रेंतील आंशिक चमत्का-रिकपणा वज्रोली, अमरोली व सहजोली या तीन प्रक्रियांत बीभत्स स्वरूप पावला आहे.

मध्यकालांत हळूहळू योगाच्या मार्गांत नैतिक बाजूकडेहि लक्ष दिलें जाऊं लागलें. नाथप्रभावानें योगाचें पुनश्च व्यवस्थापन व शुद्धीकरण झालें व 'कथनी' ( नैतिक अंग ) व 'करणी' ( शारीरिक प्रक्रिया ) अशीं दोन अंगें निर्माण झालीं. 'कथनी'च्या विकासक्रमांत भक्तीचें बीज पडून पुढें कबीरोत्तर निर्गुण-भक्तीचा वृक्ष बहरला.

**जैन सिद्ध :** जैन साधना आणि नाथ संप्रदाय यांचा प्रथमतः संबंध जाणवतो तो 'नाथ'-पदान्त नामांमुळें! जैन तीर्थंकरांचीं नांवें आदिनाथ, अजितनाथ, संभवनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ अशीं नाथ-पदान्त आहेत. नाथ संप्रदायाच्या प्रमुख बारा शाखांपैकीं कपिलानी शाखेच्या अंतर्गत नेमिनाथ आणि पारसनाथ अशीं दोन उपशाखांचीं नांवें आहेत. या उपशाखा प्रायः नेमिनाथ आणि पार्श्वनाथ या जैन तीर्थंकरांना मानणाऱ्या वर्गांतून निर्माण झाल्या असाव्या. ज्या भूमींत आणि ज्या कालांत नाथ संप्रदायाचा उदय झाला, त्या भूमींत त्या काळीं जैन साधनेचें जनमनावर प्रभुत्व होतें. शिवाय वेदविरोधिता, प्रखर विचार-प्रणाली, योगप्राधान्य आणि बाह्य कर्मकांडाचा निषेध, तसेंच गुरूचें माहिमान या बाबतींत जैन सिद्धांचा वर्ग गोरक्षनाथाला जवळचा वाटला असला पाहिजे. मध्ययुगांत मुनि रामसिंह, मुनि देवसेन, जोइंदु, इत्यादि जैन सिद्ध आपल्या क्रांतिकारक विचारांची पेरणी करीत होते. या जैन सिद्धांच्या विचारांचा आपण जवळून परिचय करून घेतला, तर गोरक्ष-प्रणीत नाथ संप्रदायाशीं जैन साधनेचा संबंध कसा आला असेल, याची स्पष्ट कल्पना येईल.[५०]

**देवसेन** ( इ. स. ९३० ) हा १० व्या शतकांतील जैन सिद्ध मालव प्रदेशाचा रहिवासी होता. यानें 'सावयधम्मदोहा', 'भावसंग्रह', 'दर्शन-सार' या तीन ग्रंथांची रचना केली आहे. 'सावयधम्म' म्हणजे 'श्रावक-धर्म'. यांतील एका दोह्यांत देवसेन म्हणतो : "या धर्माचें जो आचरण करील तो ब्राह्मण असो कीं शूद्र असो, त्याला श्रावक म्हणावें."

**मुनि रामसिंह** ( इ. स. १००० ) हा जैन सिद्ध राजपुतान्याचा रहि-वासी असावा. हा एक स्वतंत्र प्रकृतीचा क्रांतिकारक तत्त्वचिंतक होता. याचा

५०. अपभ्रंशसाहित्य, पृ.

'पाहुडदोहा' हा ग्रंथ मध्ययुगीन विचारविश्वांत महत्त्वपूर्ण आहे. इंद्रियसंयमन, निरंजन-साधना, बाह्यावडंबरनिषेध, गुरु-महिमा आणि विकृत साधनांचें खंडन या बाबतींत हा गोरक्षनाथाचा विचार-बंधु शोभेल.

देहदेवले जो बसइ, शक्तिसहितो देव।
को तहँ जोगी! शक्ति-शिव, शीघ्र गवेसहु भेद॥

रामसिंह 'देह-देऊळ' आणि 'शक्तिसहित शिव' यांचें रहस्य जोग्याला संबोधून सांगत आहे, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

" शिव विनु शक्ति न व्यापरइ, शिव पुनि शक्ति-विहीन।"

हा सिद्धान्त सांगणारा रामसिंह, जैन सिद्ध न वाटतां नाथ सिद्धच वाटतो.

आगेहिं, पाछेहिं, दसदिसिहिं, जहँ जोवउँ तहँ सोइ।
सो मम काटी भ्रांतडी, अवश न पूछिय कोई॥

भ्रांतिनाश करणारें हें सर्वव्यापी गुरु-स्वरूप समन्वयवादी गोरक्षाला निःसंशय विलोभनीय वाटलें असेल! मंत्र-तंत्र, वादविवाद आणि भोगासक्ति यांचा रामसिंहानें प्रखर निषेध केला आहे. रामसिंहाची श्रुतीवर श्रद्धा नाहीं. जरामरणाचा क्षय करणारा अद्वैतानुभव हेंच त्याचें परमध्येय आहे. पूजाविधि, स्पर्शास्पर्शाची उपाधि, तीर्थयात्रा हें सर्व रामसिंहाला निरर्थक वाटतें. तो म्हणतो :

" हे मूर्ख! तूं मंदिरांत देवदर्शनाला जातोस आणि तेथील पाषाणाची पूजा बांधतोस, परंतु जिथें शिव सदैव विराजमान आहे, त्या देह-देवळांत तूं कधींहि डोकावत नाहींस."

जोइंदु (योगीन्दु) हा जैन सिद्ध (इ. स. १०००) राजस्थानचा निवासी असावा. 'परमात्मप्रकाश' आणि 'योगसार' हे त्याचे दोन दोहासंग्रह आहेत. बाह्याचाराचा विरोध, चित्तशुद्धीवर जोर, शरीरालाच परमात्म्याचें निवासस्थान मानणें आणि सामरस्यभावाचा आनंद लुटणें हीं जोइंदूच्या वाणीचीं वैशिष्टयें आहेत. तो म्हणतो, " देवता देवालयांत नाहींत, शिळेंत नाहींत, चंदनादि पूजासाहित्यांत नाहींत — तो अक्षय निरंजन, ज्ञानमय शिव शुद्ध चित्तांत निवास करतो. याचसाठीं विविध यौगिक क्रियांनीं चित्तशुद्धि करणें आवश्यक आहे." जोइंदूच्या कल्पनेंतील परमात्मा वैदिक परमात्म्याहून निराळा नाहीं. अलख-निरंजनाचें जोइंदूनें उभारलेलें चित्र मनन करण्यासारखें आहे.

देह-देवले जो वसै, देव अनादि अनंत ।

हा सिद्धान्त जोइंदूनें वारंवार उद्घोषिला आहे. त्यानें आपले सर्व विचार जोग्याला उद्देशून विवरिले आहेत, हें विशेष. ग्रंथ-पांडित्य, तीर्थ-भ्रमण, पूजा-वडंबर इत्यादि गोष्टींची विफलता जोइंदूनें स्पष्ट शब्दांत मांडली आहे आणि 'ज्ञानविहीना जीवडा, चिर संसार भ्रमंति।' असा इशारा दिला आहे. जोइंदु त्या निर्मल, निष्कल, शुद्ध तत्त्वाला जिन, विष्णु, बुद्ध, शिव असें कोणतेंहि नांव द्यायला तयार आहे; फक्त "देह-मध्यही सो वसे, तासु नहीं है भेद।" ही जाणीव ठेवली म्हणजे झालें.

जैनमत आणि तंत्रसाधना यांच्या संबंधावर विशेष प्रकाश टाकण्याइतकी सामग्री उपलब्ध नसली, तरी हेमचंद्राच्या 'योगशास्त्र' आदि ग्रंथाधारें असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, हिंदु, बौद्ध यांच्याप्रमाणेंच जैन-मतांतहि तंत्राचा प्रवेश-प्रचार झाला असावा.

वरील जैन सिद्धांच्या वचनांतून योगी व योग यांवर भर आहेच आहे. 'कुमारपालचरिता'सारख्या ग्रंथांतूनहि योग-परिभाषेचा वापर आहे.

बंगालच्या कांहीं भागांत असलेली 'शराक' नांवाची योगी जमात जैन 'श्रावक'-वर्गाच्या योग-मार्गांतील समावेशामुळें बनलेली असावी, असा कांहीं विद्वानांचा कयास आहे.[५१]

## गोरक्षनाथाचा काल-निर्णय :

ज्याचें महिमान भारतीय लोकमानसांत रुजलें आहे आणि भारतीय साधनेच्या इतिहासांत युग-कार म्हणून ज्याचें महत्त्व आहे, त्या गुरु गोरक्ष-नाथाची जीवन-गाथा काळाच्या अंधारांत लुप्त झाली आहे. काळाच्याहि मस्तकावर पाय देऊन त्याची गौरवगाथा मात्र गेलीं आठशें वर्षें भारताच्या कानाकोपऱ्यांत गाजते आहे. गोरक्षनाथाचा कालनिर्णय करण्याचा प्रयत्न आजवर अनेक संशोधकांनीं केला आहे. या संशोधकांचीं मतें गोरक्षनाथाला आठव्या शतकापासून चौदाव्या शतकापर्यंत मागें-पुढें खेचताहेत. त्यांपैकीं कांहीं प्रमुख मतें पुढीलप्रमाणें —

---

५१. नाथ संप्रदाय, पृ. १५५.

डॉ. शहिदुल्ला : आठवें शतक.
डॉ. मोहनसिंग : आठवें-नववें शतक.
डॉ. बागची : नववें-दहावें शतक.
पं. सांकृत्यायन : नववें शतक.
मं. म. हरप्रसादशास्त्री : नववें शतक.
डॉ. द्विवेदी : दहावें-अकरावें शतक.
डॉ. बडथ्वाल : अकरावें शतक.
डॉ. फर्कुहर : बारावें शतक.
प्रो. ब्रिग्ज : बारावें शतक.
श्री. रामचंद्र शुक्ल : अकरावें तें तेरावें शतक.

वरील मतांशिवाय कांहींनीं गोरक्ष-कबीरसंवादात्मक उत्तरकालीन ग्रंथांच्या आधारें गोरक्षाला कबीर-समकालीन मानलें आहे ! अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या डॉ. मालिक यांच्या ग्रंथांत अकराव्या शतकावर जोर दिलेला आहे. डॉ. गोविंद त्रिगुणायत यांनीं आपल्या कबीरविषयक प्रबंधांत गोरक्षाचा काळ बारावें शतक मानला आहे. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनीं आपल्या बंगाली भाषेवरील भाषाशास्त्रीय प्रबंधांत बारावें शतकच गोरक्ष-काल मानला आहे. यांतील प्रमुख मतांची छाननी आपण करूं.

डॉ. सिंग यांनीं आपल्या ‘ Gorakhnath and The Medieval Hindu Mysticism ’ या ग्रंथांत गोरक्षाच्या कालाचा बराच खल केला आहे. त्यांनीं कालनिर्णयासाठीं पुढील प्रमाणें मांडली आहेत—

( १ ) चर्पट आणि गोरक्ष हे समकालीन होते. चंबळा राज्याचा राजा साहिल्लवर्मा हा चर्पटीचा शिष्य होता. साहिल्लवर्माचा काल ९२० इसवी असा आहे. चर्पट-गोरक्ष यांच्या समकालीनत्वाचें अनुमान त्यांनीं ‘कंथडबोध’ या गोरक्षोत्तर ग्रंथावरून केलें आहे.

—हें प्रमाण अगदींच संदिग्ध आहे. नाथ संप्रदायांत अनेक पूर्ववर्ती साधना अंतर्भूत झाल्या आणि त्या साधनांतील प्रमुख पुरुषांची, अनेकदां ते पूर्वकालीन असूनहि, गोरक्षचरित्राशीं गल्लत करण्यांत येऊं लागली. एवढेंच काय, पण उत्तरकालीन ग्रंथांतून अशा पूर्ववर्ती पुरुषांचें गुरुत्वहि गोरक्षाला बहाल करून टाकलें आहे. शिवाय एकाच नांवाचे अनेक पुरुषहि आढळतात.

सत्यामलनाथाच्या 'नवरत्नमालें'त ज्ञानेश्वरांच्या नऊ शिष्यांत एका चर्पटीचें नांव आहे.

( २ ) सरस्वतीतीरावरील कंथडनामक शैवयोग्याचा मूलराज चालुक्याशीं संबंध आला होता. मूलराज चालुक्याचा काळ ९४१–९६ असा आहे.

— हा शैवयोगी कंथड नाथसांप्रदायिकच असला पाहिजे, हा डॉ. सिंगांचा आग्रह निराधार आहे. त्यामुळें या प्रमाणांत विशेष अर्थ उरत नाहीं.

( ३ ) लुइपा म्हणजेच मत्स्येंद्रनाथ. लुइपाचा काळ तिबेटी परंपरेप्रमाणें ९८० असा आहे. आणि गोरक्षनाथ हा मत्स्येंद्रनाथाचा शिष्य.

— नाथ संप्रदायाचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार करतांना तिबेटी परंपरेचा उपयोग होत नाहीं. तिबेटी परंपरा ऐतिहासिक दृष्ट्या अविश्वसनीय आहे. वज्रयानाचा नाथ संप्रदायांत मोठ्या प्रमाणांत अंतर्भाव झाल्यामुळें उभय-मार्गांतील सिद्ध पुरुषांच्या चरित्रांची गल्लत झाली आहे. शिवाय लुइपा म्हणजेच मत्स्येंद्र होंहि मत इतिहासाच्या कसोटीवर टिकत नाहीं. ( पाहा : मत्स्येंद्रविषयक भाग, पृ. ७२–७५. )

( ४ ) गोपीचंदाच्या नाथपंथ-प्रवेशाची कथा गुजराथेंत बाराव्या शतकांत लोकप्रिय होती, असें डॉ. कैलासनाथ यांनी सिद्ध केलें आहे.

— गोपीचंदाचा मामा भर्तृहरि हाहि नाथसिद्ध होता. त्याच्या नेतृत्वा-खालीं माळव्याच्या परिसरांत नाथ संप्रदायाचा प्रसार चालू होता. भर्तृहरि आणि गोपीचंद यांसारख्या राजकर्त्यांनीं जोगी वृत्ति स्वीकारण्यासाठी राजत्याग केला, ही गोष्टच इतकी अभूतपूर्व आहे कीं, तिच्या लोकप्रियतेसाठीं कांहीं शतकांचा अवधि लोटण्याचें कारण नाहीं.

( ५ ) गोपीचंदाची भगिनी चंद्रावली हिचा विवाह चंद्रनगरच्या राजाशीं सन १०२७ मध्यें झाला, असें बालकराम जागीशारांनी सिद्ध केलें आहे.

— चंद्रावली गोपीचंदाची धाकटी बहीण कीं थोरली ? त्यांच्या वयांतील अंतर किती ? गोपीचंद राज्याधिकारावर आला तो या लग्नापूर्वी की नंतर ? राज्यावर आल्यानंतर किती वर्षांनीं त्यानें राज्यत्याग केला ? – हे प्रश्न डॉ. सिंगांना अनावश्यक वाटले. कारण त्यांना आपल्या गृहीत मताची पुष्टि करावयास हवी होती !

( ६ ) अभिनवगुप्तानें 'तंत्रालोकां'त ( सन १०१५ ) 'मच्छंदविभू'ला वंदन केलेलें आहे.

– यावरून केवळ मत्स्येंद्राचा काळ समजतो. मत्स्येंद्राचा शिष्य गोरक्ष यांचें व्यक्तिमत्त्व गुरुहूनहि महिमामय असून, 'तंत्रालोकां'त त्याचें नांव नाहीं. तेव्हां गोरक्ष मत्स्येंद्राहून बराच 'ज्यूनिअर' असावा. एवढ्यावरून इतकेंच म्हणतां येईल कीं, गोरक्षाच्या काळाला १०१५ हून मागें नेतां येणार नाहीं.

( ७ ) गोरक्षानुयायी बाबा रतन हाजीचा मृत्यु सन ११९९ त झाला, असें हार्विंट्झचें मत आहे.

– हा पुरावा डॉ. सिंगांनाच बाधक आहे. गोरक्ष हा बाबा रतनच्या गुरूचा गुरु. बाबा रतन हा भर्तृहरि-शिष्य. रतनचा आपल्या जीवनकालांत गोरक्षाशीं प्रत्यक्ष संबंध आला होता. यावरून इ. स. ११०० च्या सुमारास गोरक्षाचें अस्तित्व निश्चित होतें.

( ८ ) 'कर्पूरमंजरीं'त भैरवानंदाचा उल्लेख आहे. हठयोगप्रदीपिकेंत भैरवानंदाचा क्रम तिसरा व गोरक्षाचा सहावा आहे. कर्पूरमंजरीचा रचनाकाल ९०० आहे.

– हठयोगप्रदीपिकेंतील नामावळी कालक्रमानुसार आहे, हें गृहीत निराधार आहे. भैरवानंद नांवाच्या अनेक व्यक्ति होऊन गेल्या. पुष्पदंतानेंहि एका भैरवानंद नामक कौलिकाचा उल्लेख केला आहे. तसेंच कर्पूरमंजरींतील पात्र ऐतिहासिक आहे, हें गृहीतहि निराधार आहे. आणि तिसऱ्या भैरवानंदापासून सहाव्या गोरक्षापर्यंत जो काळ लोटला, तोहि डॉ. सिंगांना इ. स. ९०० नंतर जेवढा जरूर ठरेल तेवढाच, हा संशोधन-कुशलतेचा ( ! ) चमत्कार आहे !

डॉ. द्विवेदी यांनीं आपल्या ' नाथ संप्रदाय ' या ग्रंथांत मत्स्येंद्रनाथाच्या कालाची चर्चा केली आहे, आणि गोरक्ष मत्स्येंद्राचा शिष्य असल्यामुळें त्याचाहि तोच काल, असें गृहीत धरूनच त्यांनीं गोरक्षाविषयींचें प्रकरण लिहिलें आहे. डॉ. सिंगांच्या प्रमाणांशिवाय जीं अधिक प्रमाणें त्यांनीं मांडलीं आहेत, तीं पुढीलप्रमाणें –

( १ ) मत्स्येंद्र-कृत 'कौलज्ञाननिर्णया'च्या हस्तलिखिताचा लिपिकाल ११ व्या शतकापूर्वीचा ठरतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वमत.
अनुक्रम २५१७६ वि: चारित्र
क्रमांक [illegible] नों. दि. [illegible]



— हें प्रमाण संदिग्ध आहे. आणि गुरुशिष्यांत अर्धशतकाहूनाहि अधिक अंतर संभवतें, याचा यांत विचारहि नाहीं.

( २ ) मीनपा = मत्स्येंद्रनाथ. मीनपाचा काल ८०९–४९ (तिबेटी परंपरा).

— हें प्रमाण लुइपाच्याप्रमाणेंच आहे. तिबेटी परंपरेवर विश्वसण्यांत अर्थ नाही, असें डॉ. द्विवेदींचेंच मत आहे.

( ३ ) गोपीचंद व दक्षिणेंतील राजेंद्र चोल यांचा संबंध आला होता. राजेंद्र चोलाचा राज्यकाल सन १०६३–१११२ असा आहे.

— हें मत डॉ. द्विवेदींनाच बाधक आहे. कारण यामुळें आपोआपच गोपीचंदाचा गुरु गोरक्षनाथ याचें अस्तित्व अकराव्या शतकाच्या अखेरीस सिद्ध होतें.

अकराव्या-बाराव्या शतकाशी संबद्ध मतें विचारणीय आहेत. त्यांच्या प्रमाणांचा आणि अन्य ऐतिहासिक प्रमाणांचा विचार करून कांहीं प्रमाणांत निश्चयाला पोंचतां येतें काय, तें पाहूं. बाकीचीं मतें विशेष विचारणीय नसल्यामुळें त्यांची चर्चा येथें केली नाहीं.

**कालाच्या दोन मर्यादा :** तेराव्या शतकांत अल्लाउद्दिनानें गोरखपूरचें मंदिर उद्ध्वस्त केलें; सन १२८७ मधील सोमनाथाच्या शिलालेखांत गोरक्षनाथाचा नामोल्लेख आहे. अर्थात् ही गोरक्षाच्या कालाच्या शोधाची अलीकडील मर्यादा झाली. स. १२८७ नंतरच्या प्रमाणांचा विचार अनावश्यक ठरतो. ‘तंत्रालोकां’त मत्स्येंद्राला वंदन केलें असल्याचें आपण पाहिलेंच आहे. तेव्हां ‘तंत्रालोका’चा रचनाकाल ( सन १०१५ ) ही गोरक्षाच्या कालाची पलीकडील मर्यादा समजण्यास हरकत नाहीं. आतां सन १०१५ ते १२८७ या सुमारें २५० वर्षांच्या कालखंडांत गोरक्षाचा जीवनकाल आपणांस निश्चित करावयाचा आहे.

**कांहीं विश्वसनीय प्रमाणें :** ( १ ) लीळाचरित्रांत नाथ संप्रदायाचे अनेक उल्लेख आहेत. स्वतः चक्रधरांनी आपल्या शिष्यांना जालंधर, गोविंदचंद्र, कान्हा, नागार्जुन, कनेरी, घोडाचूडी, लुइपाइ यांच्या कथा सांगितल्या आहेत; गोरक्षाचा व नाथवाणीचा गौरव केला आहे. यांत घोडाचूडीचाच फक्त समकालीनासारखा उल्लेख आहे. चक्रधरांचा जीवनकाल सुमारें इ. स. ११७५ ते १२७५ असा आहे. त्यामुळें गोरक्षनाथ ११७५ पूर्वी झाला असावा.

( २ ) चक्रधरांच्या एकांक काळांत सुमारें सन १२३५ च्या सुमारास त्यांना सालबर्डीच्या डोंगरावर मुक्ताबाई नामक नाथयोगिनी भेटली. ही मुक्ताबाई भर्तृहरीची शिष्या, असें महानुभावीय ग्रंथांत म्हटलें आहे.[५२]

– गोरक्षनाथ मुक्ताबाईच्या गुरूचा गुरु. यावरून १२ व्या शतकाच्या प्रारंभीं गोरक्षाचें अस्तित्व सिद्ध होतें.

( ३ ) भर्तृहरीनें राज्यत्याग केल्यावर उज्जयिनीच्या राज्यावर आलेल्या त्याच्या भावाचा – विक्रमाचा – राज्यकाल १०७६–११२६ असा आहे.

( ४ ) गोपीचंदाशी संबद्ध राजेंद्र चोलाचा राज्यकाल १०६३–१११२ असा आहे. राजेंद्र चोल आणि विक्रम हे समकालीन होत.

( ५ ) लिंगायतमत-प्रवर्तक अल्लमप्रभु हा गोरक्षाचा सहकारी होता. त्याचा आणि गोरक्षाचा मतभेद झाला. लिंगायतमत-प्रवर्तन ११५० च्या सुमारास झालें.

( ६ ) अल्लमप्रभूचा सहकारी व नाथपंथाशीं संबद्ध असा रेवणसिद्ध हा उज्जयिनीचा विक्रम व दक्षिणेंतील राजेंद्र चोल या दोघांशींहि संबंधित होता.

चक्रधरांनी एकदां आपल्या एका शिष्याला गोरक्षाचें रूप देऊन एका गांवांत पाठविलें, तेव्हां 'गोरक्ष आला, गोरक्ष आला' असें गांवकऱ्यांनीं म्हटल्याचें वर्णन लीळाचरित्रांत आहे.[५३] ही घटना तेलंग देशांत घडलेली आहे. त्याचप्रमाणें कानसाईच्या मळ्यांत चक्रधरांना पाहून एका जोगिणीनें त्यांच्या सौंदर्याचें वर्णन करतांना 'साक्षात् गोरक्षनाथु कीं गा' असे उद्गार काढले.[५४] यावरून चक्रधरांच्या काळाला गोरक्षाच्या आठवणी ताज्या असाव्या; त्या वेळीं त्याला पाहिलेले लोक असावे, असें वाटतें.

– वरील सर्व प्रमाणांचा साकल्यानें विचार करतां गोरक्षनाथ इ. स. १०५० ते ११५० या काळांत होऊन गेला, असें सिद्ध होतें. अन्य प्रमाणांची संदिग्धता ठरली तरी लीळाचरित्रांतील नाथ पंथाचे अनेक उल्लेख या काळाला उपकारक ठरतील. चक्रधरांचे गुरु गुंडम राऊळ ( ११६०–१२८७ ) हेहि एक

५२. " भर्तृहरीची मुक्ताबाई । ती योगिनी जाली ॥ "
लीळाचरित्र, एकांक – टीपा, पृ. ६४.

५३. लीळाचरित्र, उत्तरार्ध ली. ४१६.

५४. लीळाचरित्र, भा. २ रा, पृ. २९.

90338



नाथसिद्ध होते. चक्रधरांच्या जन्महि ( सुमारें सं. ११७५ ) एका अवधूताच्या कृपेनें झाला होता. अर्थात् या सर्व प्रमाणांवरून वरील अनुमान निर्णायक मानावयास हरकत नाहीं.

नाथलीलामृतांत गोरक्षनाथाच्या जन्मवेळेविषयीं पुढील संस्कृत श्लोक उद्धृत केलेले आहेत :

कार्तिक्यां शुक्लपक्षे च रेवत्यां च त्रयोदशी ।
द्विपरार्धे दिवा विष्णोरंशो गोरक्षयोनिजः ॥
भस्मगोमयसम्भूतो गोरक्षः स महामुनिः ।
भूमिगर्भसमुद्भूतं ध्यायेन्नाथं जगद्गुरुम् ॥ [५५]

**स्थल-निर्णय :**

गोरक्षांच्या स्थल-निश्चितीसाठीं आजवर कोणाहि पंडितानें भरीव प्रमाण पुढें आणलेलें नाहीं. डॉ. सिंग यांनीं गोरक्षाला पंजाबचा मानलें आहे. त्यांचें हें मत कांहींसें भावनात्मक आणि 'गोरखपूर' ( गोरखटिल्ला ) आदि स्थलनामांवर भर देणारें आहे. नेपाळ, बंगाल यांचे दावेहि असेच भावनात्मक व पंथप्रसाराच्या प्रमाणांवर आधारलेले आहेत.

( १ ) 'योगीसंप्रदायाविष्कृतीं'त गोदावरीतीरावरील चंद्रागिरि नामक स्थळ सांगितलें आहे.

( २ ) गोरक्षसहस्रनामांत दक्षिण दिशेकडील ' बडव ' (?) नामक देश उल्लेखिला आहे.

( ३ ) गोरक्षाचा नातशिष्य बाबा रतन हाजी याची व गोरक्षाची भेट गोदावरीतीरावर झाल्याचें ' पोथी रतनग्यान ' मध्यें लिहिलें आहे.

ज्या अर्थी याशिवाय इतर दावे निराधार आहेत, त्या अर्थी वरील गोदावरीतीरावरील चंद्रगिरीचा स्थलनिर्देश परंपरामान्य म्हणून सत्य धरून चालावयास हरकत नाहीं. हा चंद्रगिरि गोदावरीतीरावर निश्चित कोठें आहे, हें सांगतां येत नाहीं. विजयनगरच्या राजवंशांतील वेंकटरायलु या राजाची राजधानी चंद्रगिरि हीच होती. समर्थांच्या चरित्रांतहि एका चंद्रगिरीचा संबंध येतो. परंतु

---

५५. नाथलीलामृत, अ. २, पृ. ५ ( ओवी क्र. ६६ नंतर ).

तो गोदातीरावरील चन्द्रगिरि नव्हे. एकनाथांना चतुःश्लोकी भागवताच्या रचनेची स्फूर्ति जिथें मिळाली, तो चन्द्रगिरि मात्र गोदातीरावरच आहे :

> गोदावरी उत्तर तिरीं। चौ योजनीं चंद्रगिरी।
> श्रीजनार्दन तेथवरी। दैवयोगें फेरी स्वभावें गेलों ॥
> तो अतिदीर्घ चंद्रगिरी। तळीं चंद्रावती नगरी।
> स्वयें चंद्रनाम द्विजवरीं। वस्ती त्याचे घरीं सहज घडली ॥[५६]

एकनाथांनीं उल्लेखिलेला चंद्रगिरि नाशिक-त्र्यंबकेश्वराजवळ आहे. आज हें स्थान चांदगिर या नांवानें ओळखलें जातें. हें चांदगिर गांव नाशिकच्या पूर्वेस सहा-सात मैलांवर आहे.[५७] नाशिक-त्र्यंबकेश्वराचा परिसर नाथ संप्रदायाच्या प्रभावस्मृतींनीं भारावलेला आहे, हें सर्वश्रुत आहे. त्र्यंबकेश्वरावरील गोरख-गुंफा, गहिनीनाथांचा तेथील निवास, जवळच चौरंगीनाथाशीं संबंधित सप्तशृंगी आणि तेथपासून नगर जिल्ह्यांतील वृद्धेश्वरापर्यंतचीं नाथप्रभावित डोंगरी स्थानें यांचा विचार करतां गोरक्षनाथाचा प्रादुर्भाव इथेंच, त्र्यंबकेश्वराच्या परिसरांतच झाला असणें सर्वथा संभवनीय वाटतें. गोरक्षनाथानें त्र्यंबकेश्वराप्रमाणेंच लोकोद्धारासाठीं आपल्या अंतरंगांतून विशुद्ध साधनेची गौतमी गंगा निर्माण केली आणि तिच्या विमल प्रवाहांत अखिल भरतभूमि न्हाऊन निघाली.

गोरक्ष-प्रणीत नाथ संप्रदायाचा उदय श्रीशैलावर झाला. अर्थात् गोरक्षाचें कार्यक्षेत्र प्रारंभीं दक्षिण भारतांतच होतें, हें उघड आहे. श्रीशैलाच्या परिसरांतील कदलीबनांत योगिनींच्या मेळाव्यांत फसलेल्या आपल्या गुरूचा उद्धारहि गोरक्षानें केला. या कार्यारंभाशीं गोरक्षाचें गोदावरीतीरावरील प्रादुर्भाव-स्थान सुसंगत ठरतें.

## चरित्र आणि चारित्र्य :

( १ ) डॉ. मोहनसिंगांच्या मतें गोरक्षनाथ हा हिंदु विधवेचा अवैध पुत्र असावा. " समाजाच्या खालच्या थरांत जन्म घेऊन कर्तृत्वानें क्रांति करणारा महापुरुष " असें त्यांनीं त्याचें वर्णन केलें आहे. 'गोरक्षसिद्धान्तसंग्रहां'त त्याला

---

५६. चतुःश्लोकी भागवत, ओ. १०१८–१०१९.
५७. तुकाराममहाराज यांचे संतसांगाती : वा. सी. बेंद्रे. पृ. ७७.

'ईश्वरसंतान' ( अवैध जन्म ? ) म्हटलें आहे. 'मतिरत्नाकर' या महानुभावांच्या उत्तरकालीन ग्रंथांत –

आणि गोरक्ष जन्मला शूद्र कुळीं ।
तो मच्छिंद्राचा शिष्य नाथओळी ।
तो जन्मला शिरकमळीं ।
हें असत्य ॥ [५८]

असा त्याच्या शूद्र कुळाचा उल्लेख केला आहे. डॉ. द्विवेदी मात्र त्याला 'ब्राह्मणकुलीन' मानतात. (मला वाटतें, तो दक्षिणेंत स्थायिक झालेल्या काश्मिरी ब्राह्मण पंडिताच्या कुळांत जन्मला असावा. कारण, काश्मिरी शैव परंपरेंत गोरक्ष-गुरु मत्स्येंद्राला गौरविलें आहे. गोरक्ष आणि गोरक्षमतसंबद्ध अल्लमप्रभु व ज्ञानेश्वर यांच्या विचारावर काश्मिरी शैव मताची छाप आहे. गोरक्षनाथाच्या नांवावरील 'महार्थमंजरी' हा ग्रंथ काश्मिरी अपभ्रंश भाषेंतील आहे. काश्मिरी पंडितांचीं अनेक घराणीं दक्षिणेंत स्थायिक झाल्याचें इतिहास सांगतो.) मध्य-कालीन संस्कृत विदग्ध साहित्यांत भर टाकणारे दक्षिणेंतील कांहीं कवि मूळचे काश्मिरी होते, हें सर्वश्रुत आहे. स्वतः बसवानें शैव मताच्या उद्घाटनासाठीं काश्मीरहून पंडित आणविले, हा इतिहास आहे. तेव्हां माझें वरील अनुमान सुसंगत ठरेल, असें वाटतें.

( २ ) पंडिती परंपरेचा वारसा लाभल्यानें त्याचें दार्शनिक अध्ययनहि खूप झालें असावें, हें त्याच्या ग्रंथांवरूनहि सिद्ध होईल.

( ३ ) लहान वयांतच योगिजीवनाचा स्वीकार करुन, त्यानें आजन्म ब्रह्मचर्य पाळलें असावें. त्याच्या वाणींतून त्याच्या ब्रह्मचर्यवृत्तीचें आणि विषय-पराङ्मुखतेचें दर्शन घडतें. त्याच्या याविषयींच्या दृढतेबद्दल अनेक जनश्रुति प्रसिद्ध आहेत. या बाबतींत तो गुरूहूनहि श्रेष्ठ ठरला. 'विषयविध्वंसैकवीर' असें ज्ञानेश्वर त्याचें वर्णन करतात.

( ४ ) त्याचा देह कांतिमान् होता. ( " कैसा सौंदरु जोगी ' साक्षात् गोरक्षनाथु कीं गा : " –ली. च. भाग २ रा, पृ. ३२ ).

---

५८. मतिरत्नाकर, पृ. २५.

( ५ ) सर्व भारतांत त्याच्या संचाराचीं स्मृतिचिन्हें आहेत; सर्व भारतीय भाषांत त्याच्याविषयींचे ग्रंथ आहेत; आणि त्याच्या पंथाचा प्रसारहि सार्वत्रिक आहे; यावरून त्यानें अंगीकृत कार्यासाठीं भारतभ्रमण केलें असावें, असें वाटतें.

( ६ ) त्याची गुरुभक्ति पुढिलांना आदर्शभूत ठरली आहे. पतनोन्मुख गुरूचा उद्धार करूनहि तो गुरूशीं प्रामाणिक राहिला. ( गुरूला वडा हवा, म्हणून डोळा काढून दिला, अशी जी गोरक्षाविषयींची कथा आहे, ती त्याची नसून नागार्जुन-कनेरीची आहे, हें लीळाचरित्रावरून ठरतें.[५९] )

( ७ ) तो संगीत-वादन-प्रवीणहि असावा.

( ८ ) त्याचे विचार अनुभूतिजन्य असल्यामुळें त्याच्या विचारविश्वामागें प्रदीर्घ तपस्येची पार्श्वभूमि असावी, असें वाटतें.

( १० ) निष्कलंक चारित्र्य, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि हृदयस्पर्शी वाणी यांमुळें त्यानें ध्येयाचें गौरीशंकर गांठलें.

( ११ ) स्वयंप्रज्ञा, मौलिक अध्ययन व चिंतन आणि लोककल्याणाची तळमळ यांमुळें त्याच्या वाणीला तपःपूत तेज चढलें होतें.

( १२ ) त्याचें समाधिस्थळ नगर जिल्ह्यांत नेवाशाजवळील डोंगरांत दाखवितात. गिरनार पर्वतावर त्यानें समाधि घेतली, असेंहि एक मत आहे. ( सरदार मिरीकरांच्या मतें मढीचा कान्होबा म्हणजेच गोरक्षनाथ. )

( १३ ) लोकसाहित्यांत आणि सांप्रदायिक पुराण-ग्रंथांत त्याच्याभोंवतीं अनेक चमत्कारांचें जाळें विणलें असून, त्याला नवनारायणांपैकीं हरिनारायणाचा अवतार मानलें आहे.

## शिष्य-परिवार :

गोरक्षनाथाचा अखिल भारतांत संचार असल्यामुळें त्याचा शिष्य-परिवार अपरिमित असणार. त्यांपैकीं महाराष्ट्रांतील अमरनाथ व गहिनीनाथ, उज्जयिनीचा भर्तृहरि, बंगालचा गोपीचंद आणि जिच्या निमित्तानें गोरक्षोपनिषद् सांगितलें, ती विमलादेवी या शिष्यांची कामगिरी विशेष आहे. भर्तृहरि आणि गोपीचंद हे दोन राजपुरुष राज्यत्याग करून जोगी बनले आणि गोरक्षान

५९. लीळाचरित्र, उत्तरार्ध ली. ४२०.

उभारलेल्या साधनाशुद्धि-आन्दोलनासाठीं बद्धपरिकर झाले, ही घटना ऐतिहासिक महत्त्वाची आहे.

**ग्रंथ-संभार :**

गोरक्षनाथानें संस्कृतांत ग्रंथलेखन केलें असलें तरी त्यानें लोकभाषांचा हिरीरीनें पुरस्कार केला आणि आपल्या प्रखर विचारांचा प्रसार त्यानें लोकभाषांच्या माध्यमांतूनच केला. त्याच्या अनुयायांनीं तीच परंपरा चालविली. त्याच्या ग्रंथसंभाराचा स्थूल परिचय पुढें दिला आहे.

गोरक्षनाथाच्या नांवावरील ग्रंथांचा पसारा फारच मोठा आहे. या ग्रंथांवरून या पुरुषाच्या प्रज्ञेविषयींच्या आणि विचारविश्वाविषयींच्या आदरानें मन भारावून जातें. या गोरक्ष-मुद्रांकित ग्रंथसंभारांत निःसंशय गोरक्षाचे कोणते आणि गोरक्षाच्या नांवावर खपविलेले कोणते, याचा निर्णय अद्याप झालेला नाहीं. त्यासाठीं गोरक्ष-विचारांचें अधिष्टान आणि स्वरूप ध्यानीं घेऊनच या ग्रंथांची विचार-दृष्ट्या छाननी करावयास हवी. हें काम एखाद्या अधिकारी अभ्यासकानेंच अंगावर घ्यावयास हवें.

गोरक्षनाथाच्या नांवावर संस्कृत, हिंदी व क्वचित् अन्य भाषेंतीलहि कृति आहेत.

**संस्कृत ग्रंथ : अमनस्क :** याची एक प्रत बडोदा लायब्ररींत आहे. गोरक्षसिद्धान्तसंग्रहांत यांतील अनेक वचनें उद्धृत केलेली आहेत. **अमरौघप्रबोध :** हा ग्रंथ ७४ श्लोकांचा आहे. डॉ. मलिक यांच्या संकलनांत समाविष्ट. या ग्रंथांत लय, हठ, मंत्र आणि राज या चारी योगांचीं लक्षणें सांगितलीं आहेत आणि राजयोग हाच अमरौघ होय, असें सांगितलें आहे. यांत 'श्रीसम्पुट' नांवाच्या ग्रंथांतील एक अवतरण दिलें आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, "कोणतीहि औषधी माणसाला वांचवूं शकत नाहीं; कारण चरकासारखे औषधींचे शोधकहि मेले. 'नाद' व 'बिंदु' हीं दोनच औषधें जरा-मरणावर विजय मिळवितील." ग्रंथाच्या अखेरीस –

कायेनैव परीक्षेत, वाक्पटुः किं करिष्यति ।
चिकित्सापाठमात्रेण रोगिणः किं करिष्यति ॥

असा प्रत्यक्षानुभवाचा संदेश दिला आहे. **अमरौघशासनम् :** श्रीमन्महेश्वराचार्य गोरक्षनाथविरचित. यांत गोरक्षनाथाच्या सिद्धान्तांचें सूत्ररूप संकलन

आहे. या ग्रंथांत हठयोग व काश्मिरी शैवागम यांचा संबंध जोडलेला आहे. हा ग्रंथ संस्कृत गद्यांत आहे. **गोरक्ष-पद्धति :** हा दोनशें श्लोकांचा संग्रह आहे. यांतील प्रथम शतकाचें नांव 'गोरक्षशतक' असें असून, द्वितीय शतकाचें नांव 'गोरक्षज्ञान' वा 'योगशास्त्र' असें आहे. **गोरक्ष-संहिता :** हा ग्रंथ आज उपलब्ध नाहीं. डॉ. बागचींनी 'कौलज्ञाननिर्णया'च्या भूमिकेंत यांतील कांहीं अंश उद्धृत केला आहे, यावरून याचें मत्स्येंद्रकृत 'अकुलवीर-तंत्रा'शीं साम्य आढळतें. **महार्थ-मंजरी :** श्रीमन्महेश्वरानंद ( गोरक्षनाथ ) कृत. हा काश्मीर संस्कृत ग्रंथावलीतील ( क्र. ११ ) ग्रंथ काश्मिरी अपभ्रंशांतील असून, त्यावर ग्रंथकाराची 'परिमल' नामक संस्कृत टीका आहे. यांत अप-भ्रंशांतील ६९ श्लोक आहेत. याहि ग्रंथाचें काश्मिरी शैव सिद्धान्ताशीं जवळचें नातें आहे. **सिद्धसिद्धान्तपद्धति :** गोरक्षाच्या विचारांत या ग्रंथाचें स्थान विशेष मानलें जातें. यांत ६ 'उपदेश' ( अध्याय ) असून श्लोकसंख्या एकूण ३५३ आहे. पिण्डोत्पत्ति, पिण्डविचार, पिण्डसंवित्ति, पिण्डाधार या 'उपदेशां'तून पिण्डविज्ञानाचा ऊहापोह केला असून, पुढें समरसीकरण व अवधूतयोगीलक्षण विवरिलें आहे. हा ग्रंथ नित्यनाथविरचित असल्याचें प्रो. ब्रिग्जनें म्हटलें असून, तसा उल्लेख गोरक्षसिद्धान्तसंग्रहांताहि आला आहे.[६०] तसेंच त्यांत ६ व्या 'उपदेशां'त दोन-तीन वेळां लिंगायत पंथाचा उल्लेख आल्यामुळें तो गोरक्षोत्तर वाटतो.[६१] **योगमार्तण्ड :** हा १८८ श्लोकांचा ग्रंथ आहे. डॉ. मलिक यांच्या संकलनांत समाविष्ट. या ग्रंथांत योगाच्या सर्व अंगांचा स्थूल परामर्श घेतला आहे. यांतील अनेक श्लोकांचें 'हठयोगप्रदीपिकें'तील श्लोकांशीं साम्य आढळतें. यावरील एक मराठी टीका उपलब्ध आहे.

याशिवाय अवधूतगीता, गोरक्षकल्प, गोरक्षकौमुदी, गोरक्षगीता, गोरक्ष-चिकित्सा, गोरक्षपंचक, गोरक्षशास्त्र, चतुरशीत्यासन, ज्ञानप्रकाशशतक, ज्ञान-शतक, नाडीज्ञानप्रदीपिका, योगचिंतामणि, योगबीज, योगशास्त्र, योगसिद्धासन-पद्धति, विवेकमार्तंड, श्रीनाथसूत्र, हठयोग, हठसंहिता, इ० अनेक संस्कृत ग्रंथ गोरक्षनाथाच्या नांवावर आहेत. या यादींतील 'योगचिंतामणि' या नांवाचा एक

६०. गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. ११.

६१. सिद्धसिद्धान्तपद्धति, ६. ४४, ७७.

बंगाली ग्रंथ विश्वभारती प्रकाशनाच्या 'गोर्ख-विजया'च्या संपादनांत संकलित केलेला आहे.

**हिंदी रचना :** गोरक्षनाथाची हिंदी रचना डॉ. पीतांबरदत्त बडथ्वाल यांनीं 'गोरखबानी' या ग्रंथांत संकलित केली आहे. या संकलनाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं गोरक्षनाथाच्या नांवावरील चाळीस लहान-मोठ्या हिंदी ग्रंथांचा उल्लेख केला आहे –

(१) सबदी
(२) पद
(३) सिष्यादरसन
(४) प्राणसंकली
(५) नरवैबोध
(६) आत्मबोध – १
(७) अभैमात्रा जोग
(८) पंद्रह तिथि
(९) सतवार
(१०) मछिंद्र-गोरखबोध
(११) रोमावली
(१२) ग्यानतिलक
(१३) ग्यानचौतीसा
(१४) पंचमात्रा
(१५) गोरखगणेशगोष्ठी
(१६) गोरखदत्तगोष्ठी
(१७) महादेवगोरखगुष्टि
(१८) सिष्ट-पुरान
(१९) दयाबोध
(२०) जाती भौंरावली (छंद गोरख)
(२१) नवग्रह
(२२) नवरात्र
(२३) अष्ट पारछ्या
(२४) रह रास
(२५) ग्यानमाला
(२६) आत्मबोध – २
(२७) व्रत
(२८) निरंजन-पुराण
(२९) गोरख-वचन
(३०) इंद्री देवता
(३१) मूलगर्भावली
(३२) खाणी बाणी
(३३) गोरखसत
(३४) अष्टमुद्रा
(३५) चौबीस सिधि
(३६) षडक्षरी
(३७) पंच अग्नि
(३८) अष्टचक्र
(३९) अबलि सिलूक
(४०) काफीरबोध

या यादींतील अनेक ग्रंथ गोरक्षाचे नसून गोरक्ष-विचार-प्रसारासाठीं अन्य कुणीं तरी लिहिलेले असावेत, असें त्यांच्या नांवांवरूनच वाटतें. यांतील क्रमांक १ ते १२ व क्रमांक १४ असे १३ ग्रंथ गोरक्षाचे म्हणून डॉ. बडथ्वालांनीं गोरख-

बानींत दिले आहेत. शिवाय दोन स्वतंत्र परिशिष्टांत क्रमांक १५, १६, १७, १८, १९ व क्रमांक २१, २७, ३७, ३५, ३४, २४ हे ग्रंथ जिज्ञासूंच्या सोयीसाठीं दिले आहेत. या गोरक्ष-कृत हिंदी ग्रंथांत 'सबदी', 'पद' आणि 'गोरखबोध' यांचें कर्तृत्व निःसंशयं गोरक्षाकडेच जात असून, गोरक्षविचारांच्या दृष्टीनेंहि त्यांचें स्थान महनीय आहे.

सबदी : यांत प्रत्येकीं दोन ओळींच्या २७५ विचार-कणिका आहेत. ही गोरक्षनाथाची सर्वाधिक अधिकृत रचना मानली जाते. यांत करनी-रहनीचा विचार, योगाची प्रक्रिया, योग्याचा आचार व पथ्यें, इत्यादींची विस्तृत चर्चा आली आहे.

पद : या 'पद'-विभागांत एकूण ६२ पदें संकलित आहेत. या विभागांतील कांहीं पदांतून गोरक्ष-गुरु मत्स्येंद्रनाथ याच्या योगिनीकुलांतील पतनाचें सूचनहि आहे. पदांचा आणि 'सबदी'चा विषय बहुंशीं एकरूप असून शैलीहि प्रायः सारखीच आहे. "आदिनाथ नाती मछिंद्रनाथ पूता गोरष अवधूता" असा स्वतःचा उल्लेख गोरक्षानें वारंवार केला आहे. "सोनां ल्यौ रस सोनां ल्यौ, मेरी जाति सुनारी रे।" अशा कांहीं पदांतून भारूड-रचनेचें मूलस्वरूप आढळतें. यांतील १९ व्या पदांत सांप्रदायिक वेशाचें रहस्योद्घाटन आहे : "इडा-पिंगला-द्वारां सुषुम्नेचा मार्ग खुला करणें हेंच मुद्राधारण, सांसारिकता हेंच भस्म, नादानुसंधान हाच नाद, बिंदुरक्षण हीच बिंदी, अनाहतनाद हीच शिंगी, अस्थिनाड्यांची गुंफण हीच कंथा होय." कबीर, नानक आणि दादू यांचें सांप्रदायिक वेशाचें रहस्योद्घाटन याच्याशी ताडून पाहावें. २३ व्या पदांतील कायागडाच्या विजयाचें वर्णन वाचून ज्ञानेश्वरींतील विकार-विजेत्याच्या रूपकाची आठवण येते आणि जायसीनें पद्मावतांत निर्माण केलेला योगाचा 'कायागड' डोळ्यांसमोर येतो. क्रमांक २३ हें पद हिंसेचा निषेध व अहिंसेचा उद्घोष करणारें आहे. क्रमांक ४५ मध्यें माया-सर्पिणीच्या विनाशाची हांक आहे. गोरक्षाच्या अमृतवाणीचा हा कलश अतीव मूल्यवान् असून, त्यांत 'विषयविध्वंसैकवीर' गोरक्षनाथाचें स्पष्ट दर्शन होतें.

'सबदी' व 'पद' या दोन्ही रचना वाचतांना आपण कबीराच्या गुरूचीच रचना वाचीत आहोंत, असें संदेहातीत वाटूं लागतें. तीच उदात्त दृष्टि, तीच अनुभवनिष्ठा, तीच वैचारिक प्रखरता आणि तीच पर-कल्याणाची तळमळ!

**गोरख-बोध :** हा ग्रंथ डॉ. सिंगांनीं आपल्या ग्रंथांत इंग्रजी अनुवादासह दिला आहे. गोरक्षनाथाचें तत्त्वज्ञान मांडण्यांत त्यांनीं याच ग्रंथाला पायाभूत धरलें आहे. हें नाथ संप्रदायाचें उपनिषद् आहे, असें डॉ. सिंग म्हणतात. सूत्र-मय विचार-ग्रथन व गुरु-शिष्य-संवादात्मक मांडणी या दोन्ही दृष्टींनीं या ग्रंथाला औपनिषदिक मूल्य प्राप्त झालें आहे. गोरक्षनाथाचा प्रश्न आणि मत्स्येंद्रनाथाचें उत्तर अशा क्रमानें ५३ प्रश्न व ५३ उत्तरें आणि अखेर गोरक्षनाथाचा १ उप-संहाराचा उद्गार अशी १२७ कडव्यांची ही गुंफण आहे. उत्तराच्या वेळीं मत्स्येंद्रानें सर्वत्र 'अवधू' हें संबोधन वापरलें आहे. गोरक्षनाथाच्या यौगिक व दार्शनिक विचारांच्यां अभ्यासांत हा ग्रंथ अत्यावश्यक ठरेल.

**गोरष : स्वामीं कौंण सो मंदिर, कौंण सो द्वार ?**
**कौंण सो मूरति, कौंण अपार ?**
**कौंण रूप मन उनमन रहै ?**
**सतगुरु होइ सु बुझ्यां कहै ।**
**मछिंद्र : अवधू, सुंनि सो मंदिर, सबद सो द्वार,**
**ज्योति सो मूरति, ज्वाला अपार,**
**रूप अरूप, मन उनमनि रहै,**
**ऐसा बिचार मछिंद्र कहै ।**

या एका प्रश्नोत्तरावरून ग्रंथाच्या अंतरंगाची कल्पना येईल.

**आणखी कांहीं पदें :** ह. भ. प. पांगारकरांनीं 'ज्ञानेश्वरांची प्रभावळ' या ग्रंथांत गोरक्षनाथाचीं तीन पदें दिलीं आहेत. तिन्ही पदें हिंदीच आहेत. पहिलें पद 'गुरुजी, मैं तो एक निरंजन ध्याऊँ' असें असून त्यांत निर्गुणोपासना ग्रथित आहे. 'अडुसट तीरथ है घटभीतर', त्यामुळें विग्रह-पूजेची व तीर्थयात्रेची आवश्यकता नाहीं, असें त्यांत स्पष्टपणें सांगितलें आहे. दुसऱ्या गीतांत 'जोगी भूला जोग जुगतसे, उलटी पवन चढाई' अशी बाह्य प्रक्रियांची निरर्थकता सांगून, 'सकल भरमणा' (सकल भ्रम) नाहींसा करणारा एक 'सतगुरु'च होय, असें सांगितलें आहे. तिसऱ्या गीतांतील –

**ये संसार कागदकी पुतली । बुंद लगे गल जावोगे ॥**
**ये संसार ओसका पानी । धूप लगे ढल जावोगे ॥**
**ये संसार बागरका कांटा । आग लगे जल जावोगे ॥**

यां ओळी वाचून 'यह संसार काँटकी बाड़ी ...' या कबीराच्या ओळींची आठवण येते. आणखी एक पद शिवदिन केसरीच्या मठांतील हस्तलिखितांत आहे. त्या पदांत 'आकार ना निराकार, सूक्ष्म ना स्थूल' अशा रूप-रेखा-वर्णहीन तत्त्वाचें वर्णन केलें आहे.

'लीळा-चरित्रा'च्या उत्तरार्धात स्वतः चक्रधरांनीं गायिलेली एक 'चौपदी आहे.[६२] ही चौपदी म्हणजे एक 'गोरक्ष-गीत' आहे. चक्रधरांच्या मनांत नाथ वाणी-सिद्धवाणीविषयीं अपार आदरभावना होती. ते अशीं पदें शिष्यांकरवीं म्हणवून घेत व कधीं स्वतःहि म्हणत.

मूळस्थानीं भीड बांधों हो जोइ : जेंवि ना कळ कळाइ :
गुरुवचनें वोडियाणा दृढ बांधों : जेंवि ना चंचळ होइ : ध्रु०
गोरक्षी हो : सुनि बंधीं : स्थिरु होइ : जेणें तुह्मी जाया :
सोपरि मारो : बैरी आनु नाहीं कोइ : १ :
पांचै पंचाएन : पांचै जान हो : धावति आन आन स्थानीं :
उन्मनीं कारणें नीज मुनी लीन : ना ते मारिएले नीज स्थानीं : २ :
पवन पूरो मन स्थीर करो : चंद्रा मीळावो भानु :
आयागमन यें दुष नीवारो : बूधि राखों आपणा : ३ :
भाटीं जातां निवारो हो : भीडो बाइ वों उजाइ :
अलख नीरंजनीं ळो कर हो : भावा ना भाव होइ : ४ :

हें पद मराठी-प्रभावित हिंदींत आहे. 'गोरखबानीं'त एक मराठी पदहि समाविष्ट आहे.

निज तत निहारतां अम्हें तुम्हें नांहीं ॥
पषाणांची देवळी पषांणचा देव,
पषांण पूजिला कैसें फीटीला सनेह ॥ १ ॥
सरजीव तोडिला निरजीव पूजिला,
पापची करणीं कैसें दूतर तिरीला ॥ २ ॥
तीरथि तीरथि सनांन करीला,
बाहर धोये कैसैं भीतरि भेदीला ॥ ३ ॥

---

६२. लीळाचरित्र, उत्तरार्ध ली. २२१.

आदिनाथं नाती मछींद्रनाथ पूता,
निज तत निहारै गोरष अवधूता ॥ ४ ॥

हेंच पद थोड्याशा फरकानें श्री. भावे यांनीं 'महाराष्ट्र-सारस्वतां'त दिलें आहे. तेथेंहि या गीतांतील मराठी अ-महाराष्ट्रीयाचें असावें, असें वाटतें. महाराष्ट्रांतील संचार; आणि अमर-गहिनीसारख्या महाराष्ट्रीय शिष्यांचा सहवास यामुळें गोरक्षाच्या वाणीवर मराठीचा अंशतः प्रभाव पडला असावा. या पदांतील विचारांची प्रखरता स्पष्ट आहे. हें पद आणि पांगारकर-संकलित गोरक्षनाथाच्या पदांपैकीं पहिलें पद विचार-दृष्ट्या समान आहे.

डॉ. मलिकच्या संकलनांत 'गोरख उपनिषद्' या नांवाची एक हिंदी रचना ( पृ. ७२–७३ ) समाविष्ट आहे. परंतु तें 'गोरक्षोपनिषद्' नसून गोरक्षोपनिषदावरचें एक हिंदी टिपण आहे, असें अंतरंगावरून वाटतें. 'गोरख-बानीं'तील अन्य गोरक्ष-कृत प्रकरणांचा विचार विस्तारभयास्तव केला नाहीं.

'कबीराचा गाथा' या नांवाच्या पुस्तकांत गोरक्षनाथाच्या नांवावरील तीन पदें आहेत.[६३] त्यांतील पहिलें 'उलट बचन' ( गूढगुंजनात्मक रचना ), दुसरें दत्त-गोरक्ष-संवादात्मक आणि तिसरें रावलजोगीविषयक आहे. यांपैकीं दुसऱ्या क्रमांकाचें गीत आणि मागें पृ. ८० वर अवतरिलेलें मत्स्येंद्रनाथाच्या नांवावरील गीत एकच आहे; फक्त समाप्ति-मुद्रा वेगळी आहे. प्रस्तुत पदाची समाप्तिमुद्रा पुढीलप्रमाणें आहे :

कहे गुरु दत्ता सुनो गोरख तीनो उपर ज्याना।
सद्गुरुकृपा भयी तब ज्यानो, आपसे आप पछाना ॥

बाकी दोन पदें जशींच्या तशीं खालीं देत आहें :

१. नाथजी बोले अमृत बानी।
बरखत कमली भीगत पानी ॥
गाडो जी घोडा बांधो जी खुंटा।
चालत नगाना बाचत उंटा ॥
धब धब मटके कुंभार घडीयो।
मटकेके उपर चुलीया धरीयो ॥

---

६३. कबीराचा गाथा : प्रकाशक – ल. ना. गोडबोले, पृ. [illegible]–१२१.

मांडो जी हांडी चढा देवे भाता।
बकरेके आगे देवसे काटा॥
आदिनाथ गुरु मछिंद्र चेला।
उलट बचनसो गोरख मिला॥

२. रावल जोगी आया।
मेरा रावल जोगी आया॥ ध्रु०॥
त्रिकूट शिखर उपर भ्रमर गुंफा।
अनुहात शिंगी बजाया॥
खेचरी मुद्रा कानमो पेहरी।
अटल समाधी लगाया॥
गोरख बनखंडी मछींद्र अविनासी।
आतमस्वरूप गोरखसे दिखाया॥

## औपनिषदिक ऋषींचा वारसा :

आंतरिक शुद्धीवर भर, अनुभूतीला प्रमाण मानणारें मुक्त चिंतन, तपःपुनीत तेजस्वी व्यक्तिमत्त्व आणि प्रखर आत्मविश्वास या गुणांमुळें गोरक्षनाथानें औपनिषदिक ऋषींचा वारसा समृद्ध बनविला. डॉ. मोहनसिंग यांच्या मतें गोरक्ष नाथाचें विचारविश्व विशुद्ध औपनिषदिक विचारांच्या पायावरच उभें राहिलें आहे. गोरक्षविचारांचा उपनिषदांशीं अनुबंध दाखवितांना ते म्हणतात :

" मिथ्या असत्-जीवनाचा त्याग करून शाश्वत जीवन जगणें हें गोरखपंथाचें ध्येय आहे. आणि हें त्याच वेळेला शक्य आहे कीं, ज्या वेळेला साधक मन, प्राण व काम हा जो अशुद्ध वर्ग आहे त्याच्यावर ताबा मिळवून शुद्ध आत्मस्वरूप होऊन राहतो. हा जो अविद्या वर्ग आहे त्याला जिंकण्याकरितां या प्रत्येकाची तर मदत लागतेच. प्राणायामानें काम जिंकले जातात. मनाला जिंकण्याचा उपाय म्हणजे ध्यान. मनाची वृत्तिद्वारा बाहेर धांवण्याची जी सवय आहे तिचा संयम, विचारानें अंतर्मुखता प्राप्त करून घेऊन आत्मशोधन, यायोगें मनच मनावर ताबा मिळवितें व अमनीभावाजवळ येतें. हा संयम 'सहज' मार्गानेंच करणें सुखकर होय. या अभ्यासमार्गानें 'अमनीभाव' (Supramental State) प्राप्त होऊं शकतो. त्या ठिकाणी कामादि त्रयींचा प्रवेश नाही. ही

स्थिति म्हणजे शून्य नव्हे. ही स्थिति सच्चिदानंदानें परिपूर्ण भावरूप अशी आहे. या सच्चिदानंदालाच शब्द, रस, ज्योति असें नांव आहे. जागृति गिळून जागणें, निद्रेपरौते निजणें, मनाला मनानें गिळून राहणें, अशी ही स्थिति आहे.

"केवळ कुंभकानें प्राणावर जय मिळवतां येतो. गुरुनें सांगितलेल्या मंत्राचा (अजपा) जप केला कीं, काम आवरला जातो. विषय बाहेर दवडून मनाला मोकळें, रिकामें करण्यानें व ध्यानानें मन ताब्यांत येतें. स्पृहा मनांतच नाहीशी झाली, मनामाजीं मन आलिंगू सरलें, द्वंद्वांतील अवस्था प्राप्त झाली कीं, समदृष्टित्व प्राप्त होतें व या भावालाच असंप्रज्ञात समाधि, कैवल्य, सहजसमाधि, तूर्यावस्था, महाशून्य अशीं वेगवेगळीं नांवें आहेत. हा मार्ग म्हणजे नादानुसंधानाचा मार्ग आहे. यास गुरूपदिष्ट दिव्य नाममंत्राचें शांत ध्यान करणें, नादानुसंधान, हा मार्ग म्हणतात व यानें आत्म्यांत समरस होणें हें ध्येय आहे. हाच अंतर्मार्ग. याचकरितां बाह्य आसनादिक करावयाचे असतात. कुंभारीबुवा म्हणतात, त्याप्रमाणें हाच सिद्धान्तयोग.

"या योगास ब्रह्मचर्याची आवश्यकता खरी. पण योग्य संयम पाळून गृहस्थाश्रमांतहि हा करतां येतो. भिक्षुवृत्ति अथवा संन्यास याची आवश्यकता आहे, असें नाहीं. बौद्धांसारखी आत्मपीडा यांत नाहीं. अथवा कांहीं तांत्रिक मार्गांतील भोगातिशय यांत नाहीं. हठयोगाच्या क्रियांचा कडकपणाहि यांत नाहीं. गोरक्षनाथांचा मार्ग म्हणजे उपनिषदांनीं सांगितलेला राजयोगच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. याचा सर्वांना अधिकार आहे. याच्या साधकास, नीतियुक्त आचार व वैराग्य यांची गरज आहे. इतर मार्गांनी जें साध्य होतें, तें खऱ्या गुरूच्या शब्दानें साधकास प्राप्त होतें. चमत्कार करण्याची शक्ति, सिद्धि — मग त्या नऊ अथवा बारा असोत — प्राप्त होणें हें योगाचें ध्येय नव्हे. हें योगमार्गांतील विलोभन मोठें विघ्न आहे. साधकानें याच्यापलीकडे जाणें अवश्य आहे.

"तंत्र, हठ, अथवा रसशास्त्र हीं शरीर अमर करण्याचा प्रयत्न करणारीं शास्त्रें आहेत. गोरक्षनाथांचा पंथ हा आत्म्याचें अमरत्व अनुभवणें, नादमधूचा आनंद भोगणें व शिवशक्तीच्या सामरस्याचा आनंद भोगणें याकरितां आहे. आत्म्याचें मंदिर जें शरीर त्याचें नुसतें शोषण हें त्याचें ध्येय नव्हे, आत्म्याचें अमरत्व अनुभवणें हेंच या मार्गाचें उद्दिष्ट आहे." [६४]

६४. Gorakhnath : Dr. Mohansingh, pp. 26–29.

**'युगप्रवर्तक' महापुरुष :**

गोरक्षनाथ ही मध्ययुगीन भारतांतील एक प्रभावी शक्ति होती. त्याची संघटनशक्ति अपूर्व होती. मध्ययुगीन भारतांत गोरक्षाइतकें श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व असलेला दुसरा पुरुष आढळणार नाहीं. स्फटिकासारखें निष्कलंक चारित्र्य व कुशाग्र बुद्धिमत्ता यामुळें त्याचें तेज वाढलें होतें. त्या काळांत भारतीय साधना अधःपतित झाली होती. गोरक्षनाथानें मृत्युंजयी निग्रहानें आणि वज्रकठोर सत्यनिष्ठेनें भारतीय साधनेचें उत्थान घडविलें आणि तिच्यांत नवी प्राणशक्ति ओतली. रूढींवर आणि कुरीतींवर आघात करतांना त्यानें 'वज्रादपि कठोर' वृत्ति दाखविली. तो स्वतः एक महापंडित असूनहि, ग्रंथ हें लक्ष्य नसून साधन आहे, याची त्यानें सदैव जाणीव ठेवली. सत्यनिष्ठेपायीं आवश्यक तेव्हां त्यानें लोकांशीं व वेदांशींहि विरोध दर्शविला. व्यर्थ लोकानुनय करून लोकप्रियता मिळविण्याच्या लालसेपायीं त्यानें आपल्या सत्यनिष्ठेला शबलित बनविलें नाहीं. मात्र चांगल्या गोष्टीच्या ग्रहणाकरितां तो सदैव तत्पर असे – त्या बाबतींत त्याच्या मनांत कधींहि अहंता उद्भवली नाहीं.

गोरक्षनाथानें भारतीय साधनेचें शुद्धीकरण केलें आणि उत्तरकालीन अनेक महापुरुषांच्या जीवनकार्यांच्या प्रेरणा निर्माण केल्या, ही एकच गोष्ट गोरक्षनाथाची योग्यता सिद्ध करण्यास पुरेशी आहे. त्याचें जीवन व कार्य ही मध्ययुगीन साधनेची गंगोत्री आहे. त्यानें योगमार्गाला अत्यंत व्यवस्थित रूप दिलें; शैवप्रत्यभिज्ञादर्शनांतील सिद्धान्तांच्या आधारावर अत्यंत विस्कळित काया-योगाच्या साधनांचें व्यवस्थापन केलें; आत्मानुभूति आणि शैव परंपरा यांच्या समन्वयांतून चक्रसंख्या निश्चित केली; त्या काळीं सर्वत्र प्रचलित असलेल्या वज्र-यानी साधनांतील पारिभाषिक शब्दांचा अभिधामूलक चमत्कारिक अर्थ बदलून त्यांना पारमार्थिक रूप दिलें आणि तत्कालीन साधनेचा बंडखोर पिंड कायम ठेवून त्याचें विकृत अंतरंग परिवर्तित केलें. गोरक्षनाथाचा विराट् आत्मा चक्रधराच्या नाडींतून वाहतो आहे, ज्ञानेश्वरांच्या श्वसनांतून दर्वळतो आहे, कबीराच्या कंठांतून हुंकारतो आहे, नानकाच्या समदृष्टींतून वरसत आहे आणि समग्र संतवाणींतून गंगेसारखा धांवत आहे.

• • •

# : ३ : काहीं प्राचीन नाथसिद्धांचा परिचय

**नवनाथ :**

'नाथपंथ' हा विषय पुढें आला कीं 'नवनाथ' आणि 'चौऱ्यायशीं सिद्ध' या नाथ-सिद्ध-संख्या पुढें येतात. नाथपंथाचे असे विवक्षित नऊ प्रमुख नाथ आणि चौऱ्यायशीं सिद्ध होते काय? या गणनेचें प्रयोजन काय? या गणनेचा प्रारंभ केव्हांपासून झाला? 'नव' आणि 'चौऱ्यायशीं' ('चौ-रासी'?) हीं पदें संख्यावाचकच मानावयाचीं काय? अशा शंका मनांत जाग्या होतात. प्राप्त सामग्रींतून या शंकांचें निरसन होतें काय, तें पाहूं.

(१) 'नवनाथभक्तिसार' या सांप्रदायिक मराठी पुराण-ग्रंथांत नवनाथ (९ नाथ) हे नव-नारायणांचे अवतार मानले आहेत[1] –

| | |
|---|---|
| १. कविनारायण : मत्स्येंद्रनाथ | ५. पिप्पलायन : चर्पटीनाथ |
| २. हरिनारायण : गोरक्षनाथ | ६. अविर्होत्र : नागनाथ |
| ३. अन्तरिक्षनारायण : जालंधरनाथ | ७. द्रुमिलनारायण : भरथरीनाथ |
| ४. प्रबुद्धनारायण : कानीफनाथ | ८. चमसनारायण : रेवणनाथ |

९. करभाजन : गहिनीनाथ

– 'योगिसम्प्रदायाविष्कृति' या ग्रंथांतहि ही नवनारायणांच्या अवतारांची कल्पना स्वीकारलेली आहे.[2] पण त्या नवनाथांत गोरक्षाचा समावेश नाहीं. आणि हरिनारायण = भरथरीनाथ व द्रुमिलनारायण = गोपीचंद्रनाथ असें मानलें आहे.

(२) 'नवनाथचारित्रमु' या तेलगू ग्रंथांत (इ. स. १४००) पुढील-प्रमाणें नवनाथ-गणना आहे[3] –

---

१. नवनाथभक्तिसार, १. २७–४३.

२. नाथ संप्रदाय, पृ. २५.

३. तेलुगु और उसका साहित्य, पृ. २८.

| | | |
|---|---|---|
| १. शिवनाथ | ४. गोरक्षनाथ | ७. सिद्धबुद्ध |
| २. मीननाथ | ५. मेघनाद | ८. विरूपाक्ष |
| ३. सारंगधर | ६. नागार्जुन | ९. कणिक |

– 'गोरक्षसिद्धांतसंग्रह' या ग्रंथांत दोन गणना दिलेल्या आहेत[४] –

| | | | |
|---|---|---|---|
| (३) | १. आदिनाथ | ४. दण्डनाथ | ७. कूर्मनाथ |
| | २. मत्स्येंद्रनाथ | ५. सत्यनाथ | ८. भवनार्जि |
| | ३. उदयनाथ | ६. संतोषनाथ | ९. गोरक्षनाथ |
| (४) | १. गोरक्षनाथ | ४. नागार्जुन | ७. देवदत्त |
| | २. जगन्नाथ | ५. सहस्त्रार्जुन | ८. जडभरत |
| | ३. जलंधर | ६. दत्तात्रेय | ९. मत्स्येंदर |

– 'सुधाकरचंद्रिके' मधील नवनाथ-गणनेचें 'गोरक्षसिद्धांतसंग्रहां'तील पहिल्या (क्र. ३) गणनेशीं साम्य आहे[५] – फक्त 'भवनार्जि' हें नांव त्यांत नसून 'एकनाथ' हें निराळेंच नांव गणनेच्या प्रारंभींच आहे.

– 'महार्णवतंत्रां'तील नवनाथांची गणना व 'गोरक्षसिद्धांतसंग्रहां'तील दुसरी (क्र. ४) गणना सर्वथा एकच आहे.[६]

(५) नेपाळ परंपरेंतील नांवें तर अगदींच भिन्न आहेत[७] –

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाश | ४. ज्ञान | ७. स्वभा |
| २. विमर्श | ५. सत्य | ८. प्रतिभा |
| ३. आनंद | ६. पूर्ण | ९. सुभग |

(६) राजाराम प्रसादीनें 'भक्तमंजरीमाले'त जें 'नवनाथचरित्र' गायिलें आहे, त्यांत ज्ञानेश्वरोत्तर परंपरेंतील नवनाथांचीं नांवें आहेत[८] –

| | | |
|---|---|---|
| १. सत्यामलनाथ | ४. उद्बोधनाथ | ७. नरहरीनाथ |
| २. गैबीनाथ | ५. केसरीनाथ | ८. लक्ष्मणनाथ |
| ३. गुप्तनाथ | ६. शिवदिननाथ | ९. मल्हारनाथ |

---

४. गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. ४०, ४४–४५.

५. नाथ संप्रदाय, पृ. २५.

६. नाथ संप्रदाय, पृ. २४.

७. नाथ संप्रदाय, पृ. २५.

८. भक्तमंजरीमाला, खं. २, अ. ३१–३४, पृ. २८२–३१३.

—शाक्त, कापालिक, कौल आदि तांत्रिकांच्या ग्रंथांतून ज्या सिद्ध-गणना आहेत ( षोडषनित्यतंत्र, ललितासहस्रनाम, कौलावलीतंत्र, श्यामारहस्य ), त्या गणनांतील ८, १२, १४ अशा संख्यांत मत्स्येंद्र-गोरक्षादि कांहीं नाथ-सिद्धांचाहि समावेश आहे.[९]

( ७ ) नवनाथ-गणनेचा एक सांप्रदायिक श्लोक रूढ आहे, त्यांतील नांवें अशीं आहेत[१०] —

| | | |
|---|---|---|
| १. गोरक्षनाथ | ४. अडबंगनाथ | ७. चौरंगीनाथ |
| २. जालंधरनाथ | ५. कानीफनाथ | ८. रेवणनाथ |
| ३. चर्पटीनाथ | ६. मत्स्येंद्रनाथ | ९. भरथरीनाथ |

( ८ ) शिवदिन मठांत प्रचलित असलेली नवनाथ-गणना :

| | | |
|---|---|---|
| १. आदिनाथ | ४. संतोषनाथ | ७. मच्छींद्रनाथ |
| २. उदोनाथ | ५. गणेशनाथ | ८. गोरक्षनाथ |
| ३. सत्यनाथ | ६. कार्तिकनाथ | ९. चौरंगीनाथ |

यांतील पहिल्या ६ नांवांचें देवतावाचक स्पष्टीकरण दिलें जातें.[११]

( ९ ) 'कदलीमंजुनाथमाहात्म्यां'त पुढील नवनाथ वर्णिले आहेत[१२] :

| | | |
|---|---|---|
| १. मीननाथ | ४. कोङ्कणनाथ | ३. जलंधरनाथ |
| २. कंथडीनाथ | ५. विरूपाक्षनाथ | ८. चौरंगीनाथ |
| ३. गोरक्षनाथ | ६. अनंगनाथ | ९. अरुणाचलनाथ |

वरील विविध नवनाथ-गणनांवरून हें स्पष्ट होईल कीं, त्यांतील कांहीं नांवें सर्व गणनांत साधारण असलीं तरी त्या गणनांत साम्य नाहीं. तेव्हां अमुकच नऊ नाथ आद्य नाथसिद्धांपैकीं प्रमुख होते, असें वाटत नाहीं. निरनिराळ्या परंपरांत स्थानिक महत्त्वानुसार व कमीजास्त आदरभावनेनुसार या गणना झाल्या असाव्यात, हें उघड आहे.

९. नाथ संप्रदाय, पृ. २६–२७.

१०. "गोरक्षजालंदरचर्पटाश्च अड्बंगकानीफमछिंदराद्याः ।
चौरंगिरेवाणकभर्त्रिसंज्ञाः भूम्यां बभूवुर्नवनाथसिद्धाः ॥ "

११. नाथसंप्रदायाचा इतिहास : सरदार मिरीकर ( हस्तलिखित : सरदार मुजुमदार संग्रह ).

१२. कदलीमञ्जुनाथमाहात्म्य, प्रस्तावना पृ. ५–७.

ही नवनाथ-गणनेची कल्पना केव्हां उद्भवली, त निश्चित सांगतां येणार नाहीं. ज्ञानेश्वर-मंडळांत कोणीं 'नवनाथां'चा उल्लेख केला नाहीं. ज्ञानेश्वरींत आदिनाथ-मत्स्येंद्रनाथ-गोरक्षनाथ-चौरंगीनाथ-गहिनीनाथ हींच ज्ञानेश्वरपूर्व पांच नांवें आहेत.[13] मात्र ज्ञानेश्वरांच्या परंपरेंतील शिवदिनासारखे उत्तरकालीन नाथ 'नवनाथां'चा निर्देश करतात.[14] दिनकरस्वामींनीं 'स्वानुभवदिनकरां'त नवनाथ-निर्देश केला आहे.[15] ज्ञानेश्वर-समकालीन महानुभाव कवि दामोदर पंडित यानें एका नाथपंथी जोग्यासमोर "नवनाथ कहे सो नाथपंथी" ही चौपदी रचून गायिल्याचा उल्लेख हरिबास-सोंगोबास-कृत 'अन्वयस्थळां'त आहे.[16] प्रत्यक्ष 'गोरखबानीं'त "नौ नाथ नै चौरासी सिद्धा" असा स्पष्ट उल्लेख आला आहे.[17] यावरून ही गणना-पद्धति बरीच जुनी आहे, असें ठरतें.

'नवद्वारां'चे अधिष्ठाते ते नवनाथ, अशा विचारसरणींतून नवनाथ-कल्पनेचा उगम झाला असावा. पुढें ज्याला जे नाथ आदरणीय वाटले, ते 'नऊ' या संख्येंत बसवून, त्यानें आपली 'नवनाथसूचि' सिद्ध केली असणार. सप्तमनु, सप्तर्षि, अष्टछाप, नवनारायण, त्रेसष्ट सिद्ध ( तामीळ शैव ) इत्यादि गणनां-प्रमाणेंच ही 'नवनाथ'-गणना आहे.

## चौऱ्यायशीं सिद्ध :

'चौऱ्यायशीं सिद्ध' ही सिद्धगणना मूळची वज्रयानी परंपरेंतील आहे; गोरक्ष-प्रभावानें वज्रयान्यांचे समूहच्या समूह नाथपंथांत प्रविष्ट झाले. त्या पूर्व-वज्रयानी नाथपंथीयांनीं आपल्या पूर्वीच्या परंपरांतील सिद्धपुरुषांची आणि नंतर स्वीकारलेल्या नाथपंथांतील सिद्धपुरुषांची नामावळी मिश्रित केली आणि नव-नाथांप्रमाणेंच नाथपंथाचीहि विवक्षित सिद्धगणना सुरू झाली.

चौऱ्यांशीं सिद्धांचा सिद्धबेटीं मेळा ।
तो सुखसोहळा काय सांगूं ॥ – नामदेव

---

१३. ज्ञानेश्वरी, १८. १७५२–५७.
१४. ज्ञानप्रदीप, ओ. ५४७, पृ. ५३.
१५. स्वानुभवदिनकर, ९. २. ३२.
१६. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अं. १०६ ( सप्टेंबर १९५३ ), पृ. २६.
१७. गोरखबानी, पद ३८, पृ. १३३.

चौऱ्यांशीं सिद्धांचा सिद्धबेटीं मेळा ।
प्रत्यक्ष स्थापिला कल्पवृक्ष ॥ – एकनाथ
नवनाथ चौन्ह्याशीं सिद्ध । योगसिद्धी थोरावले ॥
– दिनकरस्वामी

असे मराठींतहि या सिद्ध-गणनेचे उल्लेख आढळतात. परंतु त्यांचीहि स्थिति 'नवनाथ-गणने'प्रमाणेंच आहे. चौऱ्यायशीं सिद्धांच्या विविध गणना आढळतात. त्यांत अनेक नामें समान असलीं, तरी बरींच वेगवेगळींहि आहेत. सरदार मिरीकरांच्या मतें 'चौऱ्यायशीं' हा शब्द ८४ संख्यावाचक नसून 'चौ-रासी' असा असून सिद्धांच्या चार राशींचा – चतुर्विध साधकांचा – या 'चौ-रासी' शब्दांत निर्देश असावा. परंतु ही कल्पना प्राप्त सामग्रीवरून सिद्ध होत नाहीं.

पुढें 'चौऱ्यायशीं सिद्धां'च्या कांहीं गणना दिल्या आहेत. त्यांच्या एकत्र निरीक्षणांतून अभ्यासकांना कांहीं ऐतिहासिक तथ्यें शोधून काढणें शक्य होईल.

**चौऱ्यायशीं सिद्ध : वज्रयानी ( पं. सांकृत्यायन-संकलित[१८] )**

| | | |
|---|---|---|
| १ लूहिपा | १४ चमरिपा | २७ कालपा |
| २ लीलापा | १५ खड्गपा | २८ धोम्भिपा |
| ३ विरूपा | १६ नागार्जुन | २९ कंकणपा |
| ४ डोम्भिपा | १७ कण्हपा | ३० कमरिपा |
| ५ शबरीपा | १८ कर्णरिपा ( आर्यदेव ) | ३१ डेंगिपा |
| ६ सरहपा | १९ थगनपा | ३२ भदेपा |
| ७ कंकालीपा | २० नारोपा | ३३ तंधेपा |
| ८ मीनपा | २१ शलिपा ( शीलपा ) | ३४ कुकुरिपा |
| ९ गोरक्षपा | २२ तिलोपा | ३५ कुचिपा |
| १० चोरंगीपा | २३ छत्रपा | ३६ धर्मपा |
| ११ वीणापा | २४ भद्रपा | ३७ महीपा |
| १२ शांतिपा | २५ दोखंधिपा | ३८ अचिंतिपा |
| १३ तंतिपा | २६ अजोगिपा | ३९ भलहपा |

१८. 'गंगा' : पुरातत्त्वांक, १९३३, पृ. २१४–२२६.

| | | |
|---|---|---|
| ४० नलिनपा | ५५ गुंडरिपा | ७० धहुलिपा |
| ४१ भुसुकपा | ५६ लुचिकपा | ७१ उधलिपा |
| ४२ इंद्रभूति | ५७ निर्गुणपा | ७२ कपालपा |
| ४३ मेकोपा | ५८ जयानंत | ७३ किलपा |
| ४४ कुठालिपा | ५९ चर्पटीपा | ७४ सागरपा |
| ४५ कर्मारपा | ६० चम्पकपा | ७५ सर्वभक्षपा |
| ४६ जालंधरपा | ६१ मिखनपा | ७६ नागबोधिपा |
| ४७ राहुलपा | ६२ भलिपा | ७७ दारिकपा |
| ४८ घर्वरिपा | ६३ कुमरिपा | ७८ पुतुलिपा |
| ४९ धोकरिपा | ६४ चवरिपा | ७९ पनहपा |
| ५० मेदनीपा | ६५ मणिभद्रा | ८० कोकालिपा |
| ५१ पंकजपा | ६६ मेखलापा | ८१ अनंगपा |
| ५२ घंटापा | ६७ कनखलापा | ८२ लक्ष्मीकरा |
| ५३ जोगीपा | ६८ कलकलपा | ८३ समुदपा |
| ५४ चेलुकपा | ६९ कंतालिपा | ८४ भलिपा |

## चौऱ्यायशीं सिद्ध : 'नाथ' – ( 'वर्णरत्नाकरां'तून संकलित[१९] )

| | | |
|---|---|---|
| १ मीननाथ | १२ कमारी | २३ दौली |
| २ गोरक्षनाथ | १३ कान्ह | २४ भिषाल |
| ३ चौरंगीनाथ | १४ कनखले | २५ अचिति |
| ४ चामरीनाथ | १५ मेखल | २६ कचम्प |
| ५ तंतिपा | १६ उन्मन | २७ ढेण्टस |
| ६ हालिपा | १७ कांडलि | २८ भुम्बरी |
| ७ केदारिपा | १८ धोबी | २९ बाकलि |
| ८ धोंगपा | १९ जालंधर | ३० तुजि |
| ९ दारिपा | २० टोंगी | ३१ चर्पटि |
| १० विरुपा | २१ मवह | ३२ भादे |
| ११ कपालि | २२ नागार्जुन | ३३ चाँदन |

---

१९. नाथ संप्रदाय, पृ. २२–२६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २४९७६ वि: चरित्र
क्रमांक २०१ दि: २२१ २०।८



३४ कामरी
३५ करवत
३६ धर्मपापतंग
३७ भद्र
३८ पातालिभद्र
३९ पलिहिह
४० भानु
४१ मीन
४२ निर्दय
४३ सबर
४४ सांति
४५ भर्तृहरि
४६ भीषण
४७ भटी
४८ गगनपा
४९ गमार
५० मेनुरा
७६ मुरुकुटि
५१ कुमारी
५२ जीविन
५३ अघोसाधव
५४ गिरीवर
५५ सियारी
५६ नागवालि
५७ विभवत्
५८ सारंब
५९ विविक्धिन
६० मगरधज
६१ अचित
६२ विचित
६३ नेचक
६४ चाटल
६५ नाचन
६६ भीलो
६७ पाहिल
६८ पासल
६९ कमल-कंगारि
७० चिपिल
७१ गोविंद
७२ भीम
७३ भैरव
७४ भद्र
७५ भमर
७६ मुरकुटि

### चौऱ्यायशीं सिद्ध : 'नाथ' ( शिवदिन-मठ-संग्रह[२०] )

१ आदि
२ उमा
३ मिनी
४ चौरंगी
५ गोरखि
६ संति
७ तांति
८ चामारि
९ इलुलुवा
१० मीलुवा
११ डोंबी
१२ सदसौरी
१३ कंकाळी
१४ कोकिनी
१५ कांवळी
१६ ढेकी
१७ भाळी
१८ टेटिणी
१९ कुकरी
२० खुजी
२१ पास
२२ विवर्जित
२३ धामस
२४ धोनड
२५ उन्मत्त
२६ बुढी
२७ मीकी
२८ कुदळी
२९ हाडी
३० जालांधरी राऊळ
३१ धुधुःकारी
३२ मेदिनी
३३ पंकज

---

२०. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त : शके १८३६, पृ. ७५–७६.

३४ घंटा
३५ जेजत
३६ गुंडम राऊळ
३७ चौकी
३८ खडकी
३९ नागार्जुन
४० कान
४१ कनेरी
४२ टेकीन
४३ नाळी
४४ साळी
४५ इंडु
४६ चाटी
४७ भाटी
४८ दुखंडी
४९ आदित्य
५० पाबळी
५१ धोबी
५२ निर्गुण
५३ जलधो
५४ चर्पटी
५५ चंपक
५६ डेकिन
५७ तेली
५८ कुंभारी
५९ भद्रिक
६० कनखळी
६१ मेखळी
६२ कंथई
६३ दंडळी
६४ डोळी
६५ वोडी
६६ कपाळी
६७ गिरिवर
६८ सागर
६९ सर्वभक्षक
७० हनुमंत
७१ दारि
७२ कोकिळ
७३ मेंडुकी
७४ अनुभवी
७५ सुतळी
७६ निळक्षित
७७ शब्दवेवाळी

**'तत्त्वसारां'तील सिद्धनामावळी[२१] :**

१ आदिनाथ
२ मछिंद्र
३ चौरंगी
४ श्रीगोरक्षनाथ
५ श्रीमुक्तादेवी
६ चक्रपाणि
७ जळांधर
८ मेडुकि
९ कंथडि
१० धुंधडी
११ कापडि
१२ विरूपाक्ष
१३ सर्वसुसावेरी
१४ नागार्जुन
१५ कणेरी
१६ लुइलाला
१७ कुकरि
१८ रत्नघोष
१९ कान्हु
२० कुदाळि
२१ दारिपु
२२ कलालि
२३ भुसकु
२४ कांबळी
२५ कोरंटक
२६ चर्पटि
२७ कर्पटि
२८ कांसारि
२९ चाटु
३० भाटु
३१ कुंभारी
३२ कनखळु
३३ मेखळु

---

२१. तत्त्वसार, ओ. ८६५–८८१, पृ. २६–२८.

३४ चमारि
३५ साति
३६ तांति
३७ घटामहिष
३८ चोखली
३९ सर्वभक्षक
४० सिद्ध वरली
४१ काश्यप
४२ चिहाळी
४३ घट्ट
४४ मनाक्षु
४५ पंकज
४६ दुखंडि
४७ लिंचका
४८ फरखंडि
४९ कवाडि
५० निर्गुण भंगी
५१ कुमुदु
५२ गुडरी
५३ वोडिका
५४ कावेरी
५५ पाह्याणु
५६ सागरी
५७ अनपा बोधि
५८ गुंडम राऊळ
५९ शबरी
६० मनु
६१ अजागिरी
६२ जिराबाई
६३ खेचरी
६४ देमादेवी
६५ भादु
६६ माह्रिलु
६७ चिंचणी
६८ धामु
६९ धूम्र
७० टिंटिणी
७१ अतिबळ
७२ महाबळ
७३ माथणी
७४ गोविंदचंदु
७५ बोधि
७६ जैनंदु
७७ कपाळि
७८ सोमचंद्
७९ भर्तुरि
८० विजयचंद्
८१ ताल्हा तेलि
८२ चंडाळि
८३ हाडि
८४ डोंकि
८५ घोडाचुळि
८६ गोदाइ
८७ थाकडि
८८ विमळनाथ
८९ वणकाकळि
९० षडगु
९१ कोकावाळि
९२ मेदाडि
९३ सुतली
९४ हरिध –
(अपूर्ण नांव)

'तत्त्वसारां' त ओव्या ८६५ ते ८८१ यांत हीं नांवें आलीं आहेत. ८८१ च्या पुढील ओवींतील 'हरिध –' एवढेंच अपूर्ण नांव उपलब्ध आहे. पुढें क्र. ९१२ पर्यंतच्या ओव्या नष्ट झाल्या आहेत. त्यामुळें ही यादी कोठपर्यंत चालू राहिली असेल, हें सांगतां येत नाहीं. 'जळंधर' व 'सर्वभक्षक' हीं दोन नांवें पुनरावृत्त झालीं आहेत. अनेक नांवांचें स्वरूप लेखनदोषांमुळें विकृत झालेलें दिसतें. त्यामुळें नाम-निश्चिति संदिग्ध आहे.

**'हठयोगप्रदीपिकें'तील सिद्धनामावळी[२२] :**

| | | |
|---|---|---|
| १ आदिनाथ | ११ सिद्धबुद्ध | २१ कपालीनाथ |
| २ मत्स्येंद्रनाथ | १२ कंथडीनाथ | २२ बिंदुनाथ |
| ३ शाबरानन्द | १३ कोरंटकनाथ | २३ काकचंडीश्वर |
| ४ भैरव | १४ सुरानंद | २४ अल्लम प्रभुदेव |
| ५ चौरंगीनाथ | १५ सिद्धपाद | २५ घोडाचोली |
| ६ मीननाथ | १६ चर्पटीनाथ | २६ टिंटिणी |
| ७ गोरक्षनाथ | १७ कानेरीनाथ | २७ भानुकी |
| ८ विरूपाक्ष | १८ पूज्यपाद | २८ नारदेव |
| ९ बिलेशय | १९ नित्यनाथ | २९ खण्डकापालिक |
| १० मंथानभैरव | २० निरंजननाथ | |

या सिद्धगणांपैकीं चौरंगीनाथ, चामरीनाथ, तंतिपा, दारिपा, विरूपा, कामरी, कनखल, मेखल, धोबी, नागार्जुन, अचिति, चम्पक, ढेण्टस, चुणकर, भादे, धर्मपा, भद्रपा, सबर, सान्ति, कुमारी, सियारी, कमलकंगारी, चर्पटी हे गोरक्षनाथाचे समकालीन असावे, अशी डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांची कल्पना आहे.[२३] पुढें जालंधरनाथ, कृष्णपाद, चौरंगीनाथ, चर्पटीनाथ आणि भर्तृहरि यांच्याविषयींचे उपलब्ध उल्लेख केवळ संकलित केले आहेत. वरील सिद्धगणांपकीं अनेकांविषयीं पंथीय वाङ्मयांत व दन्तकथांत भरपूर उल्लेख आहेत. अशा उल्लेखांची एकत्र जुळवाजुळव करून आणि त्यांची सूक्ष्म छाननी करून त्यांचा परिचय करून देणें शक्य आहे. परन्तु तें काम अत्यन्त जिकिरीचें आणि दीर्घ मुदतीचें आहे. या पुस्तकाच्या पृष्ठमर्यादेंत तो प्रपंच अशक्य आहे. उत्तरकालीन कांहीं उत्तरभारतीय नाथसिद्धांचा ( पृथ्वीनाथ, गरीबनाथ, आमनाथ, टीकारामनाथ, इ. ) परिचयहि मीं येथें देण्याचें टाळलें आहे. एक तर त्यांची कालनिश्चिति झालेली नाही आणि दुसरें म्हणजे त्यांच्या गुरुपरंपरांचे धागेहि संप्रदायाच्या आदिकालापर्यंत जोडतां येत नाहींत.

---

२२. हठयोगप्रदीपिका, १. ५–८.

२३. नाथ संप्रदाय, पृ. १२७.

**जालंधरनाथ :**

" जालंधरनाथ हा मत्स्येंद्रनाथाचा गुरुबंधु. परंतु तिबेटी परंपरेंत जालंधरनाथ हा मत्स्येंद्राचा गुरु मानला जातो. तिबेटी परंपरेनुसार नगरभोग देशांत ब्राह्मण कुलांत याचा जन्म झाला. नंतर हा उत्तम पंडित बनला. घंटापादाचा शिष्य कूर्मपाद याच्या संगतींत येऊन त्याचा शिष्य बनला. मत्स्येंद्रनाथ, कण्हपा (कृष्णपाद) व तंतिपा हे त्याच्या शिष्यांपैकीं होते. भोटिया ग्रंथांत याला आदिनाथहि मानलें आहे. तनजूरमध्यें यानें लिहिलेल्या सात ग्रंथांचा उल्लेख आहे, त्यांपैकीं दोन राहुलजींच्या मतें मगही भाषेंत लिहिलेले आहेत : ( १ ) विमुक्त-मंजरी-गीत, ( २ ) हुंकराचित्तबिंदुभावनाक्रम. डॉ. कांद्येनें तनजूरांतील बौद्धतंत्र-ग्रंथांची एक तालिका फ्रेंच भाषेंत प्रकाशित केली आहे, तींत ( पृ. ७८ ) सिद्धाचार्य जालंधरिपाद-लिखित एका टिप्पणी-ग्रंथाचेंहि नांव आहे. सरोरुहपादाचा प्रसिद्ध तंत्रग्रंथ 'हेवज्रसाधन' यावरील या टिप्पणी-ग्रंथाचें नांव आहे 'शुद्धिवज्रप्रदीप'. हीं सर्व पुस्तकें कायायोगाशीं संबद्ध आहेत. असेंहि प्रसिद्ध आहे कीं, हा पंजाबांतील जालंधरपीठनामक तांत्रिक पीठांत उत्पन्न झाला होता. एका दुसऱ्या परंपरेनुसार हा हस्तिनापूरचा पुरुवंशी राजा बृहद्रथ याच्या यज्ञाग्नीतून उत्पन्न झाल्यामुळें याचें नांव ज्वालेंद्रनाथ पडलें होतें. अशा प्रकारें नगरभोग, हस्तिनापूर आणि जालंधरपीठ अशा तीन स्थानांचा उल्लेख तीन विभिन्न परंपरा करतात. त्याच्या जातीसंबंधींहि असाच वाद आहे. तिबेटी परंपरेनुसार जालंधरनाथ ब्राह्मण आहे. बंगाली परंपरेनुसार तो हाडी किंवा हलखोर ( भंगी ) आणि योगीसंप्रदाया-विष्कृतीनुसार क्षत्रिय मानला जातो.

" जालंधर नांवावरुन असें अनुमान करणें शक्य आहे कीं, जालंधर पीठांत याचा जन्म वा साधना झाली असावी. हठयोगग्रंथांत एका बंधाचें नांवहि जालंधर आहे. उड्डियानबंध हा उड्डियानपीठसंबद्ध असावा. डॉ. भट्टाचार्यांच्या मतें हें उड्डियान उडिसांत असावें. डॉ. बागची यांच्या मतें उड्डियान वस्तुतः स्वात-उपत्यकांतच आहे आणि तें जालंधरपीठाच्या जवळपास आहे. जालंधराचा या दोन्ही पीठांशीं संबंध असावा. कारण, उड्डियानमध्यें ज्वालेंद्रनामक राजा असल्याचा उल्लेख मिळतो. हा राजाच पुढें महासिद्ध बनला. तारानाथानें उड्डियान देशाचे दोन भाग सांगितले आहेत : संभल व लंकापुरी हे ते दोन भाग. अनेक तिबेटी व चिनी ग्रंथांत या लंकापुरीची चर्चा येते. संभलपुरीचा राजा इंद्रभूति

व लंकापुरीचा ज्वालेंद्र. याच ज्वालेंद्राच्या मुलाशीं इंद्रभूतीच्या बहिणीचें लग्न झाले होतें. परंतु ज्वालेंद्र म्हणजेच जालंधर आहे काय, याचा निर्णय करणें कठीण आहे." [२४]

जालंधरशिष्य कण्हपा हा कापालिक होता. स्कंदपुराणांत नवनाथवर्णनांत जालंधराचा उल्लेख आहे. नवनाथभक्तिसारांत जालंधरकथा आहे. 'गोरक्ष-सिद्धांत-संग्रह' या ग्रंथाच्या आरंभीं जालंधराला वंदन केलें आहे. जालंधरिपा संप्रदायाचा जालंधर हा प्रवर्तक आहे. जालंधर व कण्हपा यांचा पंथ मत्स्येंद्र-गोरक्ष परंपरेहून भिन्न होता. परंतु नंतर गोरक्षनाथी परंपरेंत जालंधरपंथ अंतर्भूत झाला. जालंधर हा अंतरिक्षनारायणाचा अवतार मानतात. वर्णरत्नाकरांतील नाथसिद्धांत जालंधरनाथ हा १९ वा व व्रजयान-सिद्धांमध्यें ४६ वा आहे. तिबेटी परंपरेनुसार हा देवपाल-समकालीन मानला जातो. हाडिपा नामक वंगीय सिद्ध म्हणजेच जालंधर, असें बंगाली परंपरेंत मानलें जातें. [२५] पं. गोपीनाथ कविराज यांच्या मतें जालंधर हा भर्तृहरीचाहि गुरु असावा. [२६]

जालंधर हा कापालिक साधना-परंपरेंतील असून नंतर तो नाथ संप्रदायांत प्रविष्ट झाला असावा. कदाचित् गोरक्ष-प्रभावकाळांत हा हयात नसेलहि. त्याचा पंथ नाथ संप्रदायांत समाविष्ट झाल्यानें उभय पंथांच्या प्रमुखांचीं चरित्रें एकत्र जोडलीं गेलीं असतील. 'लीळाचरित्रां'त गोविंदचंद्राचा उपदेशक व कान्हाचा गुरु म्हणून जालंधराचा उल्लेख आला आहे. [२७] गोविंदचंद्राच्या पुतळ्यांना जालंधरानें भस्मसात् केल्याची कथा लीळाचरित्रांत आहे. तसेंच विविध संतमालिकांतून जालंधराचा उल्लेख आढळतो.

**कृष्णपाद :**

"हा जालंधरनाथाचा प्रधान शिष्य होय. कण्हपा, कान्हपा, कानपा, कानफा इत्यादि नांवांनीं तो परिचित आहे. तिबेटी परंपरेच्या आधारें राहुलजींनीं याला कर्णाटदेशीय ब्राह्मण मानलें आहे; पण डॉ. भट्टाचार्यांनीं याला

---

२४. नाथ संप्रदाय, पृ. ७७.

२५. History of Bengali Language and Literature by D. C. Sen, p. 73.

२६. Saraswati Bhavan Studies, Vol. VI, p. 28.

२७. लीळाचरित्र, उत्तरार्ध ली. ४१८, पृ. २३७–३९.

उडियाभाषी 'जुलाहा' म्हटलें आहे. कृष्णवर्णामुळें कृष्णपाद नांव पडलें आहे. देवपालाच्या ( ८०९-८४९ ) काळांत कृष्णपाद पंडितभिक्षु होता व अनेक दिवस सोनपुरी विहारांत ( पहाडपूर, जि. राजशाही, बंगाल ) राहत होता. पुढें तो जालंधराचा शिष्य बनला. नाथांच्या चौऱ्यायशी सिद्धांमध्यें कवित्व आणि विद्या दोन्ही दृष्टींनीं हा सर्वश्रेष्ठ होता. चौऱ्यायशीं सिद्धांत याचे ७ शिष्य होते. त्यांपैकीं कनखला व मेखला या दोन योगिनी होत्या. म. म. हरप्रसाद शास्त्रीजींनीं लिहिलें आहे – ' याचीं ५७ पुस्तकें व १२ संकीर्तनपदें उपलब्ध आहेत. कृष्णपाद व कृष्णाचार्य या नांवाचे अनेकजण होऊन गेले. महाचार्य, महासिद्धाचार्य, उपाध्याय, मंडलाचार्य आदि पदांनीं ते संमानित होते. ' ( बौ. गा. २४ ).

" राहुलजींच्या कथनानुसार तनजूरमध्यें याचे दर्शनपर ६ व तंत्रपर ७४ ग्रंथ आहेत. दर्शनग्रंथांत यानें शांतिदेवाच्या 'बोधिचर्यावतारा'वर ' बोधिचर्यावतारदुःखबोधपदनिर्णय ' नामक टीका लिहिली होती. त्यांतील भाषेवरून याला डॉ. भट्टाचार्य उडियाभाषी, शास्त्रीजी बंगालीभाषी व राहुलजी मगहीभाषी मानतात. राहुलजींनीं त्याचे खालील ग्रंथ मगही भाषेंत लिहिलेले म्हणून सांगितले आहेत – ( १ ) काण्हपादगीतिका ( २ ) महाढुण्ढनमूल ( ३ ) वज्रगीति ( ४ ) वसंततिलक ( ५ ) असंबद्धदृष्टि ( ६ ) दोहाकोश. 'बौद्धगान'-मध्यें 'दोहाकोश' ( ३२ दोहे ) व त्यावरील संस्कृत टीका छापली आहे. 'साधनमाले'त कुरुकुल्लादेवीच्या साधनेच्या प्रवर्तकांत कृष्णपादालाहि स्थान आहे." [२८]

## चौरंगीनाथ :

चौरंगीनाथ हा मत्स्येंद्रनाथाचा शिष्य. मत्स्येंद्रनाथाच्या शिष्यांत गोरक्षनाथ प्रमुख असला, तरी चौरंगीनाथहि अज्ञात नाही. " सावत्र आईच्या अवकृपेनें हस्तपादविहीन झालेला हा भारताच्या पूर्वभागांतील देवपाल राजाचा पुत्र 'चौरंगी' नांवानें प्रसिद्ध आहे. मीननाथ देशभ्रमण करीत असतां चौरंगीनाथाजवळ आला आणि त्यानें त्याला दीक्षादान केलें. त्याचा सांभाळ करण्याची जबाबदारी एका माणसावर सोंपविली. पुढें हेंच बालक 'चौरंगीनाथ' नांवानें ख्यात झालें. चौरंगीनाथाला द्वादश वर्षांच्या ध्यानावस्थेनंतर सिद्धिलाभ झाला आणि त्याला त्याचे हातपाय पूर्ववत् प्राप्त झाले." अशी याची कथा आढळते.

---

२८. नाथ संप्रदाय, पृ. ८०-८१.

डॉ. मोहनसिंगांच्या मतें तो सालवाहनाचा पुत्र व गोरक्ष-मत्स्येंद्राचा शिष्य होय. पंजाबांतील इतिवृत्तानुसार या सालवाहन-पुत्राचें नाम पूरणभगत होतें.

बंगाली शून्यपुराणांत ' आद्यनाथ, मीननाथ, सिंगा, चरंगिनाथ, दन्तपाणि आणि किन्नरी ' यांचा उल्लेख आहे.

'गोरक्ष-विजयां'त असा उल्लेख आहे कीं, अनाद्याच्या शरीरापासून शिव, मीननाथ, हाडीफा, कानफा, गाभूर, गोरक्षनाथ व गौरी यांनीं जन्म ग्रहण केला. गाभूर म्हणजे युवक. याच गाभूर सिद्धाचें नांव 'चौरंगीनाथ' होय. मत्स्येंद्रनाथानें म्हटलें आहे –

**एक शिष्य आछे मोर जति गोरखाई,**
**आर शिष्य आछे मोर गाभूर सिद्धाई ।**

सिद्धजन महादेवाच्या घरीं भोजनासाठी निमंत्रित असतां पार्वतीनें सर्वांना कामबाणानें विद्ध करून परीक्षा केली, तेव्हां एकमेव गोरक्षनाथ त्या परीक्षेंत उत्तीर्ण झाला. बाकीच्यांना पार्वतीचे अभिशाप मिळाले. गाभूर-सिद्धाला देवीच्या शापामुळें विमाताभिलाषदोषावरून हस्तपादविहीन होऊन युवराजत्वाला मुकावें लागलें.

ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत गुरुपरंपरा वर्णितांना चौरंगीचा उल्लेख केला आहे –

**तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं । भग्नावयवा चौरंगी ।**
**भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण जाला ॥** [२९]

'नवनाथभक्तिसार' या मराठी ग्रंथांत त्याचा 'वैदर्भ' देशाच्या राजाचा पुत्र म्हणून उल्लेख आला आहे : कृष्णा-तुंगभद्रा संगमाजवळ कौंडिण्यपुरींत शशांगर-मंदाकिनीच्या उदरीं याचा जन्म झाला. विमाता भुजावंतीकडून हस्तपादविहीन झाल्यावर मित्राचार्य-शरयू या ब्राह्मण पतिपत्नीनें यास सांभाळलें.

गौरन्नमंत्री या तेलगू कवीनें तेलगू भाषेंत लिहिलेल्या 'नवनाथचरित्रमु' नामक काव्यांत ( स. १४२७ ) सारंगधर नामक नाथाची कथा दिली आहे. याच कथेवर आधारलेलें एक काव्य 'सारंगधर-चरित्रमु' चेमकूर वेंकट या तेलगू

---

२९. ज्ञानेश्वरी, १८. १७५४.

कवीनें लिहिलें आहे. 'सारंगधर-चरित्रमु'चा नायक सारंगधर हा राजराज-नरेंद्रांचा पुत्र मानला जातो. सारंगधरावर विमाता चित्रांगी आसक्त होती. परतु सारंगधरानें या अनुचित प्रेमाचा स्वीकार केला नाहीं. चित्रांगीला प्रतिकार केल्यामुळें राजाज्ञेनें सारंगधराचे हातपाय तोडले गेले. अशी ही काव्यकथा आहे.[३०] ही सारंगधराची कथा व अशोकपुत्र कुणाल याची कथा समान आहे. 'आंध्र-नाटक-पितामह' धर्मवर रामकृष्णम्माचार्य यांनीं लिहिलेली 'विषाद-सारंगधर' ही विख्यात शोकांतिका सारंगधराच्याच जीवनावर लिहिलेली आहे. 'तत्त्वसारां'त चौरंगीनाथाचा गौरवपर उल्लेख आढळतो.[३१]

**चर्पटीनाथ :**

डॉ. मोहनसिंगांनीं पंजाब युनिव्हर्सिटी लायब्ररींत असणाऱ्या एका हस्त-लिखितावरून ( क्र. २७४ ) चर्पटीनाथाच्या नांवावरील एक कविता आपल्या पुस्तकांत इंग्रजी अनुवादासह छापलीं आहे.

सुधु फटाकि मनु गिआनि रता ।
चरपट प्रणिवै सिधमता ॥
बाहिरि रु लटि भवन नहि जाऊ ।
काहे कारनि काननिका चीरा खाऊ ॥
विभूति न लगाओ जिउतरि उतरि जाई ।
खर जिऊ थूडि लेटे मेरी बलाइ ॥
सेली न बांधो लेवो ना भ्रिगानी ।
ओढउँ ना खिंथा जो होइ पुरानी ॥
पत्र न पूजो उड़ा न उठावो ।
कुते की निआइ माँगने न जावो ॥
बासी करि के भुगति न खाओ ।
सिंधिआ देखि सिंगी न बजाओ ॥
दुआरे दुआरे धुआ न पाओ ।
भेखिका जोगी न कहावो ॥

३०. तेलुगु और उसका साहित्य. पृ. २८, ६०, ८४.
३१. तत्त्वसार, ओ. ६४८, ६५२.

आतिमा का जोगी चरपट नाउ ॥ [३२]

यांत 'वेषाचा जोगी' होण्याचा निषेध केला असून 'आत्म्याचा जोगी' होण्यास सांगितलें आहे. याच्या अखेरीस बाह्याचार धारण करणाऱ्या अन्य संप्रदायांची व्यर्थता दाखविली आहे. "जेव्हां कालाचा मेघ मस्तकावर घिरट्या घालूं लागेल, तेव्हां स्वेत वा नील पट, लांब जटा, तिलक वा जानवें उपयोगी पडणार नाहीं." या बाह्याचारांबरोबर कान फाडणाऱ्यांनाहि सावध केलें आहे –

इक सेति पटा, इक नीलि पटा।
इक तिलक जनेऊ लंबि जटा॥
इक फीए एक मोनी इक कानिफटा।
जब आवैगी कालि घटा॥ [३३]

मोहनसिंग-संग्रहित आणखी एक गीतांश असा आहे :

इह संसार कंटिओंकी बाड़ी।
निरख निरख पग धरना॥
चरपटु कहै सुनहु रे सिधो।
हटि करि तपु नहिं करना॥ [३३]

श्रीसंत संपूर्णसिंग-प्रकाशित 'प्राणसंगलीं'तील चरपटी-नानक संवादांतील एक पद खाली देत आहें –

इक पीत पटा इक लंब जटा।
इक सूत जनेऊ तिलक ठटा॥
इक जंगम कहीं अै भसम घटा।
जउलई नहीं चीनै उलटि घटा।
तब चरपट सगले स्वांग नटा॥ [३३]

चर्पटीनाथ बाह्यवेशविरोधी होता. तो नाथ संप्रदायांत राहूनहि त्याच्या शुष्क बाह्यप्रक्रियांना मानीत नव्हता. 'वर्णरत्नाकरां'तील सिद्धमालिकेंत चरपटीनाथाचें नांव आहे. 'प्राणसंगलीं'तील संवादावरून तो रसायनसिद्धीचा अन्वेषक असावा असें वाटतें. या पदांवरून इतकेंच अनुमान निघतें कीं, तो गोरक्षनाथाचा

---

३२. Gorakhnath and the Medieval Hindu Mysticism, परिशिष्ट पृ. २०.

३३. नाथ संप्रदाय, पृ. १४३.

थोडा परवर्ती असून, रसायनवादी बौद्ध सिद्धांच्या पंथांतून गोरक्षप्रभावाखालीं आला असावा.

५९ व्या वज्रयान सिद्धाचें नांव चरपट आहे. तिबेटी परंपरेनुसार चरपटनाथ हा मीनपाचा गुरु आहे. परंतु नाथ परंपरेंत तो गोरक्षाचा शिष्य आहे. एका जनश्रुतीसार गोरक्षाशीर्वादानें चर्पटनाथ उत्पन्न झाला. 'मीनचेतनां'त यालाच कर्पटीनाथ म्हटलें आहे. याचा 'चतुर्भवाभिवासनाक्रमा'चा तिबेटी अनुवाद उपलब्ध आहे. रज्जबदासानें आपल्या 'सरबंगी' ग्रंथांत चर्पटीनाथाला चारिणी-गर्भोत्पन्न मानलें आहे. डॉ. बडथ्वालांनीं लिहिलें आहे : " चंबा राजवंशावलींत याची चर्चा येते. चंबाच्या राजप्रासादासमोरच्या मंदिरांत एक चर्पटमंदिर आहे. चंबाच्या साहिल्ल-देवाचा गुरु म्हणून चर्पटीचा उल्लेख आहे. " 'योग-प्रवाहां'त कांहीं पदें याच्या नांवावर समाविष्ट झालेलीं आहेत.

चर्पटीनाथाचें कापालिकांच्या द्वादश शिष्यांतहि नांव आहे. 'हठयोग-प्रदीपिकें'तहि त्याचें नांव आहे. पिप्पलनारायणाचा अवतार म्हणून चर्पटीनाथाचा उल्लेख आढळतो. तसेंच 'प्राणसंगली' या शीख ग्रंथांत याचा नानकाशीं संबंध दाखविला आहे. डॉ. मलिक यांच्या संकलनांत एक 'चरपटजीकी सबदी' संग्रहित केलेली आहे.[३४]

### भर्तृहरि :

नाथपंथांत ज्या वैराग्यपंथाचा अंतर्भाव झाला, त्या वैराग्यपंथाचा प्रवर्तक भर्तृहरि हा होय. 'वैराग्यपंथ' या नांवाकडे पाहून सहजच 'वैराग्यशतक'-कार भर्तृहरींची आठवण होते. या भर्तृहरीनें 'शृंगारशतक' व 'नीतिशतक' अशीं आणखी दोन शतकें लिहिलीं आहेत. आपल्या पत्नीच्या अनुचित आचारांमुळें याला वैराग्य प्राप्त झालें, असें वैराग्यशतकाच्या प्रथम श्लोकावरून अनुमानित होतें. इत्सिंगनें एका भर्तृहरीचा उल्लेख केला आहे. तो सात वेळां बुद्ध भिक्षु बनला आणि पुनः गृहस्थ बनला. तो भर्तृहरि म्हणजेच 'शतककर्ता' भर्तृहरि असावा. याचा काळ सप्तम शतकाचा पूर्वार्ध येतो. अर्थात् गोरक्षशिष्य भर्तृहरि तो हा नव्हे. कारण तिन्ही शतकांत कुठेंहि गोरक्षाचें नांव नाहीं किंवा हठयोगाचा

३४. सिद्धसिद्धान्तपद्धति and Other Works of Nath Yogis, pp. 82-87.

संदर्भहि नाहीं. कदाचित् पूर्ववर्ती भर्तृहरीचें वैराग्यमत गोरक्षानुमोदित होऊन परवर्ती भर्तृहरीच्या नांवावर प्रचलित झालें असावें. कपिलायनी शाखा व नीमनाथी-पारसनाथी शाखा यांच्याप्रमाणें या शाखेंतहि योगक्रियांचें बाहुल्य असल्यामुळें गोरक्षानें त्याचा स्वीकार केला असावा. (भर्तृहरीसंबंधीं दंतकथां-शिवाय अन्य ऐतिहासिक पुरावा मिळत नाहीं.)

एकदां भर्तृहरि एका मृगदलविहारी मृगाला मारून घरीं चालला होता. मृगींच्या विलापानें दयार्द्र राजाचें मन विव्हळ झालें. इतक्यांत गोरक्षनाथ तिथें उपस्थित झाला. राजानें शिष्यत्व पत्करण्याच्या अटीवर गोरक्षनाथानें मृगाला जिवंत केलें. गोपीचंदाची माता मयनामती ही भर्तृहरीची बहीण. 'भरथरि-चरित्रा'नुसार भर्तृहरि उज्जैनचा राजा, इंद्रसेनाचा पौत्र व चंद्रसेनाचा पुत्र होता. वैराग्यग्रहणापूर्वी, सिंहल देशाची राजकुमारी सामदेई हिच्याशीं विवाह करून राजा तिथेंच राहत होता आणि तिथेंच मृगयेच्या वेळीं गोरक्षनाथाची व त्याची भेट झाली. योग्यांचा सिंहलदेश हा उत्तर भारतांतच होता; सीलोन नव्हे.

दुसऱ्या एका कथेनुसार, आपली पतिव्रता पत्नी पिंगला हिच्या मृत्यू-नंतर शोकग्रस्त अवस्थेंत गोरक्षाच्या प्रभावानें भर्तृहरीनें वैराग्य पत्करिलें आणि आपला भाऊ विक्रमादित्य याजवर राज्यकारभार सोंपविला. उज्जैनला विक्रमादित्य नामक राजा इ. १०७६–११२६ या काळांत राज्य करीत होता. भर्तृहरिबंधु विक्रमादित्य हाच असेल, तर भर्तृहरीचा काळ अकराव्या शतकाचा मध्यभाग ठरतो. भर्तृहरीचें एक पर्यायनाम 'विचारनाथ' असें आढळतें.[३५]

पेशावरचा रतननाथ भर्तृहरीचा शिष्य होता. हा बाह्यमुद्रा धारण करीत नसे. हा मुसलमान योग्यांत प्रसिद्ध होता. काबुल, जलालाबाद इथेंहि भर्तृहरी-संबंधींचीं तीर्थें आहेत.

'गोरक्षसिद्धांतसंग्रहा'त भर्तृहरीसंबंधीं कांहीं दंतकथा दिल्या आहेत; तसेंच भर्तृहरीचे कांहीं संस्कृत श्लोक उद्धृत केले आहेत.[३६] गोरखबानीतहि 'भरथरी'चा उल्लेख आहे –

३५. गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. ८०; Saraswati Bhavan Studies, p. 28.

३६. गोरक्षसिद्धान्तसंग्रह, पृ. ७९–८०.

मांन्यां सबद चुकाया दंद।
निहचै राजा भरथरी परचै गोपीचंद।
निहचै नरवै भए निरदंद।
परचै जोगी परमानंद॥[३७]

डॉ. कल्याणी मलिक यांच्या संकलनांत 'भरथरीजीकी सबदी' म्हणून भर्तृहरीची एक हिंदी रचना आहे.[३८] 'कबीर ग्रंथावलीं'तहि भर्तृहरीविषयीं उल्लेख आहे –

गोरष भरथरी गोपीचंदा।
ता मन सौं मिलि करैं अनंदा॥[३९]

कबीर-ग्रंथावलींत कबीराचें भर्तृहरिविषयक एक पद आहे – त्यांत भर्तृहरीच्या जीवनाची स्थूल रेखा रेखाटली आहे –

भरथरी भूप भया बैरागी।
बिरह बियोगि बनि बनि ढूंढै, वाकी सुरति साहिब सौं लागी॥
हसती घोड़ा गांव गढ़ गूडर कनड़ा पाइक आगी
जोगी हुवा जांणि जग जाता, सहर उजीणीं त्यागी
छत्र सिघासण चवर ढुलंता, राग रंग बहु आगी
सेज रमैणी रंभा होती, तासौं प्रीति न लागी
सूर वीर गाढा पग रोप्या, इह बिधि माया त्यागी
सब सुख छाडि भज्या इक साहिब, गुरु गोरख ल्यौ लागी
मनसा वाचा हरि हरि भाखै गंध्रप सुत बड भागी
कहै कबीर कुदर भजि करतां, अमर भणे अणरागी॥[४०]

● ● ●

---

३७. गोरखबानी, सबदी १५, पृ. ६.

३८. सिद्धसिद्धान्तपद्धति and Other Works of Nath Yogis, pp. 77–81.

३९. कबीर ग्रंथावली, पद २२, पृ. ९९.

४०. कबीर ग्रंथावली, पद २९९, पृ. १८९.

# : ४ : महाराष्ट्रांतील नाथ संप्रदाय

## साधनेचें साम्राज्य :

आजवर नाथ संप्रदायावर जे ग्रंथ लिहिले गेले, त्यांत महाराष्ट्रांतील नाथ संप्रदायाचा इतिहास अंशतःहि मांडला गेला नसल्यानें मी त्याचा प्रपंच या स्वतंत्र प्रकरणांत सहेतुक करीत आहें. महाराष्ट्रांतील नाथ संप्रदायाचें महत्त्व स्थानिक नसून अखिल भारतीय स्वरूपाचें आहे. महाराष्ट्रीयेतर पंडितांना महाराष्ट्रांतील साधनेच्या वैभवाविषयीं माहिती नाहीं. त्यांचीं एतद्विषयक स्फुट मतें अनेकदां अपसमजाच्या स्वरूपाचीं असतात. तसें पाहिलें तर मध्ययुगीन साधनेच्या इतिहासांत, तामिळ संतांचा अपवाद वगळला तर, महाराष्ट्राकडेच आद्यत्व येईल. अखिल भारतांतील साधनाप्रणालींवर गोरक्षनाथाचा प्रभाव असला, तरी गोरक्षाचा वारसा लगोलग हातीं घेऊन, परंपरा यत्किंचितहि खंडित होऊं न देतां, भारतीय साधनेचा विकास घडविणारे महापुरुष महाराष्ट्रांत वा दाक्षिणेंत झाले, हें उघड आहे. द्रविड देशांतील भक्ति रामानंदांनीं उत्तरेंत नेली, ती बरीच उशीरां.

दुसरें असें कीं, महाराष्ट्रांतील नाथ संप्रदायाचा इतिहास बऱ्याच अंशीं अद्ययावत् मांडतां येण्याची सोय आहे. गोरक्षनाथापासून थेट आजपर्यंतच्या हयात् मठस्थांपर्यंत या परंपरा अव्याहतपणें ज्ञात आहेत.

तिसरें असें कीं, महाराष्ट्रांत बाह्याचारावर विशेष भर न देतां, गोरक्षज्ञानेश्वरांच्या आत्मिक वैभवाची लूट करण्यांतच सांप्रदायिकांनीं धन्यता मानली आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील नाथ संप्रदाय सदैव जनमानसावर इष्ट परिणाम घडवीत राहिला — विकृतीनें त्याला ग्रासलें नाहीं.

चौथी गोष्ट म्हणजे महाराष्ट्रांतील विविध साधना-प्रणालींशीं नाथ संप्रदायानें समन्वय साधला. केवळ आध्यात्मिक अधिष्ठानाकडे लक्ष देऊन सर्व इतर संप्रदायांशीं आत्मीय संबंध राखले. ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळें महाराष्ट्रांत नाथ संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यांत जवळ जवळ ऐकात्म्य निर्माण झालें. त्याचमुळें वारकरी संत अनेकदां नाथ-परंपरेची थोरवी गातांना दिसतात, तर नाथसांप्रदायिक विठ्ठलनाम-संकीर्तनांत रंगून जातात.

मीं यां प्रकरणांत मांडलेला इतिहास हा सर्वथा अपुरा आहे, याची मला पुरेपूर जाणीव आहे. कारण अशा तऱ्हेचा हा पहिलाच प्रयत्न आहे. या इतिहासाची दिशा ज्ञात असूनहि सामग्रीच्या जुळवाजुळवीला आवश्यक तें स्वास्थ्य न लाभल्यानें तसा प्रयत्न अशक्य ठरला. या प्रकरणांत केवळ त्या दिशेनें टाकलेलें पहिलें पाऊल आहे. योग्य दिशेनें प्रयत्न केल्यास आवश्यक ती सर्व सामग्री सहज उपलब्ध होईल, असा मला विश्वास वाटतो.

ज्ञानेश्वर-पूर्व नाथ संप्रदायासंबंधीं आज फारच कमी साधनें आहेत. गोरक्ष-शिष्य अमरनाथ व गहिनीनाथ हे महाराष्ट्रांतील नाथ संप्रदायाचे मूलपुरुष. त्यांचे 'अमरनाथ संवाद' व 'गोरक्षगीता' हे दोन ग्रंथ प्रकाशित व्हावयास हवेत. तसेंच गहिनीनाथाचा 'गहिनीप्रताप' हा ग्रंथहि उपलब्ध नाहीं. महानुभावांच्या गुरु-परंपरेंत गणले जाणारे चांगदेव राऊळ व गुंडम राऊळ यांचा नाथ संप्रदायाशीं असलेला अनुबंध अधिक स्पष्ट होण्यासाठीहि साधनें उपलब्ध नाहींत. चांगा वटेश्वराच्या यौगिक परंपरेचा वेध घ्यावयास हवा. मुकुन्द-पूर्व हरिनाथ-रघुनाथांचें कांहीं वाङ्मय मिळेल काय, याचाहि शोध घ्यावयास हवा.

ज्ञानेश्वरांच्या आजच्या उपलब्ध ग्रंथांत सांप्रदायिक इतिहासाविषयीचे उल्लेख फार कमी आहेत. सत्यामलादि ज्ञानेश्वर-परंपरेंतील नाथांचे ग्रंथ उजेडांत आले, तर सांप्रदायिक इतिहासाची फार मोठी सामग्री हातीं येईल. डॉ. हर्षे यांच्यासारखे संशोधक या दिशेनें कांहीं प्रयत्न करीत आहेत. केसरीनाथांचा 'सिद्धान्तसार' म. म. पोतदारांच्या संग्रहालयांत प्रकाशाची वाट पाहत पडला आहे. शिवदिनादींच्या मठांतील साहित्याहि धांडोळून सांप्रदायिक माहितीचा कपटान् कपटा प्रकाशित करावयास पाहिजे. ग्वाल्हेर-उज्जैनीकडील महीपतिनाथ-दत्तनाथादींच्या मठांतील प्रचंड वाङ्मयसंभार अजून हस्तलेखावस्थेंतच आहे. देवनाथ-दयाळनाथांची कविता सामग्र्यानें प्रकाशित झालेली नाहीं. मधूनच उपलब्ध होणाऱ्या रत्नाकर, लिंगनाथ, जयराम, मुकुंदराज, प्रकाशानंदनाथ यांसारख्या ग्रंथकारांच्या ग्रंथांनींहि परंपरांचे धागे-दुवे जुळविण्यास फार मोठी मदत झाली आहे. आजवर उपलब्ध झालेल्या हस्तलिखितांचाहि अजून एकत्र अभ्यास झालेला नाहीं. असा अभ्यासहि ऐतिहासिक तथ्यें सिद्ध करण्यास अनेक दृष्टींनीं उपकारक ठरेल. तसेंच अन्य संप्रदायांचा ग्रंथसंभारहि या दृष्टीनें

अभ्यासला, तर त्यांतून खूपच संदर्भ मिळूं शकतील. नजिकच्या भविष्यकाळांत या दिशेनें धडपड करण्याचा माझा नम्र संकल्प आहे.

महाराष्ट्रांत सांप्रदायिकांनीं स्वतंत्र ग्रंथरचना पुष्कळच केली आहे. प्रत्यक्ष गोरक्षनाथाच्या विचारांची चर्चाहि, त्याच्या ग्रंथांवर टीका-विवरणें लिहून, करण्यांत आलेली आहे. 'अमरनाथ संवाद' व 'गोरक्षगीता' हे अमर-गहिनींचे गोरक्षविचारविषयक ग्रंथ मराठीतील आद्य ग्रंथांपैकी आहेत. सोपान-परंपरेंतील मुकुंदनाथाचा 'योगविवेकमार्तंडदीप' ही गोरक्षनाथाच्या 'योगमार्तण्डा'वरील टीका आहे, तर मुकुंदनाथाच्या परंपरेंतील गंगाधरनाथ नामक सांप्रदायिकानें 'गोरक्षगीते'वर 'गोरक्षगीताविवरण' नामक प्रकरण रचलें आहे. 'दत्तात्रय-गोरक्ष-संवाद', 'गोपीचंदाख्यान' अशीं कांहीं स्फुट सांप्रदायिक प्रकरणेंहि रचली गेली आहेत. शोधान्तीं गोरक्षनाथाच्या ग्रंथांवरील आणखी कांही टीका-ग्रंथ उपलब्ध होण्याची दाट शक्यता आहे.

**अमरनाथ :**

अमरनाथ हा गोरक्षनाथाचा शिष्य आणि गहिनीनाथाचा गुरुबंधु होय. अमरनाथाचे अनुयायी महाराष्ट्रांत आढळतात, असें श्री. वि. ल. भावे यांनीं 'महाराष्ट्र-सारस्वतां'त लिहिलें आहे.[1] डॉ. द्विवेदींनीहि अमरनाथी शाखेचा उल्लेख केला आहे.[2] परंतु महाराष्ट्रांत अमरनाथाच्या परंपरेचा धागा अद्यापि तरी सांपडत नाही. अमरनाथाचा गुरुबंधु गहिनीनाथ एक वैभवशाली परंपरा निर्माण करण्यांत आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक शिल्पकारांच्या मूळ पुरुषांत स्थान मिळविण्यांत जसा भाग्यशाली ठरला, तसें भाग्य अमरनाथाच्या वांट्यास आलेलें दिसत नाहीं. अमरनाथाचें जीवनवृत्तहि अंधारांतच आहे. निवृत्तिनाथांनीं मात्र आपल्या गुरुबरोबरच अमरनाथाचाहि सादर उल्लेख केला आहे –

निवृत्ति परिवार गुरु गयनी अमर
गोरक्षीं कंदर ब्रह्म माझें ॥ [3]

'अमरनाथ-संवाद' हा ग्रंथ उपलब्ध झाला नसता, तर 'अमरनाथा'चें केवळ नांवच बाकी राहिलें असतें.

---

१. महाराष्ट्र सारस्वत, पृ. ३११-३१२.

२. नाथ संप्रदाय, पृ. १२.

३. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गाथा, पृ २७०.

**'अमरनाथ-संवाद' :**

अमरनाथाचा 'अमरनाथ-संवाद' नांवाचा मराठी ग्रंथ अंशतः उपलब्ध आहे. या ग्रंथाचा समाप्ति-लेख "श्रीगोरक्षनाथविराचिते अमरनाथ संवादे आत्मज्ञान कथींतिं निजविचारें" असा असल्यामुळें हा ग्रंथ गोरक्ष-विरचित आहे, असें वाटतें. परंतु आपला ग्रंथ आदरभावानें गुरूच्या नांवावर लिहिण्याची प्रथा आहे. या ग्रंथांत अमरनाथानें गुरुदत्त ज्ञान ग्रथित केलें आहे. ग्रंथांतील भाषा ग्रंथाचें प्राचीनत्व सिद्ध करणारी आहे. ग्रंथाची मांडणी सूत्रबद्ध आहे. हा ग्रंथ पद्याला जवळ असणाऱ्या गद्यांत लिहिला आहे, असें वाटतें. हा ग्रंथ आज अपूर्ण अवस्थेतच उपलब्ध आहे.

उपलब्ध भागांत चंद्रसूर्यविवेक, देहविवेक, आत्मज्ञानकथन, सायुज्यतालक्षण, गुरुशिष्यलक्षण, राजयोगलक्षण, ज्ञानविवेक इत्यादि विषय चर्चिले आहेत. ग्रंथविस्तार लहान आकाराच्या एकूण ३२ पृष्ठांत असून, त्यांतील फक्त पंधराच पृष्ठें उपलब्ध झालेलीं आहेत. पुढें दिलेल्या उताऱ्यावरून भाषा व विषय यांची कल्पना येईल —

"वृक्षाची पानें झडति। आणि मार्गौति नीगति। परि तेंचि म्हणुं नयेति किं। दिवेयापासौनि निघालिया काजळी। त्याचा पोटीं काई आणिकीं। घाणि असे। मग निगालीये नदी उदके आनिलें। परि प्रवाही नित्य जाणावी किं। तैसा दृश्यु प्रपंचु पदार्थु अनित्यु। परि त्या प्रवाहो नित्य जाणावा। केळिचा गाभा उकलितां काई लाभु असे। आणि फळपानिचें निकें पिकलें। पिकनयाचा ऊर्डौंचि पाहतां बरवां दिसे। स्वप्निचें सुष स्वप्नींचि बरवें। मग निर्धारितां तेथें कांहीं असे। तें संसारिचे सुष दिसे निकें। सेंपी सुरस नव्हे। ऐसें ज्ञानें जाणावें। आकाश कुसुमीं जरि परिमळु भेटे। नातरि नाथलीये वांझेचें लेंकरु त्रिभुवन भोगी। ससेचेयां सींगे। तिषटें हें बोलणेंचि लटिकें। तैसा दृश्यु प्रपंचु। असत्यचि लटिका असे।"[४]

"यांतील दृष्टान्त व प्रमेयें ज्ञानेश्वरीत आढळणाऱ्या दृष्टान्तांशीं व प्रमेयांशीं इतकीं जुळतात कीं, या ग्रंथाचा लेखक आणि ज्ञानेश्वर हे एकाच परंपरेंतले असून या दोहींतलें पाणी मूळ एकाच झऱ्याचें आहे, असें मनांत येतें" असें

४. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त : शके १८३७, पृ. ३३

श्री. भावे यांनीं लिहिलें आहे.[५] या ग्रंथांत अनेक दृष्टान्तांनीं अजातवाद व मायावाद सांगितला असून, " एवढीये सृष्टीचें अढाळ जेयाचेनि चाले, त्यातें ओळखे, तो या संसाराआंतु सुखदुःखें लिंपेना ॥ " असा अखेरचा संदेश सांगितला आहे.

## गहिनीनाथ :

गोरक्षनाथ हा पंथप्रवर्तक असून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव अखिल भारतीय स्वरूपाचा आहे, हें आपण पाहिलेंच आहे. त्यानें प्रबोधिलेल्या शिष्यांकरवीं नाथ संप्रदायाचा अश्वत्थ भारतभर पसरला. महाराष्ट्राच्या दृष्टीनें विचार करायचा झाला, तर महाराष्ट्रांत नाथ संप्रदायाची अविच्छिन्न परंपरा निर्माण करणारा गहिनीनाथ हाच प्रथम नाथसिद्ध होय. गहिनीचा गुरुबंधु अमरनाथ याच्या स्थलकालाचा, जीवनाचा नि परंपरेचा कांहींच शोध लागत नसल्यानें गहिनीवरच लक्ष केंद्रित करणें भाग आहे.

'गयनी', 'गैनी', 'गहनी' वा 'गहिनी' या नांवांनीं तो ओळखला जातो. 'नवनाथभक्तिसारा'च्या दहाव्या अध्यायांत त्याची अद्‌भुत जन्मकथा दिली आहे : " कनकग्रामांत बाल गोरक्ष गुरुदेवांबरोबर विचरण करीत असतां एकदां त्यानें मुलांच्या बरोबर मातीच्या मूर्ति बनविण्याचा खेळ आरंभिला. गुरूनें दिलेल्या मंत्राच्या सहजोच्चारणानें त्याच्या हातांतील मातीच्या पुतळ्यांत चैतन्य संचारलें. तोच गहिनीनाथ होय." या ग्रंथांत गहिनीला करभंजन नारायणाचा अवतार मानिलें आहे. या अयोनिसंभव बालकाचा सांभाळ मत्स्येंद्रनाथाच्या आज्ञेनें गांवांतील मधु नामक ब्राह्मण व त्याची पत्नी गंगा यांनीं केलें.

या अद्‌भुत वर्णनाखेरीज गहिनीनाथाच्या जीवनाविषयीं अधिक कांहीं माहिती मिळूं शकत नाहीं. शके १२१० च्या सुमारास ब्रह्मगिरीवर निवृत्तिनाथांना गहिनीनें प्रबोधिलें, हें सर्वांस माहीतच आहे. निवृत्तिनाथांचे आजाआजी गोविंदपंत व निराई यांनाहि गहिनीनाथाचा उपदेश होता, असें नामदेवानें 'आदी'त सांगितलें आहे –

गोविंदा विश्रांती गहिनीनाथ ।[६]
निराईस प्रेम गहिनीनाथीं ।[६]

---

५. महाराष्ट्र सारस्वत, पृ. ४५.
६. नामदेवाचा गाथा, आदि, अ. १–२.

याशिवाय गहिनीनाथास प्रकाशनाथ नांवाचा एक शिष्य होता, असें 'नाथ-लीलामृता'वरून वाटतें. हा प्रकाशनाथ म्हणजे जयजयपूरच्या सोमराजाचा पुत्र. या प्रकाशनाथाच्या द्वारां विस्तारलेली परंपराच 'नाथलीलामृता'चा कर्ता आदिनाथ भैरव याच्यापर्यंत चालत आली.

निवृत्तिनाथांनीं आपल्या अनेक अभंगांत गहिनी-कृपेचा सादर उल्लेख केला आहे आणि त्याचबरोबर गोरक्षनाथाचाहि उल्लेख केला आहे; त्यावरून गहिनींचें महिमान आणि गोरक्ष-गहिनी संबंध निश्चित होतो—

निवृत्ति गयनी कृपा जपतो अमुप जाण ।
सांगितली खूण गोरक्षानें ॥[७]
निवृत्ति गयनीदेव उपदेशिल सर्व ।
गोरक्षी गुह्यभाव सांगती मज ॥[७]
निवृत्ति परिवार गुरु गयनी अमर ।
गोरक्षीं कंदर ब्रह्म माझें ॥[७]
निवृत्ति सधर गोरक्षीं गयनी
ब्रह्मरूपें पूर्णीं समरसे ॥[७]

**गहिनीनाथाचा काळ :**

निवृत्तीचा जन्म इ. स. १२७३ मधील. निवृत्तीस गहिनींचा उपदेश इ. स. १२८८ च्या सुमारास वा कांहीं वर्षें त्यापूर्वीं मिळाला असावा. निवृत्तीला उपदेश दिल्यानंतर गहिनीच्या कर्तृत्वासंबंधी कांहींहि पुरावा ज्ञात नाहीं. अर्थात् इ. स. १२८८ हा गहिनींचा अखेरचा काळ असावा.

निवृत्तींचे आजा-आजी गोविंद-निराई यांनाहि गहिनींचा उपदेश असल्याचें वर उल्लेखिलें आहेच. तेव्हां गोविंदपंतांचा काळ कोणता, तें पाहिलें पाहिजे. गोविंदपंतांना मूल ( विठ्ठलपंत – ज्ञानेश्वरांचे वडील ) ५५ व्या वर्षीं झालें. या मुलाचें लग्न झाल्यावर लवकरच गोविंद-निराईचा अंत झाला. त्यामुळें साधारणतः गोविंदपंतांचा जीवनकाल ( विठ्ठलपंतांचें लग्न विशीच्या सुमारास झालें, असें गृहीत धरून ) ७५ वर्षांचा ठरतो. निवृत्तिनाथांचा जन्म ( इ. स. १२७३ ) विठ्ठलपंतांच्या ३५ व्या वर्षीं धरला, तर

७. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गाथा,

(१२७३ – ३५ = ) इ. स. १२३८ हा विठ्ठलपंतांचा जन्मकाल येतो. त्या वेळीं गोविंदपंतांचें वय ५५ असल्यामुळें गोविंदपंतांचा जन्म (१२३८ – ५५ = ) ११८३ च्या सुमारास झाला असावा, असें अनुमान निघतें. अर्थात् गोविंदपंतांचा जीवनकाल इ. स. ११८३ ते १२५८ असा ठरतो. म्हणजे स्थूलमानानें इ. स. १२०० च्या सुमारासहि गहिनीचें अस्तित्व असावें, असें म्हणावयास हरकत नाहीं.

## कृष्णभक्तीचा प्रचारक :

नाथ संप्रदायाच्या मूलरूपांत भक्तीचा प्रवेश नव्हता, असें अनेक जाणते म्हणतात. 'भक्ति' ही निवृत्ति-ज्ञानदेवांची नाथ संप्रदायांत भर आहे, असें प्रा. दांडेकरांसारखे थोर अभ्यासक म्हणतात.[८] 'नाथसंप्रदाय आणि भक्ति-साधना' याविषयीं मीं पृ. ५१–५३ वर चर्चा केलीच आहे. येथें निवृत्तिनाथांचा एक प्रसिद्ध अभंग उद्धृत करतों –

आदिनाथ उमाबीज प्रकटलें । मच्छिंद्रा लाधलें सहजस्थिती ॥
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गयनीनाथा ॥
वैराग्यें तापला सप्रेमें निवाला । ठेवा जो लाधला शांतिसुख ॥
विरक्तीचें पात्र अन्वयाचें सुख । देऊनि सम्यक अनन्यता ॥
निवृत्ति गयनी कृपा केली पूर्ण । कुळ हें पावन कृष्णनामें ॥[९]

या 'कृष्णनामानें पावन असलेल्या गुरुकुळा'चा ठेवाच गहिनीनें निवृत्तीला दिला. ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत गुरुपरंपरा सांगतांना ज्ञानेश्वरांनीं गहिनीनाथानें निवृत्तिनाथांस दिलेला उत्कट संदेश शब्दबद्ध केला आहे.[१०] हा गुरुदत्त ठेवा निवृत्तींनीं सर्व प्रकारें पुढिलांना दिला, हें आपणांस पुरतेपणीं माहीत आहे. निवृत्तींच्या अनेक अभंगांत गहिनीनें दिलेल्या कृष्णमंत्राची मुद्रा आहे –

निवृत्ति संचित गैनी पै सांगे । एकचि श्रीरंग जोडी करा ॥
निवृत्ति म्हणे मज गुरुबोध दिठी । हरिनामपेटी उघाडिली ॥

---

८. ज्ञानेश्वर (त्रैमासिक), सप्टेंबर १९५५, पृ. १२.
९. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गाथा, पृ. २९६.
१०. ज्ञानेश्वरी, १८. १७५८–६०.

निवृत्ति साधन कृष्णरूपें खूण । विश्व विश्वपूर्ण हरि माझा ॥
निवृत्ति तल्लीन कृष्णरूपें ध्यान । गयनी तल्लीन नाम घेतां ॥
निवृत्तीचें धन गोकुळीं श्रीकृष्ण । गयनी सहिष्ण प्रेमें डुले ॥
निवृत्तीचें ध्येय कृष्ण हाचि होय । गयनीनाथें सोय दाखविली ॥
निवृत्तीचें नाम रूप निराकार । कृष्ण हा साचार गयनीकृपा ॥[११]

## गहिनीनाथाचे ग्रंथ :

निवृत्तिनाथांचा गुरु आणि महाराष्ट्रांतील नाथपरंपरेचा मूल पुरुष गहिनीनाथ याचा 'गहिनी-प्रताप' नामक ग्रंथ श्री. भिंगारकर उल्लेखितात. या ग्रंथांतील—

गोरखसुत गहिनी कहे नाथ पंथकी बानी ।
ग्यानी जानत गुरुपुन होत सोहि चढे निरबानी ॥

या गुरूची अनिवार्य आवश्यकता सांगणाऱ्या ओळी त्यांनीं उद्धृत केल्या आहेत.[१२]

गहिनीनाथाचा 'गोरक्षगीता' या नांवाचा एक मराठी ग्रंथ उपलब्ध आहे. "हे गोरक्षगीता । गहिनीनाथ संवादु ॥" असें प्रारंभींच म्हटलें आहे. यांत योगाभ्यासाचें आणि त्यांत येणाऱ्या अनुभवांचें वर्णन आहे. या ग्रंथाचा प्रभाव उत्तरकालीन साधुसंतांवर बराच असावा, असें वाटतें. कारण यांतील योगविवेचनाचें ज्ञानेश्वरींतील ६ व्या अध्यायांतील योग-विवेचनाशीं साम्य असून, सांप्रदायिक वातावरणांत त्या ग्रंथाचें प्रति-लेखन व अध्ययन सतत होत राहिलें आहे. त्याचप्रमाणें सोपान-परंपरेंतील गंगाधरनाथ नामक नाथपंथीयानें 'गोरक्षगीता-निरूपण' या नांवाची एक टीकाहि या ग्रंथावर लिहिलेली आढळते.[13]

श्री. भावे यांनीं 'गोरक्ष-गीता' व ज्ञानेश्वरी अ. ६ यांतील साम्यदर्शक उतारे दिले आहेत, ते जिज्ञासूंनीं पाहावे.[१४] गहिनी-अमर यांच्या ग्रंथांचें ज्ञानेश्वरीशीं साम्य पाहून ज्ञानेश्वरांच्या वैचारिक पोषणाची पार्श्वभूमि समजून येते.

---

११. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गाथा, पृ. २६७, २९६.
१२. श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय, पृ. २७.
१३. 'श्रीकेशवगोविंदमाहात्म्यां'त समाविष्ट 'गोरक्ष-गीता-निरूपण'
१४. महाराष्ट्र सारस्वत, पृ. ४९.

श्री. पांगारकरांनीं ‘ ज्ञानेश्वरांची प्रभावळ ’ या ग्रंथांत गहिनीनाथाचे तीन अभंग संकलित केले आहेत. पहिल्या अभंगांत—

आकाश तडतडी, मेरु हा कडाडी ।
तरी आत्मसुखगोडी सांडूं नये ॥
वायु जरी सुटे, ब्रह्मांड हें आटे ।
तरी आत्मनिष्टे भंगों नेदी ॥

असा ‘आत्मनिष्ठेचा’चा निर्धार व्यक्त केला आहे. दुसरा अभंग गुरुदत्त गूढ तत्त्वरहस्याचा असून, तिसऱ्या अभंगांत ‘ कळिकाळाला जिंकण्याचा मार्ग ’ निवृत्तिनाथांना सांगितला आहे.

**हरिनाथ :** ( शके १०८१ – ११०८ )

मुकुंदराजपरंपरेचे हे आद्य पुरुष. यांच्या मातेचें नांव सरस्वतीबाई व पित्याचें नांव सत्यनारायण. पांचव्याच वर्षी यांचें मौंजीबंधन झालें. जन्म, मुंज, वेदाध्ययन, पाशुपतव्रताचरण, शिष्य-प्रबोधन व समाधि या अठ्ठावीस वर्षांतील सर्व जीवन-घटना नागपूर प्रांतांतील वैनगंगेच्या तीरावरील ‘ मनोहर अंबानगरी’स ( अंभोरें येथें ) घडून आल्या. यांचे नातशिष्य मुकुंदराज यांनीं त्यांच्या जीवन-कथेचें तेजस्वी चित्र ‘विवेकसिंधू’त रेखाटलें आहे.[१५]

जयाचें नामसंकीर्तन । करितां पापनिकृंतन ।
तयासी मेखलाबंधन । पिता करिता झाला ॥
वेदशास्त्राचा अभ्यास । जयास करितां न लगे सायास ।
जो चतुर्विध वाचेचा ईश । तेथें विस्मय कैचा ॥

नंतर श्रीहरिनाथ यांनीं १२ वर्षे पाशुवत व्रताचें आचरण केलें—

बारा वर्षें पाशुपत । आचरला महाव्रत ।
तेणें पार्वतीसहित । शंभू प्रसन्न केला ॥
मग आपुले इच्छावशें । अनुष्टानाचेनि दशांशें
हवन आरंभिलें परेशें । हरीनें महाकुंडीं ॥

१५. विवेकसिंधु, १८. ३४–१०२.

अनुक्रम २२१५६ दि:
दि: १४३

झाली होमाची समाप्ति । मग आदरिली पूर्णाहुति ।
तेथें प्रकटला स्वयंज्योति । घृतधारेसरिसा ॥

अग्निकुंडांतून प्रकटलेल्या 'स्वयंज्योति' श्रीआदिनाथानें हरिनाथाला गाढ आलिंगन दिलें आणि त्याला 'स्वानंदसाम्राज्याचा चक्रवर्ती' बनविलें. आदिनाथाला हरीनें विनविलें कीं, "मज आपुलें प्रेम देई!" या 'प्रेमदाना'बरोबरच 'जे नेणती आपुली शुद्धि' अशांच्या उद्धाराचीहि हरीनें मागणी केली. श्रीआदिनाथानें ही विनवणी सहर्ष मानून आशीर्वाद दिला—

तुझिये सांप्रदायाची उडी । पडेल जयाचे हृदयकुंडीं ।
तयासी ज्ञानाची सांकडी । कांहींच नाहीं ॥
तुझ्या वचनीं धरिती विश्वास । तयांसी नाहीं गर्भवास ।
त्याचा अभिमानी मी महेश । म्हणूनिया ॥

या आशीर्वादानंतर आदिनाथानें आपलें 'शांभव तेज' हरीच्या शरीरांत मुखद्वारां संक्रान्त केलें. त्या वेळीं हरिनाथांची बावीस दिवसपर्यंत निर्विकल्प समाधि चालू राहिली. समाधि-विसर्जनानंतर —

जडचर्य्या आचरत । पिशाचवत् खेळत ।
निजानंदें डुल्लत । हरी योगिराज ॥
ढाळे ढाळे चालणें । विसरत विसरत बोलणें ।
कांहीं नेणोनी हांसणें । हरिनाथासी ॥

अशी 'बालोन्मत्तपिशाचवत्' स्थिति झाली. ही स्थिति भंगल्यावर हरिनाथांनीं यज्ञस्थलीं 'श्रीचैतन्येश्वर' शिवलिंगाची स्थापना केली. अंभोऱ्याचें हें चैतन्येश्वराचें स्थान अत्यंत रम्य आहे.

याप्रमाणें पूर्णत्वास पोंचल्यावर हरिनाथांनीं श्रीचैतन्येश्वराच्या आशीर्वादाप्रमाणें जगदुद्धाराचें कार्य हातीं घेतलें —

सुरेंद्र भारती मुख्य । हरीनें बोधिले शिष्य ।
परी कृपा असंख्य । फळली रामचंद्रीं ॥

सुरेंद्र-भारती, नागार्जुन, जनार्दन आदि छप्पन्न शिष्यांत रामचंद्र तथा रघुनाथ याच्यावर हरिनाथांची 'असंख्य' कृपा होती. हे रघुनाथ म्हणजेच मुकुंदराजांचे गुरु. हरिनाथांनीं आपल्या 'असंख्य' कृपेनें रामचंद्राला थोर बनविलें आणि

त्याच्याकरवी मुकुंदराजादि अनेक शिष्यांना प्रबोधून ‘ब्रह्मविद्येचा सुकाळ’ केला —

> अनेक शिष्यांप्रति बोधिलें । ते ब्रह्मसुखें निवाले ।
> ब्रह्मविद्येचें तारू केलें । सकळ जनांसी ॥

हरिनाथांना मुकुंदराजांची योग्यताहि आपल्या डोळ्यांनीं पाहतां आली. हरिनाथांची ग्रंथरचना आज तरी उपलब्ध नाहीं. हरिनाथांच्या व मुकुंदराजांच्या परंपरेंतील अनेक मठ नागपूर प्रांतांत विखुरलेले आहेत. खास नागपूर येथील गणोबांच्या वाडींतील मठ, तांडा पेठेंतील गळघाट्यांचा मठ, वर्धा जिल्ह्यांतील हमदापूर येथील मठ, नागपूरच्या डोकेबुवांचा मठ, हिंगणघाट ( जि. वर्धा ) जवळील कोरो येथील मठ, उमरेड येथील मठ इत्यादि मठ हरिनाथांच्या व मुकुंदराजांच्या परंपरेंतील म्हणून प्रसिद्ध आहेत. यांपैकीं कांहीं मठांत मुकुंदराजांची माहिती असलेले ग्रंथ, पदें, आरत्या इत्यादि मिळतात. ‘विवेकसिंधू’चे छापील व हस्तलिखित ग्रंथ तर नागपूरकडील व खेडला येथील भागांत अनेक सांपडतात. या भागांत शोध करुन मुकुंद-परंपरा व अन्य नाथपरंपरा यांचा प्रत्यक्ष संबंध स्पष्ट करण्यासाठीं कांही साधनें मिळतात काय, हें पाहावयास हवें.

**रघुनाथ :** ( समाधि शके ११०८ )

हरिनाथांची ज्यांच्यावर ‘विशेष कृपा’ होती आणि आदिकवि मुकुंदराजांचे जे गुरु, तेच हे रघुनाथ होत. यांच्या स्थलकालाबद्दल विशेष माहिती मिळत नाही. कमळेश्वर येथील मठांतील एका जुन्या मोडी पत्रावरुन आणि मुरहर नामक एका सांप्रदायिकाच्या अभंगांवरुन थोडी माहिती मिळते.

रघुनाथ हे ‘शशिग्राम’ किंवा ‘चंद्रनगर’ ( आजचें चांदा. अंभोऱ्यापासून सुमारें ५० मैल ) येथें राहत होते. शशिग्राम म्हणजेच चंद्रनगर; आणि चंद्रनगरचें प्राकृत रूप चांदा. रघुनाथांचें उपनाम ‘बोबडे’ असें होतें. चांद्याचें ‘बोबडे’ घराणें आजाहि विख्यात आहे. या घराण्याच्या वंशावळींत मूळपुरुषाचें नांव ‘रामचंद्र’ असेंच आहे.

हरिनाथांनीं शंकराला प्रसन्न करुन घेतल्यावर आणि त्यांची ब्रह्मावस्था व उन्मन्यावस्था ओसरुन त्यांना पूर्ण दृष्टि लाभल्यावर हरिनाथांशीं रघुनाथांचा संबंध आला असावा —

कृपादृष्टीसरिसी । समाधि प्रवर्तली रामासी ।
उमसु घेवों नेदी मनासी । ब्रह्मानंद तो ॥
अठरा दिनपरियंता । जाली उन्मनीअवस्था ।
मनोवृत्ती समस्ता । खुंटालिया ॥[१६]

हरिनाथांची ' असंख्य कृपा ' रामचंद्रांसच फळल्यामुळें ते नेहमीं हरिनाथांबरोबरच असत. हे गुरुशिष्य काशीक्षेत्री विचरण करीत असतां तेथें मुकुंद नामक ज्योतिष्यानें रघुनाथांचें मृत्यु-भविष्य वर्तविलें. रघुनाथांचा मृत्यु हरिनाथांनीं चुकविला आणि अखेर या रघुनाथांकडूनच मुकुंद ज्योतिष्याला प्रबोधिलें. हा मुकुंद ज्योतिषी म्हणजेच मुकुंदराज.

रघुनाथांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. त्यांनीं अनेक शिष्यांना प्रबोधिलें. रघुनाथांचीहि ग्रंथरचना उपलब्ध नाहीं. 'आत्ममुख' नांवाचा एक संस्कृत ग्रंथ त्यांनीं लिहिल्याचा उल्लेख मिळतो. तो ग्रंथ आज उपलब्ध नाहीं. मुकुंदराजांनीं –

रामु गुणांचा सागरु । कीं महिमेचा मेरु ।
ब्रह्मविद्या देता उदारु । तोचि येकु ॥[१७]

असा आपल्या गुरूचा उल्लेख केला आहे. रघुनाथांनीं हरिनाथांबरोबरच शके ११०८ मध्यें अंभोरें येथें श्रीचैतन्येश्वराच्या चरणांजवळ समाधि घेतली.

## मुकुंदराज :

आदिकवि मुकुंदराजांच्या स्थळकाळाबाबत विद्वानांत ऐकमत्य नाहीं. कांहीं जण त्यांचा काळ ज्ञानेश्वरांपर्यंत अलीकडे ओढून त्यांचें 'आदिकवित्व' हिरावून घेतात. मुकुंदराजांच्या 'विवेकसिंधू'तहि आत्मचरित्रपर उल्लेख कांहींच नाहींत. कांहीं मठस्थ कागदपत्र, कांहीं सांप्रदायिक स्फुट अभंग आणि 'भक्तिरहस्य' नामक पौराणिक ग्रंथ ( केशव जयराम-कृत. शके १७७९ ) यांवरून मुकुंदराजांच्या पूर्वजीवनासंबंधीं कांहीं माहिती मिळते. अन्य पुराव्यांच्या अभावीं आणि या साधनांचें या माहितीच्या बाबतीत एकमत असल्यामुळें ही माहिती आज तरी खरी मानण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

---

१६. विवेकसिन्धु, १८. १०३–१०४.
१७. विवेकसिन्धु, १८. १०८.

मुकुंदराजांचें पूर्वींचें नांव मुकुंदभट्ट असें होतें. ते वाराणशीला ज्योतिषी होते. एकदां हरिनाथ रघुनाथांसह काशीला गेले असतां त्यांनीं रघुनाथांना मधुकरीसाठीं पाठविलें. रघुनाथ मधुकरी मागण्यासाठीं मुकुंदभट्टांच्या घरीं गेले. मुकुंद ज्योतिष्यानें रघुनाथांकडे पाहून सांगितलें कीं, 'आजच्या आज तुझें मरण आहे.' रघुनाथांनीं हें वृत्त हरिनाथांना सांगितलें. हरिनाथांनीं आपल्या सामर्थ्यानें शिष्याचें मरण चुकविलें व दुसऱ्या दिवशीं पुनः त्याच स्थळीं मधुकरीसाठीं जाण्यास सांगितलें. रघुनाथांना जिवंत पाहून मुकुंदभट्टांना आश्चर्य वाटलें. रघुनाथांचें मरण ज्या महापुरुषानें चुकविलें, त्याच्या भेटीसाठीं ते निघाले आणि रघुनाथ व हरिनाथ यांच्यामागोमाग ते 'वेणगंगेच्या तीरीं' अंबानगरी येथें आले. हरिनाथांनीं तिथें रघुनाथांकरवीं त्यांना गुरूपदेश दिला आणि 'मुकुंदराज' किंवा 'मुकुंदराज योगी' असें नांव दिलें.

मुकुंदराजांनीं 'परमामृत' हा ग्रंथ हरिनाथ-रघुनाथ यांच्या हयातीतच लिहिला. 'विवेकसिंधू'ची रचना मात्र या दोघांच्या समाधीनंतर दोन वर्षांनीं ( शके १११० ) झाली आहे, असें 'विवेकसिंधू'च्या समाप्तिदर्शक ओवीवरून ठरतें —

> शके अकरा दाहोत्तरु । साधारण संवत्सरु ।
> राजा शारंगधरु । राज्य करी ॥
> ऐसा समयो सर्वोत्तमु । तेथ मुकुंद द्विजोत्तमु ।
> विवेकसिंधु मनोरमु । निर्मिता जाला ॥[१८]

कांहींच्या मतें, या ओव्या प्रक्षिप्त आहेत. परंतु मुकुंदराजांच्या स्थळकाळाचा साग्र अभ्यास करून त्यासंबंधीं निर्णायक सिद्धान्त प्रस्थापित करणारे प्रा. सुरेश डोळके यांनीं साधक-बाधक चर्चा करून 'विवेकसिंधू'च्या रचनेचा हाच काळ निश्चित केला आहे.[१९]

वरील कालदर्शक ओवींत उल्लेखिलेला 'शारंगधर राजा' आणि —

> नृसिंहाचा ब्राह्मळु । तेयाचा कुमरु जैतपाळु ।
> तेणें करविला हारोळु । ग्रंथरचनेचा ॥ [२०]

---

१८. विवेकसिन्धु, पृ. ४०२.
१९. नवभारत, ऑगस्ट व नोव्हेंबर १९५५.
२०. विवेकसिन्धु, ७. १५५.

या ओवींतील 'जैतपाळ' हे कोठले, असा एक प्रश्न आहे. मुकुंदराजांनीं शारंगधराच्या राज्यांत ग्रंथ लिहिला व जैतपाळाच्या 'प्रसंगा'नें त्याचा 'गदारोळ' केला. हा शारंगधर चांद्याच्या राजाचा मांडलिक असावा किंवा चांद्याच्या राजाच्या अंतर्गत असलेल्या अंभोरें परगण्याचा स्वतंत्र वहिवाटदार असावा, असें श्री. डोळके यांचें मत आहे. त्याचप्रमाणें जैतपाळ हा खेडला येथील शेवटला रजपूत ( राठोड ) राजा असावा, असाहि साधार कयास त्यांनीं बांधला आहे.[२१]

या जैतपाळ राजाला एकदां ब्रह्मसाक्षात्काराचा उमाळा आला व त्यानें 'आपल्याला ब्रह्मदर्शन घडवावें' असा जाहिरनामा काढला. त्याच्या राज्यांत येणाऱ्या प्रत्येक साधुसंताला तो हाच प्रश्न विचारी व उत्तरास असमर्थ ठरलेल्यांची तुरुंगांत रवानगी करी. मुकुंदराजांनीं आपला 'विवेकसिंधु' हा ग्रंथ अगोदरच लिहिलेला होता. त्यांतील तत्त्वज्ञान जैतपाळाला सांगून त्याला आपण ब्रह्मदर्शन घडवूं, असा त्यांना आत्मविश्वास वाटला. ते अंभोऱ्याहून खेडल्यास जावयास निघाले. तुरुंगांत रवानगी केलेल्या साधुसंतांकरवी जैतपाळ तलाव खोदण्याचें व चक्की ओढण्याचें काम करून घेई. मुकुंदराज तेथें गेले; त्यांनीं जैतपाळाला घोड्यावर बसविलें व हातांतील वेताच्या छडीनें त्याला व घोड्याला मारतांच जैतपाळाची समाधि लागली. त्याला ब्रह्मदर्शन झालें—

**जयत्पाळासीं उद्धरिलें । भिक्षुक अवघे मुक्त केले ।**
**संत परोपकारी भले । माहात्म्य वर्णिलें नव जाये ॥**

खेडल्याच्या सीमेवर हा तलाव व खेडल्याच्या किल्ल्यांत दगडी चक्क्या अजूनहि दाखवितात. मुकुंदराजांची समाधिहि खेडल्याच्या किल्ल्यांत आहे. जैतपाळ राजा व त्याचा घोडा यांचीहि समाधि याच किल्ल्यांत आहे.

मुकुंदराजांच्या ग्रंथांनीं मराठी वाङ्मयाच्या परंपरेचा व महाराष्ट्रांतील वेदान्त-चर्चेचा मूलारंभ केला. पुढील अनेक श्रेष्ठ ग्रंथकारांच्या जीवनांवर व ग्रंथांवर मुकुंदराजांची छाप आहे. महाराष्ट्रांतील नाथ परंपरा वेदान्तनिष्ठ बनविण्याचें श्रेयहि मुकुंदराजांनाच द्यावें लागेल. मुकुंदराजांच्या नांवावर 'विवेकसिंधू'-शिवाय 'परमामृत', 'महाभाष्य', 'गुह्यसप्तक' आणि कांहीं स्फुटें आढळतात.

---

२१. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अं. १०५, १०६, १०८.

समर्थ-काळापासून मुकुंदराज आणि आंबें-जोगाई यांचे दृढ संबंध आढळतात, त्याचें रहस्य अजून उलगडलें नाहीं.

## मुकुंदराजोत्तर परंपरा :

हरिनाथांच्या आध्यात्मिक वंशाचा विस्तार फार मोठा आहे, हें मागें सूचित केलें आहेच. श्री. वि. रा. ढोक यांनीं ' श्रीआंभोरे क्षेत्रमहिमा ' या पुस्तकांत हरिनाथांच्या अनेक परंपरांची माहिती दिली आहे.[२२]

( १ ) मुकुंदराज – नृसिंहभारती – जगन्नाथ – सहजबोध – श्रीरंग – केशव – शंकर – वैद्यनाथ – भीमराज – नागनाथ – वकाजी – गोपीनाथ – गणोबा – जयराम – रामकृष्ण – विठ्ठल.

– या परंपरेंतील शेवटचे विठ्ठल म्हणजेच हल्लीं हयात असलेले ' श्रीआंभोरे क्षेत्रमहिमा ' या पुस्तकाचे लेखक श्री. विठ्ठल रामकृष्ण ढोक हे होत. मुकुंदराजांनंतर केशवस्वामींपावेतों जे सत्पुरुष झाले, त्यांची माहिती उपलब्ध नाहीं. केशवस्वामी हे फार विद्वान् व कर्तबगार होते. केशवस्वामींनंतर संप्रदायाच्या पुनः अनेक शाखा निर्माण झाल्या. भीमराजांचा शिष्य नागनाथ यानें मोरयांष्टक, श्रीअष्टक, भगवद्गीता समश्लोकी, भिल्लिणी आख्यान व अनेक अभंग केले आहेत. नागनाथाचा शिष्य वकाजी यानें 'विवेकभास्कर' या नांवाचा नव्वद अध्यायांचा एक ग्रंथ लिहिला आहे. या परंपरेंतील गणोबांचा शिष्यपरिवारहि मोठा होता. त्यांपैकीं कृष्णानंदस्वामी यांनीं 'निजात्मबोध' व 'पंचीकरण' हे वेदान्तपर ग्रंथ लिहिले आहेत.

( २ ) केशवस्वामी – संतस्वामी – लक्ष्मणबोवा पत्थे – यमाजी – नारायण – पांडुरंग – गणोबा गोविंदराव. ( तांडापेठ मठ, नागपूर ) या परंपरेंतील शेवटचे गोविंदराव १९४८ सालीं निधन पावले.

( ३ ) केशवस्वामी – शंकर – विठ्ठल – माधव – पांडुरंग – राघव – आत्माराम – श्रीहरि – गोविंदगुरु ( अमदापूर मठ – सिंदी स्टेशनजवळ, जि. वर्धा ) – शेवटचे गोविंदगुरु हे सध्यां मठाधिपति आहेत.

---

२२. श्रीअंभोरें-क्षेत्रमहिमा, पृ. २९–४५.

( ४ ) केशवस्वामी – शंकर – विश्वनाथ – गोविंद ( चांदा ) – लक्ष्मणबोवा ( डोके ) – सच्चिदानंदस्वामी ( यादवराव डोके ) – गोविंदस्वामी ( जनार्दन डोके ) – नागपूर येथील आदितवारींतील डोकेबुवांचा मठ.

– या परंपरेंतील जनार्दनबोवांचे नातू यादवराव ऊर्फ बाबाजी व बाबूराव डोके हे दोघे बंधु हल्लीं विद्यमान आहेत.

( ५ ) केशवस्वामी – शंकर – विठ्ठल – माधव – पांडुरंग – राघवनाथ – घनश्यामबोवा ( कोरे, हिंगणघाट तहसील, जि. वर्धा, येथील मठ ).

– या परंपरेंतील शेवटचे घनश्यामबोवा हयात आहेत.

( ६ ) केशवस्वामी – कृष्णानंद – चिन्मयानंद – भानूनंद – डोमानंद – रामानंद – रुद्रानंद – बक्षीनंद – गजानंद – पांडुरंग दमड्डू – विठोबा – ग्यानदेव – गोविंदा ( उमरेठ, जि. नागपूर, येथील परंपरा ).

– शेवटचे गोविंदा ग्यानबा दमड्डू कोष्टी हे हयात आहेत.

( ७ ) ही परंपरा महानुभावीय आहे. प्रतिवर्षी महानुभाव लोक हरिनाथांच्या समाधिदर्शनाला येतात. हरिनाथांच्या नागनाथ नामक शिष्याकरवीं महानुभाव परंपरा सुरू झाल्याचें महानुभावीय ग्रंथांत नमूद आहे. याचा ऊहापोह ‘ नाथ संप्रदायाचा प्रभाव ’ या अखेरच्या प्रकरणांत ‘ महानुभाव संप्रदाय ’ या छेदकांत विस्तारानें केला आहे.

( ८ ) आदिनाथ – हरिनाथ – विश्वंभरनाथ – गरीबनाथ – आत्मनाथ – ज्योतिनाथ – लीलानंद – कुणपनाथ – चैतन्यनाथ – ईश्वरनाथ – पूर्णानंदनाथ – कुळेश्वरानंदनाथ – सहजानंदनाथ – ब्रह्मानंद – पूर्णप्रकाशानंदनाथ – श्रीआत्माराम ( तुकोबा ) – व्यंकट.

या आठव्या परंपरेची माहिती प्रा. प्रियोळकर यांनीं मराठी संशोधन पत्रिकेच्या अलीकडच्या एका अंकांत करून दिली आहे. या परंपरेंतील ईश्वरनाथ हा अकबराचा ( स. १५४२–१६०५ ) समकालीन होता. हा ईश्वरनाथ तारकब्रह्ममंत्राचा उपदेश करूं लागल्यानें देवांचें महत्त्व कमी झालें. गंगातीरावर काशीस ‘पाषाणवोवरी’ बनवून हा तप करीत असे. कांही काळानें अकबर काशीस आला. या जीर्ण घाटाची बांधणी करावी, या हेतूनें त्यानें उत्खनन केलें तों आंत समाधिस्थ तपस्वी. जमलेल्या समूहांतील पूर्णानंदानें ईश्वरनाथास

समाधींतून जागें केलें. त्यानंतर त्या रात्रीं पूर्णानंदासह अकबर राजा ईश्वरनाथाच्या चरणीं एकांकांत राहिला आणि त्यानें ईश्वरनाथापासून ज्ञानप्राप्ति करून घेतली. त्यानंतर ईश्वरनाथानें तेथें चिरसमाधि घेतली.

**पूर्णप्रकाशानंदनाथ :** याच परंपरेंतलि पूर्णप्रकाशानंदनाथ तथा नायक-स्वामी ( मंगेशिकवि ) हा एक मराठी ग्रंथकार आहे. हा मूळचा अंत्रवल्ली ( ता. कुमठा, जि. कारवार ) या गांवचा. त्याचें कुलदैवत गोमंतकांतील श्रीमंगेश. त्याचा निवास अखेरपर्यंत श्रीमंगेशाच्या चरणांजवळच होता. सतराव्या शतकाची अखेर व अठराव्या शतकाचा प्रारंभ हा याचा काळ असावा. याच्या वेळीं याचा आजेगुरु सहजानंद हा हयात होता. सहजानंदानेंच त्याला ईश्वरनाथाविषयी माहिती सांगितली आणि ती त्यानें शब्दबद्ध केली. पूर्णप्रकाशानंदानें ( १ ) पूर्णप्रबोधचंद्रोदय, ( २ ) शिवदर्पण, ( ३ ) राधाविलास हे तीन ग्रंथ लिहिले आहेत. या पूर्णप्रकाशानंदनाथाचा प्रशिष्य व्यंकट यानें ' चतुःश्लोक भागवत ' ( इ. स. १७६७ ) आणि 'वेदस्तुति' हे ग्रंथ लिहिले आहेत.

या परंपरेंतील नांवांत 'आनन्द' आणि 'नाथ' हीं दोन्ही पदें आढळ-तात, हें चिंतनीय आहे. या प्रकाशानंदानें हरिनाथाच्या शिष्यांत 'नागेशा'चा उल्लेख केला असल्यानें नाथ-महानुभाव अनुबंधांतील एका गूढाचें कांहींसें स्पष्टी-करण होतें, हें पुढें शेवटच्या प्रकरणांत दाखविलें आहे.

प्रा. प्रियोळकरांनीं मराठी संशोधन पत्रिकेंत पूर्णप्रकाशानंदनाथाच्या ग्रंथांचा जो परिचय दिला आहे, त्याचाच संक्षेप खालीं देत आहें.[२३]

**१. श्रीपूर्णप्रबोधचंद्रोदय :** हा ग्रंथ अन्वय व व्यतिरेक अशा दोन भागांत विभागला आहे. पहिल्या भागांत ४ व दुसऱ्या भागांत ५ असे एकूण ९ अध्याय व ओवीसंख्या १८४७ आहे. अध्यायाची संज्ञा परंपरेनुसार 'उपदेश' अशी आहे. तत्पद, हस्यत्रयानुवाद, त्वंपदार्थ, असिपदार्थ, क्रियोपास्या, समाधि-उद्बोध, समाधिसुखानुभव, ग्रंथप्रबोध तारकार्थोंसि उपदेशविध व परंपराविध असे सर्व अध्यायांतील विषय ग्रंथकारानें दिले आहेत. याच ग्रंथांत आपल्या गुरुपरंपरेंतील ईश्वरनाथाचा अकबराशीं आलेला संबंध लेखकानें वर्णिला आहे. अकबराचें ग्रंथकारानें केलेलें वर्णन चिंतनीय आहे :

---

२३. मराठी संशोधन पत्रिका, व. ५, अं. १.

आतां येथ वर्तमानीं। धर्मराजा सिंहासनीं।
आरूढ भोगी राजधानी। शबरू राजा॥
त्याचें नाम अकबर। सर्व धर्मांचें माहियेर।
जगद्गुरु नाम बहिवार। प्रसिद्ध लोकीं॥

२. शिवदर्पण : ही शिवगीतेवरील समश्लोकी मराठी टीका आहे. हा ग्रंथ अनुष्टुप छंदांत आहे. या ग्रंथांत ग्रंथकारानें मराठीची प्रशस्ति केली आहे :

त्यांहींमध्यें महाराष्ट्रभाषा हे उत्तमोत्तम।
अवतारांतरीं राम कृष्ण तेशी विशेष हे॥

३. राधाविलास : या आख्यानाचे विविध वृत्तांतील १७० श्लोक आहेत. हें काव्य बरेंच क्लिष्ट आहे. शुद्ध शृंगाररसाला वैराग्याचें अगर शांत-रसाचें स्वरूप देण्याची या कवीस हौस फार.

सद्वृत्ति गोपवनिता, व्यभिचारबुद्धि।
आरोपिती जन, परी अविचारबुद्धि।
कीं सर्वदा स्थिरचरात्मक कृष्ण त्याचें
कर्तृत्व मोहक वदे मुख कृष्ण त्याचें॥
त्यामाजि बोध वृषभानु अहीर याची।
निर्मूनि भक्ति दुहिता तिस फार याची॥

अशी राधा-कृष्णाविषयींची ग्रंथकाराची शुद्ध आध्यात्मिक दृष्टि आहे.

( ९ ) आदिनाथ – हरिनाथ – सुरींद्रभारती – रामचंद्र – मुकुंदराज – नरसिंहभारती – जगन्नाथ – सहजबोध – रंगबोध – अद्वयबोध – शिवनाथ – रंगबोध – शिवराम – गुरुनाथ. शिवराम-पुत्र गुरुनाथानें लिहिलेल्या 'देशिक-चरित्रां'त सहजबोधानंतरच्या पुरुषांचें वृत्त वर्णिलें आहे.[२४] ही परंपरा सध्यां बेळगांव जिल्ह्यांत गोकाकजवळ मुडलगी या गांवीं 'स्वामी घराणें' म्हणून नांदत आहे. विद्यमान स्वामी कल्येषबोध.

( १० ) मुकुंदराजांना 'भगा' नामक एक शिष्य असल्याचा उल्लेख आढळतो.[२५] या भगाचे कांहीं अभंगाहि उपलब्ध आहेत.

---

२४. 'नवभारत', सप्टेंबर १९५८ व महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अं. १२७ या दोन अंकांतील प्रा. पंडित आवळीकर यांचे 'देशिकचरित्रा'विषयींचे लेख.

२५. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अं. ११६, पृ. २४–२५.

## गहिनीनाथांची एक स्वतंत्र परंपरा

गहिनीनाथांनीं नाथ संप्रदायाच्या अद्वयानंदाचा प्रवाह निवृत्तिनाथांकरवीं महाराष्ट्रांत अव्याहत वाहत ठेवला. निवृत्तिनाथ हेच गहिनीनाथांचे प्रमुख पारमार्थिक वारसदार होत. परंतु निवृत्तिनाथांशिवाय आणखी एक परंपरा गहिनीनाथांनीं प्रवर्तित केली होती. ती परंपरा पुढीलप्रमाणें आहे –

आदिनाथ – मत्स्येंद्रनाथ – गोरक्षनाथ – **गहिनीनाथ** – प्रकाशनाथ – चिद्रंजनाथ – उत्पत्तिनाथ – प्रवृत्तिनाथ – हंसनाथ – निरंजननाथ – सिद्धनाथ – भैरवनाथ – **आदिनाथ.**

या परंपरेंतील गहिनीनाथांचा शिष्य प्रकाशनाथ हा जयजयपूरच्या सोमराजाचा पुत्र होय. हें जयजयपूर कुठें आहे, याचा शोध घ्यावयास हवा. 'भक्तितत्त्वामृतरहस्यां'त उल्लेखिलेला ज्ञानेश्वरांचा द्रविडदेशीय शिष्य प्रकाशनाथ आणि हा गहिनीनाथांचा शिष्य प्रकाशनाथ यांचें ऐकात्म्य सिद्ध होईल काय, याचाहि शोध घ्यावयास हवा. या परंपरेंतील अखेरचा सिद्ध आदिनाथ यानें लिहिलेल्या 'नाथलीलामृत' या ग्रंथावरून ही परंपरा ज्ञात होत आहे.[२६]

**आदिनाथ भैरव :** हा पुण्याजवळील निघोजें ( ता. खेड, जि. पुणें ) या गांवचा. त्याचा जन्म निघोजें येथेंच झाला. त्यानें शके १७५६ मध्यें विटें येथें 'नाथलीलामृत' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथावरून आदिनाथाच्या सांप्रदायिक ग्रंथाध्ययनाची आणि रुचिर भाषाशैलीची चांगली कल्पना येते. आदिनाथानं वैशाख वद्य ११ शके १७६७ मध्यें नाशिक येथें समाधि स्वीकारली. आदिनाथाचा वंश निघोज्यास नांदत आहे.

आदिनाथ भैरवाचा 'नाथलीलामृत' हा ग्रंथ 'नवनाथभक्तिसारा'हून सर्व दृष्टीनें अधिक सरस असूनहि महाराष्ट्रांत त्याला लोकप्रियता लाभू नये, याचें आश्चर्य वाटतें. या ग्रंथाचे २८ अध्याय असून ओवीसंख्या ५४९३ आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, दासोपंत, एकनाथ, रामदास, नाभाजी, महीपति या

---

२६. 'नाथलीलामृत' : आदिनाथ भैरव (गोपाळ नारायण आणि कंपनीकरितां रामचंद्र कृष्ण पिंगे वेरेकर यांनीं कंपनीच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला. मुंबई, १८९८).

संतकवींच्या वाङ्मयसागरांत आदिनाथानें यथेच्छ विहार केला आहे; एवढेंच नव्हे तर 'कवनकुशळ' मुक्तेश्वराच्या वाक्सरितेचें अंतरंगाहि त्यानें धांडोळलें आहे. प्रारंभींच्या काव्यमय गणेश-नमनापासून अखेरपर्यंत ग्रंथ रसाळ उतरला आहे. ग्रंथकाराचें अध्ययन सखोल असल्यामुळें सांप्रदायिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें या ग्रंथाचें महत्त्व विशेष आहे. 'सिद्धसिद्धान्तपद्धति', 'अमनस्क', 'गोरक्षशतक', 'विवेकमार्तंड', 'मत्स्येंद्रसंहिता', 'गोरक्षयोगबोध', 'हठयोगप्रदीपिका' इत्यादि महत्त्वपूर्ण सांप्रदायिक ग्रंथांबरोबरच गीता, भागवत, योगवासिष्ठ, पूर्वोत्तर-मीमांसाग्रंथ, पातंजलयोगसूत्रें, सप्तशती, नीतिशतक व देशी भाषेंतील महनीय ग्रंथ — एवढी व्यापक संदर्भ-सामग्री ग्रंथकाराच्या हाताशीं असल्यामुळें ग्रंथांतील विचारप्रदर्शनाच्या प्रत्येक प्रसंगाला विलक्षण वजन प्राप्त झालें आहे. शिवशक्ति-समावेशन, पिंडब्रह्मांडसमरसीकरण यांसारख्या शुद्ध तात्त्विक विवेचनाइतकेंच संप्रदायवेश, अजपाजप, इत्यादि लहानसहान साधनाविशेषांचें विवेचन तो तत्त्वज्ञानाच्या उच्च पातळीवरून करतो. यांतील नाथसिद्धांच्या कथा सांप्रदायिक इतिहासाच्या दृष्टीनें 'नवनाथभक्तिसारा'इतक्याच निरुपयोगी असल्या तरी या कथांतील कांहीं लहान-सहान फरक भूतकालाच्या दुष्ट मौनाला छिद्रें पाडणारें आहेत, एवढें मात्र खरें. 'सामरस्याच्या बोहल्यावर शिवशक्तीचें स्वयंवर साजिरें करणाऱ्या' या ग्रंथकाराचें महत्त्व महाराष्ट्रांतील नाथ संप्रदायाच्या इतिहासात स्थिर व्हावयास हवें. त्यानें अवतरिलेल्या संस्कृत श्लोकांचें संकलन करून कांहीं अनुपलब्ध सांप्रदायिक ग्रंथांवर प्रकाश टाकतां येईल.

## ज्ञानेश्वर-मंडळ :

निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई या चौघांचाहि नाथ संप्रदायाच्या इतिहासांतच अंतर्भाव करावयास हवा. गहिनीनाथांनीं उजळलेल्या या चार ज्योतींच्या प्रकाशानें महाराष्ट्राचें हृदय धवळून निघालें. गहिनीनाथांकडून नाथ संप्रदायाचा ठेवा निवृत्तिनाथांच्या हातीं आला; त्यामुळें सांप्रदायिक दृष्ट्या ज्ञानेश्वर-मंडळांत निवृत्तिनाथांनाच अग्रस्थान द्यावें लागेल. या चौघांहि भावंडांची जीवनकथा सर्व मराठी जनतेला ज्ञात आहे. त्यामुळें ती पुनः येथें देऊन विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं. ब्रह्मगिरीवर गहिनीनाथांनी निवृत्ति-नाथांना जो संदेश दिला, तो ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या उपसंहारांत शब्दशः ग्रथित केला आहे —

तेणें कळिकळित भूतां । आला देखोनि निरुता ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥
ना आदि गुरु शंकरा । लागोनि शिष्यपरंपरा ।
बोधाचा हा संसरा । जाला जो आमुतें ।
तो हा तूं घेऊनि आघवा । कळीं गिळितयां जीवां ।
सर्व प्रकारीं धांवा । करीं पा वेगीं ॥[२७]

हा संदेश ज्ञानेश्वर-मंडळानें सर्वस्वानें साकार केला आहे, याचा इतिहास सर्वश्रुत आहे. निवृत्तिनाथांनीं आपलें जीवन-ध्येय आपला कनिष्ठ बंधु आणि शिष्य श्रीज्ञानेश्वर यांच्या करवीं पार पाडलें. निवृत्तिनाथांच्या व्यक्तिमत्त्वाचें महिमान ज्ञानेश्वरांनीं जागोजाग गाइलें आहे. स्वतः निवृत्तिनाथांनी 'निवृत्ते-श्वरी' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे.[२८] निवृत्तिनाथांचे सुमारें ४०० अभंग आज आपल्यापुढें आहेत. या अभंगांत कृष्णभक्तीचा जिव्हाळा आणि परतत्त्वस्पर्शाची अनुभूति सर्वत्र दृग्गोचर होते.

ज्ञानेश्वर हें तर महाराष्ट्राचें पितृतीर्थ होय ! त्यांचा प्रभाव महाराष्ट्रांतील लोकमानसावर आजहि दिसून येतो. 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' हे दोन ग्रंथ काव्य व तत्त्वज्ञान या दोन्ही क्षेत्रांत जगाच्या वाङ्मयांतहि अजरामर ठरतील. ज्ञानेश्वरांसारखा महामानव निर्माण करून नाथ संप्रदायानें भारतीय साधनेच्या इतिहासांत आपलें नांव चिरस्थायी बनविलें आहे.

ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताबाई या तिघांपासून नाथ, वारकरी, चैतन्य अशा अनेक शिष्यपरंपरा निर्माण झाल्या आणि नाथ संप्रदायाचा प्रवाह आज-पर्यंत अखंड वाहत आला आहे. मुक्ताबाईनें आपल्या ज्ञानतेजानें चांगदेवा-सारख्या महान् योग्याचेंहि गुरुत्व पत्करण्याची क्षमता दाखविली. ज्ञानेश्वर-मंडळाच्या आध्यात्मिक वैभवामुळें आणि सोज्वळ व्यक्तिमत्त्वामुळें महाराष्ट्रांत नाथ-परंपरा अविकृत आणि बाह्यावडंबरापासून सदैव अलिप्त राहिली. शिवाय नाथ, वारकरी, आनंद, चैतन्य, दत्त, समर्थ इत्यादि संप्रदायांत समन्वय आणि सहकार नांदून साधनेचा सहप्रवास सुरू राहिला, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची.

---

२७. ज्ञानेश्वरी, १८. १७५८–१७६०.

२८. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त : शके १८३८, पृ. ८०.

आहे महाराष्ट्रीय साधनेच्या इतिहासांत ज्ञानेश्वरांचें नांव 'युगकर्ता महापुरुष' म्हणून सुवर्णाक्षरांनीं नोंदवायास हवें.

## ज्ञानेश्वरांची शिष्यसंख्या :

ज्ञानेश्वरांनंतर नाथ संप्रदायाचा वंशविस्तार खूपच वाढला. ज्ञानेश्वर-शिष्य सत्यामलनाथ यांनीं आपल्या 'नवरत्नमाला' या ग्रंथांत ज्ञानेश्वरांचे पुढील नऊ शिष्य नोंदविले आहेत[२९] : ( १ ) सोपानदेव, ( २ ) मुक्ताबाई, ( ३ ) विसोबा खेचर, ( ४ ) विमलानंद, ( ५ ) सत्यानंद ( सत्यामलनाथ ), ( ६ ) स्वरूपनाथ, ( ७ ) चर्पटनाथ, ( ८ ) सच्चिदानंद, ( ९ ) रामचंद्रनृप. या नऊ शिष्यांपासून पुढें मोठा परंपराविस्तार झाला.

## सोपानोत्तर परंपरा :

सोपानदेवापासून : सोपान – मुचकुंदानंद ( मुकुंदनाथ ) – अव्यक्त – जनार्दन – अलक्ष्य – अचिन्त्य – त्र्यंबकनाथ अशी परंपरा निर्माण झाली. या त्र्यंबकनानाथाचे दोन शिष्य : कविदास मुकुंदराज व कोनेरीनाथ. कोनेरीनाथाचा शिष्य लिंगनाथ हा होय.

**लिंगनाथ योगी :** हे नाथपंथी सत्पुरुष सुमारें १५० वर्षांपूर्वीं कर्नाटकांत चंदी-चंदावरच्या बाजूस होऊन गेले. यांचा 'अमृतसार' नामक एक योगशास्त्रविषयक ग्रंथ उपलब्ध आहे. हा ग्रंथ त्यांनीं शके १६४६ ( १७२४ ) सालीं कावेरीतीरीं चंदावर येथें लिहिला. त्या वेळीं तेथें शरभ ( शरफोजी भोसले ) नामक राजा राज्य करीत होता. आपल्या ग्रंथांत लिंगनाथानें 'मौनावती वेदश्रुति' अशा थाटांत शरभाचें जें अतिशयोक्त वर्णन केलें आहे, त्यावरून तो शरभाचा आश्रित कवि असावा, असें वाटतें. कोनेरीनाथांनीं आपलें 'लिंगनाथ' असें नांव ठेवल्याचें कवि लिहितो, त्या अर्थीं त्याचें मूळचें नांव निराळें असावें.

लिंगनाथाचा 'अमृतसार' हा ग्रंथ योगपर असून त्यांत १५ अध्याय व १४०० ओव्या आहेत. या ग्रंथाची रचना शके १६४५ मध्यें कावेरीतीरीं चंदावर येथें झाली. कवि सोपान-परंपरेंतील आहे; त्यामुळें सांप्रदायिक ज्ञानाचा वारसा त्याला लाभला आहे. हा ग्रंथ पांगारकर संग्रहांत आहे.

---

२९. 'माऊली', व. १, अं. २, पृ. १०१.

ग्रंथांच्या प्रारंभींच भाविक-अभाविक वर्णन आहे. भाविकांचे गोडवे गातांना कवीनें नवविधाभक्तीचा महिमा वर्णिला आहे. खालील उतारा ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांतील ओव्या २५३–२७० शीं ताडून पहावा –

कोण्ही चारी मुद्रेच्या साधनीं। अर्धोन्मीलित दृष्टि करुनी।
लक्ष लाविती गगनीं। नानारूप नयनीं अवलोकिती॥
सूर्य चंद्र उगवले जैसे। गगनगर्भीं तेज भासे।
किंवा तारांगणें उदेलींसीं दिसे। साधक उल्हासें पाहती॥
मुक्ताफळांचिया पंगती। लखलखीत भासों लागती।
सोनियाचे चूर दिसती। तार उठती प्रकाशाचें॥
कीं उजळले रत्नदीपक। झळमळीत जैसा मयंक।
तैसें तेज निष्कळंक। भक्त भाविक अनुभविती॥
जैसा चांदण्याचा गोंधळ। उगवला दिसे सोज्वळ।
तैसा प्रकाश भासे निर्मळ। नाहीं मळ प्रपंचाचा॥[३०]

**कविदास मुकुंदराज :** हा त्र्यंबकनाथाचा शिष्य आपल्या 'योगविवेक-मार्तंडदीप' या ग्रंथामुळें प्रसिद्ध आहे गुरुपरंपरेव्यतिरिक्त कवीच्या कालासंबंधीं किंवा चरित्रासंबंधी कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. कवीनें "योगियांमाजीं प्रसिद्ध। महायोगी॥" असा त्र्यंबकनाथाचा गौरव केला आहे.

मुकुंदनाथ ऊर्फ मुकुंदराजांचा 'योगविवेकमार्तंडदीप' हा ग्रंथ म्हणजे गोरक्षनाथाच्या एका संस्कृत ग्रंथावरील टीका आहे. गोरक्षनाथाच्या नांवावर 'योगमार्तंड' व 'विवेकमार्तंड' असे दोन्ही ग्रंथ आहेत. मुकुंदराजांच्या ग्रंथांतील नांवांत 'योगविवेक' असे दोन्ही शब्द आहेत. 'गोरक्षसिद्धान्तसंग्रहा'मध्यें 'विवेकमार्तंडा'तील चार अवतरणें आलीं असून 'योगमार्तंड' हा समग्र ग्रंथ डॉ. मलिक यांच्या संकलनांत आहे. मुकुंदराजानें लिहिलेल्या टीकेंतील मूळ संस्कृत श्लोक गोरक्षाच्या ग्रंथाशीं ताडून पाहूनच याचा निर्णय करणें शक्य आहे. श्री. कानोले यांनीं 'ऐ. संकीर्ण वाङ्मय-साहित्य' खं. १ मध्यें या ग्रंथाचा परिचय देतांना जो यांतील उतारा दिला आहे, त्यावरून ही 'योग-मार्तंडा' वरचीच टीका आहे, असें ठरतें –

---

३०. महाराष्ट्र कविचरित्र, भाग ५, पृ. ८३–८६.

— कुण्डलिन्या समुद्भूता गायत्री प्राणधारिणी ।
सप्रणवामिमां विद्यां यस्तं वेत्ति स योगवित् ॥ ( उतारा )
— कुण्डलिन्या समुत्पन्ना गायत्री प्राणधारिणी ।
प्रणवाद्यास्तथा विद्या यस्तं वेद स वेदावित् ॥ ( यो. मा. ३५ )

हे दोन श्लोक, थोड्या पाठभेदाशिवाय, एकरूपच आहेत. फक्त उताऱ्यांतील श्लोकाचा क्रम ३५ नसून ३७ आहे. उताऱ्यांत यापुढें आलेले क्र. ३८, ३९, ४० हे तीन श्लोक थोड्याशा फरकानें 'योगमार्तण्डां'तील क्र. ३६, ३७, ३९ हेच श्लोक आहेत. 'योगमार्तण्डां'तील मधला क्र. ३८ हा श्लोक उताऱ्यांत आलेला नाही. यावरून मुकुंदराजापुढें असलेली 'योगमार्तण्डा'चीच पाठ-भेदान्तरित प्रत असली पाहिजे, हें उघड आहे. मुकुंदराजानें मूळ ग्रंथाची श्लोकसंख्या १८३ दिली आहे; मुद्रित 'योगमार्तण्डा'ची १८८ ही श्लोकसंख्या वरील संख्येच्या जवळपास आहे. श्री. कानोले यांच्याजवळील अपूर्ण प्रत आणि औंधकरांच्या संग्रहांतील संपूर्ण प्रत[31] यांत तफावत असावी, असें वाटतें. ओवीसंख्या दोहींतहि एकच असली तरी संस्कृत श्लोक संपूर्ण प्रतींत १३५ च आहेत. मुकुंदराजाच्या टीकाग्रंथांतील या ७७४ ओव्यांतून हें स्पष्ट होतें कीं, ग्रंथकारावर ज्ञानेश्वरी व अमृतानुभवाचा खूप प्रभाव आहे. श्री. कानोले यांनीं परिचय-लेखांत ज्ञानेश्वरी ६·२२२—२६ व यो-वि-मा-दीप ९० — ९८ हे साम्य-दर्शक उतारे दिले आहेत. सांप्रदायिक तत्त्वज्ञानाच्या अभ्यासांत या ग्रंथाचें महत्त्व विशेष आहे.

खालील प्रथम श्लोकावरील टीकेचा भाग वाचला तरी मुकुंदराजाच्या भाषिक व वैचारिक सामर्थ्याची कल्पना येईल —

जयाचिया आत्मप्रतिति । बंधमोक्षाची हरे भ्रांति ।
तो मिननाथु चितिं । सेवीतो मी ॥ २२ ॥
जिया पुरुषीं निरंतर । न साहे द्वैतभाव संचार ।
तेथ सेव्यासेव्य प्रकार । म्हणाल कैसा ॥ २३ ॥
जेवि जळाचिया पोटिं । तरंग दृश्यत्वेंसि उठि ।
परि तो जळत्वेंसि तुटि । पडों नेदि ॥ २४ ॥

---

३१. या प्रतीची नक्कल मला म. म. पोतदार यांच्या संग्रहांत पहावयास मिळाली.

तेविं गुरु शिष्य मिसें । सेव्यासेव्यत्व उल्हसे ।
परि ऐक्यत्व जैसें तैसें । अखंडाकारें ॥ २५ ॥

**गंगाधरनाथ :** वरील सोपान-परंपरेंतील जनार्दनाचा शिष्य रघुनाथ व त्याचा शिष्य हा गंगाधरनाथ अथवा गंगानाथ होय. या गंगाधरनाथानें शके १७२१ मध्यें 'गोरक्षगीता-निरूपण' या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. बेलापूर-वनांतील श्रीविद्यानंदस्वामी महाराज या साधु पुरुषाच्या स्वाध्याय-ग्रंथांत गंगाधरनाथाच्या या ग्रंथाचा समावेश होत असे.[३२]

'गोरक्षगीतानिरूपण' ही गहिनीनाथांच्या मूळ 'गोरक्षगीते'वरील लघु टीका आहे. हें निरूपण १२१ ओव्यांचें आहे. पहिल्या १० ओव्यांत गुरुस्तवन व ग्रंथप्रस्ताव आहे आणि अखेरच्या १० ओव्यांत ग्रंथोपसंहार व गुरुपरंपरा आहे. म्हणजे हें (१२१–२०=) एक ओवीशतक आहे, असें म्हटलें तरी चालेल. मूळ ग्रंथ किती ओव्यांचा असावा, याची कल्पना नाहीं. परंतु तो गहिनी-कृतच असावा, असें " पांचवी हे गोरक्षगीता । गहिनीनाथ संवादू ॥ " " श्रीगोरक्षें उपदेशिला । योग गहिनीनाथें अनुभविला ॥ " या अंतर्गत उल्लेखांवरून निश्चित होतें. ग्रंथांतील भाषेवर ज्ञानेश्वरीची छाया आहे. " दोनी दंशु गा भले । नाथपंथीं ॥ " (८५) या ओळींत 'नाथपंथ' हेंच पंथनाम आलें असून 'दंशु' हा शब्द ज्ञानेश्वरीतील अर्थानेंच वापरला आहे. या ग्रंथांत यौगिक प्रक्रिया, योगसिद्धि आणि गुरुमहिमान वर्णिलें आहे. " ये पंथींचा अभिमानी । स्वयें असे शूलपाणी । " असें विवेकसिंधु-काराच्या शब्दांत उद्घोषित केलें आहे.

वरील परंपरेखेरीज सासवडचे गणेशनाथ आणि द्रविड देशांतील प्रकाश नाथ असे आणखी दोन सोपानदेवांचे शिष्य होते. या द्राविड देशांतील प्रकाश-नाथाचा (प्रकाशानंदाचा) अवश्य शोध घ्यावयास हवा. आळंदीच्या सोपान-देवाचा बोध द्रविड देशांतील एका पुरुषाला मिळावा, ही महत्त्वाची बाब आहे. प्रकाशनाथाची परंपरा उपलब्ध आहे काय, हें समजलें तर ज्ञानेश्वरोत्तर नाथ-परंपरेवर नवा प्रकाश पडेल. मागें उल्लेखिलेला चंद्री-चंदावरचा लिंगनाथ

३२. श्रीकेशवगोविंदमाहात्म्य : पां. श्री. आपटे व दा. गो. पाटील, या पुस्तकांत 'गोरक्षगीता निरूपण' छापलें आहे.

आणि तंजावरच्या गरुड मठांतील चिंद्ड शंकर हा नाथपंथी कवि यांच्या-संबंधींच्या विशेष संशोधनांतून या दिशेनें कांहीं पाऊल टाकतां येईल, असें वाटतें. गहिनीनाथांचा एक शिष्य प्रकाशनाथ याच नांवाचा होता. तो आणि हा प्रकाशनाथ एकच कीं वेगळे, याचाहि शोध घ्यावयास हवा.

**मुक्ताबाई-प्रणीत परंपरा :**

मुक्ताबाईपासून चांगा वटेश्वर ( चक्रपाणि ) – विमलानंद – चांगा केशवदास – जनकराज – नृसिंह अशी परंपरा आहे. नृसिंहापासून हृदयानंद – विश्वेश्वर – केशवराज – हरिदास – परमानंद – नित्यानंद – शिवकल्याण, ही एक परंपरा आणि पुरुषोत्तम – मुक्तानंद – येकानंद – पुरुषोत्तम – सिद्धानंद – रामानंद – रत्नाकर ही दुसरी परंपरा रूढ झाली. मुक्ताबाईचा चांगा वटेश्वरा-शिवाय चैतन्य नामक आणखी एक शिष्य असल्याचें सत्यामलनाथांनी उल्लेखिलें आहे.[33] चांगा केशवदास हा पुणतांब्याचा होय. त्यानें स्थापन केलेलें केशव-राजाचें देऊळ अद्यापि पुणतांबें येथें आहे. मरुद्गण उपनांवाचे त्याचे वंशजहि तेथें आहेत. या परंपरेंत चांगा वटेश्वर, चांगा केशवदास, शिवकल्याण आणि रत्नाकर या चौघांचीच माहिती उपलब्ध आहे.

**चांगा वटेश्वर** ( समाधि : शके १२४७ ) : चांगा वटेश्वराचा समाधि-काल ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर सुमारें तीस वर्षांनी नंतरचा असला, तरी चांगा ज्ञानेश्वरांना शरण आला त्या वेळीं तो एक वयस्क योगी होता, हें महत्त्वाचें आहे. ज्ञानेश्वरांना शरण येण्यापूर्वी एक महान् योगी पुरुष म्हणून त्याची सर्वत्र ख्याति होती, असें अनुश्रुतीवरून दिसतें. अर्थात् त्याच्या यौगिक गुरुपरंपरेचा वेध घेणें उद्बोधक ठरेल. चांगदेवाची सर्व हयात चक्रधर-समकालीन ठरते. 'लीळाचरित्रां'त अनेक नाथ सिद्धांची आणि योगिनींची माहिती आली आहे, पण त्यांत चांगदेवाचा उल्लेख नाहीं. चांगदेवाचा 'तत्त्वसार' हा ग्रंथहि संपूर्णपणें उपलब्ध नाहीं. हा 'तत्त्वसार' संपूर्ण उपलब्ध झाला आणि चांगदेवाच्या गुरु-परंपरेंतील एखाद्या योग्याचा ग्रंथ उपलब्ध होऊं शकला, तरच या दिशेनें शोध घेणें शक्य होईल. तसें झालें तर महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वरपूर्व योग-साधनेवर प्रकाश पडून नाथ संप्रदायाचें मूल स्वरूपहि कळूं शकेल. आज तरी त्याविषयीं विशेष कांहीं सांगतां येणें कठीण आहे.

---

३३. 'माऊली', व. १, अं. २, पृ. १०१.

पूर्व खानदेशांतील तापी-पयोष्णी नद्यांच्या संगमावरील मंदिरांत चांगदेवाचा निवास असे. याच शिवमंदिरांत तो योगसाधना करीत असे. लौकरच त्यानें अनेक योगसिद्धि प्राप्त करून घेतल्या. ज्ञानेश्वरांची कीर्ति ऐकून त्याचा योगाभिमान डिवचला गेला आणि आपलें योगसामर्थ्य सिद्ध करण्यासाठी म्हणून तो ज्ञानेश्वरांकडे आला. परंतु त्याचा अभिमान मावळला आणि ज्ञानेश्वरांविषयींच्या भक्तिभावानें त्याचा हृदय-गाभाराहि धवळला. ज्ञानेश्वरांनीं त्याला जो उपदेश केला, तो पत्ररूप-संदेश म्हणजेच 'चांगदेवपासष्टी'. कांहींच्या मतें ज्ञानेश्वरच आपल्या परिभ्रमणकालांत या संगमस्थलीं आले होते आणि तेथें त्यांनी प्रत्यक्ष भेटीत चांगदेवांना बोध केला. चांगदेवाला गुरुदीक्षा दिली ती मुक्ताबाईनें. चांगदेवानें आपल्या ग्रंथांत ( 'तत्त्वसार' ) व अभंगांत मुक्ताईचा गुरु-गौरव हृदयभरानें केला आहे. मुक्ताबाईनेंहि याच तापी-पयोष्णी-संगमावर अखेर समाधि घेतली ( शके १२१८ ).

चांगदेवाचे अखेरचे दिवस कोठें व्यतीत झाले, हेंहि कळण्यास साधन नाहीं, मग पूर्वजीवन कळणें तर दूरच. नामदेवगाथ्यांत त्याची समाधि मुक्ताइच्या समाधीपूर्वी वर्णिली आहे; परंतु तें खरें नाहीं. कारण चांगदेवाचा 'तत्त्वसार' हा ग्रंथ शके १२३४ मधील आहे. पांगारकर त्याची समाधि शके १२४७ मधील मानतात, तें बरोबर वाटतें. तापी-पयोष्णी-संगमावर 'चांगदेव' या नांवाचें एक गांवच वसलेलें आहे; तेथें प्रतिवर्षी माघ वद्य १३ व महाशिवरात्रीस चांगदेवाच्या स्मृतीप्रीत्यर्थ यात्रा भरते आणि हजारों भाविक तेथें जमतात.

चांगदेवपासष्टींत चांगदेवास 'वटेश्वराचा पुत्र' ( चां. पा. ३७ ), 'चक्रपाणि' ( चां. पा. ४०, ६२ ), 'चांगया' ( चां. पा. ४५, ६० ), 'चांगदेव' ( चां. पा. ६१ ) या नांवांनीं बाहिलें आहे. परंतु चांगदेवपासष्टीच्या पहिल्याच ओवींत 'स्वस्ति श्रीवटेशु' असें संबोधन आहे, त्याची 'वटेश्वराचा पुत्र' याच्याशी संगति कशी लावावयाची ?

आतां वटेश्वरप्रसादें । मी निर्गुणभक्ति अनुवादें ।
तरि आइकतु श्रोते विनोदें । चांगा म्हणे ॥

* * *

आतां वटेश्वरु होउनु निगुतें । सांघेन मिं वटेश्वरातें ।
मना करविं गिळवीन मागुतें । संसारासि ॥

* * *

त्रिगुण गौप्य गव्हरु । तो स्वामि माझा वटेश्वरु ।

* * *

गुरु वटेश्वरिं वाइली पूजा । चांगा म्हणे ॥

* * *

वटेश्वराचा सुतु । चांगा म्हणे अवधुतु ॥

* * *

कथिलें वटेश्वर प्रसादें । योगरहस्य हें ॥

* * *

वाइली वटेश्वरचरणयुगुळ । चांगा म्हणे ॥

या 'तत्त्वसारां'तील उल्लेखांशिवाय 'तत्त्वसारा'च्या समाप्तिलेखांत 'श्रीवटेश्वरार्पणमस्तु' असे शब्द आहेत. त्याचप्रमाणें सिद्ध पंथांतील सिद्ध-नामावळी देतांना 'चक्रपाणि' असा स्वनामोल्लेख आहे –

श्रीमुक्तादेवी योगिनी । जे समस्त सिद्ध शिरोमणि ।
तिये प्रसादें चक्रपाणि । ज्ञानसिद्‌धु ॥ [३४]

'चांगदेवपासष्टी' हा चांगदेवासाठीं लिहिलेला ग्रंथ आणि 'तत्त्वसार' हा स्वतः चांगदेवानें लिहिलेला ग्रंथ असल्यामुळें या दोन्ही ग्रंथांतील उल्लेखां-वरून बांधलेले सिद्धान्तच ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे ठरतील. या उभय ग्रंथांतील वरील उल्लेखांवरून 'चांगा', 'चांगया', 'चांगदेव', 'चक्रपाणि' हीं या एकाच व्यक्तीचीं नांवें असून 'वटेश्वर' हें त्याच्या गुरूचें नांव आहे. 'वटेश्वर' हें त्याच्या उपास्यदेवतेचें नांव आहे, असेंहि कांहीं मानतात; पण ओवी क्र. १०२३ मध्यें 'गुरु वटेश्वरिं वाइली पूजा' असे स्पष्ट संशयच्छेदी शब्द आहेत.

चांगदेवानें आपल्या अभंगांतहि वटेश्वराचा उल्लेख अनेकदां केला आहे –

चांगा वटेश्वरीं सोहं झाला । अवघाचि बुडाला ज्ञान डोहीं ॥ [३५]
डोळां लावुनि निजीं निजेला निवांत । स्वप्नीं वटेश्वर देखिला निवांत ॥ [३५]
चांगा म्हणे जिवींचें गुज । वटेश्वरें मज सांगितलें ॥ [३५]
चांगा सोय धरी ज्ञान वटेश्वरीं । मुक्ताई जिव्हारीं बोध करी ॥ [३५]

---

३४. 'तत्त्वसार', ओ. ८६५.

३५. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गाथा, पृ. २२२–२२९ (श्रीचांगदेवाचे अभंग).

यांतील शेवटच्या अवतरणांत तर 'वटेश्वर' व 'मुक्ताई' या दोन्ही गुरुस्थानांचा एकत्र उल्लेख आहे. वर उल्लेखिलेली ओवीहि ( त. ८६९ ) श्रीमुक्तादेवीचा उल्लेख करणारी आहे.

निर्दैवें मनिं शुद्ध नव्हति । मग गुरुवरि गुरु कारिति ।
ते तैसेचि लोटिजाति । अधोगति ॥[३६]

या ओवींत अनेक गुरु करण्याचा चांगदेवानें निषेध केला आहे; यावरुन डॉ. दिवेकर ( 'तत्त्वसारा'चे संपादक ) यांनीं असें ठरविलें आहे कीं, चांगदेवानेंच स्वतः आपल्या या विचाराचें उल्लंघन करणें अशक्य आहे — वटेश्वर हें गुरुनाम नसून उपास्यबोधकच नांव असलें पाहिजे. परंतु —

तरि जयाचा अनुग्रहो आधिं । तयातें पुसावें त्रिशुद्धि ॥
तैं आणिकी ठाइं बुद्धि । करूं लाहे ॥
कां आधिला गुरुचेनि अभावें । आणिका गुरुतें भजावें ॥
तैं दोषातें न पवे । साधकु तो ॥
गुरु देवंगत होती । कां दीपांतरां जाती ।
तेयावाचूनु आणिके ठाइं संगति । करूंचि नये ॥
जो योगु पहिलिये ठाइं सांघती । तोचि संवादु आणिके ठाइं देखाति।
तरी आधिल गुरु मानिजती । त्रिशुद्धि गा ॥[३७]

या ओव्यांत आणखी गुरु करण्याचा जो अपवाद चांगदेवानें सांगितला आहे, तो विशेष सूचक आहे. मुक्ताबाईचा अनुग्रह मिळाला, तेव्हां वटेश्वर हयात नसावे, असें मानावयास हरकत वाटत नाहीं.

मग हा वटेश्वर चांगदेवाचा योगगुरु होता काय ? डॉ. दिवेकरांच्या मतें वटेश्वराचा योगमार्गाशीं संबंध सिद्ध होत नाहीं. चांगदेवानें सिद्धपंथीयांची जी नामावळी दिली आहे, तींत 'श्रीमुक्तादेवी'चा समावेश आहे, पण वटेश्वराचा नामोल्लेखहि नाहीं. ही शंका रास्त असली तरी या नामावळींत जसें वटेश्वराचें नांव नाहीं, तशींच गहिनी, निवृत्ति व ज्ञानेश्वर यांचींहि नांवें नाहींत. 'तत्त्व-सारा'ची रचना जर ज्ञानेश्वर-चांगदेव संबंधानंतर झाली आहे, तर येथें हा

३६. 'तत्त्वसार', ओ. ९४९.
३७. 'तत्त्वसार', ओ. ९४४–९४७.

नामोल्लेख आवश्यक होता. या नामावळीतच काय, पण या संपूर्ण ग्रंथांतच ( उपलब्ध भागांत ) ज्ञानेश्वरांचा कुठें उल्लेख नाहीं.

ज्ञानेश्वरांशीं संबंध येण्यापूर्वीहि चांगदेव योगी होते, हें मात्र निश्चित. चांगदेवानें नाथ सिद्धांची जी विस्तृत नामावळी दिली आहे, तितकीं नांवें ज्ञानेश्वरींत वा ज्ञानेश्वर-मंडळाच्या अन्य कृतींत कुठेंहि आढळत नाहींत. शिवाय गोरक्ष-चौरंगीचा त्यानें आणखी दोन वेळां ( तत्त्वसार, पृ. १० ) गोरखोल्लेख केला आहे. ही सिद्धपंथांतील सिद्धांची नामावळी केवळ शिष्याच्या प्रश्नावरून दिलेली माहिती आहे, अशी कोणी शंका घेईल. परंतु याच नामावळींत मुक्तादेवीचा आणि आपल्या तच्छिष्यत्वाचा उल्लेख आहे. आपल्या ग्रंथाचें वर्णन चांगदेव ' निर्गुणभक्तीचा अनुवाद ' ( त. ६०० ), 'सिद्धयोग' ( त. ६७१ ), 'योगरहस्य' ( त. १०३५ ) असें करतो. शिवाय –

वटेश्वराचा सुतु । चांगा म्हणे अवधुतु ।
सिद्धसंकेतें मातु । प्रकट केली ॥[३८]

या ओवींत स्वतःचा 'अवधूत' म्हणून केलेला उल्लेख आणि 'सिद्धसंकेता'चें रहस्यच आपण प्रकट केलें आहे, हा उल्लेख शंकानिरसनास पुरेसा आहे.

'तत्त्वसार' चाळतांना आणखी एक प्रगूढ शंका मनांत तरळली, ती येथें व्यक्त करतों. चांगदेवाचा पूर्वजीवनांत महानुभाव संप्रदायाशी कांही संबंध आहे काय ? –

( १ ) चक्रधरांनीं शके ११८० मध्यें महानुभाव संप्रदायाचें प्रवर्तन केलें; त्यापूर्वीच त्यांनीं गुंडम राउळांकडून गुरुमंत्र घेतला होता. ती परंपरा कोणती ? चांगदेव राऊळ आणि गुंडम राऊळ हे दोघेहि नाथ सिद्ध असल्याचें मीं पुढील प्रकरणांत साधार सिद्ध केलें आहे. चांगदेव राउळांचींहि 'चांगदेव' व 'चक्रपाणि' अशीं दोन नांवें होती. चांगा वटेश्वर आणि चांगदेव राऊळ या दोघांहि नाथ सिद्धांच्या नांवाचे दोन्ही पर्याय एकच असावे, हें नवल नाहीं काय !

( २ ) 'तत्त्वसारां'त गोरक्षानंतर एकदम श्रीमुक्तादेवी योगिनीचें नांव येतें. गहनी ते ज्ञानेश्वर हीं तीन नांवें त्यांत नाहींत. मग ही मुक्तादेवी योगिनी कुणी गोरक्षशिष्या होती काय ? गोरक्षाच्या काळाला जवळ असलेली, कदाचित्

३८. 'तत्त्वसार', ओ. १०२५.

गोरक्षाचा सहवास प्राप्त झालेली एक मुक्तादेवी योगिनी ( भर्तृहरि-शिष्या ) चक्रधरांना एकांककाळांत सालबर्डीच्या डोंगरावर भेटल्याचें वर्णन लीळा-चरित्रांत आहे.[३९] चक्रधराचें तिनें स्वागतहि केलें होतें.

( ३ ) 'तत्त्वसारां'त गुंडम राऊळ या चक्रधर-गुरूचा सिद्ध म्हणून उल्लेख आहे. 'तत्त्वसारां'त उल्लिखित अनेक सिद्धांची माहिती 'लीळाचरित्रां'ताहि आहे.

( ४ ) 'तत्त्वसारां'तील खालील दोन ओव्याहि या संबंधांत विचारणीय आहेत –

**गुरुचरण मस्तकीं ठेविले । आणि पोटेंसि धरिले ।**
**मग हात पसरिले । प्रसादासि ॥**
**गुरूनि मूखिचा उगाळु दिधला । महाप्रसादु म्हणौनि येरें घेतला ।**
**मग शिष्यें पुसिला । सिद्धपंथु ॥[४०]**

यांतील 'प्रसादपद्धति' महानुभावीय वातावरणांतील आहे, हें लीळाचरित्राच्या सर्व अभ्यासकांना परिचित आहेच.

– चांगदेवाच्या पूर्वजीवनावर प्रकाश पाडणारी सामग्री उपलब्ध झाल्या-शिवाय या गूढावर कांहीं बोलणें कठीण आहे. 'तत्त्वसारा'ची संपूर्ण प्रत नि वटेश्वराची एखादी कृति मिळेल काय, यासाठीं धडपडलें पाहिजे.

**चांगदेवाचा 'तत्त्वसार'** : ह्या ग्रंथ एकूण १०३६ ओव्यांचा असून त्यांपैकीं एकूण ४०५ ओव्याच उपलब्ध आहेत.

**इति गुरुशिष्य संवादे । तत्त्वसार प्रबंधे ।**
**कथिलें वटेश्वर प्रसादें । योगरहस्य हें ॥[४१]**

असा ग्रंथाचा उपसंहार केला आहे. पहिल्या पांच ओव्यांत गणेशस्तवन असून पुढें शारदास्तवन आहे. पद, पिंड, रूप व रूपातीत यांचा विचार मांडून नंतर, निर्गुण भक्तीचें विवरण केलें आहे. ओव्या ६४३–६६४ यांत हठयोग विवरिला आहे. परंतु या विवेचनांतला विशेष म्हणजे –

---

३९. 'लीळाचरित्र', एकांक ली. ९.
४०. 'तत्त्वसार', ओ. ८६३–६४.
४१. 'तत्त्वसार', ओ. १०२५.

जऱ्हिं शरीरसाधना कीजैल । परि नाशिवंत जाईल ।
वरी जन्मातें सुचिल । दुःखमूळ ॥[४२]

हा विचार. या विवेचनांत स्वानुभवाचा रंग आहे. पुढें निर्वाण व सिद्धयोग सांगून ब्रह्मविवरणास प्रारंभ केला आहे. आणि 'तत्त्वमसि'ची फोड केली आहे.

ओव्या ८६७ ते ८८१ यांत योगमार्गीय सिद्धांचीं नांवें आहेत. पुढें गुरुभक्तीचा महिमा व गुरुद्रोहाचें पाप यांचें वर्णन केलें आहे. हें गुरुभक्तीचें वर्णन व ज्ञानेश्वरांनीं 'आचार्योपासनं' या पदावर केलेलें व्याख्यान एकत्र ताडून पाहण्यासारखें आहे. ग्रंथाच्या अखेरीस पूर्ण तृप्त गुरुशिष्यांचा जो 'परिष्वंग' आहे, त्यांत ज्ञानेश्वरीच्या अखेरची कृष्णार्जुनांची अद्वैतमिठी आणि विवेकसिंधूंतील आदिनाथ-हरिनाथ यांचा तेजोमय संगम यांचें स्पष्ट प्रतिबिंब आहे[४३] —

कां समुद्रिं समुद्रु मिसळला । कां आकाशिं आकाश लयो जाला ।
हरिहरां जाला । ऐक्यवादु ॥
तैसें उभयतां मीनलें । ब्रह्मतेजिं येकवाटल ।
गुरुराशि वाढीतले । असंख्यात ॥
गुरुशिष्य येक जाले । तें जालेंपणहि गेलें ।
गेलेपण राहिलें । वटेश्वरिं ॥

आपण ही 'सिद्धसंकेतें मातु प्रगट केली' असेंच हा चांगा अवधूत म्हणतो. 'बाळबोध मऱ्हाटि आरष बोलां'चाहि चांगदेवानें गौरव केला आहे.

या ग्रंथाची रचना मार्गशीर्ष शुद्ध ३, रविवार, शके १२३४ परिधावी संवत्सर या दिवशी हरिश्चंद्र पर्वतावर ( जि. नगर ) झाली.

'तत्त्वसारां'त शैव परंपरेंतील सदाशिव, शिव, शक्ति, पशु-पाश ही परिभाषा वापरली आहे. " ज्ञानेशांच्या परंपरेंतील या ग्रंथांत शून्यवाद, अनिर्वचनीयवाद, मायावाद व अद्वैतवाद सांगून निर्गुणभक्ति व हठयोगाचीं साधनें सांगितलीं आहेत. 'चांगदेवपासष्टी'च्या द्वारां ज्ञानेश्वरांनीं दिलेल्या ज्ञानाचेंच

४२. 'तत्त्वसार', ओ. ६४७.

४३. 'तत्त्वसार', ओ. १०१०–१०२०; ज्ञानेश्वरी, १८. १४१८–२५; विवेकसिंधु, ८. ६१–६२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८१७६ वि: चरित्र
क्रमांक २०१ नों: दि: २०/८/२०

यांत प्रतिबिंब आहे" असें या ग्रंथाच्या अंतरंगाचें डॉ. पेंडसे यांनीं वर्णन केलें आहे.[४४]

'तत्त्वसारा'शिवाय ज्ञानेश्वर-गाथ्यांत चांगदेवाचे ४६ अभंग समाविष्ट आहेत. 'सासूचे आधीं सून जन्मली' असे रहस्यमय अभंग यांत आहेत. 'कुडी हे नोवरी, आत्मा हा नोवरा' असें कुडी-आत्म्याचें लग्नहि एका अभंगांत आहे. 'वटेश्वरसुत चांगा अवधूत' असा 'तत्त्वसारांत'ल्याप्रमाणेंच स्वतःचा उल्लेख चांगदेवानें केला असून, 'वटेश्वरीं सोय सांगितली' व 'पोसणा घेतला मुक्ताईनें' असा वटेश्वर व मुक्ताई या दोघांचाहि गुरुस्वरूप उल्लेख केला आहे.

'प्राकृत कवीश्वरां'ना वंदन करतांना एकनाथांनीं आपल्या एकादशटीकेंत चांगदेवालाहि वंदिलें आहे.[४५]

**शिवकल्याण :** हा नित्यानंदाचा पुत्र व शिष्य. यानें लिहिलेली 'नित्यानंदैक्यदीपिका' ही अमृतानुभावरील टीका प्रसिद्ध आहे. यानें दशमस्कंधावर विस्तृत ओवीबद्ध टीका लिहिली आहे. हा जोगाईच्या आंब्याचा राहणारा असून पंढरपूरच्या पांडुरंगाचा उपासक होता.

**भक्तिभीमेच्या तीरीं। प्रतीतिविटेवरी**
**समानीं पदीं श्रीहरि। देखिला गा ॥[४६]**

अशा प्रकारचा उच्च 'दर्शनानुभव' प्राप्त झाल्यामुळें शिवकल्याणाच्या शब्दांना दिव्य सामर्थ्य प्राप्त झालें आहे.

**रत्नाकर :** रत्नाकराचे गुरु रामानंद हे गृहस्थाश्रमी असून शेकदार, अमीन इत्यादि हुद्द्यांचीं कामें करीत असत. मुल्हेरच्या बाजूस शोध केल्यास रामानंदाची विशेष माहिती मिळूं शकेल, असें श्री. चांदोरकर यांचें मत आहे. गिरिजा नदीच्या तीरीं चंडीपूर नामक गांव हें रत्नाकराचें वसतिस्थान होतें. रत्नाकराला वयाच्या दुसऱ्या वर्षी वाचा फुटून तो हरिस्मरण करूं लागला अशी आख्यायिका आहे. रत्नाकाराला ज्ञानेश्वरांचा साक्षात्कार झाला होता.

---

४४. ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, पृ. ३७२.
४५. एकनाथी भागवत, १. १२१.
४६. श्रीकृष्णजन्मपंचाध्यायी, १.

त्यास रामानंदाचा गुरूपदेश संवत १७६० ( आषाढ वद्य ११ ) मध्यें मिळाला. रत्नाकाराचा समाधिशक शके १६४१ ( आश्विन वद्य १३ ) असा आहे. रत्नाकरानें आपला 'दीपरत्नाकर' हा प्रसिद्ध ग्रंथ पानखेड येथें ( ता. साक्री, जि. खानदेश ) रामानंदांच्या समाधीजवळ बसून लिहिला.

रत्नाकर हा भार्गव गोत्री, यजुर्वेदी ब्राह्मण. आडनांव सदावर्ते. हरिहर व अजुबाई हीं त्याच्या मातापित्यांचीं नांवें असून सावित्री असें त्याच्या पत्नीचें नांव होतें. बऱ्हाणपूर येथें त्याचा लौकिक वंश आणि कळवण येथें त्याचा आध्यात्मिक वंश आजहि नांदत आहे.

मुक्ताबाईच्या परंपरेंतील या रत्नाकर कवीचे अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत :

| | | |
|---|---|---|
| ( १ ) दीपरत्नाकर | ( २ ) सिद्धान्तरत्नाकर | ( ३ ) वैराग्यररत्नाकर |
| ( ४ ) उपदेशरत्नाकर | ( ५ ) भिक्षुगीत | ( ६ ) अनुभवरत्नाकर |
| ( ७ ) ब्रिजभागवत | ( ८ ) रत्नाकरी गीता | ( ९ ) स्फुट रचना |

हे आणि आणखी ६ ग्रंथ आहेत. पैकीं 'दीपरत्नाकर' व 'उपदेशरत्नाकर' प्रसिद्ध[४७] झालेले असून बाकीच्या अप्रकाशित ग्रंथांपैकीं बरेचसे श्री. चांदोरकर यांच्या संग्रहांत आहेत. 'दीपरत्नाकरा'चे अध्याय १५ व ओवीसंख्या ३३७० आहे. सर्व ग्रंथांचा पसारा सुमारें ४०,००० ओव्यांचा आहे. रत्नाकराची बहुतेक सर्व कविता अध्यात्मपर आहे. त्याची भाषा प्रासादिक असून, दृष्टान्तांची हातोटी चांगली आहे. 'दीपरत्नाकर' गुरुशिष्यसंवादात्मक ग्रंथ आहे. रत्नाकराची समश्लोकी गीताहि सुबोध असून तिचा रचनाकाल मकरसंक्रान्त शके १६२१ असा आहे.[४८]

**विठ्ठलकिंकर :** विठ्ठलकिंकर हा मुक्ताबाईच्या परंपरेंतील.[४९] आदिनाथ-गोरक्ष – मुक्ताबाई – चांगा वटेश्वर – विमलानंद – चांगा केशवदास – जनकराज – नृसिंह – हृदयानंद – विश्वेश्वर – केशवराज – बोपया – हरिदास – कान्हया – सदानंद – कृष्ण – श्यामसुंदर – अनंत – प्रल्हाद – नागया –

---

४७. 'दीपरत्नाकर' : प्रकाशक पं. वि. पाठक, मुंबई. द्वितीयावृत्ति १९२९. 'उपदेशरत्नाकर' : 'स्फुट प्रकरणें' भा. १, या भा. इ. सं. मंडळ-प्रकाशित पुस्तकांत समाविष्ट.

४८. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त : शके १८३७, पृ. ११६.

४९. भा. इ. सं. मं. त्रैमासिक, व. २०, अं. १, पृ. १३–१७.

एकनाथनाना – विठ्ठलकिंकर अशी याची परंपरा आहे. याच परंपरेंतील नृसिंहाच्या दोन वेगवेगळ्या शिष्यशाखांत शिवकल्याण आणि रत्नाकर हे दोन ग्रंथकार होऊन गेले, हें मागें सांगितलेंच आहे.

विठ्ठलकिंकर हा वऱ्हाडांतील पुसद या गांवचा भिकाजी देशपांडे. त्याचा पिता गोविंद आणि माता वेल्हाळ. त्यास जयराम आणि श्रीनिवास असे दोघे पुत्र होते. विठ्ठल हें त्याचें उपास्य असल्यामुळें तो स्वतःस 'विठ्ठलकिंकर' म्हणवीत असे. त्याचा काळ सतराव्या शतकाचा उत्तरार्ध असावा. त्याची समाधि पुसद येथेंच आहे. त्यास चिन्मयानंद व नारायण असे दोन प्रमुख शिष्य होते. पैकीं चिन्मयानंदाची परंपरा उमरखेड येथें नांदत आहे. विठ्ठलकिंकर – चिन्मयानन्द – सहजानंद – सच्चिदानंद – देशिकेंद्र – शिवरामानंद – नित्यानंद – रामानंद – वासुदेवानंद अशी उमरखेड मठाची परंपरा आहे. विठ्ठलकिंकरानें महाभारतावरील एक टिपण-ग्रंथ, 'समपदाश्रयबोधिनी' नामक प्राकृत गीताटीका आणि पाताळकांड रामायण अशी ग्रंथरचना केली आहे.

या तीन ग्रथांपैकीं फक्त पाताळकांड रामायण अंशतः उपलब्ध आहे. हा ग्रंथ ओवीबद्ध असून त्याचे एकुण १८ अध्याय आहेत. या ग्रंथ-रचनेची प्रेरणा कवीस कान्हो त्रिमलदासाच्या पाताळकांड रामायणावरून मिळाली, असें ग्रंथगत उल्लेखावरून समजतें. हा ओवीबद्ध ग्रंथ लिहिण्यापूर्वी त्यानें याच कथेवर पंचसर्गात्मक श्लोकबद्ध काव्य रचलें होतें, अशीहि माहिती तो देतो. विठ्ठलकिंकराचा पुत्र श्रीनिवास यानेंहि 'अष्टभावामृत' ( श. १७६४ ) नामक ग्रंथ रचला आहे.

**सदाशिवनाथ परंपरा :** सत्यामलनाथांनीं नोंदविलेल्या ज्ञानेश्वरांच्या नऊ शिष्यांत ज्याचें नांव आलें नाहीं, असा सदाशिवनाथ नांवाचा ज्ञानेश्वरांचा एक शिष्य होता. या सदाशिवनाथापासून सदाशिवनाथ – गणेशनाथ – उद्धवनाथ – केशवनाथ – बाळनाथ – दीनानाथ – मयोरेश्वर – जयराम अशी एक परंपरा आहे. या परंपरेंतील गणेशनाथ आणि सासवडचा सोपानशिष्य गणेशनाथ एकच की काय ? गणेशनाथ नामक आणखी एका उत्तरकालीन साधूचें नांव मध्ययुगीन चरित्रकोशांत आढळतें.

मयोरेश्वर हा आळंदीचा होय. याचा शिष्य जयराम हा पुणें येथील शनिवार पेठेंतील रहिवासी. त्यानें लिहिलेला 'जयबोध' हा ग्रंथ धुळ्याच्या

समर्थ वाग्देवता मंदिरांत आहे.[५०] या ग्रंथाची रचना शके १७०१ ( आश्विन व. ४ ) मध्यें आळंदीस गुरुसंन्निध झाली. हा बृहद्ग्रंथ १९०७४ ओव्यांचा आहे. ग्रंथाचें स्वरूप दासबोध-टीकापर आहे. यांत दासबोधांतील ३००० ओव्या घेतल्या असून त्यांचा सहा-सातपट विस्तार केला आहे. जयरामानें आपल्या ग्रंथांत मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ व समर्थ रामदास यांना अनुसरलें आहे.

**देवनाथ परंपरा :** ज्ञाननाथ – देवनाथ – चूडामणिनाथ – गुंडानाथ – बीरनाथ – मल्लनाथ. या मल्लनाथांच्या अभंगांची गाथा ( ३५० अभंग ) प्रसिद्ध झाली आहे.[५१] मल्लनाथांचा काळ शके १७६७–१८२६ असा असल्यामुळें या परंपरेंतील कांहीं नांवें गळलीं असावीत असें वाटतें.

## सत्यामलनाथ परंपरा :

**सत्यामलनाथांचे ग्रंथ :** सत्यामलनाथांच्या नांवावर 'सिद्धान्तरहस्य', 'नवरत्नमाला' व अनेक अभंग अशी ग्रंथरचना आहे. 'सिद्धान्तरहस्य' हा ग्रंथ १२,००० ओव्यांचा आहे, असें म्हणतात. 'नवरत्नमाला' हा ग्रंथ डॉ. हर्षे यांच्या संग्रहीं आहे.[५२] या ग्रंथांत एकूण नऊ 'रत्नें' ( अध्याय ) असून एकूण ओवी-संख्या १२५७ आहे. परंतु या नऊ रत्नांपैकीं वैडूर्य, पुष्पराग व इंद्रनील हीं तीन 'रत्नें' ( ओव्या ३२५ ) अनुपलब्ध आहेत. पद्मराग, गोमेद, वज्र, पाचू, प्रवाळ व मंगळ हीं सहा रत्नें ( ओव्या ९३२ ) उपलब्ध आहेत. हा सर्व ग्रंथ अभंग-ओवी वृत्तांत लिहिलेला आहे. उपलब्ध भागांत प्रकृतिपुरुष-विवेक, दैवासुरसंपद्विभाग, योगाविवरण, परब्रह्मस्वरूप, आत्मसाक्षात्कार, शांभवी विद्येची परंपरा इत्यादि विषय विवरिलेले दिसतात. या ग्रंथांत सत्यामलांनीं अनुषंगानें आपल्या महान् गुरुदेवांचें – ज्ञानेशांचें – चरित्र वर्णिलें असून त्यांतील समाधि-विषयक भाग ज्ञानेश्वर-चरित्रावर नवा प्रकाश टाकणारा आहे. ग्रंथांत सर्वत्र भक्तीचा जिव्हाळा दाटलेला असून शैली ओघवती व प्रसाद पूर्ण आहे. ग्रंथकारानें—

ज्याच्या मंदहास्यें । सुमनें झरतीं ।
पदस्पर्शें होती । जीव ब्रह्म ॥

---

५०. समर्थ वाग्देवता मंदिर, बाड क्र. १५९१.

५१. मल्लनाथमहाराजांच्या अभंगांची गाथा : सं. दे. म. येरूळकर ( श्रीक्षेत्र आवसा, जि. उस्मानाबाद ), शके १८२७.

५२. 'माऊली', व. १, अं. २.

षडैश्वर्याद्भुत । रसाचें हें लिंग ।
पाहुनी अनंग । आर्तभूत ॥

असें ज्ञानेशांचें यथार्थ रूप-वर्णन केलें आहे. सत्यामलनाथांच्या जीवनाला ज्ञानेशांचा सुवर्णस्पर्श झाला असावा, असें या ग्रंथावरून प्रत्ययास येतें.

'सिद्धान्तरहस्य' हा ग्रंथ दशप्रकरणात्मक आहे.[५३] या ग्रंथाचें दुसरें नांव 'ललितप्रबंध' असेंहि आहे. या ग्रंथांत ज्या पूर्वसूरींना वंदन केलें आहे, त्यांत नानक, कबीर, तुलसी, सूर, मीरा एकनाथ, रामदास, तुकाराम या संतांचा समावेश आहे. त्यावरून असें वाटतें कीं, सत्यामलनाथ हे ज्ञानेश्वरांचे साक्षात् शिष्य नसावे किंवा हा ग्रंथ दुसऱ्याच सत्यामलनाथांचा असावा. गैबीनाथांचा काळ जर शके १५२०–१५८० असा आहे, तर गैबीनाथांचा गुरु हा तेराव्या शतकांतील ज्ञानेश्वरांचा साक्षात् शिष्य असणें कसें शक्य आहे? 'सिद्धान्त-रहस्या'च्या अखेरीस ग्रंथकार म्हणतो :

संस्कृत असोनि । वरी टीका केली ।
तैसी नव्हे झाली । ग्रंथोत्पत्ती ॥
वेदान्तावनींचीं । वेचोनिया फुलें ।
दहा हार केले । प्रकरणांचे ॥
प्रेमाचिया सूत्रीं । गुंफोनियां माळा ।
बुका तो योजिला । सद्भावाचा ॥
एवं हार बुका । घेवोनी श्रीकंठीं ।
करतया भेटीं । पातलों मी ॥
श्रीनाथें समाधी । घेतलियावरी ।
इंद्रायणीतीरीं । आळंदीये ॥
येक संवत्सर । मासत्रय पूर्ण ॥
झाल्या पंच दिन । वरी तधीं ॥
सिद्धान्तरहस्य । ग्रंथ हा समाप्त ।
झाली श्रीमन्नाथ- । कृपादृष्टी ॥

ज्याच्या समाधीनंतर एक वर्ष, तीन महिने, पांच दिवस एवढ्या काला-वधीनें या ग्रंथाची रचना झाली, तो ग्रंथकाराचा गुरु 'श्रीनाथ' कोण?

५३. भा. इ. सं. मं. पंचम संमेलन वृत्त, शके १८३९, पृ. ६०.

सत्यामलनाथांचे गुरु ज्ञानेश्वर यांची समाधि, वरील उताऱ्यांत उल्लेखिल्याप्रमाणें, आळंदीसच असल्यामुळें शंकेला जागा उरत नाहीं. परंतु या ग्रंथांत उत्तर-कालीन संतांना वंदन असल्यामुळें हा ग्रंथ सतराव्या शतकांत रचला गेला आहे, हेंहि उघड आहे. 'नवरत्नमालें'ताहि ज्ञानेश्वर-समाधि-वर्णन-प्रसंगांत एकनाथांचा कालविपर्यासात्मक उल्लेख आहे. तसेंच नवरत्नमालेंत –

सत्यामळवाणी। पद्में त्या शब्दाचा।
केसरुजतीचा। मद्यमधु॥

असा केसरीनाथांचाहि उल्लेख आहे. तसेंच नवरत्नमालेच्या एका प्रतीच्या हस्तलिखिताच्या शेवटीं 'श्रीकेसरीनाथार्पणमस्तु' असाहि उल्लेख आहे. त्यावरून असें म्हणावेंसें वाटतें कीं, 'सिद्धान्तसारा'च्या अखेरीस उल्लेखिलेले 'श्रीनाथ' म्हणजे ज्ञानेश्वर नसून आळंदीसच समाधिस्थ झालेले केसरीनाथ हे होत. केसरी-नाथांचा समाधिदिन मार्गशीर्ष शुद्ध २ शके १६४६ असा आहे. अर्थातच सिद्धान्तरहस्यांतील स्थूल कालनिर्देशावरून या ग्रंथाची रचना शके १६४७च्या फाल्गुन शुद्ध ७ या दिवशीं पूर्णतेस गेली असावी असें वाटतें. ही अनुमान-दिशा योग्य असेल तर असेंहि म्हणतां येईल कीं, 'नवरत्नमाला' व 'सिद्धान्त-रहस्य' या ग्रंथांचा कर्ता ज्ञानेश्वरशिष्य सत्यामलनाथ नसून केसरीनाथशिष्य अन्य सत्यामलनाथ होय.

सत्यमलनाथांचा प्रचंड अभंगगाथा उपलब्ध झाला होता, असें म. म. पोतदार सांगतात. पोतदारांनीं माझ्याजवळ या गाथ्याचें वर्णन करतांना त्याला 'पोथा' असा व्याप्तिदर्शक शब्द वापरला. "सदर गाथा श्री. दिवेकर नामक इतिहासप्रेमी गृहस्थांना रत्नागिरीच्या बाजूस उपलब्ध झाला होता. त्यांच्याकडून तो श्री. पांगारकरांकडे गेला. पुढें त्याचें काय झालें, कल्पना नाहीं," अशी माहिती म. म. पोतदार यांनी दिली. हा गाथा उपलब्ध झाला तर ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरकालीन संत, स्वतः सत्यामलनाथ आणि त्यांची परमार्थ-साधना याविषयीं अधिकृत माहिती मिळविण्याचें मोठेंच साधन उपलब्ध होईल.

यांच्या परंपरेच्या दोन शाखा पडतात :

(१) सत्यामलनाथ – दीनानाथ – अनंतराज – अमळनाथ – भूमानंद – गोपाळ – विश्वनाथ (भय्याकाका) – अण्णाबोवा हुपरीकर – रघुनाथबोवा.

या शाखेतील प्रसिद्ध पुरुष भय्याकाका यांनीं विख्यात ज्ञानेश्वर-भक्त के. कुंटे यांना ज्ञानेश्वरीची माधुरी चाखविली. [५४]

( २ ) सत्यामलनाथ – गैबीनाथ – गुप्तनाथ – उद्‌बोधनाथ – केसरीनाथ – शिवदीननाथ. हीच परंपरा ज्ञानेश्वरोत्तर परंपरेंतील मुख्य नाथ परंपरा समजली जाते. ही परंपरा शिवदीनानंतरहि चालूच राहिली.

सत्यामलशिष्य गैबीनाथांची चरित्रविषयक माहिती मिळत नाहीं. त्यांची कांहीं स्फुट रचना आहे व 'पंचीकृतविवेक' ( शके १५७६ ) हा ग्रंथ आहे. गैबीनाथांचा काळ श. १५२०–१५८०. त्यांचा शिष्य गुप्तनाथ. गुप्तनाथ ही एक स्त्री आहे. हिचें मूळ नांव गंगाबाई. राशिन येथील एका ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मणाची मुलगी. वयाच्या सोळाव्याच वर्षीं हिला वैधव्य आलें. तेव्हांपासून ही परमार्थप्रवण बनून भजन-कीर्तन-प्रवचनांत वेळ घालवूं लागली.

**ज्ञानेश्वरीचा पाठ करावा । संतसमुदाय भोंवता मिळवावा ।**
**क्षणक्षणां देहभावा । विसर पडावा अर्थ करितां ॥**

अशी तिची विवेचनक्षमता होती. तिच्या प्रवचनाला येणाऱ्या श्रोत्यांत राशिनच्या मल्हार नाईक ठिपशांचा मुलगा उद्धव हाहि एक होता. गंगाबाईच्या वाणीच्या प्रभावानें तो विरक्त बनला आणि बाईच्या मार्गदर्शनानें परमार्थाची वाटचाल करूं लागला. उद्धवास बरोबर घेऊन गंगाबाई काशीयात्रेस जात असतां वाटेंत त्यांना गैबीनाथांची दीक्षा प्राप्त झाली. गुरूनें त्यांचें 'गुप्तनाथ' असें नामकरण केलें. नंतर गुप्तनाथांनीं उद्धवास सांप्रदायिक दीक्षा देऊन त्याचें उद्बोधनाथ असें नांव ठेवलें. गुप्तनाथ व उद्बोधनाथ या दोघांचीहि कांहीं स्फुट रचना उपलब्ध आहे. उद्बोधनाथांनीं शके १६०९ ( वैशाख वद्य ९ ) या दिवशीं राशिन येथें गुरूच्या समाधीजवळच समाधि स्वीकारली.

**केसरीनाथ :** उद्बोनाथांच्या शिष्यमंडळांतील प्रमुख शिष्य केसरीनाथ हे होत. हे राशिन येथेंच मामलतीच्या हुद्द्यावर होते. उद्बोधनाथांच्या ज्ञानेश्वरी-प्रवचनांनीं यांना मोहिनी घातली आणि यांनीं नोकरी सोडून गुरुमंत्र घेतला. केसरीनाथांनीं मार्गशीर्ष शुद्ध २ शके १६४६ या दिवशीं आळंदी येथें ज्ञानेश्वरांच्या चरणांजवळ समाधि घेतली.

---

५४ 'ज्ञानेश्वर' ( त्रैमासिक ), व. ८, अं. १, पृ. ४–१२.

केसरीनाथांचीं अनेक पदें आणि 'सिद्धान्तसार' नामक ग्रंथ एवढी रचना आहे. 'सिद्धान्तसार' ( श. १६३८ ) हा ग्रंथ म. म. पोतदार यांच्या संग्रहांत आहे. तो मला पाहावयास मिळाला नाहीं. पुणें येथील गंगानाथ-संग्रहांत या ग्रंथाचें सहावें प्रकरण ( ओव्या ५७३ ) मला पाहावयास मिळालें. या प्रकरणांत 'श्रुत्यन्तरा'चा शोध घेऊन परब्रह्मस्वरूपाचें विवरण केलें आहे. प्रकरणारंभींच्या गुरुवंदनावरूनहि ग्रंथकाराच्या शैलीची आणि विचारसघनतेची स्पष्ट कल्पना येईल :

ॐ नमो चिद्विलास विलसतीया । नमो तुज अपरामितवीर्या ।
नमो चिद्घनैक प्रसवतिया । आनंदकंदा ॥ १ ॥
तुं जगद्रूपें विलससि । परि जगद्रूपा नातळसि ।
समत्वें जग नांदविसि । नांदनुके नेणोनिया ॥ २ ॥
आपुलीये स्वसतेकरुणि । करिसि हरिसि नांदउणिं ।
परि अकर्तेपणाचि रहणीं । भंगलीच ना ॥ ३ ॥
ऐसा तुं जगदीश्वरू । जगिं असोनि जगा अगोचरू ।
त्या तुझाहि गोचरत्वप्रकारू । तुझीया कृपा लाहिजे ॥ ४ ॥
तो तुं श्रीसद्गुरु कृपादानी । दाता येकु त्रिभुवनि ।
उद्बोधनाथा दिनमणि । सच्चिदानंदघना ॥ ५ ॥
ऐसिया नमोजि देवा । सहजस्वरूपा स्वयमेवा ।
तुझीया करणें स्तवा । हें तों अघटित ॥ ६ ॥
परि तूं निजानंद आत्मा । सर्वांतर्यामि परमात्मा ।
म्हणौनि आपुलीये सते स्वमहिमा । प्रगट दाविसि स्वयें ॥ ७ ॥
येथें स्तवना नाडळे दुजें । तुझा तुंचि आससि सहजें ।
परि गुरुशीष्यत्व व्याजें । स्तव्य स्तविता स्वयें होसि ॥ ८ ॥
कां जें दुजेपणावेगळें । आपुलें स्वानंदत्व सगळें ।
तिये गोडिये चाखतां न आलें । ह्मणौनि दो रूपें जालसि ॥ ९ ॥
जैसा गुळें गुळ चाखतां । तिये गोडियचा कवण भोक्ता ।
तेथिंचि अनुभवकथा । जाणतां सांगता कवण तो ॥ १० ॥
तैसा तुं सहज नित्य सत्यात्मा । तुझा तुज येकत्वें न कळे माहिमा ।
ह्मणौनि दो रूपें अवगमलासि आम्हां । ऐसें दीसे ॥ ११ ॥

तरि तुझें तें यकत्व संचलें । तुजचि अनुभवा वेद्य जालें ।
तेथें अनुभवितें दुजें आलें । कोण कोढुनियां ॥ १२ ॥
ययालागि गुरुशिष्यान्वय। तुंचि तूं निर्विकार अद्वय।
होउनि सर्वां सर्वमय । आत्मत्वें चेष्टवीसि ॥ १३ ॥
तेथ स्तवावयावेगळा । हा तों भाव नाहीं उरला ।
परि भक्तिसुखें आवडला । तो सिद्धितें पाववीं ॥ १४ ॥
तुझीये भक्तिचे ठाई । विधि निषेध कैंचे काई ।
भक्त आवडीचेनि लवलाहिं । होणें तुज तैसेंचि ॥ १५ ॥
ह्मणौनि ग्रंथपिटिके । चालवावें गुरुनायकें ।
आत्मरस उल्हासकें । वाक्यें ऐसिं ॥ १६ ॥
तव निजात्मसंतोषें । सद्गुरु म्हणाति हो ऐसें ।
तेथें निरूपण कैसें । वोघें आलें ॥ १७ ॥

केसरीनाथांचा शिष्यपरिवार मोठा होता. त्यांपैकीं मल्हारीनाथ, शिवदीननाथ, महीपतिनाथ, बालमुकुंद असे चारच शिष्य आज ज्ञात आहेत. या चौघांपैकीं मल्हारीनाथ हे केसरीनाथांचे गुरु उद्बोधनाथ यांचे पुत्र होत. त्यांच्याकडे राशिन मठाची परंपरा चालू राहिली. शिवदीननाथांची परंपरा पैठण मठांत नांदत राहिली. महीपतिनाथांचें एक हिंदी 'गोपीचंदाख्यान' उपलब्ध आहे [५५] आणि बालमुकुंदांचें 'अलकामाहात्म्य' अपूर्णावस्थेंत उपलब्ध झालें आहे.

**बालमुकुंद** : हा केसरीनाथांचा एक शिष्य. याचा 'अलकामाहात्म्य' नामक ग्रंथ अंशतः (७–८ पानें) उपलब्ध आहे.[५६] हा आळंदीमाहात्म्यपर ग्रंथ समग्र उपलब्ध झाला, तर आळंदी आणि ज्ञानेश्वर याविषयीं विशेष माहिती उपलब्ध होण्याची शक्यता आहे. उपलब्ध पृष्ठांत आळंदीचा उल्लेख अलका, आनंदवन, अलकावती, अलंका अशा नांवांनीं येतो. इंद्रायणीस 'कौबेराख्य महानदी' असें म्हटलें आहे. ग्रंथांतील भाषेचें स्वरूप प्रारंभींच्या गणेशनमनावरूनहि स्पष्ट होईल—

ॐ नमोजी मंगळवदना । देवाधिदेवा चिंतामणा ।
सद्गुरुस्वामी दीनोद्धरणा । निर्गुणगुणा महासिद्ध ॥ १ ॥

५५. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त : शके १८३७, पृ. २८९.
५६. भा. इ. सं. मं. त्रैमासिक, व. २०, अं. २, पृ. ७८.

ॐ नमो आदि गणेश्वरा। अनाक्षर आनंदकंदा अपारा।
सच्चिदानंदा ज्ञानेश्वरा। निज सोयरिया जिवलगा ॥ २ ॥
अभेद अद्वैत अखंडता। अजरामर अविनाश सत्ता।
तूं अरूप असंग अलक्षता। अकळ अढळता अनुपम्य ॥ ३ ॥
स्वयंप्रकाशा असंभासा। अप्रमाणा स्वात्महस्ता।
निरालंबा निराधारसा। निरंतरसा निरंजन ॥ ४ ॥
निर्मोहा निर्विकारा। निष्प्रपंचा मनोहरा।
प्रणवपीठा मोरेश्वरा। मूळ ॐकारा तुज नमो ॥ ५ ॥

**शिवदीन केसरी :** जन्म शके १६२०. पित्याचें नांव कृष्ण यादव जोशी व आईचें नांव सरस्वती. हे पैठणचे रहिवासी. वयाच्या आठव्या वर्षींच यांना केसरीनाथांचा अनुग्रह प्राप्त झाला. वेरूळच्या एका मुसलमान अवलियानें त्यांच्या कीर्तनावर खूष होऊन त्यांना 'दीन' ( धर्म ) अशी पदवी दिली, म्हणून त्यांच्या नांवांत 'दीन' हा शब्द समाविष्ट झाला. १२ व्या वर्षींच शिवदीनांनीं गृहस्थाश्रम स्वीकारला. शिवदीनांनी नरहरिनाथ व गदाधरनाथ या आपल्या दोन्ही मुलांना गुरूपदेश देऊन आध्यात्मिक वारसदार बनविलें. पैकीं नरहरिनाथ व त्यांचा पुत्र लक्ष्मीनाथ यांचा अधिकार मोठा होता. शके १६९६ मध्यें ७६ व्या वर्षी शिवदीननाथ समाधिस्थ झाले. त्यांची समाधि पैठण येथें गोदातीरीं असून, तेथें त्यांच्या नांवानें चालणारा मठहि आहे.

'ज्ञानप्रदीप' हा प्रकाशित ग्रंथ[५७] आणि सुमारें ५०० पदें एवढी शिवदीनांची रचना आहे. 'ज्ञानप्रदीप' या ग्रंथांत सलग १२५६ ओव्या आहेत. या ग्रंथाची रचना शके १६९२ मध्यें झाली. हा ग्रंथ शिवदीनांनीं वयाच्या अखेरीस ( ७२ व्या वर्षी ) लिहिला. सुरुवातीच्या २७ ओव्यांतील गणेश-स्तवनांत ज्ञानेश्वरींतील गणेशस्तवनाचें अनुसरण आहे. ग्रंथांतहि "जैसें मुळिं उदक पावें। वृक्ष सर्वांगिं वोल्हावें।" किंवा "अनुतापतीर्थीं न्हाला" अशीं कांहीं ज्ञानेश्वरांची पदचिन्हें उमटलीं आहेत. ओवी ८९६ पासून अखेरपर्यंत सर्व संप्रदाय-विचार आहे. मधल्या सुमारें ८७५ ओव्यांत कांहीं संस्कृत श्लोकांच्या

---

५७. 'ज्ञानप्रदीप' : सं. म. म. द. वा. पोतदार, भा. इ. सं. मंडळ-पुरस्कृत ग्रंथमाला, क्र. २२, शके १८५६.

आधारें केलेलें तत्त्वविवरण आहे. या ग्रंथांत शिवदीनांनीं मऱ्हाटीचा उत्कट पुरस्कार केला आहे.

शिवदीनांचें पदवाङ्मय सरस आहे. 'भाव धरारे, अपुलासा देव करारे' किंवा 'अजि तुम्हि ऐका, सखा सहोदर पैका' इत्यादि त्यांचीं पदें लोकप्रिय आहेत.

**महीपतिनाथ :** शिवदीनकेसरींच्या शिष्यमंडळांत त्यांचे पुत्र नरहरिनाथ हे प्रमुख होत. नरहरिनाथांचे दोन शिष्य : एक लक्ष्मणनाथ ( पुत्र ) व दुसरे महीपतिनाथ उज्जयिनीकर. महीपतिनाथ हे जनार्दनस्वामींच्या वंशांतील होत. त्यांचें जीवन ग्वाल्हेर-इंदूर-उज्जयिनी या प्रदेशांत व्यतीत झालें. उज्जयिनीच्या दत्तनाथांशीं त्यांचा प्रगाढ स्नेह होता. ग्वाल्हेरचे दौलतराव शिंदे व इंदूरचे यशवंतराव होळकर या राजपुरुषांची महीपतिनाथांवर विशेष भक्ति होती. महीपतिनाथांची हिंदी-मराठी कविता उज्जयिनीच्या दत्तनाथ मठांत सुरक्षित आहे. महीपतिनाथांनीं ग्वाल्हेर येथें पौष शुद्ध १३ शके १७४४ या दिवशीं समाधि घेतली. त्यांना अप्पानाथ, नारायणमहाराज, निर्मलनाथ, अमरनाथ, दाजीमहाराज इत्यादि शिष्य होते. त्यांच्या परंपरेचा मुख्य मठ ग्वाल्हेर येथें आहे. महीपतिनाथांच्या रचनेची कल्पना येण्यासाठीं त्यांचें एक पद खालीं देत आहें :

**गुरुनें नवल केलें ग । माझें मीपण नेलें गं ॥**
**गुरुरूप माझ्या नयनीं भरलें । ब्रह्मचि होउनि गेलें ग ॥**
**नयन सांटउन नयनांत । उभें मज केलें अंगणांत ॥**
**हळूच सांगे कानीं दुरुनी । बोट दाखवी गगनांत ॥**
**निळी चांदणी लखलखली । प्रभा लोचनीं झकझकली ॥**
**पहातां दृष्टी न पुरे माझी । पुढें ज्योति चकचकली ॥**
**सुंदर सुनीळ नार ग । स्वरूप तिचें अरुवार ग ॥**
**मस्तकीं येक फूल फुललें । तेंहि सदा गरुवार ग ॥**
**फुलोन फुलली पूर्ण कला । चिन्मय उगवे चंद्रकला ॥**
**मुद्रा तंद्री लागून गेली । अलक्षरूप झाला सगळा ॥**
**नरहरिनाथा श्रीगुरुराया । महीपति लागे तव पायां ॥**
**कर्ता हर्ता तूंचि स्वामी । अर्पण केली तुज काया ॥** [५८]

५८. महाराष्ट्र-सारस्वत, पृ. ५९१.

**चिंतामणीचें 'ज्ञानकैवल्य' :** शिवदीनशिष्य चिंतामणीचा हा ग्रंथ ७४७ ओव्यांचा आणि ९ प्रकरणांचा आहे.[५९] या ग्रंथाचें नांव 'ज्ञानकैवल्य' असें असलें, तरी त्याला ज्ञानाचा स्पर्श मुळीच नाहीं. महानुभावांच्या ' नित्यदिनी लीळे'-प्रमाणें गुरूचा दिनक्रम आणि शिष्याची अतिरेकी अनन्यता प्रारंभींच्या चार प्रकरणांत वर्णिली आहे. पुढील पांच प्रकरणांत गुरुपरंपरा वर्णिली आहे. त्यांत उद्बोधनाथ, केसरीनाथ आणि शिवदीननाथ यांचीं चरित्रें विस्तृत दिलीं आहेत.

## एकनाथोत्तर परंपरा :

ज्ञानेश्वरांशीं संबद्ध असलेली व थेट दत्तात्रेयापर्यंत संबंध जोडणारी अशी ही परंपरा आहे. एकनाथ – गावबा ( नित्यानंद ) – कृष्णनाथ – विश्वंभरनाथ – मुरारनाथ – रंगनाथ – गोपाळनाथ – गोविंदनाथ – देवनाथ – दयाळनाथ अशी ही परंपरा आहे. एकनाथ व गावबा यांची माहिती सर्वश्रुत आहेच. त्यामुळें ती येथें देत नाहीं. कृष्णनाथाचा जन्म शके १५५० ( इ. स. १६२८ ) मध्यें व अनुग्रह शके १५७६ ( इ. स. १६५४ ) मध्यें झाला, असें या परंपरेतील एक अलीकडचे पुरुष श्री. भालचंद्रनाथ आपल्या ग्रंथांत लिहितात. कृष्णनाथापासून रंगनाथापर्यंतच्या पुरुषांची माहिती अजून मिळत नाहीं. यांपैकी कुणाचे ग्रंथ उपलब्ध झाले तरच अधिक प्रकाश पडेल.

**गोपाळनाथ :** रंगनाथांचे शिष्य गोपाळनाथ[६०] हे औरंगाबादनजिक सलाबतपूरचे राहणारे. यांच्या वडिलांचें नांव गोविंद व आईचें नांव आनंदीबाई. गोपाळनाथ हे शुक्ल यजुर्वेदी, कौंडिण्यगोत्री असून त्यांचें उपनांव घोलप असें होतें. त्यांच्या नांवावर 'शिरोमणि' व 'समाधिबोध' ( ओ. १०० ) असे दोन ग्रंथ आहेत. तसेंच अनेक पदें व अभंगहि त्यांनी लिहिले आहेत. 'शिरोमणि' हा ग्रंथ शके १६६८ मध्यें लिहिला. हे ब्रह्मचारीच होते. यांनीं श्रावण वद्य ३० शके १६८८ रोजीं त्रिपुटी येथें जिवंत समाधि घेतली. त्यांचे ब्रह्मचारी बंधु नानासाहेब यांनीं लिहिलेलें त्यांचें एक चरित्र ( अ. ३२, ओ. ७५०० ) उपलब्ध आहे.

त्रिपुटी येथील मठाधिपति गोपाळनाथांचे गृहस्थाश्रमी बंधु रामचंद्र यांच्या वंशांतून परंपरेनें चालत आले आहेत. गोपाळनाथांचा शिष्यपरिवार फार

---

५९. हस्तलिखित : म. म. पोतदार संग्रह, पुणें.

६०. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त : १८३७, पृ. २१८.

मोठा होता. त्यांच्या शिष्यांपैकीं परमहंस, खंडेराय, बाळनाथ, शेख सुलतान, गोविंदनाथ, अचलनाथ, कैवल्यनाथ, गोपाळ सोनार, शाहीर हैबती हे प्रमुख होत. त्यांच्या परंपरेंतील मठ पुणें ( स्वारगेटाजवळ ), चासनारुडी, नागपूर, भांडवली, बुध, कऱ्हाड, पाटकळ, इत्यादि ठिकाणीं आहेत. गोपाळनाथांचें तत्कालीन चित्र कऱ्हाडच्या मठांत आहे.

गोपाळनाथांच्या उपलब्ध अभंगांत कृष्णलीलापर अभंग विशेष आहेत. कृष्णलीलापर १६३ अभंगांचें एक अपूर्ण बाड उपलब्ध झालें आहे.[६१]

**श्रीकृष्णाच्या लीळा वर्णाव्या अंतरीं । आवड हे खरी मनीं वसे ।**
**दशमस्कंध हे भागवत, हरि – । वंश हा अंतरीं पहावया ॥**

असा आधारभूत ग्रंथांचा उल्लेख कवीनें केला आहे. प्रत्येक अभंगाच्या शेवटीं 'नाथ गोपाळ' अशी उपास्य-उपासकसूचक नाममुद्रा गोवली आहे. या अभंगांच्या काव्यांगाविषयीं लिहितांना श्री. कृ. वि. आचार्य ( कालगांवकर ) म्हणतात : " कवीची वर्णनशैली हृदयभेदक असून रसाळ आहे. श्रीकृष्णाच्या बाळपणींच्या खोड्या वर्णन करतांना कित्येक ठिकाणीं ग्राम्यतेची छटा पडलेली दिसते. तथापि मुबलक चारा व पाणी पाहून आपल्या गोधनासुद्धां रानांत राहणाऱ्या गौळ्यांच्या वर्णनांत दिसणारी ही ग्राम्यता, ग्राम्यता नसून गौळ्यांच्या गांवढळपणाचें तें हुबेहूब वर्णन होय, असें मला वाटतें. "

खालीं दिलेल्या एका पदावरूनहि गोपाळनाथांच्या आध्यात्मिक भूमिके-संबंधींची कल्पना येईल :

**यशोदेनें सर्व स्थळें शोधियेलीं । जगत्त्रयमाउली लागोनिया ॥**
**अवस्थात्रिगुण भोग चारी खाणी । अभिमान वाणी चारी शोधी ॥**
**पिंडब्रह्मांडींचीं तत्त्वें शोधियलीं । वेदशास्त्रें बोली पुराणेंही ॥**
**नाना ग्रंथ नाना साधन उपरी । माझ्या षट्चक्रीं शोधीयल्या ॥**
**दिसेनाचि कोठें म्हणे काय करूं । कोणाचे मी धरूं पाय आतां ॥**
**आला नंद तेव्हां पाहत अंगणीं । यशोदा गौळणी आक्रंदती ॥**
**माता सोडी प्राण म्हणोनिया स्वामी । नीळबंदभूमी धावतये ॥**
**देखोनिया नंद हृदयीं धरीत । मातेसी फुटत पान्हा तेव्हां ॥**

---

६१. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त : १८३७, पृ. १६५.

घेऊनी आडवा राजीवनयन । पुसतां मी म्हणे येथें होतों ॥
श्रीनाथ गोपाळ हृदयपालखा । ब्रह्मानंदसुखा नाना घाली ॥

गोपाळनाथांच्या 'शिरोमणि' या ग्रंथाचे अठरा 'किरात' ( अध्याय ) असून ओवीसंख्या ९२०९ ( ज्ञानेश्वरीइतकी ) आहे. या ग्रंथाची रचना ज्येष्ठ वद्य ७ शके १६६८ ( शुक्रवार ) या दिवशीं कृष्णा-तारळी-संगमावर गोपाळवाडी येथें पूर्ण झाली. या ग्रंथाची संपूर्ण प्रत त्रिपुटीच्या मठांत आहे, असें म्हणतात. पुण्याच्या गंगानाथ मठांत या ग्रंथाचे दोन 'किरात' ( पांचवा पूर्ण : ओ. ५२३ आणि सहावा अपूर्ण : ओ. ५८७ = ओ. १११० ) मला पाहावयास मिळाले. पांचव्या किराताच्या प्रारंभीं गोपाळनाथ श्रोतृ-वक्तृ-एकात्मतेचें वर्णन असें करतात :

श्रोता जरि मिळे चांगु । मग वक्तयाचा फिटे पांगु ।
दोहींचा कळे लागमागु । निसुंगपणी ॥ १ ॥

श्रोता जाला गर्भअंध । काय वस्तूत्व करील स्वतसिध ।
तेथिचा आदि अनादि प्रबोध । काय उपेगा जाये ॥ २ ॥

श्रोता मिळाला जऱ्ही भोक्ता । वक्तत्व न ये जयाचिया चित्ता ।
अर्थ जाय गा परुता । असंगसंगु ॥ ३ ॥

जेही दोहींची पडे गांठी । तहीं अर्थासि न पडे तुटी ।
अलभ्य लाभेंसिं भेटी । जोडे जया ॥ ४ ॥

तेथें प्रेमा अधिक दुनावटे । अर्थ आणि संघटे ।
तेचि होउनि ठाके । येकत्वें गा ॥ ५ ॥

मनीं मन मिळोनि जाये । तेंचि श्रोतत्व वक्तत्व आहे ।
ऐके सांगावया होये । मातु जेथें ॥ ६ ॥

शब्दिं शब्द रिघोनि कान । जहीं ऐक्य होय अंतःकरण ।
येहिं आर्थि आर्थ मन । रिघोनि ठाके ॥ ७ ॥

तो श्रोता वक्ता येकासनीं । येकचि भिन्न नसे दोन्ही ।
जैसें लेणें सुवर्णि । सुवर्णमय ॥ ८ ॥

सूर्यबिंब प्रभा द्वैत नाहीं । दोन्हीं येकचि अंग पाही ।
ते ऐक्याच्या अंगावरी राही । प्रभा किं बिंब ॥ १० ॥

पुढें या प्रास्ताविकाशीं प्रतिपाद्याची सांखळी जोडून, अनेक सुलभ दृष्टान्तांच्या साहाय्यानें मायानिरास आणि ब्रह्मस्वरूपवर्णन केलें आहे. सहाव्या किरातांत जीवाचें स्वरूप आणि ब्रह्मस्वरूपप्राप्तीचा मार्ग यांचें विवेचन केलें आहे : ग्रंथकाराची विवेचनपद्धति सुबोध आणि स्पष्ट आहे.

**शेख सुलतान :** त्रिपुटीच्या गोपाळनाथांच्या शिष्यांपैकीं हा एक होय.[६२] याची समाधि त्रिपुटीसच आहे. याचें एक पद उपलब्ध आहे :

कोणी शुधी सांगा मजलागी । बाई कोठें तो निजयोगी ॥ ध्रु० ॥
चतुर्दळीच्या चवघी जणी । साहा सखया स्वाधिष्टानीं ॥
दहा मणिपुरीच्या कामिनी । अनुहातीच्या द्वादशगडनी ॥
नेणो म्हणती तो वीतरागी ॥ १ ॥
वीशु दलीच्या नारी सोळा । अग्नी चक्रीच्या दोनी बाळा ॥
त्रिपुटीसी देखिले डोळा । ब्रह्मदेवो ब्राह्मण मेळा ॥
तेथें गेलें मी लगबगी ॥ २ ॥
श्रीहाटीचा सारंगधर । गोल्हाटीचा गौरीहर ॥
आउट पीटीचा विस्वंभर । भ्रमर गुंफेचा विचार ॥
सदासीव उन्मनी भोगी ॥ ३ ॥
ब्रह्मरंध्रीची सत्रावी । चढले सहस्रदळ गावी ॥
पुढें देखिला गोसावी । माजी सरली ठेवाठेवी ॥
माया सरली न शिवे आंगीं ॥ ४ ॥
जेथें शब्द वाचा नाहीं । तेथें अद्भुत कांहीं न बाई ॥
नाथ गोपाळ निर्गुण बाही । केला सुलतान आक्षई ॥
सद्गुरुकृपे सायोज्य भोगी ॥ ५ ॥

**गोविंदनाथ :** हे गोपाळनाथांचे शिष्य. यांचें पूर्वाश्रमीचें नांव गोविंदराव. यांचा जन्म श्री. भालचंद्रांच्या मतें रत्नागिरी व बऱ्हाणपूरकर श्री. भगवंतनाथांच्या मतें चिंचवडच्या देव घराण्यांत झाला. यांचा जन्मशक १६४३ ( इ. स. १७२१ ) व समाधिशक १७३३ ( इ. स. १८११, २४ जून ) असा आहे. यांनीं गुरूची सेवा फार दिवस मोठ्या भक्तीनें व प्रेमानें केल्यामुळें संतमंडळींत

---

६२. ऐतिहासिक वाङ्मय साहित्य, खंड १, पृष्ठ ५४-५५.

त फार महत्त्वास चढले. ते नेहमीं तीर्थाटन करीत. त्यांनीं कर्नाटक, उ. हिंदुस्थान वगैरे पुष्कळ मुलूख पाहिला. तीर्थाटन करित असतां वऱ्हाडांत आल्यावर सुरजी अंजनगांव येथें त्यांनीं देवनाथ या आपल्या शिष्यास उपदेश दिला व अकोलें तालुक्यांतील धूसर गांवीं जाऊन राहिले. तेथें विठ्ठलाची मूर्ति स्थापन केली. हल्लीं तेथें त्यांचें मोडकळीस आलेलें घर आहे. त्यांनीं आपल्या प्रदीर्घ जीवन-कालांत शिष्य देवनाथ व नातशिष्य दयाळनाथ या दोघांचीहि कारकीर्द पाहिली.

**देवनाथ :** हे गोपाळनाथांचे शिष्य. यांचा जन्म वऱ्हाडांत शहाणूर नांवाच्या नदीतीरीं सुरजी अंजनगांवीं सन १७५४ च्या सुमारास झाला. हे ऋग्वेदी वसिष्ठगोत्री ब्राह्मण होते. यांना व्यंकटराव नांवाचा वडील भाऊ व सुंदरपंत नांवाचा धाकटा भाऊ होता. हे मारुतीचे उपासक होते. हे सहज काव्य करीत. यांची सगळी कविता प्रासंगिक आहे. श्रीमंत सवाई माधवराव पेशव्यांच्या मातोश्री गंगाबाई यांनीं त्यांचा अनुग्रह घेतला होता. त्यांनीं हिंदुस्थानांत बराच प्रवास केला होता. कीर्तनकार, वेदान्ती आणि साक्षात्कारी असा यांचा लौकिक होता. ग्वाल्हेर येथें कीर्तन करीत असतां त्याच मंडपाला आग लागली, तरीहि निर्भयपणें चालू कीर्तन पुरें करून त्यांनीं आपला देह तेथेंच ठेवला ( सन १८२१ ). कटाव व पदें याच स्वरूपांत त्यांची बहुतेक कविता असून ती सुरजी येथील मठांत आहे. पैकीं थोडीशी कविता काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झाली आहे.[६३] त्यांचें 'अमोल काया जाइल वाया' हें पद प्रसिद्ध आहे.

**दयाळनाथ :** हे वैदर्भ कवि संत दयाळनाथ यांचे शिष्य. यांचा जन्म कार्तिक शुद्ध १४ शके १७१० ( सन १७८८ ) मध्यें वऱ्हाडांत दर्यापूरपासून सात कोसांवर मूर्तिझापूर या तालुक्यांत ते राहत असत. हे मौतसगोत्री यजुर्वेदी ब्राह्मण होते. त्यांच्या वडिलांची संतति अल्पायुषी मरूं लागल्यानें त्यांनीं शेवटचें अपत्य – हरि – पांच वर्षांचें होतांच देवनाथचरणीं वाहिलें. हरीचें दयाळू हृदय पाहून आजेगुरु गोविंदनाथांनी त्याचें दयाळनाथ असें नांव ठेवलें. देवनाथांनीं सुरजी अंजनगांवच्या मठांतच त्यांची मुंज व लग्न केलें. त्यांच्या पत्नीचें नांव राधाबाई होतें. विवाहकालीं आजेगुरूचें – गोविंदनाथांचें – वय ८० वर्षांचें होतें. गोविंदनाथांनीं बऱ्हाणपूर येथें समाधि घेतल्यावर दयाळनाथांना अतिशय दुःख झालें. दयाळनाथ वृत्तीनें शांत होते. गोविंदनाथांवर त्यांनीं विरहपर पदें

६३. देवनाथमहाराजकृत कवितासंग्रह : काव्यसंग्रह क्र. २१. १८९६.

लिहिलीं. त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेला आहे.[६४] त्यांनीं 'राधाविलास' नांवाचा ग्रंथ आणि अनेक पदें लिहिलीं आहेत. दयाळनाथांची शिष्यपरंपरा जयकृष्णनाथ – रामकृष्णनाथ – भालचंद्रनाथ – मारुतिनाथ अशी आहे.

**गंगानाथ :** हे नाथपंथी साधु पुण्याचे. गोपाळनाथांच्या परमहंस नामक शिष्याच्या परंपरेंत हे होऊन गेले. परमहंस – सहजनाथ – सुभाननाथ – गोपाळनाथ – गंगानाथ अशी ही परंपरा आहे. हा गोपाळनाथ-परंपरेंतील मठ स्वारगेटनजिक होता. हल्लीं या मठाची जागा खत्री समाजाच्या ताब्यांत आहे. जागेंत सध्यां व्यंकटेश-मंदिर असून त्या मंदिरांत सहजनाथ – सुभाननाथ – गोपाळनाथ या त्रयींच्या समाधिशिला आहेत. याशिवाय या मंदिरांत गणपति, शिवलिंग आणि गंगानाथांचे पुत्र व शिष्य रावजीनाथ यांचीहि समाधि आहे. शेजारींच देवीचें मंदिर असून त्यांत श्वेत पाषाणाची अष्टभुजा आणि कृष्ण पाषाणाची दशानना आहे.

गंगानाथांचा जन्म शके १६७१ च्या सुमारास क्षत्रिय धनगर समाजांत झाला. यांचें आडनांव कोथमिरे. वडिलांचें नांव येसाजीबुवा. येसाजीबुवा हे विठ्ठलभक्त असून पंढरीची आषाढी-कार्तिकी वारी करीत. घरचा जातिविशिष्ट व्यवसाय मेंढपाळीचा होता. छोटा गंगाराम मेंढ्या चारावयास रानांत जात असे. रानांतून परततांना गांवाबाहेरील सहजनाथ मठांत तो कांहींशा कुतूहलानें व कांहींशा श्रद्धेनें जात असे व श्रवणाचा लाभ घेत असे. त्या मठांत त्या वेळीं सहजनाथ – सुभाननाथ – गोपाळनाथ ही गुरु-शिष्य-त्रयी निवास करीत होती. सहजनाथांनीं आपल्या नातशिष्याकरवीं गंगारामास दीक्षा दिली आणि त्याचें नांव गंगानाथ ठेवलें. या गुरुबोधानंतर गंगानाथांचें सहजसात्त्विक हृदय परमार्थानुभवानें क्रमशः रंगूं लागलें आणि त्यांचे सारे जीवन-व्यापार स्वानुभवाच्या संगीतानें भारल्यासारखे बनले. आपल्या मेंढपाळीच्या नित्यक्रमांतहि त्यांना योगानुभवाचें प्रतीक आढळलें –

**थीर् हुस् चालल्या मेंढ्या बावनखंड्या ॥ ध्रु० ॥**
**चालला स्थिर मेंढ्यांचा भार ।**
**आधार चक्रें वरतीं चार ।**
**स्वाधिष्ठानीं सहा सरदार । बांड्याबुंड्या ॥ १ ॥**

---

६४. वैदर्भकवि दयाळनाथ यांची कविता : सं. साटे.

मनपुरीं जमल्या दहा जणी ।
करिती क्रीडा पिती पाणी ।
द्वादशदळ अनुहात स्थानीं । तृणधुंड्या ॥ २ ॥

बारांपुढें चालल्या सोळा ।
सोळांपुढें दोन ओढाळा ।
क्षीराब्धितारीं घेति उल्हाळा । तांबडतोंड्या ॥ ३ ॥

चंचल अणुरेणूची वाट ।
वेंघल्या निरंजनाचा घाट ।
निर्गुणशेतिं केला बोभाट । खाति मूळशेंड्या ॥ ४ ॥
अर्धा ओंकार मेंढका भोळा ।
त्यानें अवघ्याच केल्या गोळा ।
सुभाननाथ स्वामि गोपाळा । गंगानाथा दाविल्या मेंढ्या ॥५ ॥

आपला मुलगा संसारनिवृत्त होऊं नये, म्हणून मातेनें गोपाळनाथांकरवीं त्याला गृहस्थाश्रमाचा स्वीकार करावयास लावलें. परंतु गंगानाथांनीं प्रपंच-परमार्थाची सांगड घालून अनेकांना पथप्रदर्शन केलें. पंढरीची वारी आणि घरीं कीर्तनें करून ते भगवद्भक्तींत रंगून जात. कीर्तनें करतां करतां त्यांनीं अनेक आख्यानें, अभंग व पदें रचलीं आहेत. त्यांची सर्व रचना प्रासादिक व अनुभव-संपन्न आहे. स्वाध्यायासाठीं त्यांनीं जमविलेला हस्तलिखितांचा संग्रहहि त्यांच्या व्यासंगाची नि रुचीची कल्पना देणारा आहे. त्यांना पंढरपुरास प्राप्त झालेली एकमुखी द्विभुज दत्तमूर्ति आजहि त्यांच्या गंज पेठेंतील मठांत पाहावयास मिळते.

गंगानाथांचा शिष्यपरिवार मोठा होता. ग्वाल्हेरच्या राजघराण्यांतील दोन स्त्रियांनीं त्यांचा गुरुमंत्र घेतला होता, असें सांगतात. त्यांच्या पुण्यांतील मठांत वंशपरंपरेनें मठाधिकार चालत आला आहे. गंगानाथ – आनंदीनाथ – रावजीनाथ – भाऊमहाराज – मुरलीधरबुवा – घनश्यामबुवा – बाळकृष्णबुवा गोसावी ( घनश्यामांचे बंधु : विद्यमान ). विद्यमान मठपति श्री. बाळकृष्णबुवा गोसावी यांच्या मनांत उत्कट गंगानाथभक्ति असल्यामुळें त्यांच्या निष्ठेनें गंगानाथांचें चरित्र, रचना आणि परंपरा यांच्या अभ्यासासाठीं अनुकूल वातावरण तयार होत आहे.

## कांहीं त्रुटित परंपरा :

सोहिरोबानाथ आंबिये : सोहिरोबानाथ आंबिये यांचा जन्म शके १६३६ ( इ. स. १७१४ ) मध्यें झाला. हे जातीनें सारस्वत ब्राह्मण होते. ते सावंतवाडी संस्थानांतील बांदेगांवचे रहिवासी असून त्या गांवचे कुलकर्णी होते. त्यांची वृत्ति सात्त्विक होती. द्रव्यार्जनास लागणारें व्यवहारपटुत्व त्यांच्याजवळ नव्हतें, त्यामुळें अत्यंत विपन्नावस्थेंत त्यांना दिवस कंठावे लागले. प्रपंचापेक्षां परमार्थाकडेच त्यांचा विशेष ओढा होता; त्यामुळें जुने संस्कृत व प्राकृत ग्रंथ वाचून त्यांनीं बरीच विद्वत्ता वाढविली. त्यांच्या साधुत्वाविषयीं व सज्जनतेविषयीं बऱ्याच आख्यायिका प्रसिद्ध आहेत.

सावंतवाडीपासून बांदेगांव तीन कोसांच्या अंतरावर आहे. सावंतवाडीहून सोहिरोबांना नेण्याकरितां राजाज्ञेवरून एक राजदूत आला. तेव्हां स्नान व पूजा करून जेवण न करतांच बरोबर एक फणस घेऊन सोहिरोबा सावंतवाडीस जाण्यास निघाले. वाटेंत थकवा आला म्हणून इनसुली गांवांतील ओढ्यावर हातपाय धुवून ते फणस खाण्यास बसले. इतक्यांत एक दिव्य पुरुष तेथें येऊन फणस मागूं लागला. सोहिरोबांनीं दिलेला फणस खाऊन, कांहीं गरे प्रसाद म्हणून त्या दिव्यपुरुषानें परत देऊन, सोहिरोबांच्या मस्तकीं वरदहस्त ठेवला व तो अदृश्य झाला. त्याच क्षणीं सोहिरोबानाथांची वृत्ति ब्रह्मरूप होऊन त्यांना सर्व विश्व ब्रह्ममय दिसूं लागलें. तो दिव्य पुरुष म्हणजे 'गैबीनाथ'च होय, असें सोहिरोबानाथ आपल्या कवितेंत म्हणतात.

गुरूपदेश झाल्यावर त्यांनीं नोकरी सोडली व लोकांना समजेल अशा सोप्या भाषेंत ते अध्यात्म सांगूं लागले; उपदेश करूं लागले व त्याच वेळीं पदें व ग्रंथरचना करण्यासहि त्यांनी सुरुवात केली.


एकदां लेखणी खालीं ठेवल्यावर त्यांनीं पुनः लेखणी हातांत घेतली नाहीं. त्यामुळें त्यांची सर्व कविता दुसऱ्यांनींच लिहून घेतलेली आहे. विशेषतः त्यांच्या भगिनीला काव्यवाचनाची अत्यंत आवड असल्यानें तिनें त्यांची बरीच कविता कागदावर व झाडांच्या पानांवर उतरून घेऊन नाथवाङ्मयांत बरीच मोठी भर घातली आहे. परंतु सोहिरोबांची सर्व कविता आज उपलब्ध नाहीं. कारण एक तर कागद महाग म्हणून ज्या कविता झाडांच्या पानांवर लिहिल्या,

# महाराष्ट्रांतील नाथसंप्रदाय


१ मुकुंदराज परंपरा


आदिनाथ

हरिनाथ



# महाराष्ट्रांतील नाथसंप्रदाय
## १: ज्ञानेश्वर परंपरा




चांदबोधले
जनार्दनस्वामी
एकनाथ
नित्यानंद
कृष्णानंद
विसोबानंद (विश्वंभर)
मल्हारनाथ (मुरारनाथ)
रंगनाथ
गोपाळनाथ
परमहंस
खंडेराय
बाळनाथ
शेखसुल्तान
गोविंदनाथ
अचलनाथ
कैवल्यनाथ
गोपाळ सोनार
शाहीर हैबती
सहजनाथ
सुभाननाथ
गोपाळनाथ
गंगानाथ
आनंदीनाथ
रावजीनाथ
भाऊमहाराज
मुरलीधरनाथ
घनश्यामनाथ
बाळकृष्णनाथ
देवनाथ
दयाळनाथ
आत्माराम
मल्हारनाथ
रामराव काळी
सरूया गोपाळ
जयकृष्णनाथ
रामकृष्णनाथ
भालचंद्रनाथ
मारुतिनाथ
महाराष्ट्रांतील नाथसंप्रदाय
३: एकनाथ परंपरा

ती पानें कचरा म्हणून त्यांच्या मातोश्रीनें जाळून टाकलीं व दुसरें म्हणजे सोहिरोबांचें वास्तव्य कधीच एका ठिकाणी नव्हतें. त्यामुळें किती कविता नष्ट झाली असेल, याची आज तरी स्पष्ट कल्पना येणार नाहीं.

शके १६९६ मध्यें, म्हणजे वयाच्या ६० व्या वर्षी साधु-संतांच्या भेटी व उत्तर हिंदुस्थानांतील पुण्यक्षेत्रें पाहणें या उद्देशानें ते उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासाला निघाले. बरोबर दोन पुत्रहि होते. उज्जनी, दिल्ली, प्रयाग, काशी पाहत पाहत ते शके १७०१ च्या सुमारास ग्वाल्हेरला आले. त्या वेळीं महादजी शिंदे ग्वाल्हेरला होते. तेथें आपल्या शीघ्र कवित्वानें, विरक्त व निःस्पृह वृत्तीनें हिंदींत पद्यरचना करून त्यांनीं महादजी शिंद्यांना व सर्व लोकांना चकित करून सोडलें. ग्वाल्हेरास बरेच दिवस राहून ते उज्जैनीस आले. उज्जैनीस ते १० वर्षें होते. उज्जैनीच्या व ग्वाल्हेरच्या वास्तव्यांतील त्यांच्या चमत्कारांविषयींहि बऱ्याच आख्यायिका प्रसिद्ध आहेत. या वेळेपर्यंत त्यांचा शिष्यसमुदाय बराच वाढला होता.

उज्जैनीस असतां शके १७११ (इ. स. १७८९) मध्यें एके दिवशीं आपल्या मठांतून सोहिरोबा जे बाहेर पडले ते परत आलेच नाहींत. ते नंतर कोणालाहि पुनः दिसले नाहींत. त्यांच्या मुलांनीं व शिष्यांनीं त्यांचा बराच शोध केला; पण त्यांना यश आलें नाहीं. फक्त ते गेले त्या दिवशीं त्यांच्या बिछान्यावर त्यांचें शेवटलें पद सांपडलें.

सोहिरोबांचें ज्ञान शुद्ध व वैराग्य कडकडींत होतें. ते चार चार दिवस समाधि-स्थितींत असत. ते योगी व पूर्ण वेदान्ती होते. सगुण भक्तीपेक्षां निर्गुण भक्तीकडेच त्यांचा विशेष ओढा होता. अक्कलकोट, सुरत, उज्जैनी येथें त्यांच्या परंपरेचे बरेच मठ आहेत.

सोहिरोबानाथांचा ग्रंथसंभार एवढा प्रचंड आहे कीं, त्याच्या विवेचना-साठीं एखादा स्वतंत्रच ग्रंथ लिहावा लागेल. खालीं सोहिरोबांच्या ग्रंथांची केवळ विवरणात्मक सूचि देत आहें –

(१) **अक्षयबोध :** हा सोहिरोबांचा पहिला ग्रंथ. याची रचना सांवंतवाडी येथें शके १६७१ मध्यें झाली.

"अज्ञानाचिये वाचे करवीं। बोलविलें पूर्ण ज्ञान अनुभवी।" असें या ग्रंथाचें सोहिरोबांनीं वर्णन केलें आहे. याचीं आठ प्रकरणें असून ओवीसंख्या ५०० आहे. प्रकाशित.

**( २ ) महदनुभवेश्वरी :** हा प्रचंड वेदान्तपर ग्रंथ त्यांनीं शके १६७२ मध्यें लिहिला. ग्रंथाची मांडणी ज्ञानेश्वरीच्या धर्तीवर असून त्यांत सोहिरोबांनी स्वानुभवरहस्य सांगितले आहे. ग्रंथाचे अध्याय १८ व ओवीसंख्या ९०२२ आहे. प्रकाशित.

**( ३ ) पूर्णाक्षरी :** रचना : शके १६७३. ओव्या ५००. यांत साधूचीं सर्व लक्षणें विवरिलीं आहेत.

**( ४ ) अद्वयानंद :** रचना : शके १६७५. प्रकरणें १०; ओव्या १०००. हा ग्रंथ वेदान्तपर आहे.

**( ५ ) सिद्धान्त-संहिता :** रचना : शके १६७८. अध्याय १८; ओव्या ४९४१. यांत मूळ संस्कृत श्लोकांवर मराठी टीका आहे. हा ग्रंथ रचण्यांत कवीनें आपल्या ज्ञानाची परिसीमा गांठली आहे. प्रकाशित.

शके १६७१ ते शके १६७८ या ८ वर्षांच्या अवधींत अध्यात्माचें व स्वानुभवाचें अमृतमंथन करून सोहिरोबांनीं १६००० ओव्यांचा ग्रंथसंभार निर्माण केला. याशिवाय त्यांनीं प्रवासांत निरनिराळ्या स्थळीं रचलेलीं स्वानुभव-पर अशीं मराठी व हिंदी पदें सुमारें ४००० आहेत. हीं पदें विविध राग-रागिण्यांत रचलेलीं आहेत. सोहिरोबांच्या वाङ्मयसंपदेचें अधिक व्यापक अध्ययन होणें आवश्यक आहे. सोहिरोबा आजवर उपेक्षित आहेत.

**चिंदड शंकर :** या तंजावरकडील नाथपंथी कवीच्या कवितेचा परिचय श्री. चिं. ग. कर्वे यांनीं आणि डॉ. रा. ग. हर्षे यांनीं करून दिला आहे.[६५] याच्या गुरूचें नांव चिंदडनाथ. या चिंदडनाथाचा मठ तंजावरास 'मराठ्यांचा मठ' म्हणून आजहि प्रसिद्ध आहे. चिंदडनाथ हा व्यंकोजी-पुत्र शहाजी (इ.स.१६८०–१७१०)याच्या कारकीर्दींत तंजावरीं मठ करून राहिला होता. याची शिष्यपरंपरा चिंदडनाथ – चिंदड शंकर – अवधूतनाथ – शंकर-नाथ व गोविंदनाथ अशी आहे. डॉ. हर्षे यांच्या मतें चिंदड शंकर हा चिंदड-नाथाचा साक्षात् शिष्य नसून, प्रशिष्याचा शिष्य असावा. या परंपरेंतील कवितांचीं बाडें उपरिनिर्दिष्ट संशोधकांच्या संग्रहीं आहेत.

चिंदड शंकराचा 'स्वानंदसिंधु' नामक ग्रंथ असून, २२३ स्फुट ओव्या, ११ अभंग, १ सवाई, ३८ पदें अशी स्फुट रचना आहे. चिंदड शंकराच्या

---

६५. भा. इ. सं. मं. त्रैमासिक, व. २०, अं. १; 'माऊली', भाद्रपद श. १८७८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २५१७६ वि: चरित्र
महाराष्ट्रांतील नाथ संप्रदाय नों: दि: १८७ २०/८/
क्रमांक ६०१

खालील एकाच स्फुटांतून त्याचा अध्यात्माधिकार आणि नाथपंथी संस्कार यांची कल्पना येईल –

देह पंढरीचे पुरीं। विठो नाद तो श्रीहरी॥
उन्मनी ते चंद्रभागा। नित्य वाहातसे गंगा॥
बोध पुंडलीक भक्त। स्वयें नांदतो विरक्त॥
नाथ चिंद्ड विठोबा। शंकर गगनाचा गाभा॥

चिंद्ड शंकराचा प्रशिष्य गोविंदनाथ याचें एकच उपलब्ध कवन असून तें गुरुकृपेच्या महिमानानें व्यात आहे –

चकोर चंद्रासी। चातक मेघासी।
तैसाची आम्हांसी॥ गुरुमाय॥ १॥
चोरासी यामिनी। कामिका कामिनी।
आम्हां ध्यानीं मनीं। गुरुमाय॥ २॥
पतीचे सेवेसी। पतिव्रता जैसी।
आम्हांलागी तैसी। गुरुमाये॥ ३॥
अवधूत माउली। कृपेची कोवळी।
गोविंद सांवळी। देखियेली॥ ४॥

**'घटचक्र' व 'गोरखगोधडी':** 'घटचक्र' हा ग्रंथ डॉ. हर्षे यांना तंजावरच्या गुरुदासबाबा मठांत मिळाला[६६] व 'गोरखगोधडी' हा ग्रंथ पै. आतार यांना पळूस येथें उपलब्ध झाला.[६७] पहिला ग्रंथ मराठी गद्यांत असून त्यांतील भाषेवर द्राविड संस्कार आहेत. या ग्रंथांत ३० संस्कृत श्लोक उद्धृत आहेत. या ग्रंथांत विविध योगांगांचें विस्तृत स्पष्टीकरण असल्यामुळें नाथ संप्रदायांतील पारिभाषिक शब्दांची व कल्पनांची माहिती करून घेण्यासाठीं याचें महत्त्व आहे. ग्रंथकार ज्ञानेश्वर-परंपरेंतील कोणी असावा. दुसरा ग्रंथ हिंदी असून त्यांतील मंत्र-तंत्रांचें विवरण गोरक्षाच्या नांवावर खपविण्याचा उपद्व्याप केला आहे.

यांशिवाय किती तरी संप्रदायदीक्षितांचे सुटे सुटे नामोल्लेख आणि सांप्रदायिक माहिती जागोजाग उपलब्ध आहे. लीळाचरित्रांतील उधळीनाथ,

---

६६. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खं. ५, पृ. ४६.
६७. ऐतिहासिक संकीर्ण वाङ्मय साहित्य, खं. १, पृ. १९.

अदंडीनाथ, विश्वनाथ, कुइराम, आउसा, आदि नाथसिद्धांचे उल्लेख महाराष्ट्रांतील नाथ संप्रदायाच्या आदिकालाच्या दृष्टीनें चिंतनीय आहेत. पुढील काळांताहि ज्यांच्या परंपरांचें सुसूत्र धागे-दोरे जुळत नाहींत अशा नाथनिरंजन, विश्वंभरनाथ, तापीनाथ, मारकीनाथ, केशवनाथ, उमरखेडचे आईनाथ, 'अविनाश-गीते'चा कर्ता काशीनाथशिष्य सुंदरनाथ,[६८] 'मत्स्येंद्रपुराणा'चा कर्ता ब्रह्मानंदशिष्य कांतानंद[६९] इत्यादि अनेक नाथपंथी व्यक्ति आढळतात. महीपतिनाथ उज्जयिनीकरांचे मित्र दत्तनाथ उज्जयिनीकर यांची गुरुपरंपराहि शोधली पाहिजे. दत्तनाथ – गोपाळ – वेडा जगन्नाथ – चिदंबर – निंबराज – नरहरि – गिरिधर – जनार्दन – एकनाथ – दत्तभाऊ – अंतोबा – दत्तनाथ उज्जयिनीकर अशी त्यांची गुरुपरंपरा सांगितली जाते. महाराष्ट्रांतील नाथ संप्रदायाचा विस्तृत इतिहास लिहूं इच्छिणाऱ्या अभ्यासकास या सर्वांच्या चरित्रांचा, ग्रंथांचा आणि परंपरांचा सूक्ष्म शोध करावयास हवा.

• • •

६८. 'अविनाश-गीता' : हस्तलिखित : गंगानाथ मठसंग्रह, पुणें.

६९. 'मत्स्येंद्रपुराण' : हस्तलिखित (अपूर्ण) : गंगानाथ मठसंग्रह, पुणें.

# : ५ : नाथ संप्रदायाचा प्रभाव

‘ मध्ययुगीन भारतीय साधनेची गंगोत्री ’ म्हणून मीं नाथ संप्रदायाचा गौरव ग्रंथारंभीं केला आहे. या प्रकरणांत नाथ संप्रदायाचें गंगौघासारखें तें धवल वैभव आपणांस पाहावयास मिळेल. नाथ संप्रदायानें आपल्या विद्रोही आंदोलनांत विकृत साधनांचा धुव्वा उडविला; अनेक वामाचारी साधकांना उच्चतम परमार्थ-साधनेच्या मार्गावर खेचलें; आणि भारतीय धार्मिक जीवनाचें शुद्धीकरण केलें. समाजाचें शील घडविण्यासाठीं गोरक्षनाथ आणि गोरक्ष-प्रेरित अनेक सिद्ध पुरुष यांनीं त्यागाची परमावधि करून अक्षरशः हिमालयाएवढे प्रयत्नांचे डोंगर रचले. नाथ संप्रदायाच्या विकासक्रमांत अनेक महान् आत्म्यांना लोकोद्धाराची ज्वलंत प्रेरणा प्राप्त झाली आणि अशा किती तरी महापुरुषांनीं भारतीय साधनेच्या इतिहासाची सोनेरी घडण केली. अशा नाथ-प्रभावित महापुरुषांनीं निर्माण केलेल्या विविध साधना-प्रणालींचा इतिहास हाच खरा नाथ संप्रदायाच्या यशाचा इतिहास आहे. देशकालपरिस्थित्यनुसार लोकजीवन घडविण्याच्या पद्धतींत इष्ट ते बदल करून विकसोन्मुख राहण्याची नाथ संप्रदायाची शक्ति या सर्व परवर्ती साधनांच्या इतिहासांत दिसून येते.

‘ नाथ संप्रदाय ’ या नांवानें जिवंत राहिलेला उत्तरकालीन नाथ संप्रदाय मात्र पूर्ववर्ती विकृत साधनांच्या परिणामानें लिडबिडलेल्या स्वरूपांतच जगत राहिला, आणि आपल्या प्रवर्तकांच्या धवल चारित्र्याला व समुज्ज्वल परंपरेला कलंकभूत होत राहिला, हेंहि आपण पाहिलें आहे. परंतु बाह्य नामरूप विसरून आणि अंतरंगाशीं अन् मूल प्रेरणांशीं प्रामाणिक राहून तो जिथें नवनव्या स्वरूपांत परिणत होत राहिला, तिथें त्यानें यशाचें नि परमश्रेयाचें गौरीशंकर गांठलें आहे.

दक्षिण भारतांत चक्रधर, अल्लमप्रभु, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि उत्तरेंत कबीर, नानक, दादू आदि महापुरुषांच्या द्वारां नाथ संप्रदायानें प्रत्यक्षाप्रत्यक्ष भारतीय साधनेचें महन्मंगल मंदिर उभारलें. या प्रभावांतून मीरेसारखी मधुराभक्तीची प्रतिनिधि-गायिका वा जायसीसारखा सूफी

प्रेमाख्यान-कविहि सुटूं शकला नाहीं, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. पुढील कांहीं पृष्ठांत या प्रभावाची, मन भारून टाकणारी, कहाणी विस्तारानें वर्णिली आहे.

## महानुभाव संप्रदाय :

महानुभाव संप्रदाय आणि त्याचे प्रवर्तक महात्मा चक्रधर यांच्या विचार-आचारांत जैन प्रभाव सहजीं जाणवतो, हें जरी खरें असलें तरी चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि विचारविश्वावर नाथ संप्रदायाचाहि फार मोठा प्रभाव आहे. अर्थात् या बाबतींत आपणांस अनुमानावर विसंबून राहण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. चक्रधराची जीवन-गाथा ज्या 'लीळाचरित्रां'त विस्तारानें वर्णिली आहे, तें 'लीळाचरित्र' या उभय संप्रदायांच्या अनुबंधावर प्रकाश पाडण्यास पुरेसें आहे. लीळाचरित्राचें महत्त्व या अनुबंधापुरतेंच मर्यादित नसून, नाथ संप्रदायाची सर्वांत जुनी उपलब्ध सामग्री आपणांस लीळाचरित्रांतच मिळते, हें आपण मागें पाहिलें आहेच. चक्रधराचे गुरु गुंडम राऊळ आणि आजे-गुरु चांगदेव राऊळ हे दोघेहि नाथसिद्ध असल्याचें सूचनहि मागें एके ठिकाणीं घडविलें आहे. आतां आपण क्रमानें चांगदेव राऊळ, गुंडम राऊळ आणि चक्रधर या तीन पुरुषांच्या जीवनांत नाथ संप्रदायाचें स्थान काय होतें, तें साधार पाहूं.

**चांगदेव राऊळ :** हे साधुपुरुष मूळचे फलटणचे. संसारत्याग करून हे माहूरला गेले आणि तेथें श्रीदत्तात्रेयानें व्याघ्ररूपानें भेटून यांना शक्तिदान केल्यावर यांच्या साधनेला सिद्धिस्वरूप प्राप्त झालें. यांचा निवास कांहीं काळ ( अखेरचीं ६२ वर्षें ) द्वारावतीस असल्यामुळें यांना द्वारावतीकर चांगदेव राऊळ असेंहि म्हणतात. 'महान् योगी' म्हणून यांची ख्याति होती. यांच्या योगबळावर आकृष्ट होऊन काउरलीची कामाख्या नामक एक तांत्रिक योगिनी त्यांच्याकडे भोग मागावयास आली आणि तिनें त्यांच्या कुटीपुढें सात दिवस धरणें धरलें. अखेर तिच्या आक्रमक कामासक्तींतून सुटण्यासाठीं चांगदेव राउळांनीं देहत्याग केला.

( १ ) याच कामाख्या योगिनीच्या बहुडी नामक शिष्येशीं रतिक्रीडा-स्पर्धा केल्यामुळें नाथसिद्ध कान्हा ( जालंधरशिष्य कान्हपाद ) हा ऊर्ध्वरेता असूनहि मृत्यु पावला, ही कथा मागें उल्लेखिली आहेच. या कामाख्येच्या रति-क्रीडेच्या आवाहनाला चांगदेव राउळांनीं साद दिली नाहीं; एवढेंच नव्हे तर

त्यांनीं त्यासाठींच देहत्याग केला, हें विशेष आहे. 'विषयविध्वंसैकवीर' अशा गोरक्षानुयायालाच साजेल असें आचरण ठेवणारे हे चांगदेव राऊळ नाथसिद्ध होते काय? ते महान् योगी होते, हे मात्र निश्चित.

( २ ) चांगदेव राउळांचे एक अनुगृहीत शिष्य उधळीनाथ हे 'नाथ'-पदान्त विद्यावंत होते. 'वयस्तंभिनी' विद्येवर त्यांचा अधिकार होता.

( ३ ) त्यांचें 'राऊळ' हें पदहि चिंतनीय आहे. त्यांच्या प्रधान शिष्याचें नांवहि ' गुंडम राऊळ ' असें आहे. लीळाचरित्रांत ' दुंडी राऊळ ' यांचाहि उल्लेख आहे.[1] तसेंच 'स्थानपोथीं'त ' नागा राउळां 'च्या गुंफेचा उल्लेख आहे.[2] महानुभाव पंथाचें प्रवर्तन चक्रधरांनीं केलें. अर्थात् त्यापूर्वीचे चांगदेव राऊळ व गुंडम राऊळ हे दोन सिद्ध केवळ चक्रधरांचे गुरु व आजे-गुरु म्हणूनच महानुभाव संप्रदायांत मोडतात. वास्तविक त्यांची परंपरा निराळी असली पाहिजे. 'राऊळ' हें त्यांच्या नांवांतील पद निःसंशय परंपरा-निदर्शक वाटतें. या परंपरेचा शोध घेण्याचे साधन आज तरी महानुभावीय वाङ्मयसंभारांत नाहीं. पण असा शोध घेणें मात्र अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें ठरेल.

( ४ ) नाथ संप्रदायाच्या प्रमुख शाखांपैकीं 'रावळ' ही एक शाखा आहे, हें आपण पाहिलेंच आहे. या 'रावळ' वा 'राऊळ' शाखेशीं तर या दोन राउळांचा संबंध नसेल? 'राऊळ' वा 'रावळ' शाखेच्या नाथयोग्यांचा संचार पश्चिम भारतांत विशेष असल्यामुळें 'द्वारावतीकर' चांगदेवांचा या 'रावळ' शाखेशीं संपर्क येणें संभवनीय आहे.

( ५ ) 'रावळ' शाखा नागनाथ-प्रवर्तित आहे, असें मानलें जातें. हा नागनाथ कोण, हें अजून निश्चित झालेलें नाहीं. पण या बाबतींत एक आश्चर्य-कारक दुवा आढळला आहे, तो येथें नोंदवतों. मेघचंद्रकृत ' यक्षदेव आम्नाय ' या महानुभावीय ग्रंथांत नाथ पंथाच्या मुकुंदराज परंपरेशीं संबंध जोडणारा उल्लेख आहे[3] —

गुरु आदिनाथु शिष्य हरिनाथु। तेणें रघुनाथु बोधियेला॥
वेनगंगेतीरीं अंबावती पुरीं। भेटला मुरारी रामदेवा॥

---

१. लीळाचरित्र, पूर्वार्ध खं. १ (भाग २ रा), पृ. २३.

२. स्थानपोथी, पृ. १२.

३. मा. इ. सं. मं. त्रैमासिक, व. १२, अं. २, पृ. ५१–५४.

**रामासी वेदान्तु नागेंद्रा सिद्धान्तु । गुरु नागनाथु आम्हांसये ॥**

या उताऱ्यांत पुढें निवृत्ति-ज्ञानेश्वर आदि नाथपंथीय साधुपुरुषांचाहि आत्मीय उल्लेख आहे पण सध्यां आपणांस त्याच्याशीं कर्तव्य नाहीं. हरिनाथानें रामाला ( रघुनाथाला ) वेदान्त सांगितला आणि नागेंद्राला ( नागनाथाला ) सिद्धान्त सांगितला, तो नागनाथ आमचा ( महानुभावांचा ) गुरु होय. या विधानांतील 'नागनाथ' कोण ? या उताऱ्याचा परिचय श्री. य. खु. देशपांडे यांनीं भा. इ. सं. मं पत्रिकेंत करून दिल्यापासून संशोधकांचे याविषयीं तर्क चालू आहेत. पण बहुतेकांना या 'नागनाथा'च्या निश्चितीविषयीं विशेष अडचण भासली नाहीं. हा नागनाथ म्हणजे चक्रधरशिष्य नागदेवाचार्य, असा सर्वांनीं निर्णय ठरविला आहे. आणि मग या अपनिर्णयाच्या आधारें त्यांनीं आदिकवि मुकुंदराजांना कालदृष्ट्या अलीकडे खेचून त्यांचें 'आदिकवित्व' हिरावून घेतलें आहे.

प्रा. सुरेश डोळके यांनीं अलीकडे मुकुंदराजविषयक मूलगामी संशोधन करून मुकुंदराजांच्या स्थल-कालाविषयींचे निर्णायक सिद्धान्त प्रस्थापित केले आहेत.[४] शके १११० ही 'विवेकसिंधू'च्या रचनेचा काल ठरविणारी ओवी त्यांच्या मतें बरोबर आहे. शिवाय अनेक ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारें या मुकुंदराजांच्या काळाला सुसंगत असा हरिनाथांचा काळहि त्यांनीं ठरविला आहे. शके १११० मध्यें आपल्या उतारवयांत मुकुंदराजांनीं 'विवेकसिंधु' लिहिला. चक्रधरांनीं महानुभावपंथाचें प्रवर्तन श. ११८० च्या सुमारास केलें. शके ११८० नंतर चक्रधरशिष्य बनलेला नागदेवाचार्य हा शक १११० मध्यें हयात असलेल्या मुकुंदराजांच्या आजे-गुरूचा शिष्य कसा संभवणार ?

'लीळाचरित्र' आणि 'स्मृतिस्थळ' या ग्रंथांत नागदेवाचार्यांचें चरित्र बारीक-सारीक घटनांनिशीं वर्णिलेलें आहे. त्यांत चक्रधरांना अनुसरण्यापूर्वीं नागदेव हा अनेक 'धांडोळां'त (व्यसनांत) गवसलेला एक सामान्य माणूस होता. नागपूरकडील हरिनाथ वा अन्य कुणा त्या परंपरेंतील सत्पुरुषाचा सिद्धान्तबोध त्याला मिळाल्याचें साधें सूचनहि तेथें नाहीं. परंतु संशोधकांना यांपैकी कसलीहि शंका आली नाहीं.

---

४. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अं. १०५, १०६, १०८ व 'नवभारत', ऑगस्ट व नोव्हेंबर १९५५.

मग हा नागनाथ कोण? हरिनाथानें ‘ छपन्न शिष्य प्रबोधिले ’, त्यांपैकीं हा नागनाथ ( नागेन्द्र – नागेश ) कोण, कोठील, त्याच्या परंपरेचें निश्चित स्वरूप काय, यासंबंधीं मुकुंदराज परंपरेंतील साहित्यांत किंवा नागनाथाशी संबंध सांगणाऱ्या महानुभावीय वाङ्मयांत कांहींच धागा मिळत नाहीं. वरील महानुभावीय उल्लेखांतील नागनाथ खरोखरच हरिनाथाच्या शिष्यांत होता कीं नाहीं, अशीहि शंका मनांत येते. परंतु अलीकडे प्रा. अ. का. प्रियोळकरांनीं प्रकाशनंदनाथ नांवाच्या गोमंतकीय नाथसिद्धाचा परिचय करून दिला आहे. त्यांत प्रकाशनंदनाथ आपली परंपरा नोंदवितांना हरिनाथाच्या शिष्यांत रामचंद्र ( मुकुंदराजांचे गुरु रघुनाथ ), नागेश आणि विश्वंभरनाथ ( प्रकाशानंद-नाथाच्या परंपरेचा प्रवर्तक ) अशा तिघांचा उल्लेख करतो.[५] अर्थात् हरि-नाथाला नागनाथ ( नागेश ) नामक शिष्य होता, याविषयीं नाथ परंपरेंतील ग्रांथिक पुरावा उपलब्ध झाल्यानें आतां नागनाथाच्या अस्तित्वाविषयीं शंका उरण्याचें कारण नाहीं. या प्रकाशानंदाचा विशेष परिचय प्रा. प्रियोळकरांच्या लेखाधारें मीं मागें करून दिलाच आहे.

हरिनाथांनीं शके ११०८ मध्यें समाधि घेतली. अर्थात् त्यांचा सारा जीवनकाल शालिवाहन शकाच्या ११ व्या शतकांत पडतो. हरिनाथ या आदि-कालीन नाथसिद्धाचा शिष्य नागनाथ हा कालदृष्ट्या चांगदेव राउळांचा गुरु संभवेल. ‘राऊळ’ शाखेचा प्रवर्तकहि नागनाथ नामकच आहे. ‘राऊळ’ या नाथ पंथाच्या शाखेचा प्रवर्तक नागनाथ आणि हरिनाथ यांचें एकरूपत्व मानलें तर हरिनाथाविषयींच्या महानुभावांच्या आदरभावनेचीहि संगति लागते. आपल्या परात्पर गुरूच्या ( चांगदेव राउळांच्या ) गुरूला ( नागनाथाला ) ज्यानें सिद्धान्तबोध दिला, त्या हरिनाथांच्या समाधीला भावभरानें वंदिण्यासाठीं महानुभाव जमतात, हें सर्वथा स्वाभाविक आहे. अर्थात् माझें हें एक ‘ सुसंगत अनुमान ’ आहे; निर्णायक सिद्धान्त नाहीं. यासाठीं आणखी कांहीं संशोधन होणें जरूर आहे. या संशोधनाभावींहि मला चांगदेव राउळांच्या ‘नाथपंथीयत्वा’-संबंधीं मात्र मुळींच शंका नाही. हा केवळ भावनात्मक आग्रह नाहीं. पुढील विवेचनावरून माझी कल्पना आणखी स्पष्ट होईल.

---

५. मराठी संशोधन पत्रिका, व. ५, अंक १.

**गुंडम राऊळ :** 'गोविंदप्रभुचरित्र' आणि 'लीळाचरित्र' यांतून दिसणारें गोविंदप्रभूंचें चित्र 'बालोन्मत्तपिशाचवत्' असें, नाथयोग्याला साजेसें आहे. चांगा वटेश्वरांच्या 'तत्त्वसार' या ग्रंथांत नाथसिद्धांच्या नामावळींत गोविंद-प्रभूंचा उल्लेख आहे.

**अवधुतु गुंडम राउळ, शबरी । मनु अजगिरि ।**
**जिराबाई खेचरी । देमादेवी ॥[६]**

या ओवींतील गुंडम राउळांचें 'अवधूत' हें विशेषणहि चिंतनीय आहे. सरदार मिरीकरांना उपलब्ध झालेल्या चौऱ्यायशी सिद्धांच्या यादींतहिं गुंडम राउळांचें नांव आहे. ( ही यादी पृ. १२१–१२२ वर दिलीच आहे. )

( १ ) 'राऊळ' या पदाविषयीं चांगदेव राउळांचा विचार करतांना बरेंच लिहिलें आहे. ज्या हरिनाथांच्या परंपरेशीं आपण चांगदेव राउळांचा संबंध जोडला, त्यांच्याच परंपरेंतील मुकुंदराजकृत 'विवेकसिंधु' या विख्यात ग्रंथांत 'राऊळ' शब्दाचा वापर कसा झाला आहे, हें पाहणें मनोरंजक ठरेल.[७]

**तंव बोलिला शिष्यांचा राणा । जीव-ईश्वरब्रह्मींचें लक्षण ।**
**राउळें निरूपिलें पूर्ण । मज कृपाबुद्धि ॥**

* * *

**जय जय श्रीगुरुनाथा । माझिया प्रश्नाची कथा ।**
**राउळें निरूपिली समस्ता । अनुक्रमें ॥**

वरील दोन ओव्यांत 'राऊळ' हा शब्द 'गुरु' या अर्थी वापरला गेला आहे. 'गोविंदप्रभुचरित्रां'त तर 'गुंडम' हें विशेषनाम गाळून अनेक ठिकाणीं केवळ 'राऊळ' या बहुमानदर्शक पदानेंच गुंडम राउळांचा उल्लेख केला आहे. ज्ञानेश्वरींतहि 'गुरु' वा ' श्रेष्ठ पुरुष ' याच अर्थी एकदां हा शब्द आला आहे –

**तरि याचिलागीं तुमतें ।**
**म्यां राउळासी विनविलें होतें ।[८]**

महानुभावीय साहित्यांतहि 'राजा', 'श्रीकृष्ण', 'देव', 'गोसावी', 'देव', 'चक्रधर'

---

६ तत्त्वसार, ओं. ८७७.

७. विवेकसिन्धु, ५. १; ८. १;

८. ज्ञानेश्वरी, ५. ५.

इत्यादि अर्थांनीं हा शब्द वापरला गेला आहे.[१] यावरून 'राऊळ' हा शब्द 'गुरुत्व' वा 'श्रेष्ठत्व' दर्शविणारा आहे, हें उघड होईल. यासंबंधींच्या विचाराला कांहीं साह्य व्हावें, म्हणूनच मीं हा सारा शब्द-प्रपंच मांडला आहे.

( २ ) चांगदेव राउळांनीं गुंडम राउळांना केलेलें वा गुंडम राउळांनीं चक्रधरांना केलेलें शक्तिदानहि विचारार्ह आहे. हा शक्तिदानाचा व स्थित्या-नंदाचा प्रकार नाथ संप्रदायाशीं अनेकांशीं संबंधित वाटतो.

हें असो. गुंडम राउळांना निःसंशय नाथसिद्ध ठरविणारे दोन निरपवाद ऐतिहासिक पुरावे उपलब्ध असल्यानें त्यांचें आणि अर्थात् त्यांच्या गुरूंचेंहि 'नाथपंथीयत्व' गृहीत धरावयास हरकत नाहीं. कारण 'गोविंदप्रभुचरित्रां'त गुंडम राउळांनीं आपल्या आयुष्यांत नव्यानें नाथपंथाचा स्वीकार केल्याचा उल्लेख नाहीं. गुरु म्हणून त्यांचा संबंध आला तो चांगदेव राउळांशींच. म्हणून ती सर्व परंपराच नाथ सांप्रदायिक होती असें म्हटलें तर चूक ठरणार नाहीं.

**चक्रधर :** 'लीळाचरित्रा'च्या प्रकाशांत मी चक्रधर आणि नाथ संप्रदाय यांचा संबध जोडूं लागलों तर अभ्यासक माझ्या खुळेपणाला हंसतील. पण 'लीळाचरित्रा'च्याच आधारें मी असें म्हणूं शकतों कीं, चक्रधरांच्या रक्तांत नाथ संप्रदायाचें सत्त्व वाहत आहे – त्यांच्या आंतरिक जीवनाचें पोषण नाथ संप्रदायानें केलें आहे – त्यांच्या आचार-विचारांच्या कक्षा नाथ-प्रभावानें निश्चित झालेल्या आहेत आणि त्यांच्या महान् व्यक्तिमत्त्वाची जडणघडण नाथ पंथाच्या प्रेरणांनीं झालेली आहे.

( १ ) मला याची पुरेपूर जाणीव आहे कीं, 'लीळाचरित्रां'त चक्रधरांचा नाथजोग्यांशीं अनेकदां विरोधाचा संबंध आलेला आहे. अशा प्रसंगांतून तर या दोन संप्रदायांतलें ऐकात्म्य वा जन्यजनकत्व सिद्ध न होतां संघर्षच सिद्ध होईल. या प्रसंगांची मीच स्थूल नोंद करतों आणि नंतरच त्या पार्श्वभूमीवर माझे विचार मांडतों.

( अ ) 'कन्नडदेसां तेलंगदेसां न वचावें : महाराष्ट्रीं असावें :' या चक्रधर-आज्ञेंत कन्नड व तेलंग देश यांच्या निषेधाचें कारण 'ते विषय-बहळ

---

१. उद्धवगीता, ७२६; ज्ञानप्रबोध, ९५२; ऋद्धिपूरवर्णन, २५.

देश : तेथ अवधूत मान्य ' असें आहे.[१०] या 'अवधूत-मान्य' प्रदेशापासून चक्रधर दूर राहूं इच्छीत आहेत.

( ब ) एकांक १९·१९ मध्यें त्यांनीं एक पंचकौळाचार्य व एक दुसरा अवधूत यांच्यांतील विद्वेषाची घृणास्पद कहाणी वर्णिली आहे.

( क ) भाग ४, पृ. १५ वर विश्वनाथ या नाथपंथी योग्याच्या धातुसिद्धीचा उल्लेख विरोधदर्शकच आहे.

( ड ) आउसा या नाथयोगिनीला आपल्या पंथाची दीक्षा देतांना तिच्याजवळील 'वींझवासिनी'ची व कृष्णाची मूर्ति आणि तिच्या कानांतील मुद्रांचें त्यांनीं विसर्जन करविलें.[११]

( इ ) योगविद्येचा गर्व बाळगणाऱ्या एका नाथ जोग्याचा त्यांनीं नाथोबा या शिष्याकरवीं एकदां पराभव केला होता.[१२]

आणखीहि बऱ्याच स्थळीं त्यांच्या मनांतील नाथ-विरोधाच्या खुणा सांपडतील. 'स्मृतिस्थळां'तहि नागदेवाचार्यांनीं म्हाइंभटाकरवीं एका नाथ-जोग्याचा पराभव केल्याचा उल्लेख आहे.[१३] तसेंच स्मृतिस्थळांत 'चोळीक' ( घोडा-चोळी ) पंथाचाहि तिरस्कारपूर्ण उल्लेख आहे.[१४] चक्रधरांच्या एकांक-परिभ्रमणांत त्यांना भेटलेल्या घोडाचोळीच्या तामसी शिष्यांची कहाणीहि याच संदर्भांत उद्बोधक ठरेल.[१५] हरिबास व सोंगोबास-रचित अन्वयस्थळाच्या शेवटीं नाथपंथ आणि त्यापासून उद्भवलेले पंथ यासंबंधीं एक चमत्कारिक कथा आहे, तींतहि असाच तिरस्काराचा सूर आहे.[१६] उत्तरकालीन महानुभावीय वाङ्मयापैकीं मतिरत्नाकर व 'दर्शनप्रकाश' या ग्रंथांत नाथ संप्रदायाला भरपूर शिव्या दिल्या आहेत. ही सर्व विरोधी पार्श्वभूमि ध्यानांत घेऊनच मी आतां मुख्य मुद्द्याकडे वळतों.

---

१०. 'सूत्रपाठ', आचार २२.
११. लीळाचरित्र, भा. ४, पृ. ४९.
१२. लीळाचरित्र, भा. ४, पृ. २०.
१३. स्मृतिस्थळ, १९२, पृ. ६१.
१४. स्मृतिस्थळ, ९९, पृ. ३१.
१५. लीळाचरित्र, एकांक २०, पृ. २१.
१६. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अं. १०६, पृ. ३१.

( १ ) वाइंदेशकर लीळाचरित्र-पाठानुसार चक्रधरांचा जन्म एका अवधूताच्या आशीर्वादानें झाला होता. दानधर्म, नवस-सायास करून थकलेला विशाळदेव वाराणसीला जावयास निघाला असतां वाटेंत दत्तात्रेयानें अवधूताच्या वेषानें दर्शन दिलें आणि कृपाप्रसाद दिला.[१७]

( २ ) हरपाळदेवा ( चक्रधरांचें पूर्वनाम )च्या मृत्यूनंतर स्मशानांत त्याच्या देहांत चांगदेव राउळांनीं प्रवेश केला. हे चांगदेव राऊळ एक नाथपंथी सिद्ध असल्याचें आपण पाहिलेंच आहे.

( ३ ) गृहत्याग करून महाराष्ट्रांत आल्यावर चक्रधरांनीं गुंडम राऊळ या ऋद्धिपूर येथील नाथसिद्धाचा गुरूपदेश घेतला.

( ४ ) एक नाथसिद्ध आणि आपल्या गुरूचे गुरुबंधु उधळीनाथ यांच्याकडून चक्रधरांनीं वयस्तंभिनी विद्या प्राप्त केली. चक्रधर त्यांना गुरुतुल्य मान देत असत.

( ५ ) एकांक-भ्रमणांत सालबर्डीच्या डोंगरावर चक्रधरांची मुक्तादेवी या भर्तृहरि-शिष्या नाथयोगिनीशीं भेट झाली. या योगिनीच्या नखांच्या चुंभळी वळल्या होत्या आणि जटा भुईला टेकल्या होत्या. तिनें चक्रधरांचें मनःपूर्वक स्वागत केलें — त्यांची वनपुष्पांनीं पूजा केली आणि त्यांना कंदमूळफळांची 'आरोगणा' दिली.

( ६ ) हंसांबेशीं विवाह केल्यावर एके दिवशीं संसाराकडे पाठ फिरवून भिक्षेसाठीं नगर-संचार करणारा अवधूत पाहून चक्रधरांची अवधूतवृत्ति पुनः जागी झाली आणि त्यांनीं पुनः घर सोडलें.

( ७ ) लीळाचरित्राच्या तिसऱ्या भागांत चक्रधरांनीं जोगीवेश धारण करून नाथ सांप्रदायिक भिक्षागीत म्हटल्याचें वर्णन आहे. " स[illegible]ल सीध एणें वचनें भिक्षा करिती " अशी माहिती त्यांनीं दिली आह.[१८] ही जोगीवेशाची आणि भिक्षागीत म्हणण्याची लहर त्यांना कां आली ?

( ८ ) उत्तरार्ध लीळा ४१६ मध्येंहि गोरक्षरूपधारणाचा असाच एक उद्बोधक प्रसंग आहे.

---

१७. चक्रधरचरित्र : डॉ. कोलते, पृ. १.

१८. लीळाचरित्र, भाग ३, पृ. १०४.

( ९ ) चक्रधरांचा जोग – जुगुति – ध्यान – धारणा – लय – लक्ष – आसन – समाधि, प्रल्हादविद्या, हठविद्या, चौरंगी विद्या, शांभवी विद्या यांशीं चांगलाच परिचय आहे.

( १० ) ते स्वतःचा आणि आपल्या शिष्यांचा अनेकदां 'जोगी', 'अवधूत' या शब्दांनीं निर्देश करतात. लोकहि त्यांना 'जोगी', 'अवधूत' वा 'सिद्ध' म्हणून गौरवितात.

( ११ ) नाथ संप्रदायाचा वेश, साधनापद्धति, भिक्षागीतें यांच्याशीं त्यांचा सूक्ष्म परिचय आहे.

( १२ ) नाथपंथाचा इतिहासहि ते सूक्ष्मपणें जाणतात. अदंडीनाथ, कुइराम, इंद्राई, लुइपाई, गोरक्षनाथ, नागार्जुन-कनेरी, जालंधर-गोविंदचंद, भर्तृहरि इत्यादि सिद्धांचा चक्रधरांनी अत्यंत आदरपूर्वक उल्लेख केला आहे – क्वचित् त्यांचा आदर्श आपल्या शिष्यांपुढें मांडला आहे. चक्रधरांनीं या सिद्धांच्या कथांतून पुरविलेली माहिती, वज्रयानी माध्यम सोडलें तर, अन्य कोणत्याहि भारतीय भाषेंत इतक्या मोठ्या प्रमाणांत, इतक्या अगोदरच्या काळांत मुळींच मिळत नाहीं – नाथ-सांप्रदायिक ग्रंथांतूनाहि मिळत नाहीं. यावरून असें खात्रीनें वाटतें कीं, चक्रधरांचें पंथप्रवर्तनापूर्वीचें जीवन नाथ-संस्कारांनीं भारलेलें असावें.

( १३ ) एकदां आबैसानें चक्रधरांजवळ बसून चौपदी गायिली. ती ऐकून चक्रधरांनीं उद्गार काढले : " नाथवाणी ते नीकी : नाथवाणी सीधवाणी गावोए : तैसें अर्वाचीक गावों नेए : " हा चक्रधरांचा अभिप्राय महत्त्वाचा आहे.[१९] यावरून आबैसानें गायिलेलें गीत नाथपंथीयच होतें, हें उघड आहे. चक्रधरांनीं स्वतः एकदां भिक्षागीत गायिल्याचें मीं मागें उल्लेखिलें आहेच. स्वतः चक्रधरांनीं गायिलेली ही चौपदी आपण पाहिली तर चक्रधरांचें नाथवाणी-विषयींचें प्रेम सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट होईल. ही चौपदी म्हणजे योगपर हिंदी गोरक्षगीत आहे.[२०] नाथसिद्धांच्या ज्या कथा प्रसंगविशेषीं चक्रधरांनीं सांगितल्या आहेत, त्या कथांच्या संवादांतील मूळचीं हिंदी विधानें नोंदवायलाहि ते विसरले नाहींत.

---

१९. लीळाचरित्र, उत्तरार्ध १५८, पृ. १०७.

२०. लीळाचरित्र, उत्तरार्ध २२१, पृ. १९५.

वरील सर्व विवरणावरून हें सिद्ध होईल कीं, चक्रधर अनेक नाथ-सिद्धांच्या महात्मतेनें भारावले होते, त्यांच्या वाणीनें हेलावले होते आणि नाथ पंथांतील मूल उदात्त प्रेरणांनीं पोसले होते. त्यांच्या काळांत नाथ पंथांत ज्या विकृति शिरल्या होत्या आणि वामाचारी संप्रदायांच्या संसर्गानें जे दोष शिरले होते, त्यांमुळेंच नाथ सांप्रदायिक जोग्यांशीं त्यांचा अनेकदां संघर्ष उद्भवला असावा. विशुद्ध अध्यात्मनिष्ठेची बैठक सुटून शुष्क यौगिक प्रक्रियांचा पसाराच अनेकदां नाथ जोग्यांच्या आचारांत बाहुल्यानें दिसूं लागल्यानेंहि त्यांना नाथ पंथाचा वीट आला असावा, असें वाटतें.

आतां शेवटीं आणखी दोन गोष्टींचा उल्लेख करून हें विवेचन संपवितों : ( १ ) नाथ संप्रदायांत दत्ताचा महिमा विशेष आहे आणि महानुभावांच्या पंचकृष्णांत एक दत्तात्रेय आहे. ( २ ) ज्या 'रावळ' शाखेचा मीं चांगदेव राउळांशीं संबंध जोडला, त्या 'रावळ' शाखेंत मुस्लिमांचें प्राचुर्य आहे. पुढें मुस्लिम सत्ताधाऱ्यांच्या जाचक जिझिया-करांतून महानुभाव वांचले, त्याचें कारण हें असेल काय ? जाणत्यांनीं याचा अधिक शोध घ्यावा.

### लिंगायत संप्रदाय :

लिंगायत संप्रदायाचा एक प्रवर्तक अल्लमप्रभु हा नाथसिद्ध होता. प्रा. द. रा. बेंद्रे यांच्या मतें तर तो मत्स्येंद्रनाथाचाच प्रत्यक्ष शिष्य होता. कारण अल्लमप्रभूच्या गुरूचें नांव 'अनिमिषदेव' ( अनिमिष = मत्स्य ) होतें, असें लिंगायत ग्रंथांतून नोंदविलें आहे. 'प्रभुलिंगलीला' या अल्लमप्रभूंच्या लिंगायत-सांप्रदायिक चरित्रांत गोरक्षनाथ आणि अल्लमप्रभु यांचा विस्तृत तात्त्विक संवाद आलेला आहे. श्री. एम्. आर्. साखरे यांनीं 'लिंगधारणचंद्रिके'च्या प्रदीर्घ प्रस्तावनेंत 'सिद्धमार्गा'चा आणि लिंगायतांचा संबंध चर्चिला आहे.[२१] त्यांच्या मतें कायायोगावर आत्यंतिक भर देण्याच्या गोरक्षनाथाच्या मताशीं अल्लम-प्रभूचा विरोध असल्यामुळेंच अल्लमप्रभु नाथ-परंपरेचा विरोधक बनला –

"This sect ( Nathism ) seems to have died out in course of time, when their theory of 'जीवनन्मुक्ति' in a

---

२१. लिंगधारणचन्द्रिका, प्रस्तावना.

deathless body was convincingly disapproved by Allamprabhu of 12 century and a contemporary of Basava."

'हठयोगप्रदीपिका' या नाथपंथाच्या प्रमुख ग्रंथांत नाथसिद्धांच्या नामावळीत अल्लमप्रभूचा समावेश आहे –

अल्लामः प्रभुदेवश्च घोडाचोली च किंकिणिः।[२२]

'गोरन्नमंत्री' या तेलगू कवीच्या 'नवनाथचरित्रमु' या ग्रंथांत नाथ-सिद्ध म्हणून अल्लमप्रभूचें चरित्र वर्णिलें आहे. हें चरित्र आणि 'प्रभुलिंगलीला' वा अन्य लिंगायत सांप्रदायिक ग्रंथ यांत आलेलें अल्लमप्रभूचें चरित्र एकच आहे; त्यामुळें हा अल्लमप्रभुच निराळा, असें मानण्यासहि जागा उरत नाहीं. सदर ग्रंथ इ. स. १४१० मध्यें लिहिला गेला.

हरिबास-सोंगोबासकृत 'अन्वय-स्थळा'च्या शेवटीं नाथ पंथापासून निर्माण झालेल्या अन्य शाखांच्या उगमाची एक रहस्यमय विकृत कथा दिली आहे. त्यांत अल्लमप्रभु आणि त्याचा पंथ नाथ संप्रदायापासूनच उद्भवल्याचें लिहिलें आहे.[२४]

अल्लमप्रभूप्रमाणेंच रेवणसिद्ध व मरूळसिद्ध हेंहि प्रथमतः नाथसिद्ध होते. नाथांच्या 'नवनाथभक्तिसार' या ग्रंथांत रेवणाचें चरित्र वर्णिलें आहे. नव-नाथांच्या श्लोकांतहि "चौरंगिरेवाणकभर्तृसंज्ञाः" असा रेवणाचा निर्देश आहे. रेवणसिद्ध गोरक्षसमकालीन. इ. स. १२६५ नंतर तो वीरशैव बनला, असें श्री. साखरे यांचें मत आहे. त्यांच्या मतें त्यापूर्वी तो लकुलीश शैव असावा. परंतु ज्या अर्थी नाथ संप्रदायांत रेवणाची कथा गायिली जाते, त्या अर्थी तत्पूर्वी तो नाथसिद्धच असला पाहिजे. मरूळसिद्ध एकाहून अधिक झाले आहेत. 'काडसिद्ध' या नांवाच्या सिद्धांचाहि उल्लेख येतो. रेवण, मरूळ व काडसिद्ध यांचा संबंध नाथपरंपरा व लिंगायत परंपरा असा दोहींकडे लावला जातो. याविषयीं अधिक संशोधनाची आवश्यकता आहे.

वडवाळ सिद्ध नागेश याचाहि नाथ-लिंगायत अनुबंधांत निर्देश करावयास हवा. अर्थात् उपलब्ध साधनांतून आज तरी यावर अधिक प्रकाश टाकतां येणें अशक्य आहे.

---

२२. हठयोगप्रदीपिका, १. ८.

२३. तेलुगु और उसका साहित्य, पृ. २७–२८.

२४. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अं. १०६, पृ. २१.

नाथ पंथाच्या या संबंधामुळें आणि संपर्कामुळें लिंगायत आद्याचार्यांच्या विचारावर नाथ संप्रदायाचा स्पष्ट ठसा आहे. शिवाय कर्नाटक नाथ संप्रदायाच्या उदयभूमीच्या जवळ असून, त्याच्या लीलास्थलींत येत असल्यामुळें लिंगायतपंथ-प्रवर्तनानंतरहि नाथ सांप्रदायिकांचा आणि लिंगायतांचा संबंध येत राहिला असणारच. लिंगायत वचनकारांच्या वचनांतील क्रांतिकारक प्रखरतेचा वारसा नाथ संप्रदायाचा आहे, असें म्हटलें तर अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं. केवळ बसवेश्वराचीं वचनें पाहिलीं तरी तेथें गोरक्षाच्या वाणीचा ध्वनिच नव्या रूपानें गर्जत आहे, असें वाटतें. हे गोरक्ष-वाणीचे पडसाद आपणांस अल्लमप्रभूच्या वाणीत तर आढळतीलच, पण चन्नबसवेश्वर, महादेवी अक्का यांच्या वाणींतहि आढळतात.

सतराव्या शतकांतील वीरशैव कवि सर्वज्ञ याच्या काव्यांतहि नाथ पंथाच्या यौगिक विचारांची छाप आहे.[२५] त्याच्या वचनांत नाद-बिंदु, सहस्रारचक्र, नाडीवह्निमंडळ इत्यादि यौगिक संज्ञांचा वापर जागोजाग आहे. कविश्रेष्ठ सर्वज्ञ हा कर्नाटकाचा 'कबीर' म्हणून ओळखला जातो, यावरून त्याच्या विचारांची जात कुळी काय असेल, याची कल्पना येईल.

या सर्व संबंधाचें सोदाहरण विवेचन या पुस्तकाच्या व्याप्तींत बसत नाहीं. तो एका स्वतंत्र ग्रंथाचा विषय होईल. केवळ नाथ पंथाच्या दिग्विजयाचा विस्तार कळावा, एवढ्यासाठींच हे धागे-दोरे स्थूलपणें मांडले आहेत. भावी संशोधनाची दिशा जरी यांतून स्पष्ट झाली, तरी मी स्वतःला धन्य समजेन.

## वारकरी संप्रदाय :

वारकरी संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांचा संबंध खरें म्हणजे मुद्दाम वर्णन करण्याचें कारण नाहीं. वारकऱ्यांची 'माउली' जे ज्ञाननाथ, ते नाथ संप्रदायांतील एक थोर महापुरुष होते, हें सर्वश्रुत आहे. ज्ञानेश्वरांना गहिनीनाथांनीं नाथ संप्रदायाचा ठेवा निवृत्तीकरवीं दिला आणि त्यांनीं तो ज्ञानेश्वरीच्या माध्यमांतून वारकरी संप्रदायाला दिला. वास्तविक ज्ञानेश्वरांचा वारकरी संप्रदायाशीं संबंध येण्यापूर्वीच ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीचें लेखन केलें आहे. 'ज्ञानेश्वरी' हा नाथ संप्रदायाचा वारसा आहे, हें त्यांनीं उपसंहारांत स्पष्ट केलें

२५. केसरी, १९ जून १९५५.

आहे. तरीहि ज्ञानेश्वरींतील भक्तिप्राधान्यामुळें वारकऱ्यांनीं तो आपल्याचं संप्रदायाचा प्रणामग्रंथ म्हणून स्वीकारला. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीकरवीं वारकरी संप्रदायाला शास्त्रप्रामाण्याची 'बैसका' निर्माण करून दिली. "ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांतील अद्वयानंदवैभव, अष्टांगयोग, दलितोद्धाराची प्रेरणा व लोकभाषेची तरफदारी म्हणजे नाथ पंथाचा वारसा होय." [२६]

वारकरी संप्रदाय हा ज्ञानेश्वरांपूर्वींपासूनच जरी प्रचलित होता, तरी ज्ञानेश्वरांच्या उदयामुळेंच वारकरी संप्रदायाचें वैभव वाढलें. ज्ञानेश्वरांनीं आपल्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें आणि तत्त्वस्पर्शी मधुर वाणीनें महाराष्ट्राच्या सर्व थरांतील आत्म्यांना प्रभावित केलें आणि 'संतांची मांदियाळी' निर्माण केली. त्यांच्या प्रभावळींत असलेले संत मूलतः सामान्य असूनहि ज्ञानेश्वरांच्या संजीवक संस्पर्शामुळें त्यांचीं जीवनें उंचावलीं आणि त्यांनीं आपल्या जीवनांतून व वाणींतून उपनिषदांचें रहस्य साकार केलें. नामदेवाच्या सगुणभक्तीला 'ज्ञानाचा डोळा' लाभला, तोहि या 'ज्ञानराजा'च्याच सहवासामुळें.

याचमुळें वारकरी "ज्ञानदेवें रचिया पाया। उभारिलें देवालया ॥" असें भागवत संप्रदायाच्या मंदिर-रचनेचें वर्णन करतात. ज्ञानेश्वरीला 'माऊली' म्हणणाऱ्या वारकरी संतांनीं "नाथ संप्रदायाची थोरी। प्रकट केली ज्ञानेश्वरी ॥" ही जाणीवहि व्यक्त केली आहे.

याचमुळें सरदार मिरीकरांसारख्या अभ्यासकांचा अपसमज झाला आहे : त्यांनीं 'ज्ञानेश्वरांचा नाथपंथ' या आपल्या निबंधांत "नाथपंथ = भागवत-पंथ" असें समीकरण मांडलें असून, भागवत संप्रदायाच्या संस्थापकाचा मान त्यांनीं मत्स्येंद्रनाथाला देऊन टाकला आहे.[२७] हा सिद्धान्त गृहीत धरूनच त्यांनीं कानफाट्यांना नाथ संप्रदायांतून हुसकावून लावलें आहे. या पुस्तकांतील सर्व विवेचनावरून आणि स. मिरीकरांच्या मत-विशेषांचा मीं योग्य स्थळीं जो ऊहापोह केला आहे त्यावरून या कल्पनेंतील अतिव्याप्ति कळून येईल.

**दत्त संप्रदाय :**

दत्त संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांचा संबंध रहस्यमय आहे. नाथ संप्रदायांत दत्ताचें स्थान विशेष आहे. 'नवनाथभक्तिसारां'त मत्स्येंद्र-गोरक्षांचा

---

२६. संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुति : प्रा. गं. बा. सरदार, पृ. ९१.

२७. ज्ञानेश्वरदर्शन, खं. १, पृ. ४०–९२.

दत्ताशीं असलेला संबंध सर्वांना परिचित आहे. 'अवधूतगीता' दत्तानें गोरक्षाला सांगितल्याचें मानलें जातें. 'दत्तगोरक्षगोष्टी' हा नाथ सांप्रदायिक ग्रंथ प्रसिद्ध आहे. नाथयोग्याला लावलें जाणारें 'अवधूत' हें नांव दत्तवाचक आहे. नाथपंथालाहि 'अवधूतपंथ' असें नांव आहे. प्राचीन मराठींत स्मरणीय पुरुषांच्या नामावळींत दत्त व गोरक्ष यांचीं नांवें बरोबर घेतलीं जातात, हें प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना ज्ञात आहे मूलतः नाथसिद्ध असणाऱ्या चांगदेव राउळांना माहूर या दत्तक्षेत्रांत दत्तात्रेयानेंच व्याघ्ररूपानें शक्तिदान केल्याचें वर्णन आढळतें. नाथ संप्रदायाशीं संबद्ध असलेल्या महानुभाव पंथाच्या पंचकृष्णांत दत्तात्रेयाला स्थान आहे.

परंतु 'गुरुचरित्रां'त प्रकटलेला नरसिंहसरस्वतींचा दत्त संप्रदाय वैचारिकदृष्टया नाथ संप्रदायाहून वेगळा वाटतो. विद्रोही नाथपंथ आणि सनातनी दत्त संप्रदाय यांचें कांहींसें नातें असेल, असें गुरुचरित्रावरून वाटत नाहीं. मात्र गुरुचरित्रावरून हें सिद्ध आहे कीं, नाथ संप्रदायाची उदयभूमि जें श्रीशैलकदलीबन त्याच्याविषयींचा तीर्थभाव नाथ-लिंगायतांप्रमाणेंच नरसिंहसरस्वतींच्याहि हृदयांत आहे. नरसिंहसरस्वतींनीं अखेरचा विश्राम स्वीकारला, तो या श्रीशैलकदलीवनांतच.

जनार्दनस्वामींनंतरच्या दत्त संप्रदायांत मात्र नाथपंथाशीं संबंध मानला जातो. एकनाथांनीं आपल्या गुरुपरंपरेच्या अभंगांतून हा संबंध स्पष्टपणें सांगितला आहे —

ध्यानीं बैसोनी शंकर। जपे रामनाम सार॥
पार्वती पुसे आवडी। काय जपतां तांतडी॥
मंत्र तो मज सांगा। ऐशी बोलतसे दुर्गा॥
एकांतीं नेऊन। उपदेशी राम अभिधान॥
तेंचि मच्छिंद्रा लाधलें। पुढें परंपरा चालिलें॥
तोचि बोध जनार्दनीं। एका लागतसे चरणीं॥ [२८]

हा संबंध एखाद-दुसऱ्या अभंगातच नव्हे, तर बारा अभंगांत एकनाथांनीं पुनः पुन्हां वर्णिला आहे. दत्तभक्त दासोपंत नाथ सांप्रदायिकच मानले जातात.

---

२८. एकनाथ गाथा, अ. १८८९, पृ. ३२८.

देवनाथ-दयाळनाथ या नाथपंथीयांची परंपरा दत्त-प्रणीतच आहे. दत्तात्रेय आणि नाथ संप्रदाय यांच्या दृढ अनुबंधाविषयीं मीं माझ्या 'दत्त संप्रदाया'-वरील पुस्तकांत विस्तृत विवरण केलें आहे.[२९]

## आनंद व चैतन्य संप्रदाय :

लिंगायत पंथाविषयीं विचार करतांना मीं अल्लमप्रभूविषयीं लिहिलें आहे. आनंद सांप्रदायिकांच्या वाङ्मयांतहि अल्लमप्रभूचा ( श्रीशहादत्त अलमाप्रभु ) संबंध येतो.[३०] भूमनगरच्या अलमाप्रभूपासून एक आनंद-परंपरा निर्माण झाल्याचें सदानंद-कृत 'आनंदसार' ग्रंथांत वर्णिलें आहे. आनंद, नंद, नाथ, दत्त हे संप्रदाय एकच, असें 'दयानंदचारित्रां'त वर्णिलें आहे, या संप्रदायाच्या ग्रंथांतून असें वर्णिलें आहे कीं, अलमाप्रभूबद्दल जोगी-जंगम-मुसलमान या सर्वांनाच पूज्यभाव वाटत असे. सदानंद-परंपरेंतील गंभीरानंद वा गंभीरनाथ हा उभयपंथी असल्याचें आढळतें. या गंभीरानंदाचा नातशिष्य कांतानंद यानें 'मत्स्येंद्रपुराण' लिहिल्याचा उल्लेख मागें केला आहे. ज्ञानेश्वरोत्तर नाथ परंपरांत 'आनंद'-नामान्त पुरुष अनेक आढळतात. या संबंधावर अधिक प्रकाश टाकणें आवश्यक आहे.

बहिणाबाईनें आपली चैतन्य-परंपरा थेट आदिनाथापर्यंत भिडविली आहे. आदिनाथ – ज्ञाननाथ – सच्चिदानंद – विश्वंभर – राघव चैतन्य – केशव चैतन्य – बाबाजी चैतन्य – तुकाराम – बहिणाबाई अशी ही परंपरा आहे.[३१]

महाराष्ट्रांतील साधनेच्या दृष्टीनें विचार करतां, परस्परांचे संबंध स्पष्ट होणें आवश्यक आहे. प्राचीन मराठी वाङ्मयाचें संप्रदायशः अध्ययन झालें तर या विविध संप्रदायांच्या परस्पर-संबंधावर व महाराष्ट्रांतील साधनेच्या विकास-क्रमावर चांगलाच प्रकाश टाकतां येईल.

महाराष्ट्रांत नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, आनंद, चैतन्य व समर्थ या संप्रदायांचा कुठें ना कुठें तरी आत्मीय अनुबंध आढळतो, हें या प्रकरणांतील एतद्विषयक विवेचनावरून लक्षांत येईल.

---

२९. श्रीनरसिंहसरस्वती : चरित्र आणि परंपरा, पृ. ५०–५५.

३०. महाराष्ट्र कविचरित्र, भा. ४ था.

३१. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त : शके १८३७, पृ. २७१

**समर्थ संप्रदाय :**

महाराष्ट्रीय साधनेच्या इतिहासांत समर्थ श्रीरामदासस्वामी आणि त्यांचा समर्थ संप्रदाय यांचें एक विशेष स्थान आहे. ज्या विवक्षित राजकीय परिस्थितींत समर्थांचें जीवनकार्य घडलें, त्या परिस्थितींत समर्थांच्या समाजोन्मुख साधुत्वाला राष्ट्रगुरुत्वाचें बिरुद प्राप्त झालें. समर्थ आणि शिवछत्रपति यांच्या घनिष्ठ संबंधामुळें तर समर्थ हे एक राजकारणी संत होते, असें सर्व विद्वानांनीं अट्टाहासानें प्रतिपादन केलें आहे. हें करीत असतांना 'राष्ट्र' आणि 'राजकारण' या विसाव्या शतकांतील कल्पना समर्थांवर लादल्या गेल्या आहेत. समर्थांच्या व्यक्तिमत्त्वांत एक व्यवच्छेदक आगळेपण असल्यामुळें पूर्वकालीन महाराष्ट्रीय संत-परंपरेहून समर्थ सर्वथा निराळे होते, असा सार्वत्रिक समज होऊन बसला आहे. हा समज समर्थांच्या वाणींतून अर्थातच सिद्ध होऊं शकत नाहीं.

या समजामुळेंच समर्थ आणि त्यांचा संप्रदाय यांच्याशीं नाथ संप्रदायाचा संबंध शोधणें अनेकांना विपरीत वाटेल. परंतु हें निश्चितपणें ठरवितां येतें कीं, समर्थांच्या आंतरिक जडण-घडणींत नाथ संप्रदायाचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष असा फार मोठा वांटा आहे. या प्रभावाचे स्रोत अनेक असले तरी प्रामुख्यानें गोरक्षनाथ, मुकुंदराज आणि ज्ञानेश्वर या त्रयीचा समर्थांवरील प्रभाव स्पष्ट आहे.

**समर्थ आणि गोरक्षनाथ :** समर्थांनी दासबोधांत गोरक्षनाथाचा गौरवानें उल्लेख केला आहे :

**सनकादिक मुख्य करूनि । आदिनाथ मीन गोरक्षमुनि ।**[३२]

नाथपंथीय जोग्यांचा समकालीन आचार आणि नाथ पंथाशीं संबंधित असलेल्या अघोर, कौल, शाक्त आदि संप्रदायांचा वामाचार यांच्याविरुद्ध समर्थांनीं अनेक ठिकाणीं शब्दप्रहार केले असले, तरी गोरक्षनाथांविषयीं त्यांच्या मनांत आदरभावनाच वसत होती. 'कानफाट्या' या आपल्या दोहऱ्यांत त्यांची गोरक्षाविषयींची आदरभावना स्पष्टपणें दृग्गोचर होते.

**आलेख आलेख सो न्यारा जैसी किहिणी वैसी रहणी ।**
**सोई नाथका प्यारा आलेख जागे ॥ १ ॥**

---

३२. दासबोध, ५. ६. २५.

**गोरख गोरख सब कोहु कहे गोरख न बुजे कोहे।**
**जोगींद्रकु जो कोई रखे सोई गोरख होये ॥ ३ ॥**
**मुद्रा फारी कानमों डारी आपसे न फारी कोये।**
**आपसे फारे मुद्रा पैटी सोई गोरख होये ॥ ९ ॥**[३३]

इतकेंच नव्हे, तर आपल्या शिष्य-महंतांना भिक्षेचा आदर्श सांगतांना 'दत्त-गोरक्षां'चीच अनुकरणीय आठवण त्यांनीं करून दिली आहे :

**दत्त गोरक्ष आदि करुनी। सिद्ध भिक्षा मागती जनीं।**
**निःस्पृहता भिक्षेपासुनी। प्रगट होये ॥**[३४]

दासबोधाच्या प्रारंभींच आपल्या या ग्रंथराजाचे ग्रांथिक आधार कोणते, हें सांगतांना समर्थांनीं ज्या बारा गीतांचा उल्लेख केला आहे, त्यांत 'अवधूतगीते'-चेंहि स्थान आहे.

**शिवगीता रामगीता। गुरुगीता गर्भगीता।**
**उत्तरगीता अवधूतगीता। वेद आणि वेदान्त ॥**[३५]

याच 'अवधूतगीते'संबंधीं दासबोधाच्या सातव्या दशकांत पुनः एकदां उल्लेख आला आहे :

**अवधूतगीता केली। गोरक्षीस निरोपिली।**
**ते अवधूतगीता बोलिली। ज्ञानमार्ग ॥**[३६]

अवधूतगीतेचा समर्थांच्या 'स्वाध्यायां'त समावेश होता. समर्थशिष्य दिनकर-स्वामींच्या 'स्वानुभवदिनकरां'त 'अवधूतगीता' आणि 'गोरक्षगीता' या दोहींचाहि संदर्भग्रंथ म्हणून उल्लेख आलेला आहे.[३७]

समर्थांनीं गृहत्याग केल्यानंतर गोदावरीच्या तीरावर जनस्थान-पंचवटीच्या परिसरांत बारा वर्षें तपश्चर्या केली, हें प्रसिद्धच आहे. हा भाग म्हणजे नाथ संप्रदायाची लीलास्थलीच होय, हें आपण मागें पाहिलेच आहे. त्र्यंबकेश्वराच्या

---

३३. समर्थांचा गाथा, पृ. २६८.
३४. दासबोध, १४. २. ५.
३५. दासबोध, १. १. १८.
३६. दासबोध, ७. ७. ३४.
३७. स्वानुभवदिनकर, १. १. ८८–८९.

सान्निध्यांत आणि गोदावरीच्या परिसरांत याहि काळांत नाथयोग्यांचा संचार निःसंशय असलाच पाहिजे. गिरिधरस्वामींच्या 'समर्थप्रतापां'त एक सूचक उल्लेख आला आहे :

> **समर्थसंगें येक नाथपंथी बाळक । गिरिगुहांतरीं तत्पर असे सेवक ।**
> **समुदाई मग गुप्त जाला देख । केवळ रघुनायक निर्धारें ॥ [३८]**

समग्र भारत पायाखालीं घालणारे आणि अधून-मधून 'गिरिगुहांतरीं' एकान्त-मनन करणारे समर्थ गिरिवासी नाथयोग्यांच्या सहवासांत अनेकदां वावरले असतील, असें यावरून अनुमान करावयास हरकत नाहीं.

शिरगांवमठपति भीमस्वामीकृत अभंगात्मक समर्थ-चरित्रांतील पांचवा अभंगहि असाच सूचक आहे :

> **पुढें जातां मार्गीं कांहीं वाटे भया ।**
> **तेथें दत्तात्रेया भेटी जाली ॥ ७ ॥**
> **मणका येक त्यांनीं बांधिला पायास ।**
> **भयातीत असे अरण्यांत ॥ ८ ॥**
> **मनीं आलें कांहीं हत्यार असावें ।**
> **गोरक्ष स्वभावें आले तेथें ॥ ९ ॥**
> **तीरकमटा त्यांनीं दिधला हातांत ।**
> **ऐसीं मार्गाआंत चिन्हें जालीं ॥ १० ॥ [३९]**

समर्थांच्या उत्तर भारतांतील आणि विशेषतः नेपाळमधील यात्रेंतहि त्यांचा नाथयोग्यांशी आणि नाथपंथीय मठांशीं संबंध आला असणार. या काळांत त्यांनीं नाथपंथीय ग्रंथ आणि यौगिक प्रक्रिया यांचा निःसंशय अभ्यास केला असणार. या अभ्यासाचें कणखर पायाभरण गोरक्षानुयायांच्या सान्निध्यांत गोदावरीच्या तीरावरच झालें असलें, तरी या उत्तरयात्रेचाहि त्या दृष्टीनें उपयोग झाला असणार. समर्थांच्या सर्व सांप्रदायिक चरित्रांत त्यांच्या योग-सामर्थ्याच्या अनेक कथा असून, 'योगेश्वर' व 'योगिराज' अशी त्यांची ख्याति आहे.

---

३८. समर्थ-प्रताप, ३. ७७, पृ. २५.

३९. भीमस्वामीकृत समर्थचरित्र, पृ. ३.

समर्थांनीं दासबोधाच्या पहिल्या दशकांतील आठव्या समासांत 'सभा-स्तवन'-प्रसंगीं ' नाथपंथी मुद्राधारी 'चा उल्लेख केला आहे. 'नरदेह-स्तवना'च्या समासांत —

ऐसे हटनिग्रही कृतबुद्धी। जयास बोळल्या नाना सिद्धि।
ऐसे सिद्ध लक्षावधि। होऊन गेले ॥
येक मनोसिद्ध येक वाचासिद्ध। येक अल्पसिद्ध येक सर्वसिद्ध।
ऐसे नाना प्रकारींचे सिद्ध। विख्यात जाले ॥
येक योगी गुप्तपंथें। ब्रह्मभुवन पातले ॥ [४०]

'चारहि मुद्रां'चा उल्लेख दासबोध ५.४.२२ मध्यें आहे. दासबोध ५.४.२५ मध्यें 'अजपा'चा उल्लेख असून दशक १७ मधील संपूर्ण पांचवा समास 'अजपा-निरूपणा'चा आहे. समर्थांच्या 'सकल संतांच्या आरतीं'त नाथसिद्धांचा अंतर्भाव आहे. या संतांची नामावळी गिरिधरस्वामींच्या 'समर्थप्रतापां'त ' महापुरुष-भोजनें ' व ' दुसरी पंगति ' या विभागांतहि आली आहे —

मुकुंदराज विवेकसिंधुरस सेविती।
हरिनाथ मांडीवरी श्रीपद गुळोरी दाविती ॥
मछिंद्र मीन गोरक्षें ब्रह्मरस सेविले।
चौरंगी गैनि पंगतिकार दाटले।
निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाईसीं जेविले।
अपार ब्रह्मरस येक पांति ॥
जालंधर गोपीचंद मैनावती।
नाना योगमार्गें ब्रह्मरस सेविती।
तिये जणे बैसुनियां येक पांति।
कानिपासीं बोलाविती गोरक्षीकरवीं ॥ [४१]

समर्थांच्या 'करुणाष्टकां'त 'गुप्तपंथ' या शीर्षकाखालीं सहा श्लोक दिले आहेत, त्यांतील —

४०. दासबोध, १. १०. ११–१३.
४१. समर्थ-प्रताप, १६. २३–२५.

गुप्त संत गुप्त पंथ तो अनंत पाविजे ।
दृश्य मूळ सानकूळ भावनेसि भाविजे ।
देव दक्ष तो अलक्ष त्यास लक्ष लाविजे ।
तत्त्वसार वेदनें निवेदनेंचि पाविजे ॥
गुप्त होये त्या न होय जन्समृत्ययातना ।
ज्ञान गुप्त तो अलिप्त वेगळाचि या जना ।
अंतरेंचि वोसरे सरो न ही उपासना ।
भक्तराज मुक्त काज काये कर्म कामना ॥[४२]

हे दोन श्लोक लक्षणीय आहेत. यांतील 'अलक्ष' ( 'आलख' ) आणि 'गुप्त होये त्या न होय जन्ममृत्ययातना' यांमधील नाथपंथी खुणा चिकित्सकांना सहज जाणवतील. 'घालोनि आसन करी एकचित्त' हा समर्थांचा योगपर अभंग सारभूतपणें योगाभ्यासक्रम दाखविणारा आहे.[४३] श्रीकल्याणस्वामींनी 'दासबोधाचें सारसर्वस्व' म्हणून लिहिलेलें गुरुबोधाचें 'सोलींव सुख' हि या दृष्टीनें विचारणीय आहे.[४४] गोरक्षनाथ आणि त्यांचा योगमार्ग यांच्याशीं समर्थांचा सादर संबंध होता, हें वरील विवेचनावरून सहज स्पष्ट होईल. हा संबंध समर्थ-शिष्यांच्या कृतींतहि दिसून येतो. समर्थ स्वतः एक थोर योगी होते आणि त्यांनीं आपल्या कांहीं अधिकारी शिष्यांनाहि योगबोध दिला होता.

अशा शिष्यांत भिंगारचे दिनकरस्वामी हे प्रमुख होत. त्यांचा 'स्वानुभवदिनकर' हा ग्रंथ समर्थ संप्रदायांत अत्यंत आदरणीय मानला जातो. समर्थभक्त शंकराव देव त्याला 'प्रति दासबोध' म्हणतात. दिनकरस्वामींच्या संदर्भ-साहित्यामध्यें 'अवधूतगीता' व 'गोरक्षगीता' असल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. त्यांच्या मठांत मिळालेल्या ग्रंथांत ज्ञानेश्वर व मुकुंदराज यांचेहि ग्रंथ होते. दिनकरस्वामींवर समर्थांची विशेष प्रीति होती, याचेंहि प्रत्यंतर 'स्वानुभवदिनकरा'च्या शब्दाशब्दांत येतें. 'स्वानुभवदिनकर' हा ग्रंथ विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, दासबोध आणि कांहीं नाथ सांप्रदायिक यौगिक ग्रंथ यांच्या व्यासंगांतून उतरला आहे. या ग्रंथाच्या नवव्या व दहाव्या कलापांत

४२. करुणाष्टकें. १५१. ४–५.

४३. रामदासांची कविता, खंड १ ला.

४४. श्रीसमर्थशिष्य कल्याण : सं. ग. शं. देव, यांत समाविष्ट.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २८१५८६ वि: चारित्र

दिनकरस्वामींनीं हठयोगाचें विवरण विस्तारानें केलें आहे. हे दोन कलाप ( ओवीसंख्या ४१९ + ३७१ = ७९० ) म्हणजे जणुं नाथ संप्रदायाचा एक लघुयोगग्रंथच. या भागाविषयीं समर्थभक्त शंकरराव देव लिहितात –

" नववा आणि दहावा हे दोन कलाप हठयोगाचे आहेत. श्रीसमर्थ स्वतः महान् योगी असून, त्यांनीं आपल्या दासबोधांत किंवा दुसऱ्या कोणत्याहि लहान-मोठ्या ग्रंथांत हठयोगाची शिकवण दिली नाहीं. देशकालवर्तमान हठयोगाला अनुकूल नव्हे, असें त्यांचें मत होतें. ते सरसकट सर्व शिष्यांना हठयोग शिकवीत नसत. दिनकरांनीं विचारलें असतां 'हठयोगाचा हट्ट धरूं नकोस' असेंच त्यांना प्रथम सांगितलें; पण अखेरीस दिनकरांची फारच आतुरता पाहून त्यांस श्रीसमर्थांनीं श्रीज्ञानेश्वरींतील सहाव्या अध्यायाला अनुसरून जो हठयोग सांगितला, तो या दोन कलापांत दिनकरांनीं दिला आहे."[४५]

यावरून कोणी अशी शंका उपस्थित करतील कीं, योगमार्ग हा अति-प्राचीन असून औपनिषदिक कालापासून चालत आला आहे – तो केवळ नाथ संप्रदायाचा मक्ता नव्हे. अर्थात् समर्थ-सांप्रदायिकांनीं वर्णिलेल्या केवळ योग-प्रक्रियेवरून त्यांचा नाथ संप्रदायाशीं संबंध जोडणें मूर्खपणाचें ठरेल. परंतु या बाबतींत दिनकरस्वामीनींच शंकेला जागा उरूं दिली नाहीं. आपल्या ग्रंथ-रचनेला आधारभूत असलेल्या ग्रंथांत जसा त्यांनीं 'अवधूतगीता' व 'गोरक्ष-गीता' यांचा समावेश केला आहे, त्याचप्रमाणें या दोन कलापांच्या विषयाचा आधार म्हणून 'हठयोगप्रदीपिके'चें नांव नोंदविलें आहे. 'हठयोगप्रदीपिका' हा नाथ संप्रदायाचा प्रातिनिधिक यौगिक ग्रंथ असल्याचें सर्वश्रुतच आहे.

मग हटप्रदीपिका शास्त्रसंमतीं ।
करूनि देहशुद्धीची अभिव्यक्ति ।
धौतीकर्मयोगें मळमूत्राची उपहति ।
करूनि उदककोशशुद्धि ॥[४६]

या 'हठयोगप्रदीपिके'च्या उल्लेखाशिवाय या मार्गाच्या प्रवर्तकांचाहि सादर उच्चार लेखकानें केला आहे –

४५. स्वानुभवदिनकर, प्रस्तावना, व समर्थ-हृदय.
४६. स्वानुभवदिनकर, ९. ३. १२.

नवही नाथ सोळा सिद्ध । तैसेचि चौऱ्यासी उपसिद्ध ।
हटयोगबळें जाले प्रसिद्ध । महासामर्थ्यवंत ॥[४७]

* * *

दत्त दुर्वासादि वशिष्ट हनुमंत । कपिल मत्स्येंद्रादि गोरक्ष अवधूत ।
नवनाथ चौऱ्यासी सिद्ध युक्त । योगसिद्धि थोरावले ॥[४७]

हा संबंध दृढ करावयास एवढे उल्लेख पुरेसे होतील असें वाटतें. परंतु हें केवळ त्या योग-विषयाच्या विवेचनान्तर्गत आहेत. म्हणून दिनकरस्वामींनीं आपल्या या ग्रंथांत अन्यत्रहि गोरक्षादि नाथसिद्धांचा वाक्सत्कार केला आहे, त्याची दखल घेणें आवश्यक आहे –

दत्त गोरक्ष हनुमंत । आदिनाथ मीन गैनि अवधूत ।
चौऱ्यासी सिद्ध आणि योगी समस्त । नवही नाथ ॥[४८]
संत महंत मुनेश्वर । सिद्ध साधु योगेश्वर ।
दत्त गोरक्ष दिगंबर । जये स्वरूपीं निमग्न ॥[४८]

ज्या अर्थी दिनकरस्वामींना समर्थांनीं बोधिलेल्या योगरहस्याचा संबंध दिनकरस्वामी 'अवधूतगीता', गोरक्षगीता', 'हठयोगप्रदीपिका' या नाथसांप्रदायिक ग्रंथांशीं आणि गोरक्षनाथादि नाथयोग्यांशीं जोडतात, त्या अर्थी समर्थांचा नाथ संप्रदायाशीं आणि त्यांतील योगग्रंथांशीं असलेला प्रगाढ संबंध आपोआपच सिद्ध होतो. 'स्वानुभवदिनकरा'शिवाय समर्थशिष्य अनंतमौनींचे शिष्य मेरुस्वामी यांच्या 'श्रीभीमोपदेश' या महत्त्वाच्या ग्रंथाच्या बाराव्या सूर्यांत ( अध्यायांत ) 'अजपाजप', 'ध्यान', 'योग' इत्यादींचें विस्तृत विवरण आहे. मेरुस्वामींचा 'श्रीरामसोहळा' हा ग्रंथ या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा आहे. समर्थांच्या व त्यांच्या शिष्यांच्या स्फुट रचनेंत तर या अनुबंधाच्या विस्रस्त खुणा अनेक आहेत. गिरिधरस्वामींचें वेणाबाईवरचें एक पद या दृष्टीनें समग्र पाहण्यासारखें आहे –

देह माझें मन माझें । सर्व नेलें गुरुराजें ॥ १ ॥
आम्ही गुरुनाथपंथी । ज्ञानमुद्रा दिधली हातीं ॥ ध्रु० ॥
कर्णीं चढली नाममुद्रा । मुखीं अगोचरी मुद्रा ॥ २ ॥

---

४७. स्वानुभवदिनकर, ९. १. ४१; ९. ९. ३२.
४८. स्वानुभवदिनकर, १. १. ७५; १२. ५. ६.

**कान फाडुनि जोगी जालों । संतदर्शनासी आलों ॥ ३ ॥**
**वेणीस्वामींचें दर्शन । मायासंकेतानिर्शन ॥ ४ ॥**[४९]

**समर्थ आणि मुकुंदराज :** ज्ञानेश्वरीप्रमाणेंच मुकुंदराजांचा 'विवेकसिंधु' महाराष्ट्रांतील पारमार्थिकांचा पथप्रदर्शक बनला होता. प्राचीन मराठींतील अनेक ग्रंथकार 'विवेकसिंधु' आणि त्याचा कर्ता मुकुंदराज यांचा गौरव करतात. 'विवेकसिंधू'चा आपल्या अभ्यासिकेंत समावेश करून त्याचें नित्य मनन करणें हें अनेक पारमार्थिकांना आवश्यक वाटत असे. समर्थसांप्रदायिक महंतांताहि 'विवेकसिंधू'चें अध्ययन सर्रास चालू असे. दिनकरस्वामींच्या मठांत मुकुंदराजांचे ग्रंथ होते आणि गिरिधरस्वामींनीं 'समर्थप्रतापां'त हरिनाथ, मुकुंदराज व त्यांचा 'विवेकसिंधु' यांचा उल्लेख केल्याचें पृष्ठ २०८ वर उल्लेखिलेल्या ओव्यांत आलेंच आहे. प्रत्यक्ष समर्थांनीं मात्र कुठेंहि मुकुंदराजांचा उल्लेख केलेला नाहीं. अर्थात् समर्थ-साहित्यांत तसा प्रत्यक्ष उल्लेख नसला, तरी समर्थवाणीच्या अंतरंगांत 'विवेकसिंधू'तील ज्ञानामृत प्रकर्षानें मिसळलें आहे, हें जाणत्यांना सहज कळून येईल. हा अनुबंध पाहण्यापूर्वीं त्याची पार्श्वभूमि पाहणें उद्बोधक ठरेल.

गोदातीरावरील तपश्चर्या संपवून समर्थांनीं जो भारतसंचार केला, त्यांत विदर्भांतील – सातपुड्याच्या परिसरांतील – अनेक महत्त्वाच्या स्थळांच्या यात्रा त्यांनीं केल्या. माहूरहून निघाल्यावर भ्रमण करतां करतां ते बैतूल येथें आले आणि तेथेंच त्यांनीं कांहीं काळ एकांतांत घालविला. त्यांचें तेथील 'तपोवन' आजहि लोक दाखवितात. आणि प्रतिवर्षी वसंत पंचमीस भाविक लोक तेथें यात्रेसाठींहि येतात. बैतुल स्टेशनाच्या दक्षिणेस मैल-दीड मैल अंतरावर हें ठिकाण आहे. येथें जातांना रस्त्यांत माचना नदी लागते. नदीपलीकडे शिंगणवाडी हें गांव आहे. या गांवाचा नाला उतरून पलीकडे गेलें असतां नाल्याच्या कांठींच एका उंचवट्याच्या जागी बटामा गांवाच्या हद्दींत हें स्थान आहे. आठ-दहा माणसें बसूं शकतील एवढी एक चुनेगच्ची घुमटी येथें आहे. आंत अंधार असून भुयार असल्याचें स्थानिक लोक सांगतात. या स्थानापासून जवळच बैतूल ते खेडला या पांच मैलांच्या अंतरांत सोमवार पेठ या खेड्यांत

४९. समर्थ-प्रताप, प्रस्तावना, पृ. ३.

डोंगरावर समर्थांनीं स्थापिलेली महावीरजीची ( मारुतीची ) मूर्ति आहे. अर्थात् या निवासांत बैतुलजवळील खेडला येथील मुकुंदराजांच्या समाधीचें दर्शन समर्थांनीं निश्चित घेतलें असणार. याच एकान्त-चिंतनाच्या काळांत त्यांनीं मुकुंद-परंपरेंतील मठ आणि ग्रंथहि धांडोळले असणें शक्य आहे. बैतुलहून ते छिंदवाड्यास ( मुकुंदगुरु रघुनाथ यांची समाधि ) आणि तेथून अंभोऱ्यास ( रघुनाथगुरु हरिनाथ यांची समाधि ) गेले. या कालावधींत या परंपरेचें ज्ञान त्यांना जवळून घेतां आलें असणार. समर्थांचा अंबेजोगाईशीं व त्या निमित्तानें 'विवेकसिंधू'शीं जो संबंध आला, त्याची चर्चाहि समर्थांच्या सांप्रदायिक चरित्रांत आढळते.[५०]

म. म. पोतदारांनीं आपल्या एका लेखांत 'दासबोध' आणि 'विवेकसिंधु' यांमधील विलक्षण साम्य दाखविलें आहे.[५१] हे दोन्ही ग्रंथ गुरुशिष्यसंवात्मक असे आहेत. या पद्धतीनें अनेक ग्रंथ लिहिलेले असले तरी 'विवेकसिंधू'नंतर 'दासबोधां'त या संवादाचा रसरशीत जिवंतपणा आढळतो. दासबोधाच्या प्रत्येक समासाची समाप्तिमुद्रा ' इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ... ' अशी आहे, हें सर्वांस माहीत आहे. मुकुंदराजांनींहि —

**गुरुशिष्याचेनि संवादे । जै बोलिजेल विनोदें ।**
**तै आईक आनंदे । महानुभाव ॥** ( वि. १.२३ )

असा या पद्धतीचा गौरव केला आहे. कारण या पद्धतीचें म्हणून एक वैशिष्ट्य आहे, तें असें :

**आइते शिष्याचे आक्षेप । सिद्धचि गुरुवाक्यप्रदीप ।**

या गुरुशिष्यसंवादपद्धतीनें लिहिलेल्या दोन्ही ग्रंथांत भाषासाम्यहि अनेक ठिकाणीं आढळतें.

**याचि देहीं याचि वेळे । होईजे संसारीं निराळे ।**

हें समर्थांचें प्रसिद्ध वचन आहे. मुकुंदराजांचेंहि अगदीं असेंच वचन आहे —

**याचि देहीं आपले डोळा । जंव न भोगिजे मुक्तीचा सोहळा ।**
**तरी वैराग्याचा तातवेळा । कां शिणावे ? ॥** ( वि. २.८१ )

---

५०. दासविश्रामधाम व उद्धवसुत-कृत समर्थ-चरित्र.

५१. समर्थ वाग्देवतेच्या चरणीं वाहिलेला पहिला सुमनहार. पृ. १८४–१८८.

दासबोधांत प्रारंभींच्या विवेचनांत जशीं गुरुशिष्यलक्षणें सांगितलीं आहेत, तशींच 'विवेकसिंधू'च्याहि प्रारंभीं थोडक्यांत सांगितलीं आहेत. 'महंती-महंत' हे रामदासी वाङ्मयांतील 'परवलीचे शब्द' हि 'विवेकसिंधू'त वापरले गेले आहेत.

**प्रकटावया आपुली महंती । सभेमाजीं गुरुतें आक्षेपिती ।**
**युक्ती खुंटलिया बळासि येती । तेही शिष्य त्यजावे ॥** ( वि. १.५६ )

* * *

**इहीं लक्षणीं अलंकृत । जे देखिजेती महंत ।**
**तेचि सद्गुरु जाणावे निश्चित । ईश्वरी अवतार ॥** ( वि. १.५० )

'दासबोधां'त विवेचनांतिल संगतिसातत्य राखण्यासाठीं जसे 'कथा' व 'कथानुसंधान' हे शब्द वापरले आहेत, तसेच 'विवेकसिंधू'ताहि आहेत. त्याच-प्रमाणें विधानाचा ठाशीवपणा समर्थ प्रत्ययावर भर देऊन व्यक्त करतात, तसेच मुकुंदराजहि प्रत्ययावर भर देतात.

**दृष्टान्त तितुका एकदेशी ।**

या समर्थ-वचनाप्रमाणेंच –

**तेथें कायसे पा दृष्टान्त । परी एकदेशी होय उचित ॥**

हें मुकुंदवचन आहे. समर्थांच्या 'धादान्त-वेदान्त-सिद्धान्त' या शब्दत्रयीपैकीं 'वेदान्त-सिद्धान्त' हे विवेकसिंधूंत एकत्र आले आहेत. त्याचप्रमाणें –

**अगा सर्वही आपण व्हावें । अथवा कांहींच न व्हावें ।**
**कांहींच न होऊनि असावें । नेणूं काईजे ॥**

ही मुकुंदराजांची ओवी आणि –

**आहे तितुकें नाहीं जालें । नाहीं नाहींपणें निमालें ।**
**आहे नाहीं जाऊनि उरलें । नसोन कांहीं ॥** ( दा. ६.१०.३८ )

ही समर्थांची ओवी यांतील साम्य चिंतनीय आहे. त्याचप्रमाणें ग्रंथलेखनांत 'रसिकमुद्रा' ( कवित्वाचा पाल्हाळ ) टाळून 'तर्कमुद्रे'वर ( तर्कशुद्ध विवेचना-वर ) भर देण्याची दोघांचीहि पद्धति आहे.

**समर्थ आणि ज्ञानेश्वर :** समर्थांनीं ज्ञानेश्वरांचा दासबोधांत प्रत्यक्ष उल्लेख केला नसला तरी त्यांना ज्ञानेश्वरांविषयीं अत्यंत आदरभाव वाटत असे. दासबोधांत ज्ञानेश्वरांचा अप्रत्यक्ष उल्लेख दोनदां आला आहे –

येक भयानकावरी बैसती। येक अचेतनें चालविती।
येक प्रेतें उठविती। तपोबळें करुनी॥ ( दा. ११०.९ )

*   *   *

प्रवृत्तीचा केला त्याग। सुहृदांचा सोडिला संग।
निवृत्तिपथें ज्ञानयोग। साधिता जाला॥ ( दा. ५.९.५१ )

समर्थ आणि त्यांचे प्रधानशिष्य यांच्या स्वाध्यायांत ज्ञानेश्वरीचा अंतर्भाव अवश्यमेव होत असे. दिनकरस्वामींना स्वतः समर्थांनींच ज्ञानेश्वरींतील सहाव्या अध्यायाच्या आधारें योग्यरहस्य सांगितल्याचें आपण मागें पाहिलें आहेच. ज्ञानेश्वरांनी ज्या ठिकाणीं ‘मरणाचेंहि मरण पाहणारी’ अलौकिक योगसाधना आदिनाथाच्या चरणांशीं बसून आचरलेली, तेथेंच ( वृद्धेश्वराचा डोंगर, नगर जिल्हा ) दिनकरस्वामींनींहि आपल्या साधनेची अथश्री केली होती. या स्थळाचें दिनकरस्वामींनीं अत्यंत रम्य चित्र चितारलें आहे :

गिरि खळि दरकूस्या कूहरें शीखरें हीं।
गवि गडि दरि गूहा गव्हरें भूयरें हीं।
जळमळित तडागें साजिरें कूप वावी।
सरोवर विहिरे ही रम्य टांकीं असावीं॥ ३॥

अमळ जळ तुटेना खंड वोघीं पडेना।
परम सुरस ऐसें स्थान कोठें दिसेना।
खळ खळ जळ वाहे दाटलें वृक्ष जेथें।
जनपदहि न पावे राहवें स्वस्थ तेथें॥ ४॥

क्रिडति मयुर भारी फोडिती शब्द टाहो।
पसरुनि वरि पुच्छें नाचती ते पहा हो।
बहुविध खग येती बोलती रम्य वाणी।
तनु मन जिव नीवे ऐकतां शब्द कानीं॥ ५॥

सुचिर सितळ छाया डोलती वृक्ष वातें।
मघमघ कुसुमाचा गंध रंजी मनातें।
सफळित तरु सैरा उंच आकाशमार्गें।
सुरस महि सुजाणा भाग्यवंतांसि भोगे॥ ६॥

जरि घडे मठ तेथें मांडणी मंडपाची ।
तरि मग मन आस्था काय वाहेल कैंची ।
नुतन हरिहरांचीं देउळें मारुतीचीं ।
रघुविरवरदाची प्राप्ति तैं जाण तेंचि ॥ ७ ॥
रघुपति मग तेथें आठवे नाठवीतां ।
रघुपति मग तेथें धांवतो दूरि जातां ।
रघुपति मग तेथें सोडितां ही न सोडी ।
दिनकरवरदें हे लाविली नित्य गोडी ॥ ८ ॥[५२]

हें वर्णन आणि ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यांतील ‘शुचौ देशे ...’ या श्लोकावर व्याख्यान करतांना ज्ञानेश्वरांनी रेखाटलेलें समाधिस्थळाचें चित्र (ज्ञा. ६.१६५–१८५) एकत्र पाहण्यासारखें आहे. तसंच ‘स्वानुभवदिनकरा’च्या नवव्या कलापांत दिनकरस्वामींनीं केलेलें समाधिस्थळाचें वर्णन पाहणेंहि मनोरंजक ठरेल –

मुख्य योग साधायाचें स्थळ । पाहिजे पुण्यभाजनशीळ ।
गिरि गुहा का परमनिर्मळ । गंगातटाक ॥
तेथ मठ अथवा देवालय । असावें परमरमणीय ।
सीतळ निर्मळ रुचिर सुखमय । उदकही पाहिजे ॥
वन उपवनेंसीं पुष्पलतायुक्त । जेथें हंससारस नित्य क्रीडत ।
मयूर कोकिळ कळिरवें कुंजत । नाना पक्षीसमूह ॥
संभोंवतीं दाटलीं निर्मळ जळें । माजीं विकासलीं कुमुदें कमळें ।
जेथ जनपदमेळ कदा काळें । न पावे किमपि ॥[५३]

या ओव्यांवर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाहीं. कलाप ९–१० यांत ज्ञानेश्वरींतील ६ व्या अध्यायाचें साम्य असणें अपरिहार्यच ठरेल. पण या दोन कलापांपुरताच नाहीं, तर ‘स्वानुभवदिनकरा’च्या पानोपानीं आपणांस हा ज्ञानेश्वरप्रभाव आढळून येईल. सातव्या कलापांतील तिसऱ्या किरणांत ओव्या ७६–८५ येथें दिनकरांनीं निर्माण केलेला ‘वाङ्मयमहेश’ ज्ञानेश्वरीच्या प्रथम

५२. स्वानुभवदिनकर, प्रस्तावना. पृ. ७.
५३ स्वानुभवदिनकर, ९. ३. ६–९.

अध्यायांतील 'वाङ्मय-गणेशा'शीं एकरूप आहे. तसेंच पृ. १७० वरील दिनकर-कृत 'महेशाचें विश्वरूपदर्शन'हि ज्ञानेश्वरींतील (अ. ११) विश्वरूपदर्शन-सदृशच आहे.

ज्ञानेश्वरांच्या तपोभूमींत दिनकरांनीं तप केलें आणि आश्चर्य असें कीं, सद्भाग्यानें समर्थांची परमकृपाहि दिनकरांना त्याच स्थळी लाभली. समर्थ आपण होऊन वृद्धेश्वरीं आले, यावरून त्यांच्या संचारकक्षेत नाथसांप्रदायिक पवित्र स्थानेंहि येत होतीं आणि अशा स्थळीं ते विसांवत होते, हें स्पष्ट होईल. वृद्धेश्वरी ज्ञानेश्वरांच्या तपस्तेजानें भारावलेल्या त्या औदुंबराखालीं समर्थ विसांवले असतील, तेव्हां त्यांच्या हृदयस्थ चित्कळांना ज्ञानेशांच्या परमपवित्र स्मृतीनी निश्चित उद्दीप्त केलें असेल. समर्थांनीं येथें त्या महामानवाच्या जीवन-गाथेंत आणि अमृतवाणींत निश्चित निमज्जन केलें असेल.

वर वर पाहतां समर्थ आणि ज्ञानेश्वर यांच्यांत आपणांस खूपच अंतर जाणवतें. परंतु दोघांच्या 'वाङ्मयी श्रीमूर्ती'चें एकत्र परिशीलन केलें, तर त्या दोघांत एकच प्रवाह वाहत आहे – दोघांच्याहि विचारप्रणालींत भक्ति-ज्ञान-कर्माचें प्रयागतीर्थ बनलें आहे, असें आढळून येईल. फरक इतकाच कीं, ज्ञानेश्वरीचा आविष्कार रसिकमुद्रेनें झाला आहे, तर दासबोधाचा आविष्कार तर्क-मुद्रेनें झाला आहे.

ज्ञानेश्वरी ही गीता-टीका आहे; तर समर्थांनी आधारास घेतलेल्या १२ गीतांत भगवद्गीतेचा समावेश असून दासबोधांत विवरिलेल्या वचनांत निम्मीं वचनें (१९) भगवद्गीतेंतील आहेत. अर्चनभक्तीच्या व्याख्यानांत समर्थांनीं विठ्ठलाचा भक्तिपूर्वक उल्लेख केला आहे. दासबोध हें परमार्थाधिष्ठित प्रपंच-विज्ञान आहे, असें म्हणतात; परंतु नवल असें कीं, दासबोधांत आलेल्या सर्व व्यवहार-विवरणाचा झाडा ज्ञानेश्वरांच्या शब्दांत देतां येणें सहज शक्य आहे. दोघांचाहि 'विवेका'वर अत्यंत भर.

ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांतील अज्ञानवर्णन (ओव्या ६५७–८८०) आणि दासबोधांतील मूर्खलक्षण (२·१), कुविद्यालक्षण (२·३) आणि पढत-मूर्खलक्षण (२·१०) यांतील विवरण एकाच जातीच्या प्रखर निरीक्षण-शक्तीतून झालेलें आहे, हें स्पष्ट होईल. 'जगीं कीर्ति रुढवी। स्वधर्माचा

मानु वाढवी । इया भारापासोंनि सोडवी । मेदिनी हे ॥ ' ( ज्ञा. ३·१९१ ) हा ज्ञानेश्वरांचा क्षात्रसंदेश आणि ' मारितां मारितां मरावें ' हा समर्थांचा संदेश एकरूपच आहे. समर्थांच्या संदेशांत कालसापेक्ष प्रखरता आली आहे इतकेंच.

**नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।**
**याकारणें तोषवावी । कोणी तरी काया ॥** (दा. १५.९.२५)

किंवा —

**भेटो कोणी येक नर । धेड महार चांभार ।**
**त्याचें राखावें अंतर । याचें नांव भजन ॥**

हीं समर्थीय वचनें, आणि —

**वस्तु भूतमात्रीं नमिजे । परोपकारी भाजिजे ।**

* * *

**जें जें देखें भूत । तें तें मानिजे भगवंत ।**
**हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥**

हीं ज्ञानेश्वरांचीं वचनें यांतील वैचारिक एकात्मता स्पष्ट आहे. जाणत्यांस या एकात्मतेचा प्रत्यय दोन्ही ग्रंथांच्या पानोपानीं येऊं शकेल. म्हणून त्यासंबंधीं अधिक उदाहरणें देऊन विस्तार करीत नाहीं.

**आणखी दोन दुवे :** समर्थ संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांच्या अनुबंधासंबंधीं समर्थसांप्रदायिक साहित्यांतून पुष्कळच उद्बोधक सामग्री पुरवितां येईल. येथें जातां जातां आणखी एक-दोन दुव्यांचा उल्लेख करतों.

राजाराम प्रसादींच्या 'भक्तमंजरीमाले'च्या द्वितीय खंडांत अध्याय ३१ ते ३४ या पांच अध्यायांत सत्यामलादि उत्तरकालीन नऊ नाथांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. तसेंच याच खंडांत आणखीहि कांहीं अप्रसिद्ध नाथांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. या खंडाचा जवळ जवळ तीन-चतुर्थांश भाग नाथांच्या इतिहासानें व्यापला आहे. राजाराम प्रसादींच्या मनावर नाथसांप्रदायिक महासिद्धांचा खूपच प्रभाव असावा. कारण अन्यत्राहि दृष्टान्तस्वरूप म्हणून त्यांना मत्स्येंद्र-गोरक्षांची आठवण येते —

**जयत्पाळ राजानें मुकुंद मुनी । आराधिला एकाग्र मनीं ।**
**नातरि शिव-भवानी । मछिंद्रचरणीं गोरक्ष ॥** ( भ. मं. २९.११ )

जनार्दनाचा श्रीयेका । कीं रामदासाचा कल्याण देखा ।
नातरि मछिंद्र सखा । गोरक्ष निका गुरुभक्त ॥ ( भ. मं. ४४.४८ )

* * *

ज्ञानेश्वरी नोहे सामान्य ग्रंथ । ब्रह्मा स्थिति आदि अंत ।
अनुभव घेतां येके वोवींत । जीवाचि होती शिवरूप ॥ ( भ.मं. ३२.३९ )

दुसरा दुवा अत्यंत आश्चर्यकारक आहे. जयराम नांवाच्या एका नाथ-सांप्रदायिक ग्रंथकारानें दासबोधावर 'जयबोध' नांवाचा १९,००० ओव्यांचा एक बृहद्‌ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथकार पुण्याचा असून त्यानें शके १७०१ (आश्विन वद्य ४) मध्यें आळंदीस मयोरेश्वर या आपल्या गुरूच्या चरणांशीं या ग्रंथाची परिसमाप्ति केली. या ग्रंथांत दासबोधांतील सुमारें ३००० ओव्या जशाच्या तशा घेतल्या आहेत. हा ग्रंथ धुळें येथें समर्थ वाग्देवता मंदिराच्या हस्तलिखित संग्रहांत असून त्याचा विस्तृत परिचय श्री. देवांनी पांचव्या सुमनहारांत ( पृ. ४९ ) विस्तारानें करून दिला आहे.

याच्या गुरुपरंपरेचा उल्लेख 'महाराष्ट्रांतील नाथ संप्रदाय' या प्रकरणांत येऊन गेलाच आहे. या ग्रंथकारानें मुकुंदराज, ज्ञानेश्वर व रामदास या तिघांचें एकत्र रसायन बनवून आपली ग्रंथसिद्धि केली आहे –

श्रीज्ञानेश्वरी भागवत । ग्रंथ सिंधु हा प्रख्यात ।
दासबोध ज्ञान संत । श्रवणयुक्त हे ग्रंथ ॥ ( ज. ४.९४ )

* * *

अमृतानुभव सिद्धांतीचा । स्वात्मानुभव श्रीस्वामीचा ।
स्वात्मसुखी स्वात्मसुखाचा । निजज्ञानाचा निजलाभ ॥
( ज. ४.९६ )

* * *

श्रीविवेकसिंधु ज्ञानेश्वरी । भागवताचें मनन करी ।
अर्थ पाहे बहु कुसरी । श्रीसद्गुरु घरीं जाऊनी ॥ (ज.४.१०६)

## कबीर आणि निर्गुण संत-परंपरा :

गोरक्षनाथाचा वारसा घेऊन साऱ्या उत्तर भारतांत निर्गुणसाधनेची श्रेष्ठ परंपरा निर्माण करणारा कबीर हा एक फार मोठा सत्पुरुष होऊन गेला. कबीराचें

जीवनकार्य पंधराव्या शतकांत घडलें. कबीराच्या विचारावर नाथ संप्रदायाचा असणारा प्रचंड प्रभाव अनेक अभ्यासकांच्या जिज्ञासेचा विषय झालेला आहे. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदींनीं आपल्या 'कबीरा'वरील विवेचक प्रबंधांत या प्रभावाच्या उगमाविषयीं एक महत्त्वपूर्ण सिद्धान्त प्रस्थापित केला आहे.तो सिद्धान्त विशेष चिंतनीय असल्यामुळें त्याची रूपरेखा येथें उद्धृत करीत आहें[५४] –

( १ ) आजच्या वयनजीवी ( वस्त्रव्यावसायिक ) जातींतील अधिकांश जाती एके काळीं ब्राह्मण-श्रेष्ठतेला मानीत नव्हत्या.

( २ ) जोगी नामक आश्रमभ्रष्ट गृहस्थांची एक जात साऱ्या उत्तर आणि पूर्व भारतांत पसरली होती. हे नाथपंथी होते; कापड विणून व सूत कांतून वा गोरक्षनाथ व भरथरी यांचीं गीतें गावून भिक्षा मागत ते निर्वाह करीत.

( ३ ) यांत निराकार-भावाची उपासना प्रचलित होती; जातिभेद व ब्राह्मणश्रेष्ठत्वाविषयीं त्यांच्या मनांत लेशमात्रहि सहानुभूति नव्हती आणि अवतारवादावरहि त्यांची श्रद्धा नव्हती.

( ४ ) आसपासच्या बृहत्तर हिंदु समाजाच्या दृष्टीनें हे नीच आणि अस्पृश्य होते.

( ५ ) मुसलमानांच्या आगमनानंतर हे हळूहळू मुसलमान होत गेले.

( ६ ) पंजाब, युक्त प्रदेश, बिहार आणि बंगालमध्यें यांच्या अनेक वसत्यांनीं सामूहिक रूपानें मुसलमान धर्म स्वीकारला.

( ७ ) कबीरदास याच नवधर्मांतरित समाजांत वाढले होते.

कबीर या योगी-जातींत वाढल्यामुळें नाथमत व आचार यांचा त्याच्या तल्लख मनावर परिणाम होणें स्वाभाविक आहे. कबीर हा एक स्वयंप्रज्ञ चिंतक असल्यामुळें त्याची सारासारविवेकबुद्धि अत्यंत तल्लख होती. त्याच्या विद्रोही मनःपिंडाला नाथमत जवळचें वाटलें, त्यानें नाथमतांतील व आचारांतील सत्त्वग्रहण केलें आणि कालसाक्षेप विवेकानें अग्राह्य व विकृत गोष्टींचा त्याग केला. कबीरावरील नाथपंथाचा प्रभाव कबीराच्या ग्रंथांत जो लक्षित होतो, तो प्राधान्यानें चतुर्विध आहे : नाथपंथी योग्याचें स्वरूप, नाथ पंथाचे दार्शनिक सिद्धान्त, नाथ पंथाची साधनापद्धति आणि नाथपंथीय भाषा व आविष्कारपद्धति.

---

५४. 'कबीर', पृ. १४.

(१) **नाथपंथी योग्याचें स्वरूप :** कबीरानें आपल्या रचनेंत जागोजागीं योग्यांच्या वा अवधूतांच्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे. हें स्वरूपवर्णन नाथपंथी योग्यांच्या स्वरूपाशीं बहुशः मिळतें-जुळतें आहे. 'सांप्रदायिक वेष' या विषयावर लिहितांना आपण योग्याच्या ज्या वेषभूषणांचा विचार केला आहे, त्या सर्व चिन्हांचा निर्देश कबीराच्या रचनेंत आढळतो. अर्थात् हा निर्देश करतांना कबीराचें बाह्य अवडंबराविरुद्ध विद्रोह दाखविणारे विचार व्यक्त झाले आहेत. नाथ-योग्यांप्रमाणें या सर्व चिन्हांना धारण करणें हें कांहीं खऱ्या योग्याचें लक्षण नव्हें, असें कबीराचें मत आहे. कबीरानें आपल्या एका पदांत हे बाह्यवेशाविषयक विचार स्पष्टपणें मांडले आहेत –

**सो जोगी जाके मनमें मुद्रा ।**
**रात दिवस ना करई निद्रा ॥**
**मनमें आसण, मनमें रहणा । मनका जप तप मनसूं कहँणा ।**
**मनमैं खपरा मनमैं सींगी । अनहनाद बजावै रंगी ।**
**पंच प्रजारि भसम करि भूका । कहै कबीर सो लहसै लंका ॥**[५५]

वास्तविक हीं बाह्य चिन्हें योग्याला आवश्यक ठरण्याचें कारण नाहीं. आणि त्याचमुळें कबीरानें वरील पदांत त्या चिन्हांचें मानसिक उपयोजन सांगितलें आहे. पण या मानसिक उपयोजनाचा अर्थ काय? कबीराच्या मनावर नाथ परंपरेचा एवढा सखोल परिणाम आहे कीं, तो अनेकदां या चिन्हां-च्याच प्रतिमा वापरून रहस्योद्ग्राही पद्धतीनें उच्च आध्यात्मिक विचार व्यक्त करतो –

**जोगिया तन कौ जंत्र बजाइ । ज्यूं तेरा आवागमन मिटाई ॥**
**तत करि ताँति धर्म करि डाँडी सतकी सारि लगाई ॥**
**मन करि निहिचल आसण निहिचल, रसना रस उपजाइ ॥**
**चित करि बटुआ तुचा मेखली भसमै भसम चढाइ ॥**
**तजि पाखण्ड पाँच करि निग्रह खोजि परम पद राइ ॥**
**हिरदै सींगी ग्यान गुणि बाँधौ खोज निरञ्जन साचा ॥**
**कहै कबीर निरञ्जन की गति जुगति बिनां पिण्ड काचा ॥**[५६]

---

५५. कबीर ग्रंथावली, पद २०६, पृ. १५८.
५६. कबीर ग्रंथावली, पृ. १५९.

या पदांत कबीरानें चिन्ह-कल्पनांच्या आधारेंच साधनेचा केवढा उदात्त आदर्श निर्माण केला आहे ! जन्म-मरणाचा फेरा चुकविण्यासाठीं समग्र तनूचेंच सारंगी-यंत्र वाजविण्याची कबीराची कल्पना विचार आणि अभिव्यक्ति या दोन्ही दृष्टींनीं भव्य आहे. एवढा श्रेष्ठ दर्जाचा विचार कबीर नाथ-संकेतांतून व्यक्त करतो, हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे.

(२) **नाथपंथाचे दार्शनिक सिद्धान्त :** नाथपंथ दार्शनिकदृष्ट्या स्वतःला वेदान्त, सांख्य, मीमांसक, बौद्ध आणि जैन यांहून भिन्न मानतो. नाथपंथीयांची वेदांवर विशेष श्रद्धा नाहीं. यज्ञ-विधानाचें विवरण करणारें स्थूल वेदशास्त्र त्यांना मान्य नाहीं. ॐकारावर मात्र त्यांचा विश्वास आहे. ॐकाराला ते सूक्ष्म वेद म्हणतात. पुस्तकी विद्येचा त्यांनीं तुच्छतेनें तिरस्कार केला आहे. नाथपंथी परमतत्त्वाला द्वैताद्वैतविलक्षण मानतात. गोरक्षनाथानें परमतत्त्वाचें वर्णन असें केलें आहे –

**वसाति न सून्यं सुन्यं न वसाति अगम अगोचर ऐसा ।**
**गगन सिखर में बालक बोले, ताका नाव धरडगे कैसा ॥**[५७]

अवधूतगीतेंत म्हटलें आहे : “ कांहीं लोक द्वैताची इच्छा करतात, तर कांहीं अद्वैताची; परंतु द्वैताद्वैतविलक्षण तत्त्व कोणी जाणत नाहीं. ” नाथपंथी शब्दा’वर विशेष श्रद्धा ठेवतात. ते ‘शब्दा’ला सर्वस्व मानतात –

**सब्दहिं ताला सब्दहि कूंजी, सब्दहिं सब्द समाया ।**
**सब्दहिं सब्दसे परचा भयो सब्दहिं सब्द समाया ॥**

याच शब्दाचें आकाश-शिखरांत गुंजन होत असतें. हा ‘शब्दवाद’च नाथ-साधनेंत प्रणवोपासनेच्या रूपांत अवतरला आहे. त्यांत ‘नाद’ व ‘बिंदु’ यांची पुष्कळ चर्चा असते. ‘नादाला’ ते नाथांश ( ईश्वरांश ) आणि ‘बिंदू’ला शरीरांश मानतात. नाद-बिंदूंच्या संयोगानें ही सर्व चराचर-निर्मिति झाल्याचें मानण्यांत येतें.

मुक्तीसंबंधींची नाथपंथीयांची कल्पना वैशिष्ट्यपूर्ण आहे. नाथस्वरूपांत लय होण्यालाच ते मुक्ति मानतात. ते अद्वैतावस्थेहूनहि श्रेष्ठ अशी एक सदानंदाची अवस्था मानतात. ही अवस्था अर्थातच बाह्याचाराच्या पालनानें प्राप्त

---

५७. गोरखबानी, पृ. १.

होत नाहीं. नाथपंथीयांची अशी कल्पना आहे कीं, शक्ति सृष्टि करते; शिव पालन करतो; काल संहार करतो आणि नाथ मुक्ति देतो. हे लोक केवळ नाथालाच एकमात्र मुक्तपुरुष मानतात; बाकी सर्वांना – शिव, विष्णु, ब्रह्मा यांनाहि – ते जीव मानतात. नाथपंथी ग्रंथांत मायेची चर्चाहि आढळते. गोरक्षनाथ माया द्विविध मानतात : विद्या व अविद्या. विद्या मोक्षदायिनी तर अविद्या बंधनकारक.

कबीराच्या विचारविश्वावर या नाथपंथी विचारांची पुष्कळ प्रमाणांत छाप आहे. परमतत्त्वाचें वर्णन कबीरानें बहुतांशी नाथपद्धतीनेंच द्वैताद्वैतविलक्षण ज्योतिस्वरूपी तत्त्वाच्या रूपांत केलें आहे –

सरीर सरोवर भीतर आछे कमल अनूप।
परम ज्योति पुरुषोत्तमो जाके रेख न रूप॥

* * *

ज्योति स्वरूप तत अनूप।
अमल न मल न छांह न धूप॥

नाथपंथीयांप्रमाणेंच कबीरानें मायेवर आघात केले आहेत. गोरखनाथाप्रमाणेंच त्यानें जागोजागीं कनक-कामिनींची निंदा केली आहे. नाथपंथाची शब्दोपासना तर त्यानें तंतोतंत ग्रहण केली आहे. त्यानें अनेक ठिकाणीं 'नाद-बिंदू'ची चर्चा केली आहे; आणि शब्दब्रह्म व प्रणवोपासना आदींचें वर्णन केलें आहे. कबीराची नाद-बिंदूविषयक धारणा बहुतांशीं नाथपंथीयांच्या कल्पनेशीं मिळती-जुळती आहे. नाथपंथीयांप्रमाणेंच कबीरहि नादाला ईश्वरांश व बिंदूला शरिरांश मानीत असे –

अव्यक्त नादै बिन्दु गगन गाजे। सब्द अनहद बोलै॥
अंतरि गति नाहि देखै नेड़ा। ढूँढत बन बन डोलै॥ [५८]

मायावर्णन तर कबीरानें नाथपंथीयांहूनाहि अधिक केलें आहे. कबीराच्या व नाथ पंथाच्या मोक्षपदवर्णनांतहि संपूर्ण साम्य आहे –

कह्या न उपजै उपज्यां नहि जांणौ भाव अभाव विहूनां।
उदय अस्त जहाँ मत बुद्धि नाहीं सहजि राम ल्यौं लीनां॥ [५९]

---

५८. कबीर ग्रंथावली, पृ. १५४.
५९. कबीर ग्रंथावली, पृ. १४८.

यावरून हें स्पष्ट होईल की, नाथपंथाच्या प्रधान दार्शनिक सिद्धान्तांची दाट छाया कबीराच्या विचार-विश्वावर पडली आहे.

**( ३ ) नाथपंथाची साधना-पद्धति :** नाथपंथीय साधना-पद्धति बरीच जटिल आहे. नाथपंथी जोग्यांचा असा विश्वास आहे कीं, शरिरांतील सहस्रार चक्रांत असलेल्या गगनमंडलांत एक अमृत कुंड आहे. यालाच चंद्रतत्त्व असेंहि म्हणतात. यांतून निरंतर अमृत झरत असतें. जो या अमृताचें पान करूं शकतो, तो अजरामर होतो. गुरूच्या पथप्रदर्शनानुसार मुक्त बनलेला योगीच त्याचें पान करूं शकतो —

**गगन मंडल में औंधा कुआं तह अमृत का वासा ।**
**सगुरा होय से झरझर पिया निगुरा जाहि पिपासा ॥**

या अमृतपानासाठीं सांसारिक भोगांच्या बंधनापासून मुक्त व्हायला पाहिजे. 'नाथ'-पदाचा अर्थच मुळीं 'सांसारिक बंधनापासून मुक्त होणें' असा आहे. या वैराग्यभावनेचें दृढीकरण केवळ गुरुच करूं शकतो. गुरुच वैराग्य-भावनेच्या दृढतेसाठीं नैतिक नियमांचें आचरण शिकवितो. नाथपंथीय साधना-पद्धतीत 'रहनी' आणि 'करनी' असे दोन विभाग आहेत. 'रहनी' म्हणजे नैतिक आचरण आणि 'करनी' म्हणजे कायायोग, 'रहनी'च्या अधिष्ठानावरच 'करनी'ची उभारणी शक्य आहे. या 'रहनी'त प्रामुख्यानें मनाची शुद्धता; शब्दपांडित्य — वेद-स्मृति आदि ग्रंथ — मूर्तिपूजा या मिथ्यावडंबरापासून व वाद-विवादापासून अलिप्तता, धीरवृत्ति, विकारवशतेवर विजय आणि शीलसंपन्नता, मध्यम मार्गाचें अनुसरण; ब्रह्मचर्याचें पालन; मादक वस्तूंच्या सेवनाचा परित्याग; आत्यंतिक शरीरपीडेचा त्याग या गोष्टींचा समावेश होतो. 'रहनी'नें व गुरु-कृपेनें वैराग्याचें दृढीकरण झाल्यावर जी 'करनी' करावी लागते, त्यांत इंद्रिय-निग्रह, प्राणसाधना, मनःसाधना यांचा समावेश होतो.

नाथ संप्रदायांत इंद्रियनिग्रहावर विशेष भर आहे. इंद्रियांचें सर्वांत प्रबळ आकर्षण म्हणजे स्त्री. यामुळें स्त्रीपासून मन परावृत्त करण्याची चर्चा वारंवार आली आहे. इंद्रियनिग्रहानें बिंदूचें स्थैर्य प्राप्त होतें आणि आसनांत दृढ राहण्याची शक्ति वाढते.

प्राणसाधना प्राणायामाशीं संबंधित असते. प्राणायामाची साधना प्राण-विजयाच्या इच्छेनें केली जाते. प्राणायामद्वारां केवळ प्राणवायुच नव्हे तर

देहाहि वायूंवर अधिकार प्राप्त होतो. परंतु यासाठीं शरिरांतील सर्व मार्ग वायूला येण्या-जाण्यास बंद झाले पाहिजेत. याचसाठीं नाथपंथी जोगी भस्म-लेपन अत्यंत आवश्यक मानतात.

मनःसाधनेंत साधक जगांतील विविध मायिक प्रवृत्तींतून मनाला खेचून घेऊन अंतर्मुख बनतो. या मनाला उलटविण्याच्या प्रक्रियेलाच ‘ उलटी चाल ’ म्हणतात. या त्रिविध साधनेनंतर नाथसाधकाची साधना कुंडलिनी-जागरणांत परिणत होते. त्याचप्रमाणें प्रत्येक श्वसनांत अद्वैत भावना राखणें, हा ‘अजपाजप’ नाथसाधनेचा विशेष आहे. षट्चक्र-भेदनानंतर ऐकूं येणारा अनाहत नादहि नाथपंथीय ग्रंथांत सर्वत्र वर्णिला आहे. या ‘रहनी’चा व ‘करनी’चा कबीरानें सर्वस्वी अंगीकार केला आहे, हें कबीर-ग्रंथावलीच्या पानापानांतून आढळून येईल. विस्तारभयास्तव त्याची अधिक चर्चा येथें करीत नाहीं. जिज्ञासूंनीं हें साम्य पहाण्यासाठीं कबीर-ग्रंथावलींतील १६, २०, २९, ४३, ४४, २६१ हीं पृष्टं पहावीं.

**(४) भाषा आणि अभिव्यक्ति :** ‘गोरखबानी’ आणि ‘कबीर-ग्रंथावली’ यांचा तुलनात्मक अभ्यास केला, तर कबीराच्या वाणीवर गोरक्ष-नाथाच्या भाषेचा व आविष्कार-पद्धतीचा किती स्पष्ट ठसा आहे, हें दिसून येईल. कबीर-ग्रंथावलींत अशीं अनेक ठिकाणें आहेत की, जेथें कबीरानें गोरक्षनाथाचे विवक्षित शब्द, शब्दसमूह आणि वचनें वारंवार वापरलीं आहेत. उदाहरणें द्यावयाचीं झालीं तर पानेंच्या पानें भरून जातील, एवढें तें साम्य आहे. ‘गोरख-बानी’ आणि ‘कबीर-बानी’ यांतील कांहीं साम्यस्थळें पुढें दिलीं आहेत त्यांवरूनहि या दोन महापुरुषांच्या हार्दिक अनुबंधाची कल्पना येईल :

**१. गोरखनाथ :**

**नींझर झरणैं अंमीरस पीवणां षट दळ बेध्या जाइ ।**
**चंद बिहूंणां चांदिणा तहां देष्या श्रीगोरष राइ ॥**[६०]

**कबीर :**

**मन लागा उनमन्न सौं, गगन पहूँचा जाइ ।**
**देख्या चंद बिहूंणां चांदिणां, तहां अलख निरंजन राइ ।**[६१]

६०. गोरखबानी, सबदी १७१, पृ. ५८.

६१. कबीर ग्रंथावली. साखी १५, पृ. १२.

२. गोरखनाथ :

हिंदू आषैं रांम कौं मुसलमान षुदाइ।
जोगी आषैं अलष कौं, तहाँ राम अछै न षुदाइ॥ [६२]

कबीर :

हिंदू मूये रांम कहि, मुसलमान खुदाइ।
कहै कबीर सो जीवता, दुह मैं कदे न जाइ॥ [६३]

३. गोरखनाथ :

तत बेली लो तत बेली लो, अवधू गोरषनाथ जांणीं।
डाल न मूल पहुप नहीं छाया, बिरधि करै बिन पांणी॥
काया कुंजर तेरी बाड़ी अवधू, सतगुर बेली रूपांणी।
पुरुष पांणती करै धणियांणौं, नीकैं बालि घरि आंणीं॥
मूल एद्वा जेद्वा ससिहर अवधू, पांन एद्वा जेद्वा भांणं
फल एद्वा जेद्वा पूनिम चंदा, जोउ जोउ जांण सुजाणं॥
वेलड़िया दौं लागी अवधू, गगन पहूँती झाला।
जिम जिम बेली दाझबा लागी, तब मेल्है कूंपल डाला॥
काटत बेली कूंपल मेल्ही सींचतडां कुमलाये।
मछिंद्र प्रसादें जती गोरष बोल्या, नित नवेलडी थाये॥ [६४]

कबीर :

रांम गुन बेलड़ी रे अवधू गोरषनाथि जांणीं।
नाति सरूप न छाया जाकै बिरध करै बिन पांणीं॥
बेलड़िया द्वै अणीं पहूंती, गगन पहूंती सैली॥
सहज बेलि जब फूलण लागी, डाली कूपल मेल्ही॥
मन कुंजर जाइ बाड़ी बिलंब्या, सतगुर बाही बेली।
पंच सखी मिलि पंवन पयंप्या, बाड़ी पांणी मेल्ही॥

---

६२. गोरखबानी सबदी ६९, पृ. २५.
६३. कबीर ग्रंथावली, साखी ७, पृ. ५४.
६४. गोरखबानी, पद १७, पृ. १०६-१०८.

काटत बेली कूपले मेल्ही, सींचताड़ीं कुमिलाणीं ।
कहै कबीर ते विरला जोगी, सहज निरंतर जाणीं ॥[६५]

४. गोरखनाथ :

ग्यांन गुरु दोऊ तूंवा अम्हारै, मनसा चेतनि डांडी ।
उनमनी तांती बाजण लागी, यहि बिधि तृष्नां षांडी ॥[६६]

कबीर :

चंद सूर दोऊ तूंवा करि हूं, चित चेतनि की डांडी ॥
सुषमन तंती बाजण लागी, इहि ब्रिधि त्रिष्णां षांडी ॥[६७]

५. गोरखनाथ :

अवधू यो मन जातहै, याही तै सब जांणि ।
मन मकड़ी का ताग ज्यूं, उलटि अपूठौ आंणि ॥[६८]

कबीर :

मनकै मतै न चालियै, छाड़ि जीव की बांणि ।
ताकू केरे सूत ज्यूं, उलटि अपूठा आंणि ॥[६९]

'कबीर-ग्रंथावली' समजावून घ्यावयाची असेल, तर अगोदर 'गोरखबानी' समजली पाहिजे, इतकें या दोघांचें आशय आणि अभिव्यक्ति या बाबतींत साम्य आहे. गोरक्षनाथाची रहस्यात्मकताहि कबीरांत जशीच्या तशी आढळते. गोरक्षनाथाच्या व्यक्तिमत्त्वाचें, विचाराचें आणि साधनापद्धतींचें आत्यंतिक परिणतस्वरूप म्हणजे कबीर! गोरक्षवाणीच्या योग-भूमींत वाढलेली भक्तीची गंधवती पुष्पलता म्हणजे कबीरवाणी!

हा गोरक्षनाथाचा नवा अवतार उत्तर भारतांतील भारतीय साधनेचा फार मोठा शिल्पकार ठरला. आपल्या प्रखर विचारांच्या संहारक आणि सर्जक अशा दोन्ही विशेषांमुळें त्यानें भारतीय लोकमानसाचें शुद्धीकरण करून, नव्या

६५. कबीर ग्रंथावली, पद १६३, पृ. १४२.
६६. गोरखबानी, पद १६, पृ. १०६.
६७. कबीर ग्रंथावली, पद १९६, पृ. १५४.
६८. गोरखबानी सबदी, २३४, पृ. ७४.
६९. कबीर ग्रंथावली, साखी १, पृ. २८.

प्रेरणा निर्माण केल्या. त्याच्या प्रचंड प्रभावामुळें भारतीय साधनेच्या इतिहासांत एक वैभवशाली 'कबीर-युग' निर्माण केलें आहे. त्यानें प्रेरिलेल्या विचार-स्फुल्लिंगांतून असंख्य दिव्य ज्योति निर्माण झाल्या. त्या ज्योतींच्या प्रकाशांत भारतीय साधनेचें तेज प्रकर्षानें फांकलें. त्या ज्योतींचें ओझरतें दर्शन घेऊन आपण हा गोरक्ष-कबीर संबंधाचा अध्याय समाप्त करूं.

**निर्गुण संत-परंपरा :** नाथ संप्रदाय आणि कबीर यांच्या संबंधाविषयीं लिहिल्यावर नाथपंथ आणि 'निर्गुण परंपरा' याविषयीं पुनः लिहिण्याचें वास्तविक कारण नाहीं. परंतु जाणत्यांच्या जिज्ञासा-तृतीसाठीं थोडें स्पष्टीकरण आवश्यक आहे. रैदासादि कबीर-गुरुकुळांतील संतांवर हा नाथ-प्रभाव आहेच आहे; पण रैदासाच्या संपर्कांत आलेल्या मधुराभक्ति-क्षेत्रांतील मीरेवरहि तो प्रभाव आहे. आपण आतां 'प्रति-कबीर' समजल्या जाणाऱ्या फक्त दादूचाच विचार करूं. दादूनें कबीराप्रमाणेंच "अवधू कामधेनु गहिराखी", "जोगी जानि जानि जन जीवै" असें अवधू वा जोगी यांना उद्देशून लिहिलें आहे.

**इहै परम गुर जोगं, अमी महारस भोगं ॥**
**मन पवना थिर साधं, अविगत नाथ अराधं ॥**
**तहँ सबद अनाहद नादं ॥**
**पंच सखी परमोधं, अगम ज्ञान गुर बोधं**
**तहँ नाथ निरंजन सोधं ॥**[७०]

—यांतील 'मन पवन', 'सबद अनाहद नाद', 'नाथ निरंजन' हे प्रयोग चिंतनीय आहेत. दादूचा 'निरंजनयोगी' नाथयोग्याहून निराळा आहे— तो कबीराच्या विचारांच्या मुशींतून साकारलेला आहे; तरीहि दादू कबीराप्रमाणेंच नाथयोग्याला तुलनेसाठीं घेऊनच आपल्या कल्पना साम्य-विरोधानें व्यक्त करतो—

**निरंजन योगी जानि ले चेला, सकल बियापि रहै अकेला ॥**
**खपर न झोली डँड अधारी, मठी न माया लेहु बिचारी ॥**
**सींगी मुद्रा बिभूति न कंथा, जटा जाप आसण नहिं पंथा ॥**

७०. संत दादू और उनकी वाणी, पद १२४.

तीरथ बरत न बनखँड बासा, माँगि न खाइ नहीं जग आसा ॥
अमर गुरु अविनासी जोगी, दादू चेला महारस भोगी ॥[७१]

या पदांत शैली-शृंगी-कंथा-झोली या बाह्यावडंबराशिवाय 'महारस' भोगणारा दादूचा 'निरंजनयोगी' म्हणजे गोरक्षनाथाच्या मूलप्रेरणेचाच परिष्कृत प्रतिध्वनि आहे; हें खास. दुसऱ्या एका पदांत कबीराप्रमाणेंच बाह्य चिन्हांच्या प्रतिमांतून दादूनें तत्त्वरहस्याची गुंफण केली आहे –

जोगिया बैरागी बाबा, रहै अकेला उन्मनि लागा ॥
आतमा जोगी धीरज कंथा, निहचल आसण आगम पंथा ॥
सहजैं मुद्रा अलख अधारी, अनहद सींगी रहणी हमारी ॥
काया बनखँड पाँचौ चेला, ज्ञानगुफामें रहै अकेला ॥
दादू दरसन कारनि जागै, निरंजन नगरी भिष्या माँगै ॥[७२]

दादूचा जोगी कायाबनांत पंचेंद्रियांचें गुरुत्व स्वीकारून ज्ञानगुंफेंत राहणारा आणि निरंजन-नगरींत भिक्षा मागणारा आहे. त्याचीं वेशचिन्हें मानसिक-आत्मिक आहेत. दादूच्या वाणींत 'रहनी'चा विस्तार कबीराइतक्याच स्पष्टपणानें झाला आहे. वरील मोजक्या अवतरणांतूनहि हें स्पष्ट दिसून येईल.

श्री. वियोगी हरि यांनीं संपादिलेलें 'संत-सुधा-सार' आणि श्री. परशुराम चतुर्वेदी यांचा ' उत्तरी भारतकी संतपरंपरा ' हा बृहद्ग्रंथ सहज चाळतांनाहि गोरक्षनाथाचा 'वंशविस्तार' कसा भारतभर बहरला आहे, याची जाणीव होईल. त्या असंख्य 'निर्गुणियां'च्या वाणीवर गोरक्षनाथाच्या विचारांचा व अभिव्यक्तीचा जो प्रभाव आहे, त्याचें विवेचन करण्यासाठीं एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. निर्गुणियांप्रमाणेंच निरंजन संप्रदायहि गोरक्ष-प्रभावित आहे.

उत्तर भारतांतील या 'निर्गुणियां'शिवाय ' गुजराथचा कबीर ' आखा आणि ' आंध्रचा कबीर ' वेमन्न यांचाहि येथें नामनिर्देश करावयास हवा. आपल्या तुकारामाच्या अभंगांप्रमाणेंच आंध्रमध्यें वेमन्नचीं वचनें जनसाधारणाच्या ओठांवर खिळून राहिलीं आहेत. या निर्गुणोपासक कवीचा गुरु लंबिका –

---

७१. संत दादू और उनकी वाणी, पद १३१.
७२. संत दादू और उनकी वाणी, पद १३२.

शिवयोगी नामक एक हठयोगी होता. त्यामुळें वेमन्नच्या वाणींत यौगिक प्रक्रियांचे व यौगिक अनुभूतींचे उल्लेख जागोजाग आहेत –

नाद् मलर जेसि नादं बु वोंगिंचि
भेद् मिंतलेक बेनगिन्पुडु
पारु काल्व वलेनु पारुरा ईनानु
विश्वदाभिराम विनरु वेम ।[७३]

अर्थात् ' आध्यात्मिक अधिष्ठानावांचून केली जाणारी योगाची शारीरिक कसरत आणि बाह्यावडंबर ' याची वेमन्ननें प्रखर निंदा केली आहे.

आणखी एक आश्चर्यजनक उल्लेख करून मी हा विषय आवरतां घेतों. 'गीतगोविंद'-कर्ता जयदेव याचीं दोन पदें शीखांच्या आदिग्रंथांत संग्रहित आहेत. त्यांतील एक पद पूर्णतः नाथप्रभावित आहे आणि त्याची शैली उत्तरकालीन निर्गुणोपासकांच्या 'सबद्'-रचनेचें मूळ भासणारी आहे.

## नानक आणि शीख पंथ :

उत्तर भारतांतील धार्मिक विद्रोहांत नानकाचें स्थान महिमामय आहे. येथें मुसलमानांचें आक्रमण झाल्यानंतर ज्या नव्या जटिल समस्या निर्माण झाल्या, त्यासाठीं केल्या गेलेल्या प्रयत्नांत नानकाचा फार मोठा वांटा आहे. हा विराट् जिज्ञासेचा आणि विशाल हृदयाचा महापुरुष उत्तर भारतांत आपल्या समन्वयी दृष्टीमुळें आणि तपःपूत विचारांमुळें प्रसिद्ध आहे. कबीर आणि नानक यांचीं नांवें नेहमीं एकत्र उच्चारलीं जातात, एवढें त्यांचें आत्मिक नातें जवळचें आहे.

शीखांच्या आदिग्रंथांत 'गुरुबानी' (शीख गुरूंची वाणी) बरोबर अनेक निर्गुणोपासकांची वाणीहि समाविष्ट आहे. यावरून नानक व त्याचा मार्ग यांची जातकुळी ध्यानांत येईल. आदिग्रंथांत प्रारंभींच येणाऱ्या नानकाच्या 'जपुजी' या स्मरणीय ग्रंथांत नाथ-प्रभावाचीं चिन्हें अनेक ठिकाणीं आहेत.[७४] गुरूचें महिमान नानकानें गोरक्षाच्याच आवाजांत गायिलें आहे –

---

७३. तेलुगु और उसका साहित्य, पृ. २६.

७४. संतसुधासार : सं. वियोगी हरि, पृ. २०८–२३७.

**गुरुमुखि नादं गुरुमुखि वेदं । गुरुमुखि रहिआ समाई ॥**
**गुरु ईसरु गोरखु बरमा गुरु पारबती माई ॥** ( जपुजी, ४ )

नानकानें 'जपुजीं'त नाथ वा सिद्ध यांना वारंवार उल्लेखिलें आहे —

**सुणि ऐ सिद्ध पीर सुरि नाथ ।** ( ज. ८ )
**असंख जोग मन रहहि उदास ।** ( ज. १७ )
**तिथि वारु ना जोगी जाणें ।** ( ज. २१ )
**आखहि ईसर आखहि सिद्ध ।** ( ज. २६ )
**गावहि सिद्ध समाधि अंदरि** ( ज. २७ )

खालीं 'जपुजी'मधील दोन पदें सार्थ देत आहें. त्या पदांवरून नाथ-नानक संबंध स्पष्ट होईल. त्यांवर भाष्य करण्याची जरूरी नाहीं —

**मुंदा संतोखु सरमु पतु झोली धिआन की करहि विभूति ॥**
**खिंथा कालु कुआरी काइआ जुगति डंडा परतीति ॥**
**आई पंथी सगल जमाती मनि जीतें जगु जीतु ॥**
**आदेसु तिसै आदेसु ।**
**आदि अनीलु अनादि अनाहति जुगु जुगु एको वेसु ॥** ( ज. २८ )

" तूं संतोष आणि शील यांच्या मुद्रा बनव आणि ( स्वभावयुक्त ) उद्यमाची झोळी बनव. परमात्म्याच्या ध्यानाचें भस्म लाव. कालाचें ( सतत ) स्मरण हीच तुझी कंथा बनूं दे. आणि देहाला — आपल्या रहनीला — कुमारी कन्येप्रमाणें पवित्र राख; आणि श्रद्धेलाच आपला दंड बनव. सर्वांना तूं आपल्या जमातींतलेंच समज. जणूं सारे मानव तुझ्या आईपंथांतलेच आहेत.

" आणि हें लक्षांत ठेव कीं, ज्यानें मनाला जिंकलें त्यानें साऱ्या जगाला जिंकलें. 'आदेश' अर्थात् प्रणाम त्यालाच कर कीं, जो 'आदि ईश' आहे. जो आदि आहे, जो शुभ्र आहे, जो अनादि आहे, ज्याचा अंत नाहीं, आणि युगानुयुगें 'एकरूप'च आहे. "

**भुगति गिआनु दइआ भंडारणि घटि घटि वाजहि नाद ॥**
**आपि नाथु नाथी सभ जा की रिद्धि सिद्धि अवरा साद ॥**
**संजोगु विजोगु दुई कार चलावहि लेखे आवहि भाग ॥**

आदेसु तिसै आदेसु ।
आदि अनीलु अनादि अनाहति जुगु जुगु एको वेसु ॥ ( ज. २९ )

" अध्यात्मिक ज्ञानाचें तूं भोजन कर आणि दयेला आपला 'भंडारी' बनव. घटाघटांत जो नाद गुंजत आहे, तीच तुझी सारंगी आहे. ज्यानें साऱ्या सृष्टीला आपल्या सूत्रानें सनाथ केलें आहे, त्यालाच तूं आपला नाथ समज.

" ऋद्धि-सिद्धींची तुच्छ करामत तुझ्यासाठीं नाहीं; इतरांसाठीं आहे. संयोग आणि वियोग हे दोन्ही नियम जगाचें नियंत्रण करीत आहेत. आमच्या भाग्यानें आम्हांला आमचा भाग मिळतो.

" आदेश अर्थात् प्रणाम त्यालाच कर कीं, जो आदि आहे, शुभ्र आहे, अनादि आहे, अनंत आहे आणि युगानुयुगें एकरूपच आहे. "

शीखांच्या 'प्राणसंगलि' नामक ग्रंथांत गुरु नानकाबरोबर चौऱ्यायशीं सिद्धांचा साक्षात्कार-प्रसंग वर्णिलेला आहे. या चौऱ्यायशी सिद्धांत अनेक प्रकारचे सिद्ध आहेत : कोणी सुरति-सिद्ध; कोणी निरति-सिद्ध; तर कोणी कनक-सिद्ध. अन्य शीख गुरूंच्या वाणींतहि हे नाथप्रभावाचे पडसाद आढळतात. डॉ. मोहनसिंगांच्या मतें 'सुरति शब्दयोग' ही गोरक्षनाथाची नानकाला मिळालेली देणगी आहे.

**धर्म संप्रदाय :**

हा बंगालमधील बौद्धांच्या ऱ्हासकाळांतील संप्रदाय. याचा उदय केव्हां झाला, हें निश्चयानें सांगतां येणार नाहीं. परंतु या संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ जो 'शून्यपुराण' त्याचा कर्ता रमाई पंडित हा अकराव्या शतकांत होऊन गेला. ही धर्मपूजापद्धति एक लोकसाधना आहे. तिला व्यवस्थित सांप्रदायिक रूप शून्य-पुराणकार रमाई पंडितानें दिलें. या धर्मपूजेस्तव पुढें अनेक 'धर्ममंगल' काव्यें रचलीं गेलीं. या काव्यांतून धर्मपूजा व नाथ संप्रदाय यांचा एकात्मसंबंध वर्णिला आहे. या 'धर्ममंगल' काव्यांत मयूरभट्ट ( १२ वें शतक ), खेलाराम, माणिक गांगुली, रूपराम, रामचंद्र, श्याम पंडित, रामदास आदक, सहदेव चक्रवर्ती, घनराम इत्यादींची 'धर्ममंगल' काव्यें विशेष महत्त्वाचीं आहेत. या बहुतेक काव्यांत मीननाथ, गोरक्षनाथ, हाडिसिद्ध, कानिपा इत्यादि नाथसिद्धांचा धर्मठाकूर वा धर्मनिरंजन याच्या उपासनेशीं दृढ संबंध वर्णिला आहे.

यांपैकी सहदेव चक्रवर्तीच्या 'धर्ममंगल' काव्यांत[७५] ( इ. स. १७४० ) अध्याय ४ मध्यें, मत्स्याच्या गर्भातील मीननाथानें वल्लुका नदीच्या तीरीं शिव-पार्वती संवादांतून महाज्ञान मिळविल्याचें वर्णन आहे. पांचव्या अध्यायांत, मीननाथ चंडीची निंदा करतो; चंडी त्याला शाप देते; त्या शापामुळें मीननाथ कदलीपट्टन येथें विकृत साधकांच्या सहवासांत सांपडतो; तेथें त्याचें कोकरांत रूपांतर होतें; या अवस्थेंतून त्याचा शिष्य गोरक्षनाथ त्याचा उद्धार करतो—असें विस्तृत वर्णन आहे. सहाव्या अध्यायांत कानिपा, हाडिपा, मीन-नाथ, गोरक्षनाथ आणि चौरंगी यांच्या भेटीचें वर्णन आहे. सातव्या अध्यायांत मीननाथाला महानदांतील राज्याचा अधिकार मिळतो, असें वर्णन आहे. अकरा अध्यायांच्या या काव्यांत चार अध्याय या ( नाथ- ) सिद्धांच्या कथा-सांगण्यांत खर्ची पडले आहेत, हें लक्षांत घ्यावयास पाहिजे.

बंगालमध्यें ज्यांची उपास्यदेवता 'धर्मठाकूर' ही आहे, अशा किती तरी योग्यांच्या स्मरणीय महापुरुषांत गोरक्षनाथ, धीरनाथ, छायानाथ, रघुनाथ यांचा समावेश होतो. धर्म संप्रदायाच्या व नाथ संप्रदायाच्या सृष्टयुत्पत्ति-कथेंत साम्य आहे. धर्मसांप्रदायिक आदिनाथाचा उद्भव धर्मनिरंजनापासून मानतात. आदिनाथ व आदिदेवी केतका यांच्या 'शवज' पुत्रांत ते मीन, गोरक्ष, हाडी, कानिपा व चौरंगी यांचा समावेश करतात. पैकी मीननाथाचा शिष्य बिंदुनाथ व गोरक्षनाथाचा शिष्य कर्पटीनाथ. मूलतः बौद्ध असलेल्या या धर्मपूजा संप्रदायावर उत्तरकाळी नाथ संप्रदायाचा किती प्रचंड प्रभाव पडला आहे, हें यावरून सिद्ध होईल.

## मलिक मुहम्मद जायसी :

पंधराव्या शतकाच्या अखेरीस झालेला हा सूफी प्रेमाख्यान-कवि निजामुद्दीन अवलियाच्या शिष्यपरंपरेंतील होय. 'पद्मावत' हें प्रदीर्घ प्रेमाख्यान काव्य, 'अखरावट', 'आखिरी कलाम', 'पोस्तीनामा' आणि 'नैनावत' एवढी त्याची ग्रंथसंपदा आहे. जायसी हा उत्कट धर्मजिज्ञासू आणि समन्वयी-वृत्तीचा असल्यामुळें त्याचा अनेक पंथांच्या साधकांशीं आत्मीय संबंध आला. विशेषतः

७५. History of Bengali Language and Literature, P. 327-329.

नाथसांप्रदायिक योग्यांशीं आलेला त्याचा संपर्क त्याच्या काव्यांत सुस्पष्टपणें उमटला आहे. हठयोग आणि रसायनवाद यांच्या साधना-प्रक्रियांचें वर्णन त्याच्या काव्यांतून आहे. सुषुम्ना नाडींतील नाभिचक्र, हृत्कमल आणि दशमद्वाराचा उल्लेख त्यानें वारंवार केला आहे. योगी ब्रह्मानुभूतीस्तव कुंडलिनी जागृत करून ब्रह्मद्वारापर्यंत पोंचण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या या साधनेंत अनेक अंतराय येतात. जायसीनें योगाच्या या विषयांत सूफी सरणीचा रंग भरला आहे. अंतरायाच्या जागीं त्यानें 'शैताना'ची योजना केली असून त्याला 'नारद' असें नांव दिलें आहे. हाच 'नारद' दशमद्वाराचा पहारेकरी असून काम, क्रोध आदि षड्विकार त्याचे शिपाई आहेत ('आखरवट'). 'पद्मावतां'त रसायनवाद्यांची चर्चाहि पुष्कळ आहे. 'जोडा करना' आदि त्यांचे कांहीं पारिभाषिक शब्दहि योजिले आहेत. सिंहलगडाचें वर्णन करतांना हठयोगानुसार 'कायागढा'चेंच वर्णन केलें आहे —

गढ़ तस जैसी तोरि काया । पुरुष देखु ओही कै छाया ॥
पाइय नाहीं जूझ हठि कीन्हे । जेइ पावा तेहि आपुहि चीन्हें ॥
नौ पौरी तेहि गढ़ मझियारा । औ तहँ फिरहि पाँच कोटवारा ॥
दसहुँ दुआर गुपुत एक ताका । अगम चढ़ाव बाट सुधि बाँका ॥
भेदै जाइ कोइ वह घाटी । जो लइ भेद चढ़ै होइ चाँटी ॥
गढ़तर कुँड सुरँग तेहि माँहाँ । तहँ वह पंथ, कहौं तोहि पाहाँ ॥
दसहुँ दुआर ताल कै लेखा । उलटि दिस्टि जो लाव सो देखा ॥ [७६]

वर उद्धृत केलेल्या ओळींत "नौ पौरी" म्हणजे 'नवद्वार'. दशमद्वार जें ब्रह्मरंध्र तेथपर्यंत पोंचण्यांत अनेक अंतराय आहेत. काम-क्रोधादि विकाररूपी पांच कोतवाल आहेत. गडाच्या खालीं 'नाभिकुंड' आहे, जिथें कुंडलिनी आहे. ब्रह्मरंध्र अत्यंत उंच आहे. तिथें जाणें कठीण आहे. संसारापासून आपली दृष्टि हटवून जो निरंतर त्याकडे ध्यान लावतो, त्यालाच तेथपर्यंत जातां येतें. कथानायक रत्नसेनाला शिवानें ज्याप्रमाणें सिंहलगडाच्या आंत पोंचण्याचा मार्ग सांगितला, त्याप्रमाणें साधकाला सिद्ध पुरुषाचा उपदेश मिळाल्याशिवाय त्याला ब्रह्मप्राप्ति होणार नाहीं.

---

७६. पद्मावत, सिंहलद्वीपखंड.

एक प्रकारें 'पद्मावता'ची सारी कथाच योगपर आहे. 'पद्मावती' हें परमश्रेम, परमश्रेयाच्या प्राप्तीसाठीं योगी बनलेला 'रत्नसेन' हा साधक, 'सिंहलगढ' ही काया. आणि परमश्रेय कायेंतच अंतर्हित आहे, असा योग-मार्गीयांचा विश्वास असल्यानें 'पद्मिनी'चा निवास 'सिंहलगढां'तच आहे. या 'सिंहलगढां'तील 'दशमद्वारा'पर्यंत पोंचायचें म्हणजे काम-क्रोधादि कोतवालांची अडचण दूर केली पाहिजे.

सिंहल देश हें योग्यांचें साधनापीठ असून, तेथें साधनेला आवश्यक अशा पद्मिनींचा निवास असल्याचें जायसीनें वर्णिलें आहे. योग्यांचा वेश, त्यांचीं श्रद्धास्थानें, त्यांची साधनाप्रणाली यांचा पुरेपूर उपयोग जायसीनें आपल्या या 'आध्यात्मिक' कथेच्या परिपोषासाठीं व मताच्या पुष्टीसाठीं करून घेतला आहे. 'पद्मावती'साठीं जोगी बनलेल्या 'रत्नसेन' राजाचें हें वर्णन पहा—

**तजा राज, राजा भा जोगी। औ किंगरी करगहेउ बियोगी।**
**तन बिसँभर मन बाउरलटा। अरुझा पेम, परी सिर जटा।**
**चंद्र-बदन औ चंदन देहा। भसम चढ़ाइ कीन्ह तन खेहा।**
**मेखल, सिंघी, चक्र, धँधारी। जोगबाट, रुद्राछ, अधारी।**
**कंथा पहिरि दंड कर गहा। सिद्ध होइ कहँ गोरख कहा।**
**मुद्रा स्रवन, कंठ जपमाळा। कर उदपान, काँध बघछाला।**
**पाँवरी पाँव, दीन्ह सिर छाता। खप्पर लीन्ह भेस करि राता।**[७७]

मंडपगमन-खंड (प. १७. १—३) व बादशाह-दूतीखंड (प. ५०. २) यांतहि जोगीवेशवर्णन आहे. सिंहलद्वीपखंडांत—

**तूं राजा जस बिकरम आदी। तूं हरिचंद बैन सतवादी।**
**गोपिचंद तुइँ जीता जोगू। औ भरथरी न पूज बियोगू।**
**गोरख सिद्धि दीन्ह तोहि हाथू। तारी गुरु मछंदरनाथू।**[७८]

असा प्रमुख नाथसिद्धांचा उल्लेख आहे. जायसीपूर्वकालीं कुतुबुद्दिन चिश्ती या सूफी कवीनें 'मृगावती' नामक प्रेमगाथेंत असाच योग-कल्पनांचा उपयोग करून घेतला आहे.

---

७७. पद्मावत, जोगीखंड, १२. १, पृ. ५२.
७८. पद्मावत, सिंहलद्वीपखंड, १६. २, पृ. ६८.

**मीराबाई :**

मधुराभक्तीची सर्वश्रेष्ठ गायिका म्हणून भारतीय साधनेच्या इतिहासांत मीरेचें स्थान अनन्यसाधारण आहे. कृष्णप्रेमांत रंगलेल्या या प्रेमयोगिनीच्या गीतांनीं अनेकांना वेड लावलें आहे. मीरेच्या पदांवर गुजराती, राजस्थानी आणि व्रज या तीन भाषा आपला अधिकार सांगतात. उपलब्ध ऐतिहासिक सामग्रीच्या आधारें गुजराथी आणि व्रज भाषेंतील पदें संदेहास्पद आहेत. राजस्थानी भाषेंतील पदें मात्र अधिकांशानें मीराकृतच असलीं पाहिजेत. या पदांतून व्यक्त झालेल्या भावना आपलें लक्ष वेधून घेतात. आश्चर्य असें कीं, या पदांत व्यक्त झालेल्या भावनांत सर्वत्र असा एक अंतःस्रोत आहे की, मीरेचा सगुण साकार श्रीकृष्ण ' मोर मुकुट पीतांबरधारी ' असा घनश्याम नाहीं – तर तो एक 'जोगी' आहे. हें वाचून आपणांस आश्चर्याचा धक्काच बसेल, पण वस्तुस्थिति मात्र अशी आहे. पद्मावती 'शबनम्' यांनीं अलीकडेच संकलित केलेल्या 'मीरा-बृहत्-पदसंग्रहां'त[७९] मीरेचीं नाथप्रभावित पदें दिलीं आहेत. त्यांत १२ 'राजस्थानी, ३ मिश्र, ५ गुजराथी आणि ३ व्रज भाषेंतील आहेत.

मीरेच्या नांवावर असलेल्या अधिकांश राजस्थानी पदांत मीरेनें आपल्या आराध्यदेवतेचें जें वर्णन केलें आहे, तें वृंदावनवासी गोपींच्या कृष्णाचेंहि नाहीं वा द्वारकानिवासी रणछोडजीचेंहि नाहीं, तर नाथपरंपरेनुसार वेशभूषा केलेल्या जोग्याचें आहे ! प्राचीन संस्कृत साहित्यांत व अन्यत्र लोकभाषा-साहित्यांतहि कृष्णाचें जोगी-रूपांतील वर्णन कुठेंहि नाहीं. कृष्णभक्तिसाहित्यांत सर्वत्र ' मोर मुकुट पीतांबर ' आणि ' गल बैजंती माल ' परिधान केलेला ' मोहन मुरलीवाला ' म्हणून कृष्णरूप चितारलें आहे. परंतु मीरेनें मात्र वारंवार आपल्या उपास्याला 'जोगी' म्हणून बाहिलें आहे. या जोग्याची वेशभूषा सर्वस्वीं नाथजोग्याची आहे. मुरलीऐवजीं 'नाद' आणि ' मोर मुकुट पीतांबर गल बैजंती माल ' यांऐवजीं 'सेली', 'बटवो', व 'भभूति' असा त्याचा वेश आहे.

**आसण माँड अडिग होय बैठा, याही भजनकी रीत ।**[८०]

---

७९. मीरा-बृहत-पद-संग्रह, पृ. २९५–३०५.

८०. मीरा पदावली, पद ५९, १८९.

आसण मांड़ि गुफामें बैठो, ध्यान हरीको लगायो।
गल बिच सेली हाथ हाजरियो अंग भभूति रमायो।[८०]

★ ★ ★

जोगिया चतुर सुजाण सजनी, ध्यावै संकरसेस।[८०]

अंगाला विभूति लावणारा, शैली-शृंगी धारण करणारा आणि गुंफेंत बसून 'संकर'चें ध्यान करणारा एक जोगी 'मीरेचें ध्येय' आहे. ज्या परमात्म्याच्या ध्यानांत शंकर सदैव रत असतो, त्या शंकराचेंच ध्यान हा मीरेचा 'जोगी' करीत आहे, हें विशेष विचारणीय आहे.

जोगियाजी निसदिन जोऊं बाट ॥
पाँव न चालै पंथ दुहेली, आडा औघड घाट।
नगर आइ जोगी रम गया रे, मो मन प्रीत न पाइ।[८१]

★ ★ ★

जोगियाकु जोवत बहु दिन बीता, अजहूँ न आयो नाहीं।
विरह बुझावण अंतरि आवो, तपत लगी तन माँहीं।[८१]

★ ★ ★

आरती तेरी अंतरि मेरे, आवो अपनी जाणि।
मीरा व्याकुल विरहिणी रे, तुम बिन तलफत प्राणि।[८१]

अशी त्या जोग्याची वाट पहात विरहिणी मीरा व्याकुळ झाली आहे. तिच्या अंगांगाची विरहानें आग झाली आहे. आणि तिला वाटे लागतें कीं, "जोगियारी प्रीतड़ी है दुखड़ारो मूल!" परंतु या 'दुःखमूलक प्रीती'चा छंद सोडायला तिचें मन तयार नाहीं. मग करायचें काय! मीरा जोग्याचा सहवास मिळविण्यासाठीं, त्याचा शोध करण्यासाठीं स्वतः 'जोगण' बनायला सिद्ध झाली आहे –

जोगियाजी छोड़ रह्या परदेस ॥
जबका बिछड्या फेर न मिलिया बहोरि न दियो संदेस।

---

८०. मीरा पदावली, पद ५९. १८९.
८१. मीरा पदावली, पद ४९.

या तन उपरि भसम रमाऊँ, खोर करूँ सिर केस।
भगवाँ भेख धरूँ तुम कारण, ढूँढ़त चारूँ देस।[८२]

* * *

माला मुद्‌रा मेखला रे बाला, खप्पर लूँगी हाथ।
जोगणि होइ जुग ढूँढसूँ रे, म्हारा रावलियारी साथ॥[८२]

अशा प्रकारें आपल्या 'साहिब'ला अनुकूल 'जोगण वेश' धारण करून 'जोगण' वा 'रावली' बनण्याचा मीरेचा निर्धार आहे: "जिन भेखाँ म्हाँरो साहिब रीझे, सोई भेख धारणाँ!"

परंतु हा जोगी कठोर आहे. तो एकदां आला आहे, परंतु मीरेच्या भावनांचा विचार न करतां, तिचें हळवें हृदय ठोकरून तो जावयास निघाला आहे. त्याचा जाण्याचा निश्चय जितका दृढ आहे, तितकीच त्याला थांबविण्या-साठीं मीरा हृदय पिळवटून त्याला विनवणी करीत आहे. जोग्याचा अनुरोध करतांना तिचें हृदय विव्हळ होऊन उठलें आहे. ती आक्रोशून विनवीत आहे —

जोगी मत जा, मत जा, मत जा॥
पांइ परूँ मैं चेरी तेरी हों॥
प्रेमभगतिको पैंड़ो ही न्यारा, हमकूँ गैल बता जा।
अगर चँदणकी चिता बणावूँ, अपणे हाथ जला जा।
जल बल भई भसमकी ढेरी, अपणे अँग लगा जा।
मीराँ कहै प्रभु गिरिधर नागर, जोतमें जोत मिला जा॥[८३]

परंतु या विनवणीचा कांहींच उपयोग झाला नाहीं. भग्नहृदय मीरा पुनः 'व्याकुल विरहिणी'च उरली आणि आपलें हृदय कसें तरी सांवरीत तिनें आत्यंतिक उद्वेगभावनेनें उद्गार काढले:

जावा दे, जावा दे, जोगी किसका मीत!

हा 'निर्मम' जोगी कोणी तरी प्रत्यक्ष मानव असावा, अशी शंका मीरा-साहित्याच्या सुविख्यात अभ्यासिका श्री पद्मावती 'शबनम्' यांनीं व्यक्त केली

---

८२. मीरा पदावली, पद ७०, ११८.
८३. मीरा पदावली, पद ५०.

आहे.[८४] तें कांहीं का असेना, भक्तीच्या क्षेत्रांत माधुर्यभावामुळें सुविख्यात असलेली ही कृष्णवेडी प्रेमयोगिनीहि 'जोगी'-प्रभावांतून सुटूं शकली नाहीं, हेंच आपल्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

याशिवाय, मध्ययुगीन साधनेच्या क्षेत्रांत गोरक्षनाथाच्या प्रभावामुळें निर्गुण उपासनेची जी वेगवान् धारा निर्माण झाली, त्याच धारेंतील एक विख्यात संत रैदास हा मीरेचा गुरु होता, हीहि गोष्ट महत्त्वाची आहे.

कबीर, रैदास इत्यादि संतांप्रमाणें 'पिंडरहस्या'ची विवरणा मीरेच्या अनेक गीतांतून आहे. 'त्रिकुटी महल', 'सुन्न महलमें सुरत जमाकर सुख की सेज बिछाना', 'सेझ सुषमणा', 'गगन मंडल की सेज', 'अगम अटारी', 'अगम का देस', 'अणहदकी झंकार' हे मीरेचे शब्दप्रयोग ( मीरापदावलींतील पद क्र. १२, २३, २२, ७२, १५१, १५२, १९२ ) मीरेचा गुरुदत्त वारसा दर्शविण्यास समर्थ आहेत.

## लोक-साहित्य :

गोरक्षनाथाचा, त्याच्या सहकाऱ्यांचा व शिष्यांचा आणि उत्तरकालीन अनेक नाथयोग्यांचा भारताच्या कानाकोपऱ्यांत संचार असल्यामुळें लोक-मानसांत गोरक्षनाथ व अन्य नाथ सिद्धांच्या गूढ जीवनाविषयीं आणि प्रखर उपदेशाविषयीं अत्यंत आकर्षण चालत आलें आहे. नाथपंथीयांच्या संचाराचीं पदचिन्हें जिथें स्मृतिरूपानें अजूनहि जागतीं आहेत, अशा ठिकाणीं तर गोरक्षाचीं व त्याच्या पंथाचीं गौरवगीतें गायिलेलीं निश्चित आडळतात. गोरक्ष-नाथाच्या प्रभावामुळें विरोधी साधकांनीं आपलें आसन सोडलें आणि भर्तृहरि-गोपीचंदासारख्या राजांनींहि जोगीपणाचा स्वीकार केला. याचा परिणाम लोक-मनावर विलक्षण रीतीनें घडून आला असणार. शिवाय नाथपंथीयांशीं योग-सिद्धीच्या गूढाद्भुत कथांचें साहचर्य असल्यामुळें या परिणामाची नि आकर्षणाची व्याप्ति व खोली खूपच वाढलेली आहे. याचमुळें सर्व भारतीय भाषांत नाथ-पंथीयांच्या जीवनांवर आधारलेल्या अद्भुत लोककथा व लोकगीतें प्रचलित आहेत.

पंजाबमध्यें तर नाथ-कथांचें व नाथविषयक गीतांचें खूपच बाहुल्य आहे. आदिग्रंथांत तर जोग्यांची जागोजाग चर्चा आहे. 'सिद्धगोष्ट' तर संपूर्ण

---

८४. मीरा : एक अध्ययन, पृ. ११३–१२६.

नाथचर्चेनेंच व्यापलेली आहे. पंजाबचें प्रसिद्ध लोककाव्य 'हीर-रांझा' यांत बारसशाहनें नाथांची विस्तृत चर्चा केली आहे. कादरयारकृत 'पूरणभगत'-'मध्येंहि नाथांची चर्चा विस्तारानें आली आहे.

धरती जेड़ (जैसा) गरीब न कोई,
इन्दर जेड़ (जैसा) न दाता।
लछमन जेड़ (जैसा) जती ना कोई,
सीता तुल्ल (तुल्य) न माता।
धीरज जेड़ (जैसा) मुकाम न कोई,
गोरख से नहिं नाता।
नानक जेड़ (जैसा) फकीर न कोई,
जिन पूरण ब्रह्म पछाता।[८५]

या पंजाबी लोकगीतांत गोरक्षाचा गौरवान्वित उल्लेख आहे. दुसऱ्या एका मालवीमिश्रित पंजाबी लोकगीतांत –

औघड कहँ दे अमृतवाणी, सुनो नाथ जी।
मेली-मेली (मित्र-मित्र) सब जग कहँदा,
नाम गुराँदा मेली (गुरु हाच मित्र) है।[८६]

असें गुरु-महिमान गायिलें आहे. हें गीत कुणा औघड जोग्यानें रचलेलें दिसतें.

मालवींतील लोकप्रचलित निर्गुणी लोकसाहित्यांत 'गोरखवाणी', 'कबीरा', 'गोरख', 'भरथरी-बेराग' हीं लोकगीतें प्रसिद्ध आहेत. 'गोरखनाथजी को ग्यान' ही ४८ दोह्यांची एक लोक-कृति आहे. यांतील प्रत्येक दोहा 'नाथ कहे' या मुद्रेनें युक्त आहे. यांतील मालवी व्रज-प्रभावित आहे –

काटे सेती काँटा निकसे, कुञ्जी सेती ताला।
सिध ही ते सिध पाइए, तब घटि होइ उजियाला॥
सर्प रहे बम्बी उठि नाचै करबिन डैरूँ बाजै।
नाथ कहे जो योपष जीतै, षंड पड़ै तो सतगुरु लाजै॥[८७]

---

८५. नई धारा (मासिक), वर्ष ६, अं. १० (जानेवारी १९५६), पृ. ४२.
८६. नई धारा, जानेवारी १९५६, पृ ४३–४४.
८७. मालवी और उसका साहित्य, पृ. ४८–४९.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वीकार क्रमांक २८१७६ वि: चरित्र दि: २०/८/८८



तामिळ भाषेंत पंधराव्या शतकांत 'सिद्धकवि' समजले जाणारे अनामिक वैरागी संत अनेक झाले.[८८] योग-साधनेच्या द्वारां अस्थिर जीवनाला अमरत्व प्रदान करण्याच्या छंदांत हे वैरागी धुंद असत आणि आपल्या विचारांना व अनुभवांना वारंवार गीतांत गुंफून गात असत. या गीतांची भाषा सर्वथा घरगुती असून, त्यांतील उपमा-रूपक-दृष्टान्तहि घरगुती असत. त्यामुळें हीं गीतें लोकप्रचलित व्हायला वेळ लागला नाहीं. नुकतेंच या सिद्धकवींच्या गीतांचें संकलन तामिळमध्यें प्रकाशित झालें आहे. भारताच्या रहस्यवादी साहित्यांत या गीतांचें विशेष स्थान आहे.

हिंदींत तर असंख्य लोकगीतें नाथ संप्रदायाच्या वातावरणाशीं संबद्ध आहेत. 'गोपीचंदका ख्याल', 'गोपीचंद भरथरी', अशीं प्रदीर्घ लोकगीतें नाथ बैरागी आणि ग्रामीण जनता तन्मयतेनें गातांना आढळते.

बंगालींत 'गोपीचंदेर गान', 'माणिकचंदेर गान' 'मैनामतीर गान', 'भरथरी गोपीचंद' अशीं अनेक गीतें लोकप्रचलित आहेत.[८९] गोपीचंदाच्या राज्यत्यागाची करुणरम्य कहाणी हा बंगाली लोकगीतांचा आवडीचा विषय आहे. हीं गीतें अवीट गोडीनें बंगाली ग्राम-समाज नित्यशः अनुभवीत असतो —

ना जाइयो, ना जाइयो, राजा, दूर देशान्तर ।

ही अदूना राणीची विनवणी वंगीय श्रोत्यांच्या हृदयाचा आजहि ठाव घेते.

मराठी लोकगीतांचें आणि लोककथांचें संकलन अजून पुष्कळच व्हायचें आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील लोकसाहित्यांत नाथ संप्रदायाच्या खुणा किती प्रमाणांत आहेत, यासंबंधीं आजच निश्चयानें सांगतां येणार नाहीं. डॉ. सरोजिनी बाबर यांनीं नुकत्याच संपादिलेल्या 'मराठींतील स्त्री-धन' या गीत-संकलनांत दक्षिण सातारा जिल्ह्यामधील शिराळा महालांतील बत्तीस शिराळें गांवचें एक गोरक्षनाथ-विषयक गीत दिलें आहे.[९०] सरदार आबासाहेब मुजुमदार यांनीं 'महाराष्ट्र लोकसाहित्य माले'च्या द्वितीय पुष्पांत नगरी लोकसाहित्याच्या

---

८८. तमिल और उसका साहित्य, पृ. ८५.

८९. बंगला और उसका साहित्य, पृ. २६–२९.

९०. मराठींतील स्त्रीधन.

विभागांत कांहीं नाथपंथी म्हणी व मुद्रा संकलित केल्या आहेत.[९१] यावरून हें समजून येईल कीं, लोकसाहित्यहि भारतीय साधनेच्या इतिहासाची अंशतः तरी सामग्री ठरूं शकेल. सर्व भाषांतील अशा लोकगीतांचें व लोककथांचें एकत्र अध्ययन केल्यास कांहीं ऐतिहासिक तथ्यें त्यांतून हातीं लागतील असें वाटतें.

## नाथ संप्रदायाचें कार्य :

येथवरच्या विवेचनावरून नाथ संप्रदायाच्या विराट् सामर्थ्याची नि भारतव्यापी प्रभावाची कल्पना येईल. विशुद्ध आत्मिक साधना देश, काल, धर्म, वंश, जाति, भाषा या सर्व भेदांच्या अतीत असते, हें गोरक्षनाथानें आपल्या संप्रदायाच्या द्वारां सर्वांना आचरून दाखविलें. गोरक्षनाथानें एके ठिकाणीं एका काजीला उद्देशून म्हटलें आहे : “हे काजी, तूं व्यर्थ ‘मुहम्मद मुहम्मद’चा जप करूं नकोस. मुहम्मदाला समजावून घेणें फार कठीण आहे. मुहम्मदाच्या हातांत जी सुरी होती, ती लोहाची नव्हती; ती प्रेमाची होती.” गोरक्षनाथाच्या शिष्यमंडळांत हिंदु-मुसलमान दोन्ही होते. बाबा रतन हाजी ( पेशावर ) हा गोरक्षनाथाचा प्रमुख मुस्लिम अनुयायी होता. त्यानें नाथ संप्रदायाचा प्रसार वायव्य भारत आणि काबूल-पर्यंत केला. आजहि काबूलचे जोगी ‘बाबा रतन हाजीके फकीर’ म्हणून ओळखले जातात. या रतन हाजींची नि गोरक्षाची भेट दक्षिणेंत गोदातीरावर झाली. रतन हाजीनें कुणा मुहम्मद नामक बादशहाला हिंदु-मुस्लिम ऐक्याचा अनुरोध करण्यासाठीं ‘काफीरबोध’ नामक ग्रंथ लिहिला :

जिस पाणीसे कुल आलम उतपानां।
ते हिन्दू बोलिए कि मुसलमानां॥
हिन्दू मुसलमान खुदाइके बंदे।
हम जोगी न रखें किस ही के छंदे॥

“हिंदु आणि मुसलमान यांच्यांत भेदभाव मानण्याचें कारण नाहीं. कारण ज्या बिंदूपासून हिंदु आणि मुसलमान निर्माण झाले, तो बिंदु हिंदुहि

---

९१. महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पुष्प दुसरें : नगरी लोकसाहित्य, पृ. ५०–५१.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........


नाहीं आणि मुसलमानहि नाहीं. हिंदु-मुसलमान दोन्हीहि एकाच परमात्म्याचे सेवक आहेत. म्हणून आम्ही जोगी असले भेद मानीत नाहीं. " — अशी बाबा रतन हाजीच्या 'काफीर-बोधा'ची बैठक आहे. रतन हाजीनें अनेक मुसलमानांना नाथ पंथाची दीक्षा दिली. नाथ संप्रदायाच्या रावळ शाखेंत आजहि मुसलमानांचा भरणा आहे. धर्मनाथाच्या परंपरेंत 'पीर' नामक मुसलमान जोग्यांचा एक वर्ग आहे. विणकराचा व्यवसाय करणाऱ्या गृहस्थ योग्यांच्या 'जुगी' जाती प्राधान्यानें मुसलमान आहेत. अशाच 'जुगी' जातींत महात्मा कबीराचा उद्भव झाला. कबीर आणि नानक यांची हिंदु-मुस्लिम ऐक्याची प्रेरणा नाथ-प्रभावांतून निर्माण झालेली आहे.

नाथ संप्रदायाच्या प्रभावकक्षेंत भर्तृहरि आणि गोपीचंद असे राजपुरुषहि खेचले गेले. महाराष्ट्रांत रामदेव यादवाला ज्ञानेश्वरांची नाथपंथी दीक्षा असल्याचा उल्लेख सत्यामलनाथाच्या 'नवरत्नमालें'त आहे. स्त्री-शूद्रांच्या उद्धाराच्या बाबतींत नाथ संप्रदाय तर अग्रगण्य आहे. गोरक्षनाथाच्या प्रधान शिष्यांत विमलादेवी, मयनामती अशा स्त्रिया होत्या. विमलादेवीसाठीं गोरक्षनाथानें 'गोरक्षोपनिषद्' सांगितलें, एवढा तिचा अधिकार. तिनेंच 'आई-पंथ' ही नाथ-पंथशाखा प्रवर्तित केली, असें मानलें जातें. लीळाचरित्रांत उल्लेखिलेली, सालबर्डीच्या डोंगरावर चक्रधरांना भेटलेली तपस्विनी मुक्ताई योगिनी ही गोरक्षनाथाची नातशिष्या ( भर्तृहरीची शिष्या ) होय. नंतर महानुभाव पंथाची दीक्षा घेतलेली आउसा हीहि नाथपंथीय योगिनी लीळाचरित्रांत आहे. याशिवाय कानसाईच्या मळ्यांत चक्रधरांच्या सौंदर्याचें वर्णन करणारी एक जोगीण आहे. जोगी आणि जोगीण यांच्या जोडप्यांचे उल्लेखहि लीळाचरित्रांत आहेत. ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई हीहि एक नाथपंथीय योगिनीच आहे. चांगदेवासारख्या महायोग्याला उपदेश देण्याइतकी तिची थोर योग्यता आहे. ज्ञानेश्वरांच्या नाथपंथीय परंपरेंतील गुप्तनाथ ( गंगाबाई राशिनकर ) ही योगिनीहि प्रसिद्ध आहे. " नाथपंथांतील सिद्धपुरुषांनीं समाजांतील दलित व बहिष्कृत वर्गांना आपुलकीनें जवळ करून त्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला, " हा प्रा. सरदार यांचा अभिप्राय यथार्थ आहे. बंगालमधील हाडिपा ( जालंधरनाथ ) हा अंत्यज होता. संन्याशाचीं पोरें म्हणून समाजानें अवहेलिलेल्या आणि धर्मपंडितांनीं लाथाडलेल्या ज्ञानेश्वरादि भावंडांना नाथ

१०३३४



संप्रदायानेंच जवळ केलें आणि त्यांच्या जीवनांत समाजोद्धाराचें सामर्थ्य ओतलें, हें आपणांस सुपरिचित आहेच.

भारतीय लोकभाषांचें उत्थान घडविण्यांतहि नाथ पंथाचा मान पहिला आहे. नाथ संप्रदाय हा भारतव्यापी संप्रदाय असल्यानें आणि समाजांत त्यानें सर्वस्पर्शित्व साधल्यानें आपल्या उपदेशासाठीं त्यानें लोकभाषांचा अवलंब केला. हिंदीचा अखिल भारतीय पातळीवरून अवलंब करणाराहि गोरक्षनाथ हा पहिला पुरुष होय. गोरक्षनाथाची प्रेरणा लाभलेल्या अनेक महापुरुषांनीं पुढें हें लोकभाषांच्या पुरस्काराचें व्रत हिरीरीनें अवलंबिलें.

वर्णाश्रमाविरुद्ध नाथपंथीय साहित्यांत अत्यंत कठोर विचार आहेत. 'गोरक्षसिद्धान्तसंग्रहां'त या विचारांचें स्पष्ट दर्शन होतें. लीळाचरित्रांतील आउसा ही चारी वर्णांच्या घरीं भिक्षा घेणारी आहे. वर्णभ्रष्टांना आपल्या उदार आश्रयाखालीं नाथ संप्रदाय सदैव आश्रय देत राहिला. शब्दप्रामाण्या-ऐवजीं अनुभूतींतून निर्माण होणारें आत्मप्रामाण्य त्यानें स्थिर केलें. पोथी-श्रद्धा आणि पंडिती वाद यांचा त्यानें धिक्कार केला. 'अडुसठ तीरथ हैं घट भीतर' या भावनेचें दृढीकरण करून वृथा देहक्लेशांवर कोरडे ओढले. आत्मशुद्धि हेंच आत्मसाक्षात्काराचें महाद्वार आहे, बाह्याचाराचें अवडंबर नव्हे, हा सिद्धान्त नाथ संप्रदायानें शतकंठांनीं उद्घोषिला.

ज्या महापुरुषाच्या विद्रोहिणी आत्मशक्तींतून हें सारें घडून आलें, त्याच्याविषयींच्या आदरानें मन भारावून जातें; मस्तक आपोआप त्याच्या वंदनीय स्मृतीपुढें लवतें. त्याच्या तपानें, प्रज्ञेनें आणि प्रतिभेनें नाथ संप्रदाय ज्ञानेश्वर-कबीरांसारख्या महापुरुषांनाहि प्रेरणा देण्याइतका चैतन्यशाली बनला. हिंदु-मुस्लिम ऐक्याचा प्रथम प्रणेता, अधोगत भारतीय साधनेचा उद्धारकर्ता, स्त्री-शूद्रांचा त्राता, लोकभाषांचा प्रथम पुरस्कर्ता आणि वर्णाश्रम-शब्दप्रामाण्य तीर्थयात्रा-व्रतोपवासादि कर्मकांड यांनीं कुचंबलेल्या चैतन्यहीन सर्वसाधारण समाजाला आत्मप्रामाण्याची वाट दाखविणारा गुरु गोरक्षनाथ आणि त्याचा नाथ संप्रदाय भारतीय साधनेच्या इतिहासांत चिरंजीव झाला आहे..

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २८१७८ वि: चरित्र
क्रमांक ८०१ नों: दि: २०/८/८८

REFBK-0010334